विषय काव्य
सं. नं. १२२८

REFBK-0007850

तव कथामृतं तप्तजीवनं कविभिरीडितं कल्मषापहम्।
श्रवणमङ्गलं श्रीमदाततं भुवि गृणन्ति ते भूरिदा जनाः॥
श्रीमद्भागवत १०-३१-९

•= श्री =•

# सुश्लोकमानस

गोस्वामी श्रीतुलसीदासजी यांच्या श्रीरामचरितमानसाचा
मराठी सुरस श्लोकानुवाद

भाग पहिला

## प्रथमसोपान--बालकांड

—: रचयिता :—

कॅ. डॉ. रामचंद्र चिन्तामण श्रीखंडे, एम्. बी. बी. एस्.
'वाङ्मय-श्री-खण्ड' 'सुश्लोक-गोविन्द' 'कुन्दमाला'
'सुश्लोककुमार' 'सुश्लोकमेघ' 'सुश्लोकमानस'
इ. चे संपादक, प्रकाशक व रचनाकार.

प्रथमावृत्ति
श्रीरामनवमी, शके १८७४

मूल्य ५ रुपये

सं. नं. २२२८०
दा. क्र. ७६५०

प्रकाशक व संग्राहक
कॅ. डॉ. रामचंद्र चिंतामण श्रीखंडे,
एम्. बी., बी. एस.
मंगळवार पेठ, कोल्हापूर.

सर्व हक्क स्वाधीन

पुणें येथील प्रमुख संग्राहक—
पं. महादेवशास्त्री जोशी, श्रीज्ञानराज प्रकाशन,
४२१ शनिवार, पुणें २.

मुद्रक—
वा. ना. ठकार,
श्रीसिद्धेश्वर प्रेस, कोल्हापूर.

रामाचा सतीला प्रश्न ( तरंग १४–३२ )



आश्चर्यचकित सती ( तरंग १४–३६ )



REFBK-0007850



दुःखी सती ( तरंग १५–१३ )



सतीचा कोप ( तरंग १५–४३ )



दक्षयज्ञविध्वंस ( तरंग १५–४१ )



नारदांचें भविष्यकथन ( तरंग १५–५१ )



मायानगरींत नारद ( तरंग २४–५१ )



नारदमोह ( तरंग २४–७५ )

# सुश्लोकमानस-बालकांड कांहीं चित्रप्रसंग.

९२२५०

मायामुक्त नारद ( तरंग २४–१० )



पाळण्यांतील राम ( तरंग ३४–६ )





कौसल्येची देवपूजा ( तरंग ३४–८ )



नैवेद्यस्वीकार ( तरंग ३४–८ )

जयमाला ( तरंग ४८–१३ )



परशुरामाचा क्रोध ( तरंग ४९–७४





परशुरामाचा मोहभंग ( तरंग ४९–८३ )



व्याकुल रावुमैना ( तरंग ५२–५४ )

॥ श्री ॥

'सुश्लोकमानसा' चें हें 'प्रथमसोपान–बालकाण्ड'

साधुवाङ्‌मयांत रमणाऱ्या पुण्यशील आर्यमहिला

# ती. गं. भा. श्रीभागीरथीबाईसाहेब द्वारकानाथ देशमुख,

## यांस अत्यंत आदरपूर्वक समर्पण केलें आहे.

चिंतामणिरत्नवरें भूषवि जी भारतासि सन्महिला ॥
मन्मानसभाग दिला त्या श्रीभागीरथीसि म्यां पहिला ॥१॥

– सदाशीर्वादाभिलाषी –

रामचंद्र चिंतामण श्रीखंडे

श्रीरामनवमी शके १८७४
ता. ३ एप्रिल १९५२



आनंदवीचि हृदिं उल्लसल्या अनन्त ।
प्रेमौघ हर्षहि उचंबळले मनांत ॥
तोच प्रवाह कवितासरिदोघ झाला ।
श्रीरामनिर्मलयशोजलिं पूर आला ! ॥

सु. मा. बा. तरंग ११।२८

विचारिशी रामकथाप्रसंग ।भागीरथीचा जणुं पुण्य ओघ।
करीतसे पावन सर्व लोकां । जो हर्षपूरें नुरवी र शोका ॥
प्रीती तुझी रामपदाब्जिं मोठी। जगद्धिताचाच विचार पोटीं ।
याकारणें प्रश्न करीसि गौरि! । ऐसें जगीं कोण परोपकारी ? ॥

सुश्लोकमानस बालकांड तरंग ११–श्लोक ५।६

## श्रीमच्छंकराचार्य, पीठ करवीर यांचे मंगलाशीर्वाद

॥ श्रीशंकर ॥

अनेकशक्तिसंघट्टप्रकाशलहरीघनः ।
ध्वान्तध्वंसो विजयते विद्याशङ्करभारती ॥

स्वस्ति श्रीमत्समस्तसुरवृन्दपूजितपादारविन्दशिवप्रतिबिम्बवर्यश्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यपदवाक्यप्रमाणपारावारपारीणयमनियमासनप्राणायामप्रत्याहारध्यानधारणासमाध्यष्टाङ्गयोगानुष्ठाननिष्ठतपश्चक्रवर्त्यनाद्यविच्छिन्नगुरुपरंपराप्राप्तषड्दर्शनसंस्थापनाचार्यश्रीमच्छङ्कराचार्यान्वयसंजाताभिनवपञ्चगङ्गातीरवासकमलानिकेतनकरवीरसिंहासनाधीश्वरश्रीविद्यानरसिंहभारतीकरकमलकिञ्जल्कोद्भवश्रीमदभिनवविद्याशङ्करभारतीस्वामिकृतानि श्रीभाकृसपरिवारच्छात्राणामनुदिनमेधमानभव्यजनकानि श्रीमच्छङ्कराराधनावसरीयनारायणस्मरणानि श्रीखण्डेइत्युपाह्वचिन्तामणितनुजनुषः डॉ० रामचन्द्रशर्मणः भव्याय भूयासुः ! विशेषस्तु—

तुळसीदासरामायण हिंदीमध्यें भक्तिरसाचा अपूर्व व अप्रतिम ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्याचा आस्वाद मराठी वाचकांना मिळावा या उद्देशानें तुम्हीं मराठींत त्याचा पद्यमय अनुवाद केला आहे. त्याचा ‘ बालकांड ’ हा भाग अवलोकनांत आला. अनुवाद अत्यंत अनुरूप झाला आहे. एका भाषेमध्यें असलेली मधुरता अन्य भाषेमध्यें त्याच अर्थामध्यें आणणें ही गोष्टअसामान्य असून प्रकृत काव्यामध्यें तुम्हांस ती साध्य झाली आहे. तुमचा उद्देश सफल झाला आहे, यांत अतिशयोक्ति नाहीं. मूळ ग्रंथ न पाहतां हा अनुवाद पाहिल्यास हा ग्रन्थ स्वतन्त्रच आहे, अशी प्रतीति येते. सरसता, मार्मिकता, प्रसन्नता, गंभीरता, भावपूर्णता इत्यादि गुण यामध्यें आविर्भूत झाले आहेत. अलंकारादिकांनीं मंडित असल्यामुळें हा ग्रंथ हृदयंगम असून रसिकांना व भाविकांना संग्राह्य आहे. विशेषतः भाविकांना अभ्यसनीय आहे. अशाच प्रकारें पुढील भागही तुमचेकडून परिपूर्ण होवोत अशी श्रीचन्द्रमौळीश्वरशारदांबाचरणीं प्रार्थना आहे. इति शम्

मु. करवीर मिति फाल्गुन कृ. २ शके १८७२

महानुशासनं वरीवर्ति । इत्यलम्

# निवेदन, पुरस्कार व आभार

वोहळें हेंचि करावें । जें गंगेचें आंग ठाकावें ।
मगही गंगा जरी नोहावें । तैं तो काय करी ॥
म्हणौनि भाग्ययोगें बहुवें पां हे । तुम्हां संतांचे मी पाये ।
पातलों आतां कें लाहें । उणें जगीं ॥

श्रीज्ञानेश्वरी, अ० १८–१७७३।७४.

श्रीरामचरितमानस या महाकवि गोस्वामी श्रीतुलसीदासकृत अलौकिक महाग्रंथाचा मराठी सुरस श्लोकानुवाद, श्रीकृपेनें जेवढा आतांपर्यंत मजकडून पूर्ण झाला, तेवढा महाराष्ट्रिय रसिकांना सादर करावा म्हणून, प्रथम विभाग सुश्लोकमानस बालकांड या अभिधानानें प्रकाशित करीत आहें. यापुढील अयोध्याकांडहि अनुवादून पूर्ण झालें असून तेंहि याचे पाठोपाठच सुश्लोक-मानस द्वितीय भाग म्हणून यथाकाल प्रकाशित करण्याचा मानस आहे.

हें सर्वच कार्य अतिशय प्रचंड आहे हें रसिकांस सांगावयास नकोच व त्याचा जेवढा भाग पूर्ण होईल तेवढ्याबद्दलहि धन्यता वाटण्यास हरकत नाहीं अशी ही भव्य काव्यसंपदा आहे ! ही सेवा महाराष्ट्रिय रसिक भक्तांना अतिशय आवडेल अशी आशा आहे.

माझा 'कुमारसंभव' महाकाव्याचा 'सुश्लोककुमार' हा अनुवाद चालूं असतां १९३५ चे सुमारास प्रथम श्रीमंत कै. यादवराव जामदार यांचें श्रीतुलसीरामायणाचें सुंदर भाषांतर माझ्या वाचनांत आलें. त्यांतील माधुर्य-पूर्ण भव्योदात्त कल्पनांनीं माझ्या अंतःकरणावर इतका परिणाम केला कीं, मीं त्याचवेळीं या ग्रंथाचा मराठी श्लोकानुवाद करण्याचें ध्येय योजिलें. बालकांडांतील प्रथमचे १२–१३ श्लोकच केट्टा येथें युद्धनोकरीनिमित्तानें १९४२–४३ मध्यें मी असतां रचले; पण पुढें पांच वर्षें या ग्रंथाच्या अनुवादाकडे लक्ष देण्याइतकी स्वस्थता नोकरींत मुळींच लाभली नाहीं. ती १९४७ मध्यें कोल्हापुरास परत आलों तेव्हां लाभून बालकांड अखेर रचना २५ मार्च १९४९ ला पूर्ण झाली. या कांडांतील रचनेचे माझे

अनुवादश्लोक सुमारें २१४० वर झाले आहेत. बालकांड सर्व कांडांत मोठें असून हा सर्व ग्रंथाचा सुमारें $\frac{1}{3}$ आहे. यापुढील 'अयोध्याकांड' हेंहि जवळजवळ तितकेंच मोठें असून त्याचें माझें अनुवादनकार्य सुमारें १८०० श्लोकांत नुकतेंच म्हणजे २७-१२-१९५१ अखेर पूर्ण झालें आहे. याप्रमाणें अजमासें ५ वर्षें इतका दीर्घ काल या सुमारें ४००० श्लोकांना लागला. राहिलेला भाग श्रीरामचंद्रकृपेनें आणखी वर्षभरानें पूर्ण होईल अशी थोर आकांक्षा बाळगितों व त्याचे सुमारें २७०० श्लोक होतील तेवढे झाले म्हणजे मगच हें महत्कार्य परिपूर्ण झालें असें म्हणतां येईल.

समग्र रामचरितमानसाचें यथामति रसिक समालोचन करण्याची संधि अनुवादसमाप्तीनंतरच सवडीनें साधावी हें योग्य होय. फक्त 'बालकांडा'-संबंधीं येथें थोडक्यांत परामर्श घेऊं इच्छितों.

बालकांडांत विषय काय आले आहेत त्याची कल्पना तरंगांच्या नांवांवरून येईलच. तुलसीदासांच्या प्रचंड प्रतिभेचा अविष्कार त्यांच्या मानसाच्या बालकांडांतील प्रस्तावनेंतच रसिकांस होऊं शकेल.

आरंभींचीं वंदनें, नाममाहात्म्य, मानसरूपक इ. बालकांडाच्या प्रास्ताविक विभागांतच रसिकभक्त वाचक अतिशय रमेल. मागाहून कथारंभ सुरू होतो. त्यांतील श्रीशंकरसतीवर्णन, श्रीशंकरपार्वतीविवाह इ. चीं वर्णनें अत्यंत हृदयंगम आहेत.

श्रीरामावतारास कारण असलेल्या अनेक कथाहि चमत्कृतिपूर्ण व रसाळ आहेत. विशेषतः नारदशापवर्णन, मनुशतरूपाख्यान, प्रतापभानूची कथा व त्यांतील कपटमुनिवर्णन, रावणदिग्विजयवर्णन, देवस्तुति, ब्रह्मवर-वाणीवर्णन, कौसल्येस परमपुरुषदर्शन, रामजन्मोत्सववर्णन, बाललीला-वर्णन, विश्वामित्रागमन-रामयात्रा, अहल्योद्धार, रामसीता यांचीं पुष्पवाटिकेंतील एकमेकांस दर्शनें, सीतास्वयंवर व नंतर रामसीताविवाहसमारंभ इत्यादि सर्वच वर्णनें अवीट माधुर्यानें भरलेलीं आहेत. हा सर्वच कथाभाग अत्यंत सुरस भक्तिनीतिवैराग्यतत्त्वानीं नटलेला असा आहे. ठायीं ठायींचीं

भक्तिरसवर्णनें, परमेश्वराच्या सगुणमूर्तीचीं केलेलीं नखशिखान्त वर्णनें हृदयंगमतेंत अप्रतिम आहेत. कल्पनाचमत्कृति व नानारसात्मक भावनाविष्कार यांनीं रसिकांचें हृदय सात्त्विक प्रेमानें वारंवार भरून आल्यावांचून राहणार नाहीं. श्रीतुलसीदासांच्या वर्णनांत पाल्हाळ आढळणें कठीण! सर्व वर्णनें समर्पक व अत्यंत औचित्यपूर्ण वाटतात. सुंदर शब्दालंकार व अर्थालंकार यांनीं त्यांचें 'मानस' नटलेलें आहे. उपनिषदें, गीता, श्रीमद्भागवत, हनुमन्नाटक, प्रसन्नराघव इ. प्राचीन वाङ्मयांतील कित्येक सुंदर विचाररत्नांचा तुलसीदासांनीं आपल्या दिव्य प्रतिभेनें अनेक ठिकाणीं उपयोग केलेला आहे. तुलसीदासांच्या सरस्वतीची, भक्तिभावाची व प्रतिभेची यथार्थ स्तुति करणें मला तर अशक्यच वाटतें. त्यांच्या कित्येक कल्पना इतक्या अभिनव आहेत कीं तुलसीदास हे व्यास-वाल्मीकि, कालिदास-भवभूति ज्ञानेश्वर-मयूरांप्रमाणें एक सर्वश्रेष्ठ कवि आहेत अशी त्यांवरून रसिकांस प्रतीति वाटल्यावांचून रहात नाहीं!

कविश्रेष्ठ संतशिरोमणि श्रीतुलसीदासजी यांचे विषयीं कविवर्य मोरोपंत म्हणतात—

श्रीवाल्मीकिच्च झाला श्रीतुळसीदास रामयश गाया ॥
तरिच्च प्रेमरसाची खाणी वाणी तशीच्च वशगा या ॥ १ ॥
याचें सुप्रेमभवन कवन निववितें सदा बुधा सरसें ॥
हें जों जों सेवावें तों तों सेव्यचि गमे सुधासरसें ॥ २ ॥

श्रीतुलसीदासांच्या चरित्राविषयीं जी अल्प माहिती उपलब्ध आहे तीवरून ते उत्तरहिंदुस्थानांत अलाहाबाद प्रयाग जिल्ह्यांतल्या राजापूर येथें इ. स. १५३२ त जन्मले. त्यांच्या वडिलांचें नांव आत्माराम दुबे व आईचें नांव श्री हुलसी. हे सरयूपारीण पाराशर गोत्री ब्राह्मण. असें सांगतात की तुलसीदास मूळ नक्षत्रावर जन्मल्यामुळें त्यांचा त्याग करण्याची पाळी त्यांच्या मातापित्यांवर आली! सुदैवानें श्रीनरहरि गुरूंनीं त्यांचा संभाळ केला व लहानपणींच त्यांना रसाळ रामकथा पढविली! संवत् १६३१ श्रीरामनवमीला (इ. स. १५७५ मध्यें) त्यांनीं श्रीरामचरितमानस ग्रंथाच्या रचनेस अयोध्येंत प्रारंभ केला. कांहीं कांडें तेथें रचलीं आहेत.

तत्पूर्वींच तुलसीदासांचा विवाह दीनबंधु पाठक ह्यांच्या रत्नावली नामक कन्येशीं होऊन त्यांना एक पुत्रहि झाला पण तो अल्पायु झाला. रत्नावलीवर तुलसीदासांचें अत्यंत प्रेम होतें. आख्यायिकेप्रमाणें तिच्याच शब्दांनीं तें प्रेम त्यांनीं श्रीरामचंद्रावर केलें व संसार सोडला! कांहीं मानससोपान त्यांनीं काशी येथेंहि रचले विद्वत्व, प्रतिभा व भक्तिभाव यांचा अपूर्व रम्य मीलनयोग तुलसीदासांच्या कृतींत दिसून येतो. तुलसीदासांचा अस्सी येथील तुलसीघाट सुप्रसिद्ध आहे. गेल्यासालीं तो पाहण्याचा व त्यांच्या पादुकांचें पुण्य दर्शन घेण्याचा सुयोग मला काशींत आला. संकटमोचन हनुमान् हेंहि तुलसीदासांचें तेथील निवासस्थान होतें, तेंहि रमणीय आहे. तुलसीदासांचें मानस संपूर्ण होण्यास सुमारें अडीच वर्षें लागलीं. तुलसीदासांचे इतर १२–१३ ग्रंथ प्रसिद्ध आहेत. पैकीं विनयपत्रिका, कवितावली, हनुमद्बाहुक, पार्वतीमंगल, जानकीमंगल इत्यादि अत्यंत रमणीय गणलीं गेलीं आहेत. तुलसीदासांची लोकप्रियता त्यांचे आयुष्यांत उत्कृष्ट दिसून आली. तुलसीदास हे काशी क्षेत्रीं संवत् १६८० श्रावण शुद्ध सप्तमी ( २४ जुलै १६२३ इ. ) दिवशीं रामरूपीं मिळाले! महाराष्ट्रांतील श्रीएकनाथ व श्रीरामदास हे थोर साधु पुरुष तुलसीदासांचे थोडेफार समकालीन होत. हिंदींत श्रीतुलसीदासांच्या कृतींवर इतकें वाङ्मय निर्मिलें गेलें आहे कीं तितकें अन्य कोणाच्याहि ग्रंथांवर झालेलें नाहीं.

मराठींत श्रीतुळसीरामायणाधारें समवृत्तांत झालेले दोन ग्रंथ आहेत. १. श्री. गणेश सदाशिव भोपटकर सं. ग्वाल्हेर यांचें ' मराठी चौपाईवृत्त रामायण ' ( स. १९२० ) यांत बराच भाग मूळाप्रमाणें व कांहीं स्वतंत्र भर घातलेला आहे. २. श्रीरामचरितमानस– हें चासचे प. प. प्रज्ञानानंदसरस्वती ( पूर्वाश्रमींचे श्री. दत्तात्रय नारायण कर्वे, बी.ए., एस.टी.सी.) यांनीं १९५० मध्यें प्रसिद्ध केलें आहे. हे दोन्ही ग्रंथ मोठ्या श्रद्धेनें निर्माण झाले आहेत. प्रज्ञानानंदसरस्वती यांच्या भेटीचा योग २ वर्षांमागें मला येथें आला. मीं माझा श्लोकानुवादहि कांहीं भाग त्यास दाखविला. व त्यांनींहि सानंद आशीर्वाद माझ्या कृतीस दिले हें लिहिण्यास आनंद होतो.

श्रीरामचरितमानसाची सर्व रचना दोहे, सोरठे, चौपाया व मधून मधून कांहीं कांहीं छंद इत्यादि रचनाप्रकारांनीं हिंदींत झालेली आहे. प्रत्येक

कांडाचे प्रारंभीं संस्कृत श्लोकांत त्याचें 'मंगलाचरण' रचलेलें आहे तसेंच कोठें कोठें कांहीं कांडांतून संस्कृत स्तोत्ररचना आढळून येते. सर्व रामायण हें एक मानससरोवर कल्पून त्याचीं सात कांडें म्हणजे बाल, अयोध्या, अरण्य, किष्किंधा, सुंदर, लंका व उत्तर असे हे त्या मानसप्रवेशाचे लहान मोठे सुंदर सोपान कल्पिले आहेत. व त्यांना विशिष्ट नामेंहि दिलेलीं आहेत. श्री सुकुल नामक टीकाकारांनीं प्रत्येक कांडाची पुनः तरंगांत विभागणी केलेली आहे. ती सोइस्कर वाटल्यामुळें तरंगांच्या नांवांसह सुश्लोकमानसांत मीं स्वीकारली आहे. इतरहि अनेक टीकाकारांनीं कांहीं समानार्थक तुल्य संस्कृत व हिंदी अवतरणें देऊन टीका हृदयंगम केलेल्या आहेत.

मराठींत श्रीरामचरितमानस अर्थात् श्रीतुलसीरामायण याचें सुरस गद्य भाषांतर हें सुंदर गद्यांत नागपूरचे विद्वद्वर्य कै. श्रीमंत यादव शंकर जामदार यांनीं करून तें चित्रशाळा प्रेस पुणें या संस्थेनें १९१३ मध्यें प्रथम छापिलें. त्याचीच द्वितीयावृत्ति २७ वर्षांनीं म्हणजे १९४० मध्यें निघाली आहे. कै. श्रीमंत जामदारसाहेब यांनीं आपल्या या भावमधुर उत्कृष्ट भाषांतरानें मराठी वाचकांवर फार मोठे उपकार करून ठेविले आहेत.

माझ्या अनुवादाच्या प्रारंभीं १९४२ मध्यें मीं श्री. जामदारांशीं पत्र-द्वारा परिचय करून घेतला व माझ्या श्लोकानुवादकार्यास त्यांचे आशीर्वाद लाभले. त्याचप्रमाणें त्यांनीं आपला 'मानसहंस' हा ग्रंथ मला मोठ्या आदरानें भेट पाठवून उत्तेजन दिलें. बालकांडापैकीं प्रारंभींचे ७८२ श्लोक सुश्लोकमानस बालकांड तरंग २३ श्लोक ४३ इतका भाग मीं त्यांचेकडे पाठविला व तो वाचून त्यांचें जें पत्र आलें त्यानें मला फारच प्रोत्साहन व समाधान वाटलें. श्री. जामदारांनीं अत्यंत हार्दिकतेनें लिहिलें—

॥ श्री ॥ नागपूर ३।४।४८

श्रीमान् कॅ. श्रीखंडेसाहेब,

सेवेसी कृ. सा. न. वि. वि. आपल्या ता. १८-३-४८ च्या आज्ञेची तामील म्हणून हें पत्र लिहितों आहें.

आपलें पुस्तक एक अमोल ठेवा आहे. तो सोडावासा वाटेना म्हणून आणि जास्त वाचन होईना म्हणून वारशीस विलंब झाल्याची माफी असावी

१८-३ तला, अनेक पण ठराविक वृत्तांची योजना कोठें कोठें अनिश्चितपणें देखील श्रीतुलसीदासांनीं कोणत्या उद्देशानें केली असावी ? असा प्रश्न आपण मला केला. पण प्रश्नकर्त्यानेंच जेथें प्रश्नोत्तर दिलें तेथें दुसऱ्या उत्तराची चाड काय ? आपल्या मानानें तुलसीकाव्यांत वृत्तें आलेलीं बोटावर मोजण्याइतकींच सांपडतील हें खास, मग तुम्हां दोघांत उद्देशाचा फरक तो काय म्हणून ?

असो. आपला संग्रह ( हस्तलिखित ) संपूर्ण वाचला. भाषा मृदु, मधुर व मंजुल वाटली. यमक असतें तर वाटतें कीं बहुतेक श्रीवामनीय काव्याचाच अवतार भासला असता.

आपली अनुवादशैली फार ऋजु, सरल आणि ललित वाटली. आपली काव्यशक्ति सहजस्फूर्त असून बरीच प्रभावी आहे. मला तरी निदान शोधून देखिल कोठें ओढाताण किंवा स्खलाखितपणा आढळला नाहीं. कांहीं भाग ( संवाद ) तर खूपच दणदणीत उतरले आहेत.

म्हणतात ना कीं शब्दावरून मन ओळखावें, हें जर खरें तर मलाही आशा वाटो कीं मी आपले स्वभावाचा अल्पसा तरी जाणता झालों. मग कां बरें म्हणण्यास मी धजूं शकूं नये कीं, आपलें जन्मस्थान धन्य आहे. म्हणूनच आपणांसारखे अभिजात कवि तें स्थान शोभवूं शकले.

आपलें काव्य अभिजात तर आहेच पण तें प्रसादयुक्तहि आहे हें निःसंशय.

पुस्तक परत करण्यास वेळ लागला. पण करणार काय ? सगळेच अवयव शिथिल आणि काव्य तर सुश्राव्य. असो; होऊन गेल्यावर आत त्याचें काय ?

पुस्तकांत कोठें कोठें कांही शोध अर्थात्च वेडे वांकडे कसेतरी टिपलेले आहेत ते नजरेखालीं घालणें.

पुस्तकाचीं कांहीं नासधूस झाली असल्यास क्षमा असावी. लो. अ. वि.

आपला

**यादव शंकर जामदार**

या रामभक्त श्री. जामदारसाहेबांना मीं १९५० मे मध्यें प्रथमच नागपूराला गेलों तेव्हां दोन दिवस दोन घटका भेटूं शकलों. त्यांना व मलाहि अत्यानंद झाला. बालकांडाचे शेवटचे ४०–५० श्लोक मीं त्यांस वाचून दाखविले. व ते त्यांस अत्यंत आवडले. व अनेक वेळां त्यांतील भक्तिप्रेम-भावनांनीं त्यांचें हृदय भरून आलें ! आम्ही एकामेकांस कडकडून भेटलों ! व त्यांचा जड अंतःकरणानें मी पुनः भेटीन असें सांगून निरोप घेतला. व पुनः तिसऱ्यादिवशीं त्यांस भेटून आलों. त्यांची वृद्धावस्था पुष्कळच झालेली होती. ह्या थोर पुरुषाचा अंत ता. १४ जाने. १९५१ ( मकरसंक्रांत शके १८७२ ) ला झाल्याचें पुढें मला नागपूरच्या 'तरुण भारत' वरून कळलें तेव्हां मला फार खेद वाटला ! कै. श्री. जामदार यांनीं आपला श्रीतुलसीरामायण रहस्य अथवा मानसहंस हा टीकात्मक प्रबंधाचा ग्रंथ मला १९४२ मध्येंच सप्रेम भेट पाठविला होता. तो रामचरितमानसाच्या अभ्यासकास उत्तम रहस्योद्बोधक वाटेल. त्यांचा अलीकडील एक इंग्रजी ग्रंथ वाल्मीकिरामायणाच्या रसग्रहणात्मक असून त्यांत सुंदर विवेचन आहे. हा ग्रंथ ' WALMIKI S RAMA & POLITICS, Presented to my esteemed friend. इ. लिहून त्यांनीं मोठ्या प्रेमानें प्रत्यक्ष भेटलों तेव्हां मला भेट दिला. ( १६ मे १९५० )

माझें ' सुश्लोकमानस ' बालकांड हा विभाग मीं, रसिक सत्कवि व टीकाकार श्री. वामन नारायण देशपांडे, यवतमाळ, यांजकडे प्रथम निंमा तयार झाल्यावर व पुनः समग्र पूर्ण होतांच पाठविला. श्री. वामनराव देशपांडे यांनीं मोठ्या रसिकतेनें सर्व कविता वाचून मला मत कळविलें तेंहि येथें देत आहे. प्रथमच्या म्हणजे ९।१०।४८ च्या पत्रांत त्यांनीं लिहिलें. " आपलें रामायण थोडें थोडें वाचून काल पुरें केलें. मला तें खरोखरच फार आवडलें. आपल्या अनुवादाची आतां नव्यानें तारीफ करीत नाहीं. मूळांतील सौंदर्य जास्तींत जास्त प्रमाणांत आणणें, व शक्य तेथें नवीन भर घालणें हे आपले गुण यांतहि दिसले. श्लोकांवरील आपलें प्रभुत्व तर हेवा वाटण्याजोगें आहे. असा हा उत्कृष्ट अनुवाद आपणांकडून पुरा व्हावा हीच हार्दिक इच्छा आहे. एवढ्या मोठ्या अनुवादाचें रसग्रहण सविस्तर व्हायला हवें..." पुढें संपूर्ण बालकांडानुवाद तयार होतांच त्यांजकडे मीं पाठविला. तो वाचून

* सं. क्रं. ........

त्यांचें पत्र आलें तेंहि येथें देतों:— "ता. १७।४।४९ टिळकवाडी, यवतमाळ स. न. वि. वि. काल रजि. नें आपली वही परत केली, तों पोंचलच बालकांडाचा नवीन भाग सर्व वाचला. तो मला खरोखरच आवडला. वृत्त व भाषा यांवर आपलें इतकें प्रभुत्व आहे कीं, आपली श्लोकबद्ध रचना वाचतांना मान डोलविण्याखेरीज दुसरें कामच उरत नाहीं! क्वचित एखाद दुसऱ्या शब्दाबद्दल मतभेद होतो. पण तो साहजिकच नाहीं कां? खेरीज, किरकोळ शब्दाबद्दलचा मतभेद नमूद करणें हा मला केवळ 'शिष्टपणा' वाटला! कारण सबंच रचना एवढी सफाइदार आहे कीं, असा शब्दविषयक मतभेद नमूद करणें हे डिपोटींनीं शाळा तपासतांना शिक्षकांच्या उगीच लहानसान चुका काढण्यासारखें अप्रयोजकपणाचें आहे! पूर्वीच्या अनुवादांत बेमालुम मिसळून जाईल असाच नवीन भागहि सुंदर झाला आहे. एवढें ह्मटलें, म्हणजे पुरें.

काव्य बारकाईनें वाचल्याची खूण ह्मणून व कांहींतरी उणीव दाखविली असे आपल्या मनाचें समाधान व्हावें म्हणून एका स्थळाकडे बोट दाखवितों. मूळ भाषांतर असें:—" निजतांना भुजंग आपल्या मस्तकावरील रत्नास ज्याप्रमाणें पोटांत लपवून ठेवतात, त्याप्रमाणें सासवा आपल्या सुनांना पुढ्यांत घेऊन निजल्या "

या सुंदर स्थळाचा आपला " त्या सुंदरी नववधू पुढतीच घेती। कीं नागिणी फणिमणी निज पोटिं घे ती." हा अनुवाद मुळाइतका स्पष्ट व रोचक झाला नाहीं. या एका दोषाखेरीज मला अन्य दोष आढळलेच नाहींत.

असो; आपणांकडून सर्व तुलसीरामायण अनुवादित होऊन प्रकाशित होवो हीच एकमेव इच्छा.... बाकी ठीक कळावें,

आपला,

वा. ना. देशपांडे "

अर्थात् या सूचनेवरून, वर उल्लेखिलेलें स्थळ मीं लगेच सुधारलें

राशी विनोदिं वदती ' रजनी विराजे।
तैशी गडे ! नगरिही अतिरम्य साजे' ॥

घेती सुनांसि निज त्या निजतां पुढ्यांत।
कीं, नाग शीर्षमणि ते उरिं झांकतात ॥ बालकांड तरंग५५।३७

कै. जामदार यांनींहि कोठें कोठें सूचना केल्या त्यांतीलहि कांहीं मला योग्य वाटल्यानें अधिक प्रसाद येण्यास मदत झाली.

सुप्रसिद्ध साहित्यिक बदलापुरचे श्री. नानासाहेब चापेकर यांनीं, छापलेला विभाग वाचून पुढील शब्दांत आपला असाच रसिक अभिप्राय व्यक्त केला आहे:—

" सुश्लोक श्रीखंडे ह्यांनीं ' सुश्लोकमानस ' ह्या नांवानें तुलसीदास-रामायणाचा मराठी अनुवाद करण्याचा संकल्प सोडून बालकांड पुरें करून भाविक रसिकांना उपकृत केलें आहे. तुळसीदासाचें मूळ हिंदी रामायणाचें भक्तीनें पारायण करणारे असंख्यजन उत्तर हिंदुस्थानांत आहेत. आपल्याकडील वारकरी पंथाप्रमाणें उत्तरेकडेहि नाममहिमा मानणारे लोक आहेत.

"रामाहुनीहि अधिकप्रभ रामनाम। नाझ्या मतें वितरि तेंचि सुख प्रकाम॥"

तरंग ६।३२.

महाराष्ट्रांत तितक्याच भक्तीनें रामकथा वाचली गेली नाहीं तरी ह्या अनुवादानें सुश्लोक श्रीखंडे आतां पुण्यश्लोक श्रीखंडे बनल्यावांचून राहणार नाहींत. आधींच 'सीतारामकथा मनोहर अशी भक्तासि चिंतामणि।'त.९।१६ ती आपल्या प्रासादिक काव्यरचनेनें ह्या चिंतामणिपुत्रानें अधिक मनोहर केली आहे. मला हिंदी समजत नसल्यानें अनुवाद अस्सल बरहुकुम उतरला आहे कीं नाहीं हें सांगता येत नाहीं. मी कवीच्या शब्दावर विश्वास ठेवतों. कवि श्रीखंडे सांगतात— ( तरंग ५–६ )

' जें वागधीश तुलसी विनयें वदे तो। तें रामही अनुवदोनि सभाव देतो '

तुलसीदासांनीं तसेंच अनुवादकारांनीं ' आम्हांला प्रतिभा नाहीं, वक्तृत्व नाहीं, साहित्यशास्त्र अवगत नाहीं ' असें विनयानें म्हटलें आहे तथापि 'हरिगिरीशपदाब्जीं लीन' असलेल्या ' शुद्धमति ' व ' कुतर्कहीन ' वाचकांना हें काव्य मधुर वाटेल असा त्यांस भरंवसा वाटतो. (तरग ३-४२-४४).

काव्यांत जर प्रसाद नसेल तर कवीचा हा तर्कही फोल ठरेल. भक्तिरस उत्पन्न होण्यास प्रसाद कारणीभूत होतो; आणि प्रसादसौष्ठव प्रस्तुत रचनेंत भरपूर आहे हें माझ्यासारख्या काव्यगुणहीनालाहि वाटतें. निश्चयानें वाटतें. कवी म्हणतात. आम्ही अनधीत आहों. असानात बिचारे. माझ्या मतें "कवी करिति काव्य हें-रसिक चाखिती स्वादु तें ॥" ( २३-२-५२ )

—ना. गो. चापेकर.

वर सविस्तर उद्‌धृत केलेले सुंदर अभिप्राय म्हणजे 'सुश्लोक-मानसा'स लाभलेले सुवर्णपुरस्कारच होत. माझ्या इतरहि अनेक मित्रांनीं प्रस्तुत बालकांडांतील सर्व वा कित्येक भाग वाचलेले आहेत, वा मी त्यांना वाचून दाखविले आहेत व त्यांनीं अत्यंत हर्षभरानें प्रशंसा करून मला सर्वप्रकारें प्रोत्साहन दिलें आहे. या सर्वांचा मी अतिशय ऋणी आहें. या मंडळींचा सामग्र्यानें नामनिर्देश करणें अशक्यच वाटत आहे. तथापि कविवर्य प्रो. हुपरीकर, श्री. वि. गो. साठ्ये, वे. शा. सं. विश्वनाथशास्त्री कात्रे, कवि वैद्य कापशीकर, पं. महादेवशास्त्री जोशी, ना. सर चिंतामणराव देशमुख डॉ. ग. वि. देसाई, पं. गणेशशास्त्री जोशी, रँ. वि. वा. नारळीकर व सौ. सुमतिदेवी नारळीकर, श्री. आराध्ये, ह. भ. प. श्री. राजारामबापू परदेशी,, वेदान्तशास्त्रज्ञ श्री. नाना शिंदे, श्री. बापूसाहेब पेटकर श्री. शालिग्राम, श्री. लक्ष्मीबाई जाधव, डॉ. जोग, रा. ब. बाळासाहेब पोवार डॉ. खानोलकर डॉ. खत्री, डॉ. पाध्ये, डॉ. राशिंगकर, श्री. वाशीकर, ती. सौ. पार्वतीबाई व ती. शंकरराव सरदेसाई, चि. सौ. लक्ष्मीबाई पंडित, चि. श्री. लक्ष्मीबाई कशाळकर, न्या. श्री. ग. नि. कात्रे, डॉ. कु. सुमति क्षेत्रमाडे, प्रो. श्री. शं. खानवेलकर इ. अनेक रसिकांचा मला साभार निर्देश करावासा वाटतो. म. म. पोतदार, म. म. मिराशी, प्रो. रा. शं. वाळिंबे श्री. माडखोलकर, श्री. वि. स. खांडेकर, ती. ग. वि. करंदीकर, सार्थ तर्कसंग्रहकर्ते रसिकवर्य श्री. कल्याण श्रीपाद उर्फ अण्णासाहेब कुलकर्णी, भक्तिश्रीमान् श्री. रामराव लाटकर, पं. पाध्येबुवा, चि. डॉ. वसंतराव व ती. भाऊसाहेब हुजुरबाजार, प्रि. अ. दाभोळकर, रियासतकार डॉ. सरदेसाई, श्री. एकांडे, कवि श्री. नाचर, डॉ. कु. कृष्णाबाई केळवकर, कविभूषण खापर्डे, श्री. शहाडे,

श्री. वि. ग. भाटवडेकर, श्री. वासुदेवराव पुसाळकर, ॲ. श्री. एम. बी. दीक्षित, नागपूर, श्री. बाळशास्त्री हरदास, ना. श्री. दादासाहेब मावळणकर, कवि हवलदार, अचलपुरचे श्री. गोरे या सर्वांचा मी फार आभारी आहें.

या विषयावर कै. गुणनिधान श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि राजेसाहेब औंध यांचेसमोर औंध येथील उत्सवांत अनेकदां व्याख्यानें देण्याचा मला सुयोग आला. त्याचप्रमाणें कोल्हापूर रोटरीक्लब व पुणें येथील रोटरी क्लब, मध्येंहि व्याख्यानें 'सुश्लोकमानसा' नुरोधानें मला देण्याची संधि रसिक मित्रांचे प्रेरणेनें लाभली. ह. भ. प. कीर्तनरत्न श्री. लक्ष्मणबुवा निजंपुरकर यांचे कृपेनें कीर्तनमेळाव्यांत भोर येथें मोठ्या श्रोतृवृंदासमोर या काव्यांतील कित्येक रम्य कल्पना मला मांगतां आल्या, असाच सुयोग ह. भ. प. श्रीराम गोसावी यांच्या नाशिक येथील प्रवचनांतहि त्यांचे कृपेनें श्रीबालाजीमंदिरांत लाभला. अनेक सज्जनांनीं 'सुश्लोकमानस' मधील श्लोक ऐकून व वाचून धन्योद्गार काढले व हें कार्य श्रीकृपें मजकडून लवकर पूर्ण व्हावें असें हार्दिक अभीष्टचिंतन केलें व मलाहि अत्यानंद वाटला. अध्यात्मकेंद्र सांगली, भारतीय साहित्य सहकार, बनारस येथें हि असे सुयोग लाभले.

रसिक कविवर्य ना. श्री. चिंतामणराव देशमुख भारताचे सन्मान्य अर्थमंत्रि यांनीं बालकांड तयार होत असतां व नंतर छापत असतां त्यांतील कांहीं भाग वाचून फारच आनंद प्रकट केला. त्यांनीं त्यांतील कित्येक भाग आपल्या परमपूज्य मातुःश्रींनाहि वाचून दाखविले याचा मला फार हर्ष वाटला. नुकतेंच त्यांनीं मला कळविलें "सुश्लोकमानस मधून मधून चाळून ती. आईस वाचून दाखविलें आहे. 'सुश्लोकगोविंद' व 'सुश्लोककुमार' यांच्या तोडीचें होणारसें दिसतें" श्री. चिंतामणरावांच्या मातुःश्री ती. गं. भा. श्री. भागीरथीबाईसाहेब या अत्यंत शालीन, सत्वशील व साधुवाङ्मयांत रमणाऱ्या भगवत्प्रेमी अशा सुमाता आहेत. प्रस्तुत कृति सुश्लोकमानस बालकांड हें त्यांस अर्पण करण्याचा सुयोग मला केवळ यदृच्छया साधतां आला, याची मला फारच मोठी धन्यता वाटते. या संकल्पसिद्धीस, मातृभक्तींत कौसल्यानंदनोपम असे स्वतः श्री. देशमुखसाहेब यांनींहि जो कायावाचामनें-करून सार्थ हातभार लावला त्याबद्दल त्यांचे कसे उतराई व्हावें हें कळत

नाहीं. त्याचप्रमाणें विद्वद्वर्य श्री. बाळ गं. खेर मुंबईचे पंतप्रधान यांनींहि ग्रंथ अवलोकन करून अतिशय प्रोत्साहन दिलें त्याबद्दल मी कृतज्ञ आहें. अंगीकारलेलें हें कार्य प्रचंड आहे. सर्वांच्या थोर साहाय्यानें हें श्रीकृपें पार पडणार आहे. सर्वांच्या प्रेरणेनें हा सर्व सुश्लोकमानस ग्रंथ माझे हातून यथाकाल लवकर श्रीसीतारामचंद्र पूर्ण करवून घेवोत हाच सदाशीर्वाद सज्जनांनीं मला द्यावा !

केकावली–टीकाकार ह. भ. प. रामदासानुदास, श्री. श्रीधर विष्णु परांजपे हनुमानगड वर्धा, यांनीं पुढील पद्यांत आपल्या उदात्त भावना माझ्या सर्व ग्रंथांविषयीं कोमलतेनें सुश्लिष्ट रामवंदनांत व्यक्तविल्या आहेत.

**मनो**ऽभिरामं **वचसो**ऽभिरामं **गोविन्द**रामं **सुकुमार**रामम् ।
**मेघा**भिरामं श्रवणाभिरामं सुश्लोक**मालं** प्रणमामि **रामम्** ॥ १ ॥
किं मिष्टं हरिभजनं मिष्टतरं किं सदुक्तहरिभजनम् ॥
मिष्टतमं किं चेत: श्रीखण्डं नाम रामचन्द्रस्य ॥२॥

त्याचप्रमाणें माझे एक सुहृद्वर्य रसिक कवि सोलापुरचे श्री. अनंत विष्णु लिमये यांनींहि रसिकतेनें व उत्साहानें सर्व ग्रंथ वाचून कांहीं सूचना केल्या व पुढील प्रेमळ पद्यांत आपल्या सद्भावनाहि प्रकट केल्या:--

चौपाइचा सजवितो तुलसी पलंग । ज्याला बघून भुलतें मम अंतरंग ।
त्याचेवरी बसविला रघुराजराम । संसारिंचे पुरवि जो मम सर्व काम ॥१॥
बावीसला शतगुणें करि राम श्लोक । वाचोन तोकसम हर्षति सुज्ञ लोक ।
मीं वाचिलें तुलसिचें नच एक पान । त्याचे कृतींस तरि दे२ अपूर्व मान ॥

सुश्लोकांचा अमृतमय हा रामरूपी प्रवाह ।
जो भक्तीनें पठन करितां सारि संसारदाह ॥
ज्याचेमध्यें जन कितिक ते नित्य स्नाना करीती ।
येई अंगावरि शिरशिरी गोड त्याची किती ती !॥३॥

पत्नीवरील दृढ टाकुनि प्रेम देई । ग्रंथामधें भुवनसुंदर राम गाई ।
ज्याचें असेल तुलसीसम गाढ प्रेम । होई खरोखरिच साध्य तयास राम ॥

वाचोन श्लोक रमणीय अशा कवीचे। होतें मला स्मरण वामनपंडिताचें।
देई चिरायु बल त्या कवि रामचंद्रा। ही एक आस पुरवीं मम रामभद्रा॥

**अ. वि. लिमये**

आमचे पुतणे चि. मो. शं. श्रीखंडे हुजुरबाजार बी. एस्सी. (ऑनर्स) यांनींहि पुढीलप्रमाणें काव्यांत आपल्या मनीषा काशीहून मला कळविल्या आहेत—

सुश्लोकमानसं काव्यमत्यन्तगुणशोभितम्॥
अचिराद् द्रष्टुमिच्छामो भवद्भिः सुप्रकाशितम्॥१॥
कथा रामायणी रम्या कविस्तु तुलसी महान्॥
अनुवादनशैलीषु सिद्धहस्तः पटुर्भवान्॥
एकैकं हि प्रमोदाय किमु यत्र त्रयं पुनः॥२॥ —श्रीमयूरेश्वर

यांस माझें उत्तर—

"श्रीरामचरितमानसकाण्डद्वयमाद्यमस्ति संपूर्णम्।
श्रीसीतारामकृपाप्रसादभाजो ममानुवादकृतौ॥१॥
सुश्लोकमानसं भूयाद्रसिकानां सतां मुदे।
संपूर्णं श्रीशकृपया मया चार्वनुवादितम्॥२॥
श्रीरामभक्तिमाधुर्यादतुला तुलसीकृतिः।
श्रीरामकृपया कुर्यान्मानसप्रेरणं मम॥३॥
हृदयंगमकाव्येन हृदयं मोहितं मम।
तुलसीदाससेवायां सोत्कण्ठं भक्तिभावितम्॥४॥
क्व रामचरितं रम्यं क्व मेऽल्पविषया मतिः॥
सतां हस्तावलम्बेन कुर्यात्सा रसमज्जनम्॥५॥
भवदीयसुशब्देन वृद्धिमायाति मद्बलम्।
सानन्दं मानसं जातं मदीयं प्रेरितं त्वया॥६॥
श्रीशारदासदननन्दनभूषणोऽयं कोऽप्येष राजति तरुस्तुलसीसमाख्यः।
यन्मञ्जरी मधुरसार्द्रतया मनोज्ञा श्रीरामनामसुधया हृदयं धिनोति॥७॥

सुश्लोकमानसं पूर्णं सुरसश्लोकसुन्दरम् ।
भगवत्कृपया भूयादचिरादिति मे मतिः ॥
भवादृशैः सद्रसिकैः समीक्षितं हंसैर्यथा निर्मलवारि मानसम् ।
सार्थं भवेन्मङ्गलभक्तिपूरितं रामायणं मे तुलसीप्रसादतः ॥९॥

या सर्वांनीं मला अत्यंत आनंदित केलें आहे. व त्यांचा मी फार आभारी आहें.

सुश्लोकमानसपैकीं कांहीं स्फुट कविता कोल्हापूरचे रसिक संपादक ' गर्जना'कार श्री. ग. ह. पाध्ये यांनीं गर्जनेंत आग्रहानें छापल्या. त्याच प्रमाणें पुण्याचे ' नवभारत ' मासिकाचे संपादक श्री. वडेकर यांनींहि दोन अंकांत मिळून ५२ श्लोक छापले; तसेंच पनवेलचे ' जनवाणी' मध्येंहि कांहीं श्लोक येऊं शकले याबद्दल त्या त्या संपादकांचा मी ऋणी आहें.

---

चित्रांचे चार ब्लॉक्स चित्रशाळा प्रेसचे श्री. रानडे यांचे कृपेनें लाभले याबद्दल त्यांचाहि मी साभार उल्लेख करतों. त्याचप्रमाणें श्रीशिवपार्वती यांचें चित्र व इतर चित्रें कल्याणच्या मानसांकांतून संपादकांच्या कृपानुज्ञेनें घेतलेलीं आहेत. रामचरितमानस काव्याचा अर्थ समजण्यास ज्या ज्या अनेक ग्रंथांचा मला उपयोग झाला त्यांचा त्यांचा मी फारच उपकृत झालों आहें.

[ टीपः— राहिलेला खालील श्लोक तरंग ११ श्लोक २५ व २६ यांचे दरम्यान २५ अ मानावा ]

ज्या स्नानपान न सरोजलिं लाभुनीयां । ये तो फिरून अभिमानसमेत वायां ॥
कोणी विचारि जर येउन त्यास कांहीं । निंदोनि सत्वर तया समजाउं पाही !,

कांहीं अशुद्धें सहज कळण्यासारखीं आहेत. तथापि सविस्तर टीपा व दुरुस्त्या परिशिष्टें इ. पुढील भागीं सवडीप्रमाणें देणेचा मानस आहे.

पूज्यवर श्रीमच्छंकराचार्य ( वे. शा. सं. पंडितवर्य श्री. मारुलकर-शास्त्री ) यांनीं प्रसन्नान्तःकरणानें 'सुश्लोकमानसा' स व मला जे मंगलाशीर्वाद दिले आहेत त्याबद्दल श्रींना मी सप्रणाम धन्यवाद देत आहें. ह. भ. प.

कीर्तनरत्न श्रीमुरलीधरबुवा निजंपुरकर व ह. भ. प. रामचंद्रबुवा शिरवळकर, संत दासगणू महाराज तसेच कवि आठवले, डॉ. तळवलकर, डॉ. कैकिणी, डॉ. पु. वि. घारपुरे, प्रा. आळतेकर, श्री. वि. वि. जोशी, श्री. जांभेकर, डॉ. केळकर प्रभृतींच्या सदिच्छा मला हर्षद झाल्या आहेत. याशिवाय अनेक मंडळींचे उल्लेख करावयाचे राहिलेच आहेत, किंबहुना हा आभारांचा सागरहि अपारच आहे! पुढील दोन विभागांत यथामति तें निदर्शन करूं शकेन अशी आशा करतों! सर्व छपाईचें काम अतिशय आपुलकीनें श्रीसिद्धेश्वर छापखान्याचे मालक श्री. बळवंतराव ठकार व त्यांचें पुत्रद्वय आणि सर्व कार्यदक्ष स्टाफ यांनीं केलें आहे. व पुढेंहि करतील. त्यांचे मी सानंद आभार मानतों. न्यूनाधिकाची सज्जन क्षमा करतीलच. शेवटीं श्रीसीतारामचंद्रास वंदन करून तूर्त विश्राम घेतों.

गुढीपाडवा शके १८७४
तारीख २६।३।१९५२
कोल्हापूर.

सदाशीर्वादाभिलाषी
**रामचन्द्र चिंतामण श्रीखंडे**

# सुश्लोकमानस, प्रथमसोपान-बालकांड

## अनुक्रमणिका


मुखपृष्ठ *
बालकांडांतील १६ निवडक प्रसंगाचित्रें पानें चार
अर्पणपत्रिका
श्रीमच्छंकराचार्य पीठ करवीर यांचा मंगलाशीर्वाद
निवेदन, पुरस्कार व आभार
सुश्लोकमानस एकूण तरंग ५५ पृष्ठें १७८

आर्ट पेपरवरील चित्रें

१ गोस्वामी श्रीतुलसीदास ( पृ. १ )
२ श्रीरामपंचायतन ( तरंग ५ )
३ श्रीशंकरपार्वती ( तरंग १९ )
४ भगवान् श्रीविष्णु ( तरंग ३१ )
५ अहल्योद्धार ( तरंग ३७ )

| तरंग | विषय | पृष्ठांक |
|---|---|---|
| १ | मंगलाचरण | १ |
| | श्रीगुरुचरणवंदन | २ |
| २ | भूदेव-संतांना वंदन | ३ |
| ३ | खलवंदन | ४ |
| | रामरूप जीवमात्रास वंदन | ६ |
| | श्रीतुलसीदासांचें आत्मलघुत्ववर्णन | ७ |
| ४ | रामभक्तिकवितामहिमा | ८ |
| ५ | कविवंदन | १० |


[ * मुखपृष्ठशीर्षक आमचा चि. यशवंत यानें केलें आहे. सर्वच ग्रंथ-योजनेंत त्याचें फार साहाय्य झालें आहे. ]

कीर्तनरत्न श्रीमुरलीधरबुवा निजंपुरकर व ह. भ. प. रामचंद्रबुवा शिरवळकर, संत दासगणू महाराज तसेच कवि आठवले, डॉ. तळवलकर, डॉ. कैकिणी, डॉ. पु. वि. घारपुरे, प्रा. आळतेकर, श्री. वि. वि. जोशी, श्री. जांभेकर, डॉ. केळकर प्रभृतींच्या सदिच्छा मला हर्षद झाल्या आहेत. याशिवाय अनेक मंडळींचे उल्लेख करावयाचे राहिलेच आहेत, किंबहुना हा आभारांचा सागरहि अपारच आहे! पुढील दोन विभागात यथामति तें निदर्शन करूं शकेन अशी आशा करतों! सर्व छपाईचें काम अतिशय आपुलकीनें श्रीसिद्धेश्वर छापखान्याचे मालक श्री. बळवंतराव ठकार व त्यांचें पुत्रद्वय आणि सर्व कार्यदक्ष स्टाफ यांनीं केलें आहे. व पुढेंहि करतील. त्यांचे मी सानंद आभार मानतों न्यूनाधिकाची सज्जन क्षमा करतीलच. शेवटीं श्रीसीतारामचंद्रास वंदन करून तूर्त विश्राम घेतों.

गुढीपाडवा शके १८७४
तारीख २६।३।१९५२
कोल्हापूर.

सदाशीर्वादाभिलाषी
**रामचन्द्र चिंतामण श्रीखंडे**

# सुश्लोकमानस, प्रथमसोपान-बालकांड

## अनुक्रमणिका

मुखपृष्ठ *
बालकांडांतील १६ निवडक प्रसंगचित्रें पानें चार
अर्पणपत्रिका
श्रीमच्छंकराचार्य पीठ करवीर यांचा मंगलाशीर्वाद
निवेदन, पुरस्कार व आभार
सुश्लोकमानस एकुण तरंग ५५ पृष्ठें १७८

आर्ट पेपरवरील चित्रें

१ गोस्वामी श्रीतुलसीदास ( पृ. १ )
२ श्रीरामपंचायतन ( तरंग ५ )
३ श्रीशंकरपार्वती ( तरंग १९ )
४ भगवान् श्रीविष्णु ( तरंग ३१ )
५ अहल्योद्धार ( तरंग ३७ )

| तरंग | विषय | पृष्ठांक |
|---|---|---|
| १ | मंगलाचरण | १ |
| | श्रीगुरुचरणवंदन | २ |
| २ | भूदेव-संतांना वंदन | ३ |
| ३ | खलवंदन | ४ |
| | रामरूप जीवमात्रास वंदन | ६ |
| | श्रीतुलसीदासांचें आत्मलघुत्ववर्णन | ७ |
| ४ | रामभक्तिकवितामहिमा | ८ |
| ५ | कविवंदन | १० |


[ * मुखपृष्ठशीर्षक आमचा चि. यशवंत यानें केलें आहे. सर्वच ग्रंथ-योजनेंत त्याचें फार साहाय्य झालें आहे. ]

| तरंग | विषय | पृष्ठांक |
|---|---|---|
| | वाल्मीकि, वेद, ब्रह्मा, देवता, शिव-पार्वती-प्रभृतींना वंदन | १० |
| | श्रीसीतारामधाम—परिवारादिवंदन | ११ |
| ६—७ | श्रीनामवंदन व नाममहिमा | १३ |
| ८—९ | श्रीरामगुण व श्रीरामचरितमहिमा | १७—२० |
| १० | 'मानस' प्रारंभ | २१ |
| ११—१२ | मानसाचें रूपक व माहात्म्य | २३—२८ |
| १३ | याज्ञवल्क्य-भरद्वाज संवाद व प्रयागमाहात्म्य | २८ |
| १४ | अगस्त्यशंभुसंवाद | २९ |
| | सतीचा भ्रम, सतीकृत रामपरीक्षा, रामप्रभाव व सतीखेद | |
| १५ | शंकरकृत सतीत्याग, शिवसमाधिध्यान | ३३ |
| | दक्षयज्ञगमनार्थ सतीनें केलेली प्रार्थना | ३६ |
| | पतीच्या अपमानानें दुःखसंतप्त सतीनें योगाग्नींत जळून जाणें, दक्षयज्ञविध्वंस | ३७ |
| १६ | पार्वतीजन्म व तिची तपस्या | ३७—४१ |
| | श्रीरामचंद्राची शिवास विवाहार्थ प्रार्थना | ४१ |
| १७ | सप्तर्षींनीं केलेली पार्वतीपरीक्षा | ४२ |
| | मदनाचें देवकार्यार्थ जाणें व भस्म होणें, रतीस वरदान | ४४—४६ |
| १८ | देवांची शंकरास विवाहार्थ प्रार्थना | ४७ |
| | सप्तर्षींचें पार्वतीकडे जाणें | ४७ |
| | शंकराची विचित्र वरात, शंकरपार्वतीविवाह | ४९—५३ |
| १९ | उमामहेश्वरसंवाद—शिवध्यानवर्णन, | ५४ |
| २०—२१ | श्रोत्यास सावध करणें, अभय देणें, | ५८—५९ |
| २२ | अवतारहेतु, जालंधरकथा रामस्वरूपवर्णन | ६० |
| २३ | नारदगर्व व मायेचा प्रभाव | ६३—७१ |
| २४ | विश्वमोहिनीस्वयंवर, शिवगणांस व भगवंतांना नारदशाप | ७० |
| | नारदाचा मोहनाश | ७१ |
| २५, २६ | मनुशतरूपांचें तप व त्यांस वरदान | ७१—७२ |

| तरंग | विषय | पृष्ठांक |
|---|---|---|
| २७,२८,२९ | प्रतापभानूची कथा | ७७ |
| २९ | रावणादिकांचे जन्म, ऐश्वर्य व अत्याचार | ८६–८८ |
| ३० | गोरूपधरा पृथ्वी व देव यांनीं केलेली विष्णुप्रार्थना | ९१ |
| | भगवंताचें आश्वासन | ९२ |
| | दशरथाचा पुत्रकामेष्टियज्ञ व राज्ञींचे गर्भवती होणें | ९३ |
| ३१–३२ | रामलक्ष्मणादिकांचे जन्म व उत्सव, नामकरण | ९४ |
| ३३ | त्यांचें बालचरित्र | ९६ |
| ३४ | रामांनीं कौसल्येस दाखविलेलें विराट् स्वरूप | ९७ |
| ३५ | बाललीलावर्णन | १०० |
| ३६ | विश्वामित्रांचें अयोध्येंत आगमन व रामलक्ष्मणांना नेणें | १०२–१०३ |
| | विश्वामित्रयज्ञरक्षण | १०४ |
| ३७ | अहल्योद्धार | १०५ |
| ३८ | श्रीरामलक्ष्मणांसह विश्वामित्रांचें मिथिलेस जाणें | १०५ |
| | श्रीरामलक्ष्मणांना पाहून जनकाची प्रेममुग्धता | १०६ |
| ३९ | श्रीरामलक्ष्मणांचें जनकपुरीनिरीक्षण | १०९ |
| ४० | धनुर्यज्ञरंगभूमिदर्शन, पुष्पवाटिकानिरीक्षण | १११ |
| ४१ | सीतेचें प्रथमदर्शन, सीतारामांचें परस्परदर्शन | ११४ |
| ४२ | श्रीसीतेचें गौरीपूजन व गौरीकडून वरप्राप्ति | ११६ |
| ४३ | रामलक्ष्मणसंवाद | ११८ |
| ४४–४५ | विश्वामित्रासह रामलक्ष्मणांचें धनुर्यज्ञरंगभूमिगमन | १२० |
| ४६ | धनुर्यज्ञशालेंत सीतेचें आगमन | १२३ |
| | जनकाचा पण बंदीजन पुकारतात | १२४ |
| | राजेलोकांकडून धनुष्य हलणें अशक्य होणें | १२५ |
| | जनकाची निराशाजनक वाणी | १२५ |
| | श्रीलक्ष्मणाचा क्रोध | १२६ |
| ४७ | धनुर्भंग | १२६ |
| ४८ | जयमाळ घालणें | १२९ |

| तरंग | विषय | पृष्ठांक |
|---|---|---|
| ४९ | श्रीरामलक्ष्मण व परशुराम यांचा संवाद | १३३–३९ |
| ५० | दशरथाकडे जनकाचें दूत पाठविणें, मंडपरचना | १४०–४१ |
| " | अयोध्येहून मिथिलेकडे वरात येणें | १४५–४७ |
| ५१ | वरातीचा जनकपुरींत प्रवेश व जनकाकडून थाटानें स्वागत | १४७–५१ |
| ५२ | श्रीरामसीताविवाह | १५१–६२ |
| ५३ | विवाहोत्सववर्णन | १६२–६९ |
| ५४ | वरात अयोध्येकडे परत येणें व | १७०–७३ |
| | अयोध्येंत आनंदीआनंद | १७३–७८ |
| ५५ | श्रीरामचरित्र ऐकणें व गाणें मंगलकारक | १७८ |
| | शुद्धिपत्र | १७९ |


---

| | |
|---|---|
| एकूण पद्यसंख्या | २१४१ |
| प्रारंभीं | १ |
| उपसंहार | ५ |
| इतर अधिक | ३ |
| | २१५० |

गोस्वामी श्रीतुलसीदास

नं.



तुलसीरूपिणे श्रीमद्वाल्मीकिमुनये नमः ।
यस्य प्रसादात्सुलभं स्वर्गीयममृतं भुवि ॥

सुश्लोकमानसप्रारंभ.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
सं. क्रमांक
9226

श्रीगणेशाय नमः ।

श्रीभवानीकमलेश्वराभ्यां नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।

श्रीसरस्वत्यै नमः ।

तुलसीरूपिणे श्रीमद्वाल्मीकिमुनये नमः ।

यस्य प्रसादात्सुलभं स्वर्गीयममृतं भुवि ॥ १ ॥

# ☆ सुश्लोकमानस ☆

## श्रीरामचरितमानस अर्थात् श्रीतुलसीरामायण

या महाकाव्याचा अनुवाद

### प्रथम सोपान

# बालकांड

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७८५०

मंगलाचरण

वर्णाक्षरां, अर्थ जयांत संचले । छन्दोरसां शोभलिं ज्यांत मंगलें ॥
विनिर्मिणारे चिरसौख्यदायक । वंदीत मी संतत वाग्विनायक ॥१॥

गौरीशंभू भक्तिविश्वासमूर्ती । श्रद्धाभावें वंदितों मी स्वचित्तीं
स्वान्तःस्थेशा, ज्यांविना सिद्धही ते । पाहायातें शक्त हो ! केविं होते ? ॥२॥

जो नित्यबोधमय शंकररूप होय । ज्या आश्रयें कुटिलही शशि वंदनीय ॥
तो मी नमीत गुरुराय कृपानिधान । होऊनि नम्र हृदयें पदपद्मलीन. ॥३॥

सीतारामगुणालयपुण्यारण्यांत नित्य रमणारे ॥
शुद्धज्ञानी कविवर-कपिवर ते मी नमीत भक्तहिरे ॥४॥

निर्मितिस्थितिविनाशकारिणी । सर्वदा सकलतापहारिणी ॥
सर्व भव्य करणार जानकी । मी नमीं रघुवरप्रिया निकी. ॥५॥

ज्याच्या मायेंत वागे जग, विधिमुख ते देवदैत्यादि तैसे
ज्याच्या सत्त्वें खरेसें सकल गमतसे, रज्जु कीं सर्प भासे ॥
संसाराब्धी तराया प्लव नच दुसरा यत्पदावीण त्यातें
वंदीं मी रामचंद्राभिध विभु हरितें, कारणाच्या परातें ॥६॥

जें कीं मान्य पुराणशास्त्रनिगमां, जें गीत रामायणीं,
जें अन्यत्रहि कांहिं चारु गमलें श्रीरामसत्कीर्तनीं, ॥
तें हें श्रीतुलसी लिही प्रभुकृपें स्वान्तःसुखाकारणीं
भाषा मंजुल योजुनी रसभरें पीयूषसंचारिणी. ॥७॥

## तरंग १ ला.

ज्याचें शुभस्मरण सिद्धिद सर्व कामीं । तो श्रीगणेश गुणराशि नमीतसें मी
श्रीशारदावर गजानन विघ्नहर्ता । माझ्यावरी करुं अनुग्रह बुद्धिदाता ॥१॥
ज्याची कृपा करि जडासहि वागधीश । आरोहवी गिरिहि दुर्गम पांगळ्यास
होवो दयाळ विभु तो कलिपापनाशी । माझ्यावरी सकृप संतत सौख्यराशी २
इंदीवराभ तनु नील सजे जयाची । रक्तोत्पलापरि विलोचनकांति साची
ऐसा रमेश मम नित्य हृदब्जधामीं । क्षीराब्धिवासि वसती करुं दे, म्हणें मी ३
कुन्देन्दुशुभ्रवपु वल्लभ गौरिचा कीं । जो हो दयाब्धि करुणायुत दीन लोकीं
ज्यानें महान् मथियलें मदनासि रागें । तो हो कृपाळु शिव, मी नच अन्य मागें
मी वंदितों नरहरी गुरुराय माझा । वाटे हरीच नररूप कृपाब्धिराजा
ज्याचें गमे वच जणों रविसें प्रतापी । अज्ञानरूप तिमिरा नुरवी कदापि ! ५
म्यां वंदिलें गुरुपदाब्जरजःकणांतें । ज्यांचें यथार्थ गुणगान न ये कुणांतें
अत्यंत दिव्य, रसशालि, सुगंधपूर्ण । भक्तांवरी करिति जे अनुराग तूर्ण ६
ते चूर्ण कीं अमृतवल्लरिच्या मुळांचें । संसारदुःखनिकरा शमवीत साचें
आनंदनिर्मिति समग्र जया अधीन । कीं ती महेशतनुचीच विभूति जाण ! ७
भक्तांचिया हृदयरूपक आरशाला । जी पादधूलि करि निर्मल सर्वकाला
जी लावितां लवहि सादर आत्मभाला । ती लेववी शुभगुणाढ्य गळ्यांत माला ८

तीं चिंतितां मणिनखें गुरुच्या पदांचीं । ये दिव्यदृष्टि हृदयीं भजकां सदाचि
अज्ञानरूप तिमिराप्रति नाशिते जी । ते धन्य यद्हृदय नाहत त्या सुतेजीं !
तेजें स्फुरे विमल दृष्टि तयें हृद्ब्जीं । संसाररात्रतम दोष विनाशि कीं जी
जी गुप्त वा प्रकट रामचरित्ररत्नें । खाणींतलीं इतर वा वितरी अयत्नें १०
जैसे पहाति जगिं मांत्रिक सुज्ञ सिद्ध । घालोनि अंजन भले नयनीं प्रसिद्ध
तीं तत्क्षणींच दिसतें सहजीं निधान । जें गुप्त शैलिं, वनिं, भूतलिं वर्तमान ११

इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकलिकलुपविध्वंसने बालकाण्डे
**श्रीमद्गुरुचरणकमलनखप्रतापवर्णनं** नाम प्रथमस्तरङ्गः ।

## तरंग २ रा.

श्रीसद्गुरुप्रभुपदाब्जरजांसि नामी । घालोनियां मृदुल सुंदर अंजना मी
माझ्या विवेकनयना करुनी विशुद्ध । गाईन रामचरिता, करि जें अबद्ध १
मी वंदितों प्रथम भूसुरपादकंजें । अज्ञान, मोह, भय वारिति जीं स्वतेजें
जे होत कीं सकल सद्गुणरत्नखाणी । ते संत संतत नमीं मन-बुद्धि-वाणीं ॥२॥
हो कापसासमचि साधुचरित्र खास । नाहीं रसाढ्य परि शुद्ध धरी गुणांस
साहे स्वदुःख परि तो परदोष झांकी । हो वंद्य, यास्तवचि कीं स्तवनीय लोकीं ३
आनंदमंगलनिधानचि होत संत । जे कीं प्रयाग जणु जंगम भासतात
श्रीरामभक्ति गमली सुरसिंधु होय । हो ब्रह्मचिंतन जलौघ सरस्वतीय ॥४॥
पापापहा विधिनिषेधमयी तयांत । कर्मात्मिका जणु कथा यमुनाचि होत
तेथें त्रिवेणि गमली हरिची, हराची । त्रैलोक्यपावनकथा शुभकीर्ति साची ॥५॥
प्रेमा स्वधर्मि दृढ हाच वट प्रयागीं । सत्कर्ममग्न जन हेंच सुतीर्थभागीं
सर्वस्थळीं सकलवेळिं सुलभ्य सर्वा । क्लेशां निवारि सकलां भविं साधुसेवा ॥६॥
ऐसा अलौकिक जगांत अवर्णनीय । सद्यः फला वितरि अद्भुत तीर्थराय
ऐकोनि तीर्थमहिमा अति आदरानें । या साधुसंगमिं नरें करणेंचि न्हाणें ॥७॥
सद्भक्तियुक्त हृदयें मनिं हर्षुनीयां । सत्तीर्थि मज्जन नरें करितांक्षणीं या
त्या लाभतील जगतीं पुरुषार्थ चारी । ऐसा प्रभाव धरि तें शुभतीर्थवारि ॥८॥
तें स्नान दाविल महत्फल हें क्षणांत । कीं काक सेवि पिकता, बक हंस होत;
आश्चर्य यांत कसचें ? शुभ संगतीचें । माहात्म्य थोर कळणार कुणा न साचें ! ९

वाल्मीकि, नारद, अगस्ति, मुनीन्द्र थोर । जे सांगती निजचरित्रकथाविचार
सत्संग हेंचि निज उन्नतिचें निदान । तो मात्र रामपदपद्मकृपेविना न ! १०
व्योमीं, जलीं, स्थलिं चराचर सृष्टि जी कीं । ती जाणते जगतिं, भूतलिं, वापि नाकीं
सद्बुद्धि, कीर्ति, गति, वैभव, साधुताही । सत्संगतीविण नसेचि सुलभ्य कांहीं !
सत्संगतीस्तवचि होत विवेकलाभ । ती लाभते जरि कृपा करि कंजनाभ
आनंदमंगलविनिर्मिति साधुसंगें, । हो साधनें सुमतती, फल सिद्धि चांगें १२
लोकीं शठासहि सुधारित साधुसंग । लोहास दे परिससंगति कांचनांग
दैवें कुसंगति मिळे कधिं सज्जनासी । ना ती गुणा फणिमणींतिल जेविं नासी १३
गाताति साधुमहिमा विधि, विष्णु, शर्व । त्यांसीहि साधुमहिमा कथवे न सर्व
तो केविं आकलन होय समग्र मातें । होईल शाकवणिका मणिमूल्य का तें ? १४
मी वंदितों सकल संत समानचित्त । नाहींच भेद अरि-मित्र असा जयांत ।।
जैसी सुगंध सुमनांजलि दे करांस । दोघांहि तुल्यचि अभेदपणें सुवास ।। १५
कल्याणकारि जगता, सरलस्वभाव । सद्भावपूर्ण सदयांतर संत नांव ।।
ऐकोनि बालविनती, मज हेंचि द्यावें । हो चित्त पूर्ण रघुनायकभक्तिभावें ।।१६।।

इति साधुगुणस्वभावलक्षणवर्णनं नाम द्वितीयस्तरंगः ।

## तरंग ३ रा.

जे कीं अकारण भल्यांशिहि वक्रगामी । त्या दुर्जनांप्रति अतां नमितों अहो ! मी
ज्या अन्यहानिच गमे निजसौख्यपूर्ति । ज्या अन्यसौख्य दुखवी, सुखवी परार्ति
जे होत विष्णुहरकीर्तिशशीसि राहू । जे अन्यकार्यहननार्थ सहस्रबाहू ।।
जे अन्यदोष बघण्यास सहस्रनेत्र । जे अन्यलाभघृतिं माशिसमान मात्र ! २
जे उग्र अग्नि महिषासुरसे अघोर । जे पापदुर्गुणनिधानधनी कुबेर ।।
ज्यांचा असे उदय हानिद केतुसाच । जे कुंभकर्णसम संतत झोंपतीच ३
नाशेंहि जे स्वतनुच्या परकार्यजाता । गारा जशा कृषिसि होति सदैव घाता ।।
जे अन्यदोषकथनीं जणुं शेषमाना । जाती सहस्रमुखिं, वंदन त्या खलांना !! ४
जे ऐकतात परपाप सहस्रकर्णी । जैसा पृथू हरिकथा जरि कोण वर्णी ।।
वाग्वज्र ज्यां प्रिय सदैव सहस्रनेत्र । जे पाहती खलमती परदोष मात्र ।।५।।

ज्यांतें सुरानीक* रुचे विशेष । म्हणोनि ज्यां इंद्रतुलाचि खास ॥
त्यां वंदितों सादर मी खलां हो ! । न त्यांविना हा रस चाखला हो ॥६॥
असो उदासीन, अरी, सखा वा । न ऐकवे तद्धित दुर्जनांतें ॥
जाणोनियां मी करयुग्म माझें । हें जोडितों त्यांप्रति लीनचित्तें ! ॥७॥
मीं प्रार्थना मजकडूनि खलांसि केली । स्वीकार ना करिल ती परि मूर्ति भोळी !
कीं पोसिलें जरिहि सादरचित्तिं काका । मांसाशना त्यजिल तो जगतीं कदा का !
मी वंदितों चरण सज्जनदुर्जनांचे । दोघेहि देति जगिं दुःख समान साचें ॥
प्राणान्तदुःख विरहीं वितरीति संत । तैसेंचि देति खल मीलनिं ते नितान्त
एक्याच वेळिं जगतीं खल, साधु येती । ये भिन्नता गुणिं परी उभयांचिया ती
हो प्राप्त पंकज, तशा जळवा जळांत । अत्यंत भिन्न गुण त्या उभयांत होत १०
पीयूष साधु सम; मद्य खलोपमा घे । घेती अगाध जलधींतचि जन्म दोघे ॥
आपापल्या कृति भल्या, अभल्या करूनी । घेती सुकीर्ति, अपकीर्ति जगांत दोनी
भागीरथी, अमृत, शीतमयूख, संत । पापापगा, गरळ, अग्नि तसे कृतान्त
लोकीं गुणागुण कळे सकलां जरी तो । जो ज्यास आवडत त्या प्रति तो धरीतो

साधुत्व ये साधुगुणेंचि लोकीं । नीचत्वही नीचपणें कळे कीं; ॥
ख्याती सुधेची अमरत्वदानें । मृत्युप्रदत्वें विषकीर्ति जाणे ॥१३॥

होती महाब्धि खल दुर्गुणपातकांचे । तैसेच सज्जन गुणग्रहणादिकांचे ॥
दोनी अगाध, नच पारहि त्या द्वयासी । याकारणें लवचि वर्णित मी तयांसी १४

न त्याग वा स्वीकृति योग्य होते । दोषां गुणां पारखिल्याविना ते ॥
निर्मी विधाता खल साधु दोनी । पृथक्पणें वेदहि ज्यांसि वर्णी ॥१५॥

हें सांगतात इतिहासपुराणवेद । कीं सृष्टिमाजिं गुणदोष अनंतभेद ॥
दुःखें–सुखें, दुरित-पुण्य, निशा-प्रभात, । साधू असाधु शुभजात, तसें कुजात
तैसे सुरासुर, सुधाविष, जीव–नाश । माया–सनातन, जगत्प्रभु–जीवनाश ॥
श्रीमंत-पामर, महान्–लघु, भूप-रंक । वाराणशी–मगध हीं युगलें अनेक ॥१७॥
भागीरथी अघहरा, शुभकर्मनाशा । म्लेंछ–द्विजाति, मरु–मालव देश तैसा ॥
स्वर्लोकता-नरक; राग-विराग जोड्या; । शास्त्रीं, पुराणिं, निगमीं कथिल्या न थोड्या

---

* श्लिष्टार्थानें सुरानीक म्हणजे देवांची सेना–हा इंद्रपक्षीं अर्थ; सुरा नीक म्हणजे मदिरा खरोखर अगर हितकर, असा खलपक्षीं अर्थ.

धाता चराचर अशी गुणदोषपूर्ण । सृष्टी रची विविध; घेति जिच्यामधून ॥
हंसासमान गुणदुग्धचि संत थोर । टाकूनि देति विकृती समजूनि नीर ॥१९॥
ऐसा विवेक जर ईशकृपेंकरून । होई तरीच मन टाकुनि दोष पूर्ण ॥
घेईल सद्‌गुणचि केवळ आवडीनें । ही हंसवृत्ति परमेशकृपेंचि बाणे ॥२०॥
काल, स्वभाव, कृति यांहिं भलेहि चित्तीं । मायातमीं सुकृतिमार्गि चुक्या करीती ॥
ऐशा चुक्याहि परि शोधिति ईशभक्त । वारूनि दुःख, अघ, कीर्तिच जोडितात
होतां सुसंग, खळही जगिं दर्शवीती । कीं ते सदा सुकृतिमग्न, खरे निजान्तीं
त्यांच्या परी खळ कधीं न कुकार्यि होई । त्या दांभिकां भजति जे, अति दुष्ट तेही.
ऐसें असे तरि सुनिश्चित हेंचि हो कीं । पापें खळांसि फळतींच समग्र लोकीं
हे राहु-रावण खलाग्रणि कालनेमि । अंतीं तयां उघड हो पतन स्वकर्मीं ॥२३॥
हो कां अमंगल असा जरि साधुवेष । सन्मान साधुसि मिळेचि जगीं विशेष ॥
हें जांबुवंत हनुमंत निदर्शवीती । नोहे असत्य जगतीतलिं ही सदुक्ति ॥ २४
नाशास कारण कुसंगति हेंचि मुख्य । देई सुसंगति जगीं बहु लाभसौख्य ॥
वेदींहि गाइयलि हीच पुराणनीति । लोकींहि हेचि दिसते व्यवहाररीति ॥२५
धूलीहि उंच रिघते नभिं वायुसंगें । ती पंक होत अवनीतलिं वारियोगें ॥
सद्गेहिं गाति हरिला शुकसारिकाही । देतात त्या परि शिव्याच असाधुगेहीं ! २६
हो धूर कज्जल कुसंगतिनेंच लोकीं, । तें शाइ होउनि पुराणकथाहि लेखी ॥
हो तोच वह्निजलवायुसमूहयोगें । अंभोद विश्वसुखदायक त्या सुसंगें !॥ २७ ॥
वस्तूसि लाभत कुसंग, सुसंग जैसा । लागेचि दोष अथवा गुण तीस तैसा ॥
लोकांत भेषज, जल, ग्रह, वस्त्र, वात । योगेंचि साधु अथवा गुणहीन होत ॥
योजूनि तेज अथवा तम तें समान । पक्षद्वया विधि करी, न गुरू न सान;
मानोनि सस्य करि एक, दुजा विशोषी । आद्या स्तवीत जन, दूषण दे दुजासि.
जाणोनि सर्व जड चेतन विश्व राम । मी अंजली रचुनि वंदि तदंघ्रिपद्म ॥
ऐसें सदैव मम चित्त रमो नितान्त । श्रीरामचंद्रचरणीं सुख हें अनंत ॥३०॥

ते देव, दैत्य, नर, नाग, विहंग, भूत । गंधर्व, किन्नर, निशाचर मी नमीत ॥
हे सर्वही मज कृपा करुं देत ऐशी । मी प्रार्थना करितसें विनयेंचि त्यांसी
चौऱ्यांशि लक्ष जगिं ज्या बहु जीवजाति । साऱ्या जलस्थलनभश्चर भिन्न होती
सीतारघूत्तममयां समजूनि त्यांला । मीं हा प्रणाम कर जोडुनि अर्पियेला ॥३२॥

सं. नं.

हा आपुला प्रणत किंकर जाणुनीयां । दावा कृपा करुनि लेश खरोखरी या
मी जाणतों किति सुदुर्बल बुद्धि माझी । ही प्रार्थना करितसें म्हणुनीच, आजीं ॥
श्रीरामसद्‌गुणकथारस गाउं पाहें । मी अल्पधी, रघुचरित्र अगाध आहे ॥
कांही सुचे नच उपाय मला अशांत । धी-चित्त दीन, परि हेतु महा वहात !
ही नीच मन्मति अती, परि उंच हांव । कांक्षी सुधेसि; जरि तक्रहि तें न नांव !
मद्‌धार्ष्ट्य सज्जन परि क्षमितील साच । ते ऐकतील गणुनी निज बालसाच !
हो बोबडेंहि जरि भाषण बालकाचें । माता, पिता मुदित ऐकति त्या सुवाचे
जे क्रूर वक्र कुमती, सुनयीं अपात्र । ते दोषदर्शनपटू हंसतील मात्र ! ॥३६॥
कोणा कवित्व अपुलें नच आवडे हो ! ? । हो कीं रसाळ अथवा रसशून्य तें हो;
ज्या अन्यकाव्य परिसोनि सहर्ष होती । ऐशा न फार मिळती जगतीं विभूति
येतां जलौघ भरती सरिता, तटाक । त्यांच्यापरी असति लोक जगीं अनेक ॥
हेलावतो बघुनि पूर्ण शशीस सिंधु । तैसा जगांत विरळा जन लोकबन्धु ! ॥३८॥
अत्यल्प मद्‌गुण तरी अभिलाष थोर । विश्वास एक दृढ तें धरितें ममोर ॥
ऐकोनि रामगुण सज्जन तुष्टतील । होतील दुष्ट जरि कीं उपहासशील ॥३९॥
माझ्या हितासचि करी खल निंदिणार । बोलेचि काक कलकोकिलही कठोर ॥
हंसा हसेचि बक, बेडुक चातकाला । पुण्या कथेसि खल निंदक तेविं झाला.
ज्यांतें कवित्वरुचि, ना जरि भक्ति रामीं । त्यांनाहि हास्यरस ठेविल सौख्यधामीं;
भाषा असंस्कृत, मतिप्रतिभाहि सान । हास्यास्पदा जन हसे, तरि दोष त्या न !
प्रीती न रामपदिं, जे परि बुद्धिमंत । त्यांतें कथारस पिकाच्च गमेल यांत ॥
वाटेल त्यां मधुर ज्यांस कुतर्कहीना । शुद्धा मती हरिगिरीशपदाब्जि लीना
जाणोनि भूषवि हिला रघुरायभक्ति । ही सज्जनीं परिसुनी स्तविजेल उक्ति ॥
वक्तृत्व नाहिं मज, कांहिं कवित्व नाहीं । विद्या नसे मज, नसेचि कलाहि कांहीं
ना अक्षरार्थ कळतो, न अलंकृतीहि । वृत्तप्रबंधरचना कळते न तीहि ॥
मी जाणतों रस न भावविभाव नाना । जाणें न काव्यगुणदोषविवेकमाना ४४
माझ्यांत शक्ति नच त्या प्रतिभादि साऱ्या । हें सत्य मी लिहुनि कागदिं देत कोऱ्या!
( जें बोलिलें तुलसिदास-कवीश्वरानें । त्यातेंचि मी अनुसरें अपुल्या स्वरानें ४५ )
आहेचि सर्वगुणहीन मदीय वाणी । एका गुणास परि नाहिंच तींत वाणी ॥
त्याचा विचार करुनी श्रवतील तीतें । जे संत, साधुमति शुद्धविवेक कीं ते ॥४६॥

—: इति विमलनीचानुसन्धानवर्णनं नाम तृतीयस्तरंगः :—

## तरंग ४ था

शोभे महा रघुपनाम इथें उदार । अत्यंत पुण्यकर वेदपुराणसार ॥
जें मंगलायतन नाशि अमंगलांतें । प्रेमें जपे शिव उमेसह रंगला तें १
वाणी विचित्र सुकवी रचितो, तरी ती । ना रामनामविण शोभत साधुरीतीं
चंद्रानना, बहु अलंकृतिनीं सुरेखा । वस्त्राविना मुळिंच शोभत नाहिं, देखा.
कैशी असो कुकविची गुणहीन वाणी । आहे तथापि रघुनाथयशासि खाणी
तीतेंचि ऐकतिल, गातिल थोर सारे । सेवीति संत जणुं भृंग गुणा रसा रे
नाहीं कवित्वरस एक जरीहि यांत । रामप्रताप परि शोभत येथ मूर्त ॥
विश्वास हाच धरि थोर मदन्तरंग । श्रेष्ठत्व देत कवणा नच साधुसंग ? ४
टाकोनि आत्मकटुता सहजाहि दूर । होतोचि चंदनसुसंगें सुगंधि धूर ॥
वाणी तशी मम अयोग्य, कथा तथापि । ही राघवीय करि मंगल, विश्व तर्पी ! ५

मंगलराशी कलिमलनाशी रघुरायकथा रचि तुलसी ।
सुरसरिता जशि पावन हे तशि गति जरि उभयां कुटिल अशी ॥
प्रभुच्या सुयशें संगत सुरसें कविता तोषवि सुजनमना ।
शिवांगसंगति चिताविभूती संस्मरणीया शुभनमना ॥६॥

साऱ्यांसही अति रुचेल मदीय काव्य । कीं त्यांत संगत असे प्रभुकीर्ति भव्य
सौगंधयुक्त तरुचा मलयाद्रिसंग । काष्ठत्व लोपवुनि दे अगरुप्रसंग ७
श्यामा जरी सुरभि, दुग्ध तिचें विशुद्ध । प्याया गुणप्रद तया जन सर्व सिद्ध ॥
ग्राम्या जरी मम गिरा, तरि रामसीता । यांच्या यशें बुध तिला स्तवितील गाता
देखा, मणी रुचिर माणिक आणि मोतीं । शोभा न नागशिरिं, शैलिं, गजीं धरीती
जैशीं नृपालमुकुटीं, ललनाजनांगीं । तीं शोभती अधिक सुंदर त्या प्रसंगीं ९
तैशीच सत्कविकृती, बुध बोलतात । अन्यत्र शोभत, न ज्या स्थलिं जन्म घेत
श्रीशारदा विधिगृहा त्यजुनीहि धावे । पावे कवींसि हृदयीं स्मरतांच भावें १०
ते धावनश्रम तिचे सगळे हराया । होती उपाय शतकोटिहि अन्य वाया ॥
श्रीरामचंद्रचरिताख्यसरःपयाचे । स्नानाविना श्रम तिचे न सरावयाचे ॥११॥
ऐसा विचार करुनी कविपंडितांनीं । गाईयली अघहरा हरिकीर्ति गानीं ॥
सामान्य लोकगुण गाय कवित्विं कोणी । हो शारदा व्यथित, घे शिर ती पिटोनी !
जाणोनि सिंधु हृदया, मति शिंपलीसी । स्वातीच मानि बुध तेविं सरस्वतीसी
वर्षेल ती जरि तिच्यांत विचारवारि । सन्मौक्तिकेंचि म्हणणें कविताहि सारी ! ॥

तीं युक्तिनेंच मग विंधुनि ओविजेतीं । श्रीरामसच्चरितसूत्रिं वरीं जरी तीं ॥
तें निर्मलीं स्वहृदिं तीं बुध वाहतील । सप्रेम त्यांवरिल तीच विभा विशाल १४
जे हंसवेष, करणी परि वायसाची । जाती कुमार्गिं, मिटुनी श्रुतिदृष्टि साची ॥
जे होत मूर्त पुतळ कपटादिकांचे । जे कीं अगार नुसतें कलिपातकांचें ॥१५
जे चोर लुब्ध कनका, अतिकोपि-कामी । जे दावितात शठ बोलुनि भक्ति रामीं॥
जे जन्मलेत युगिं या कलिच्या करालीं । मी अग्रणी खचित त्यांमधिं दंभशाली !
धिक्कार या मज असो विषयी वृपाला !। धर्मध्वजी मजपरी न कुणीहि झाला ॥
माझीच दुर्गुणकथा जर मी वदीन । वाढेल तीच इतुकी जिस पार ही न १७
यासाठिं अल्पचि इथें कथिली मियां ती । थोड्यामधेंचि बुध जाणुनि पूर्ण घेती
जी केलि मीं बहुपरी विनती अशी ही । ऐकोनि घाल मज दूषण ना कुणीही
याच्यामधेंहि जरि काढिल कोणि शंका । माझ्याहुनीहि मतिमंद तया म्हणूं का ?
मी ना कवी, चतुरही म्हणवीं न मातें । गाईन रामयश, ये मतितें यथा तें
कोठें अपार रघुनाथचरित्र मोठें ? । संसारमग्न मति अल्प मदीय कोठें ? ॥
ज्या मारुतें अचल मेरुहि तो उडावा । कापूस त्यापुढतिं दाविल काय केंवा ?
श्रीरामचंद्रविभुची गुरुता अपारा । जाणोनि चित्त कचरे रचनाविचारा ॥
वाक्-शेष-शंभु-विधि-शास्त्र-पुराण-वेद । ते ' नेति नेति ' गुण गाति अनंत छंद
सारेच जाणति हरिप्रभुता अशी ही । केल्याविना न गुणगान कुणीहि राही
नानापरी श्रुतिहि वानिति भक्तिभाव । ते वर्णिती प्रभुयशोभजनप्रभाव ॥२२॥
[illegible] एक तो अज, अनीह, अरूपनाम । सच्चित्स्वरूप भगवान् विभु दिव्य-धाम
आनंदरूप, निखिलासि भरूनि राहे । भक्तार्थ जो अवतरे जगिं रूपदेहें ॥
नानापरीं चरित आचरि भक्तकाजा । ऐसा कृपाल शरणागतपाल राजा ॥
जो आपला म्हणितला सरलें दयाळें । तो कोण ज्यावरि न हा करुणौघ वोळे?
जाणोनि हें हरियशासचि गाति संत । वाणी विशुद्ध सुफला अपुली करीत ॥
मी त्या बळेंचि रघुनायककीर्ति गाया । संनद्ध होइं, नतमस्तक रामराया ॥
जी गाइली मुनिवरीं प्रभुकीर्ति आधीं । होईल तो सुगम मार्ग मला निराधि
भूपं अपार सरितांवरि सेतु केले । मुंगीहि त्यांवरुनि पैल अखेद चाले !॥२६॥

इति निजनीचानुसन्धानश्रीरामकृपावर्णनं नाम चतुर्थस्तरंगः ॥

## तरंग ५ वा.

ऐशा प्रकारिं वितरूनि मनासि धीर । गाईन राघवचरित्र सुधाब्धिसार ॥१
श्रीव्यासवाल्मिकिकवीश्वर, ईशगाथा । जे गाति भक्तियुत, तत्पदिं ठेवुं माथा॥
संकल्पसिद्धि सकला मजला घडावी । त्यांच्या पदाब्जिं मम हीं नमनें पडावीं ॥।
मी वंदितों कलियुगीं कवि जे जहाले । ज्यांनीं स्वकाव्यिं हरिचें यश वर्णियेलें २
ज्या सुज्ञ थोर कविंनीं हरिचीं चरित्रें । हीं प्राकृतांत सुरसें रचिलीं पवित्रें ॥
आहेत जे कवि असे, नमिं मी तयांतें । होतील जे पुढतिं, त्यांसहि शुद्ध चित्तें
सन्मान्य साधुजनिं काव्य मदीय हें हो । ऐसें प्रसन्न हृदयें वरदान द्या हो !
यद्ग्रंथ सादर बुधीं अवलोकिला न, । व्यर्थश्रमी गणियला कवि तो अजाण ४
संश्लाघ्य तीच कविताकृति-कीर्ति-मूर्ति । गंगेसमा जनहिता जगिं जी वहाती
श्रीरामकीर्ति अतिदिव्य, परी मदीय । वाणी अयोग्य म्हणुनी मन भीत होय. ५
होई कृपेंच तुमच्या मज साध्य सारें । दे रेशमी कुसर भा तरटासही रे ! ॥
( जें वागधीश तुलसी विनयें वदे तो । तें ‘ राम ’ ही अनुवदोनि सभाव देतों ) ६
ऐशीच कीर्ति विमला म्हणतात संत । हो तीच तेविं कविता सरला नितान्त
जी आयकोनि निज वैरहि विस्मरोनी । सानंद संस्तवियली हृदयें अरींनीं ७
हें ना घडेल, नच जों मति निर्मला हो, । माझी तरी मति असे अति दुर्बला हो !
मी यामुळेंचि विनवीत पुनःपुन्हां हें । दावा कृपा, हरियशा मन गाउं पाहे. ८
श्रीरामचंद्रचरितामृतमानसाचे । होती कवीश्वर सुधी कलहंस साचे ! ॥
मी अज्ञ बाल विनवीत तयांसि हेंचि । ही मद्रुची बघुनि सावलि द्या कृपेची
मी वंदितों त्या मुनिच्या पदाब्जा, । रामायणा निर्मित जो महौजा ॥
खरस्वेंरही मृदु जें विशेष, । जें दूषणस्पृष्ट तरी अदोष ! ॥१०॥*
मी वंदितों वेदमया चतुष्का, भवाब्धिचे ते जणुं काय नौका, ॥
श्रीराघवाचें करितां सुगान, । स्वप्नांतही ज्यां शिवला न शीण ११

---

* खर व दूषण या राक्षसांच्या अनुक्रमें कठोर व दोष या नामार्थांवर श्लेषचमत्कृतीनें विरोधाभास; तुल्य संस्कृत सुभाषित- ‘ सदूषणापि निर्दोषा सखरापि सुकोमला । धन्यः स रचिता येन रम्या रामायणी कथा ॥१॥’

वंदीत मी चरणरेणु विधातयाचे । ज्याचें विचित्र भवसागर कार्य साचें ! ॥
ज्यामाजिं निर्मिलि सुधा, शशि, संत, धेनू । तैसींच दुष्ट—मदिरा, विष, काय वानूं
माझी असो प्रणति ही कर जोडुनीयां । देव-द्विज-ग्रह-बुधां शुभसेवनीयां
त्यांनीं करोनि हृदयीं मज पूर्णकाम । व्हावें प्रसन्न; वितरो सुफलत्व राम १३
वंदूं पुन्हां सुरसरित् तशि शारदाही । दोघांहि सुंदर चरित्र पवित्रवाही ॥
ती स्नान पान करितां अघ नाशि एक । गातां तथा परिसतां दुजि दुर्विवेक
माता, पिता, गुरु मदीय, उमामहेश । आयुष्यदायक दयाळु नमूं तयांस ॥
जे नाथ, सेवक, सखे रघुनायकाचे । निर्हेतु सर्वहित या तुलसीस साचे १५
आला बघोनि जगतीं कलि तो कराल । निर्मी उमेश जगिं शाबरमंत्रजाल
ज्यांतें न अर्थ, नच मेळ, तरी जपोन । होतां जगद्धित कळे हरशक्ति पूर्ण
होईल तो हर मला जर सानुकूल । ही हर्षमंगलनिदान कथा रसाळ ॥
होईल पूर्ण शिवपार्वतिच्या प्रसादें । चित्तासि सौख्य रघुनाथचरित्र हें दे १७
ज्योत्स्ना विभूषवि जशी रजनीस तेजें । माझ्या तशी हरकृपा कवितेसि ओजें
सद्भावयुक्त हृदयें जन वाचतील । गातील ऐकतिल संतत पाठशील १८
होईल मंगल तयां कलिपापनाशि । वाढेल रामचरणांबुजभक्तिराशि ॥
स्वप्नीहिं हो जर कृपा हरपार्वतींची । गाईन जें सकल होइल सत्य तेंचि ॥१९॥

अति पावन ती पुरी अयोध्या, तिजला वंदन मन्मनें असावें ॥
कलिपापहरा तरंगिणी मी सरयूही नमितों नितान्तभावें ॥२०॥

वंदूं समग्र तिथले नरनारि पौर । ज्यांच्यावरील ममता प्रभुची अपार ॥
नाशूनि पापगिरि मैथिलिनिंदकांसी । केलें तयें सुखमय स्थलिंचे निवासी २१

असो कौसल्येतें मम नमन, जी केवल सजे ।
दिशा प्राची जैशी यदुदरिं शशी राम निपजे ॥
असे ज्याची कीर्तिद्युति सुभग विश्वास सुखदा ।
तुषारें जो नाशी खल-कमल-राशींप्रति सदा ॥२२॥

मी मानितों सकल मंगलपुण्यमूर्ती । राज्ञी तिघी दशरथासह सद्विभूति
निर्मूनि ज्यांसि विधिनेंहि महत्त्व आलें । कीं रामनिर्मितिसि कारण तेच झाले ॥
मी आचरीत कृतिनें, वचनें, मनानें । त्यांना अनंत नमनें विनयावधानें ॥
मानोनियां तनयसेवकसाच मातें । होवोत ते मजवरी सदय स्वचित्तें ॥२४॥

वंदूं अयोध्येश महानृपाल । ज्याची रती रामपदीं विशाल ॥
दुरावतां दीनदयाळ राम । प्राणां करी जो तृणसा विराम ! ॥२५॥
वंदूं विदेहनृपती परिवारयुक्त, ज्याचें मनीं रघुपतीवरि भक्ति गुप्त ।
कीं रामचंद्रविभुचा घडतांचि संग, भोगांतुनी प्रकट त्यांतिल होय योग ॥२६॥
माझा असो प्रथम त्या भरता प्रणाम । ज्याचें अवर्ण्यचि खरें व्रत आणि नेम !
श्रीरामपादकमलीं जणुं काय भृंग । ज्याचें विलुब्ध मन; साहि न तद्वियोग ॥
मी वंदितों सुभग लक्ष्मणपादपद्म । जें भक्तसौख्यकर शीतल हर्षसद्म ॥
श्रीरामकीर्तिमय निर्मल जी पताका । आधारदंड तिज लक्ष्मणकीर्ति देखा २८
जो शेष भूधर, सहस्र शिरें जयाला । जो भूमिभारहरणा अवतीर्ण झाला ॥
भक्तां कृपाजलधि सद्गुणखाणि जो हो, सौमित्रि तो मज सदा अनुकूल राहो
शत्रुघ्न शीलधन तो भरतानुगामी । वीरेश तत्पदसरोरुह तें नमीं मी ॥
तैसाचि मी शरण त्या हनुमत्पदाला । ज्याच्या यशा स्तवुनि रामहि धन्य झाला !
जो ज्ञानमेघ खलकाननदावमूर्ति । जो अंजनातनय मारुति चारुकीर्ति ॥
ज्याच्या वसे हृदयमंदिरिं नित्य राम । कोदंडबाणधर, त्या मम हा प्रणाम ॥
तो ऋक्षराज, कपिराज, निशाचरेश । ते अंगदप्रभृति वानर रामदास ॥
तत्पुण्यपादिं मम वंदन भक्तिभावें । ज्यां नीचयोनि असुनी रघुराय पावे ३२
जे श्रीरघूत्तमपदांबुजभक्त होत । देवासुरीं, खगमृगीं, मनुजादिकांत ॥
निष्काम रामभजनीं रत, तत्पदाब्जीं । भावें नमस्कृतिशतें असुं देत माझीं ॥
भक्ताग्रणी शुकमुनी सनकादि आधीं । संसारवारिनिधिपारद नारदादि ॥
ज्यां वंदिले सकल ते लववूनि माथा । दावा कृपा गणुनि दास मुनींद्र ! आतां

अशी विश्वाची जी सदय जननी मैथिलि सती ।
दयाब्धी रामाची हृदयदयिता जी मतिमती ॥
तिचीं पादांभोजें मम मन नमी सादर सदा
कृपेनें कीं त्यांच्या मति विमल पावेन शुभदा ॥ ३५ ॥

भक्तार्तिसंकट निवारुनि देत सौख्य । राजीवनेत्र शरकार्मुकधारि मुख्य ॥
विश्वप्रभू सकललोकसमर्थ राम । त्याच्या पदाब्जयुगलासि पुन्हां प्रणाम ॥३६
वागर्थ, वारिलहरी जरि भिन्न बोलीं । आहेत तीं परि अभिन्नचि, ना निराळीं ॥
श्रीजानकीरघुपतीहि तसे अभिन्न । तत्पादिं मन्मन; त्यां प्रिय फार दीन ३७

इति मनोवचन–कर्माभिनिवेश–वन्दनकृते पंचमस्तरङ्गः

## तरंग ६ वा.

तें 'राम' नाम नमितों रघुनायकाचें । जें अग्नि, भानु, शशि यांतिल तत्त्व साचें
तें वेदजीवन, जयीं विधिविष्णुशर्व, । निस्तुल्य, निर्गुणहि, सद्गुण ज्यांत सर्व

जपे महामंत्र उमेश हाच । काशींतही मोक्षद हेंचि साच ॥
महत्त्व ज्याचें गणराज जाणे । जो अग्रपूजा मिळवीत तेणें ॥२॥

नामप्रताप मुनि आदिकवीहि जाणे । सात्सिद्धितें मिळवि तो उलट्याहि वर्णें ॥
नामप्रभाव हर हाचि समूळ जाणे । हो कालकूटहि सुधासर तत्कृपेनें ॥३॥
तें एक नाम परि नामसहस्रकीर्ति । ऐकोनि हें पतिसुखें जपि तें सती ती ॥
नाथासमेत नित; हृष्ट तयें उमेश । भूषा स्वतांस तिज तेविं करी स्त्रियांस

श्रीरामभक्ति वर्षा ऋतु, तुलसी साधु भक्त या शाली; ॥
श्रावणभाद्रपदश्री वर्णयुगा ' राम 'नाभिच्या आली ! ॥५॥
दोनींहि अक्षरें तीं मनोहरें सुंदरें अमृतमधुरें ॥
जाणों जनहृदयांचीं असतीं कीं तीं विलोचनें चतुरें ! ॥ ६ ॥
स्मरतांचि तीं जनाला सुखद तसें सुलभ सर्व हो कांहीं ॥
इहलोकिं लाभदायक मुक्तिद परलोकिंही दुजें नाहीं ॥ ७ ॥
श्रवणा, स्मरणा, पठणा अत्युत्तम अक्षरें नसतिं दुसरीं ॥
हीं रामलक्ष्मण अशीं तुलसीप्रिय; ऐशि ये कुणांस सरी ? ॥८॥
हीं वर्णितां पृथक्त्वें प्रीति विलग्नाचि होय त्यांमधली ॥
जीव-ब्रह्म तसें द्वय सहजचि एकत्र अक्षरें जडलीं ॥ ९ ॥
नरनारायण यांचें जैसें बंधुत्व तेविं त्यांचेंही ॥
जगता पालनकर्ती भक्ता प्रतिपाळितीं विशेषें हीं ॥ १०

हीं कर्णभूषणें जणुं सुंदर सजतात भक्तिललनेला ॥
जनहितकारक निर्मल विधुरविगर्वहि तिहीं सकल नेला ॥ ११ ॥
हे दोन वर्ण गमती सुगतिसुखेचे सुगंध, संतोष ॥
वसुधाधारणतत्पर अवतारचि कूर्म आणखी शेष ॥ १२ ॥
किंवा मधुकर जणुं ते जनमानससुंदराब्जि रमणारे ॥
जिह्वा माय यशोदा तिज हे बळरामकृष्ण गमणारे ! ! ॥ १३ ॥

रघुवरनामाक्षरयुग शोभत सर्वांहि अक्षरांवरतीं ॥*
छत्र तसें मुकुटमणी उपमा तुलसी समर्पि कविवर ती ! ॥ १४ ॥
होतीं परस्परसमानचि नामरूप । ईशानुगा रति तयांमधली अमूप ॥
ईशासि रूप अभिधान अशा उपाधि । साधूक्ति गात अनिरूप्यहि वा अनादि
यांची लघुत्व-गुरुता कथणें चुकीच । ऐकोनि भेद गुण जाणति सुज्ञ साच ॥
नामा अधीन दिसतें जगतांत रूप । नामाविना कळतसे नच तें अपाप ॥
नामाविना करतलागतही पदार्थ । कांहींच ना कळतसे हृदया यथार्थ ॥
घेतांचि नाम परि, रूपविहीनही तो । चित्तांमधें प्रकट होउनि लोभवीतो ॥
हो नामरूप सगळेंचि अवर्णनीय । आनंद-सौख्यद परी वदवेल काय ? ॥
साक्षी जणों सगुण निर्गुण यांत नाम । दोघां सुबोधक दुभाषिच नाम ' राम '
तूंतें प्रकाश जरि आंतरबाह्य व्हावा । तूं मान देहलिसमानचि आत्मजिह्वा ॥
श्रीरामनाममय निश्चल रत्नदीप । ठेवूनि तीवरि पहा तुलसि ! स्वरूप ॥१९॥
जे योगि हें जपति नाम सदा सभक्ति । वृत्ति प्रपंचि विधिच्या वरुनी विरक्ति
ते ब्रह्मसौख्यि रमती, नच वर्णवे जें । निर्बाध, निर्मल, अनुत्तम जें विराजे
सेवूं पहाति जगिं जे सुख गूढ गोड । त्यांहीं स्वजिह्विं करणें हरिनाम जोड ॥
एकाग्रचित्तिं करितां जप साधकानें । येतील सिद्धि अणिमादिहि त्या सुखानें
जे आर्त लोक जपतील रमेशनामा । पावूनि दुःखलय येतिल सौख्यधामा ॥
लोकीं चतुर्विध विराजति रामभक्त । चारी उदार, गतकल्मष, पुण्यवंत, ॥२२॥
आधार नामचि असे चतुरांहि चारां । ज्ञानी तयांत रुचला प्रभुच्या विचारा.
चारी श्रुति स्तविति नाम युगींहि चारीं । त्यांतूनि या युगिं तरी हरिनाम भारी
ज्यांनीं लयासि निजकाम समग्र नेले । श्रीरामभक्तिरसमग्न मतीसि केलें
श्रीरामनामरससिंधुसुधेंत लीन । केलें तयीं निजमनासि सदैव मीन ॥२४॥
निर्गुण, सगुण अशी ही जोडी ब्रह्मस्वरूपयुग्म असे ।
निरुपम, अनाद्यगाधहि वर्णन त्याचें असेल शक्य कसें ॥२५॥
दोनींहुनीहि अधिक प्रभावि नामचि असें मला गमतें ॥
निर्गुण सगुणहि दोनी अंकित करण्यास त्यास बल सम तें ॥२६॥

---

*' राम ' नामांतील र् ( रेफ ) छत्राप्रमाणें व म् ( अनुस्वार ) मुकुटमण्याप्रमाणें इतर वर्णांवर शोभतात.

सज्जन तत्त्वज्ञ महा लोकानुभवासि जाणती सारे ॥
परि मी माझी प्रीती अनुभव आवड वदें मम विचारें ॥२७॥
काष्ठगत अग्नि तैसा ब्रह्महि दोनी समान एकचि कीं ॥
एक ब्रह्म तरीं तीं निर्गुण सगुणहि अभिन्न दोनिं निकीं ॥ २८ ॥
दोनीं अगम्य परि तीं नामबळें होतिं सर्वथा सुगम ॥
ब्रह्माहुनि रामाहुनि वास्तव नामचि बलिष्ठ हो परम ॥२९॥
सच्चिद्घन अविनाशी ब्रह्म असे एकमेव अविकारी ॥
आनंदराशि विभु ह्रदिं असुनिहि जगिं दुःख दीन जीव करी ॥३०
नामनिरूपण करतां, जपतां प्रभुनाम कीर्तनीं गातां ॥
होई प्रकट ह्रदीं हरि गुप्त जसें रत्नमूल्य ये हातां ॥३१॥
नामप्रभाव गमतो मज तो अपार । जो निर्गुणाहुनिहि हो अतुल प्रकार ॥
रामाहुनीहि अधिकप्रभ रामनाम । माझ्या मतें वितरि तेंचि सुख प्रकाम !

—: इति रामनामनिरूपणब्रह्मनिर्णयो नाम षष्ठस्तरंगः :—

## तरंग ७ वा.

श्रीराम मानवतनू धरि भक्तकाजा । साहोनि कष्ट सुखवी बहु सत्समाजा ॥
सप्रेम नाम जपतां परि अप्रयासें । भक्तां भला शुभद हर्षनिधी दिलासे ॥ १
श्रीराम त्या ऋषिहितास्तव ताटकेसी । सेनासुतांसह वधोनि समूळ नाशी ॥
दासांचिया अमित दोषयुता दुराशा । नाशीत नाम रवि जेविं निशा अशेषा २
खंडी स्वतां उचलुनी भवचाप राम । खंडी प्रतापिं आपुल्या भवताप नाम ॥
एकाच दंडकवना करि रम्य राम । चित्तें असंख्य करि पावन रामनाम ॥३
निर्दाळि राघव निशाचरसंघ कोटी । नाशीत नाम कलिकल्मषराशि मोठी ॥
रामाहुनीहि अधिकप्रभ रामनाम । विश्वांतलें सुलभ तेंच सुखैकधाम ॥ ४
भिल्लीण, गृध्र, निजसेवक चांगले जे । त्यांनाच राम सुगती वितरी स्वतेजें ॥
उद्धारि नाम खळ पापि परी अनंत । महात्म्य हें श्रुतिहि वानुनि सांगतात ५
सुग्रीव आणिक बिभीषण हेच दोन । रक्षीत राम शरणागत ते म्हणोन ॥
नामें अनेक जन पामर रक्षियेले । लोकांत हें बिरुद वेदहि गात आले ॥६
एकत्र ऋक्ष-कपिसैन्य करूनि राम । आयास घेइ किति सागरसेतु-काम ॥
उच्चारितांचि परि नाम, भवाब्धि शोषे । ऐसा विचार सुजनीं करणें स्वतोषें

रामें रणीं सकुल रावण नष्ट केला । ये तो पुरीस निज घेउनि जानकीला ॥
साकेतवासि नृप राघव रामराय । एणेंचि देवमुनि तद्यश हृष्ट गाय ॥ ८ ॥
नामासि गाति अलि आवडिं रामदास । नाशीति मोहदल घोर विनाप्रयास ॥
स्वानंदराज्यसुखिं संचरती निमग्न । स्वप्नींहि सौख्यभर नामकृपें न भग्न ॥

ब्रह्माहुनि रामाहुनि गुरुतर हरिनाम वरद-वरद खरें ॥
शतकोटि रामचरितीं उचलियलें म्हणुनि एक तेंचि हरें ॥ १० ॥
वेष अमंगल जरिही नामकृपेनेंचि मंगलागार ॥
झाला असे महेश्वर, अविनाशी भक्तभव्य करणार ॥ ११ ॥
शुकसनकादिक योगी सिद्धमुनी नारदादि नामानें
भोक्ते ब्रह्मसुखाचे केले प्रिय हरिहरांसि बहुमानें ॥ १२ ॥
नामचि जपतां प्रभुनें प्रह्लादातें प्रसन्न होऊन ॥
भक्तांचा मुकुटमणी केलें, अधिक न कुणी तयाहून ॥ १३ ॥
ध्रुव करि हरिनामाचा जप जरि तो ग्लानियुक्त हृदयानें ॥
अनुपम अचल अशा त्या स्थानाला नामभक्तिच तया ने ॥ १४ ॥
पवनसुत निजचित्तें जपिलें प्रेमें पवित्र तें नाम ॥
केला आत्मवश तयें संतत करुणानिधी घनश्याम ॥ १५ ॥
त्यापरि अनेक अपरहि गणिकाऽजामिल-गजेंद्रसम किति ते ! ॥
हरिनामबळें झाले मुक्तिस भाजन जपोनियां सुकृतें ॥ १६ ॥
कुठवर वर्णावी म्यां नामाची थोरवी अशापरिं ती ! ॥
प्रत्यक्ष रामचंद्रहि निजनामा गावयासि शक्त किती? ॥ १७ ॥
श्रीरामनाम कल्पद्रुमसम कलिमाजि मंगलनिवास
स्मृतिमात्रें भाग्य चढे, झाला तुलसी तयें ‘ तुलसिदास ’ ! ॥१८॥

चारी युगीं, तिनिहि काळिं, तिनीहि लोकीं । नामेंचि होइ जनता जगतीं विशोकी
हें सांगती स्वमत वेद पुराण संत । हो रामभक्ति जर तीं सुकृतें अनंत ॥ १९ ॥
ध्यानें युगांत पहिल्या, यजनें द्वितीयीं । द्वापारिं पूजनिं तसा हरि तुष्ट होई ।
हा पापमूळ चवथा कलि जो कराल । त्यातें तराल जर नाम सखा कराल २०
श्रीरामनाम वितरी जगिं इच्छिलें तें । माता पिता इह; परत्रहि इष्ट देतें ॥
न ज्ञान, भक्ति, जगिं कर्महि, या कलींत । आधार नाम; भजका नच मोकलीत

भगवान् श्रीविष्णु



परमदयाळू अतिकनवाळू कौसल्येचा हितकारी ।
प्रकट जाहला तें आनंदित जननी झाली हृदंतरीं ॥
अद्भुतसुंदर मुनिमानसहर नयनरम्य तनु घननीला ।
रूप चतुर्भुज सायुध, शोभासागर भूषण वनमाला ॥ सु.मा.बा. त.३१।२२

चित्रकार कै. श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि, राजेसाहेब, औंध

नं. ८१५५३ १७

आहे कली कपटसागर कालनेमि। धीमान् कपींद्र वलि नाम असें म्हणें मी ॥
संसारसिंधु तरण्यास समग्र लोकां। झाली समर्थ रघुनायकनामनौका! ॥२२॥
आला कली कनककश्यिपुसाच घोर। हें रामनाम नरसिंहचि त्यासमोर ॥
निर्दाळुनी सुररिपू कलिरूप पापी। प्रह्लाद जे भजक तोषवि त्यां तथापि॥२३॥

—: इति सीतापतिरामनामसर्वोपरिवर्णनं नाम सप्तमस्तरंगः :—

## तरंग ८ वा.

सद्भाव वा कुटिल भाव मनीं धरोनी। उल्हासुनी हृदयिं वा उबगोनि कोणी ॥
घेईल नाम हरिचें जर कां कदाही। पावेल मंगलचि तो दशही दिशांहीं ॥१॥
तें नाम मी स्मरुनि रामगुणांसि गाई; । माथा विनीत करुनी रघुनाथपायीं ॥
ज्याची कृपा कृपण नाहिं वरप्रदानीं। न्यूनाधिका हरिल तो हरि चक्रपाणि २
जो राम मादृश कुसेवक रक्षिताहे। तो स्वीय केवल दयाळुपणाचि पाहे; ॥
सुस्वामिरीति जगतीं विदिताच लोकीं। कीं जाणणें मन खरें विनयावलोकीं ३
श्रीमंत, दीन, नर नागर, खेडुती वा। धीमान् विमूढ, मळके अतिशुद्ध किंवा
सारी प्रजा—सुकवि वा कुकवी कसेही। भूपा प्रशंसिति यथामति वाक्प्रवाहीं ४
जो साधु, सुज्ञ, नृपती अतिशुद्धभाव। तो ईश्वरांशभव दीनदयाळ राव ॥
तो, स्वादुवाक् श्रवुनि,भक्तिनती,गतीतें। पाहूनि गौरवि जनां सकलां; किती तें ! ५
सामान्यही नृपति दाविति ही स्वरीति। श्रीकोसलेश मग तो कितुक्यापरीं ती ?
स्नेहेंच केवळ रिझे जगिं रामराय। पापात्म मंद मजहूनि असेल काय ? ६

असे ज्यानें केले उपलहि जलामाजिं तरते।
कपी ऋक्षादीही सचिव अपुले प्राज्ञतर ते ॥
दयाळू तो राम प्रभु मज शठाच्याहि करवीं।
रुचि प्रीती धन्या करुनि कृति घेईल बरवी ! ॥ ७ ॥

बोल तो मज गमेचि खरासा। साहि कीं रघुपती उपहासा ॥
हें नसे तरि कसा रघुनाथ-सेवकीं 'तुलसिदास' सहात ? ॥ ८ ॥

माझें धार्ष्ट्य, तसेंचि खोडिहि किती सांगों तरी अंत न !
माझे पापगिरी बघोनि नरका वाटेल कां खंत न ? ॥
माझा मीच बघोनि तें चरकतों चित्तांत भीतीमुळें
माझा राम परी स्मरेहि न मुळीं स्वप्नींहि दोषस्थळें ॥ ९ ॥

मम सकलहि दोषा ऐकुनी पाहुनीही । सरलहृदयरामें मानिलें त्यासि नाहीं
निरखिलि परि माझी बुद्धि सद्भावनेची। रघुपति अतितोषें वानिता होय तीचि
वचन जरि कसेंही नष्ट हो; चित्त मात्र। विमलतम जयाचें, तो प्रभुप्रीतिपात्र
नच रघुवरचित्तीं भक्तदोषांसि ठाव। स्मरत परि कितीदा श्रीप्रभू भक्तभाव! ११

ज्या पापा निरखूनि वालिस वधी श्रीराघव व्याधसा ।
सुग्रीवेंहि पुन्हां तसेंचि करितां, त्यातें परी ना तसा ॥
तैसें तेंचि बिभीषणेंहि करितां रामें मनीं नाणिलें ।
सन्मानें भरतासि भेटुनि त्यां सप्रेम वाखाणिलें !! ॥ १२ ॥

तरुतलिं बसला प्रभु प्रसन्न । तरुशिखरांवरि ते कपी निषण्ण ॥
परि निजसम त्यांसि राम मानी । प्रभु तुलसीमतिं रामसा न कोणी ! १३*
साधू न रामसम, त्यासम न प्रभूही । तो लाभकारि सकलांसचि नित्य होई ॥
सत्योक्ति ही जर, तरी तुलसीस झालें। दाहीं दिशां, सकल काल फळास आले!
सांगोनि आत्मगुणदोष असे अशेष । सर्वांसि वंदन करूनि विनम्रशीर्ष ॥
वर्णीन मी यश अनुत्तम राघवाचें । जें आयकोनि कलिकल्मष काय वांचे ?

—: इति ' षट्शरणागतसर्वस्तुतिवर्णनं ' नाम अष्टमस्तरंगः :—

## तरंग ९ वा.

सांगीतली जी मुनि याज्ञवल्क्यें । ऐके भरद्वाज कथा सुवाक्यें ॥
संवादरूपें कथणार मी ती । सच्छ्रोतृवृंदांप्रति सौख्य देती ॥ १ ॥

श्रीशंभु निर्मि बहु शोभन हें चरित्र । तें पार्वतीसि कथिलें प्रभुनें पवित्र ॥
अत्यंत रामरति काकभुशुंडि याची । पाहूनि त्याप्रति पुन्हां कथि शंभु तेंचि २

काकभुशुंडीकडुनी ऐके श्रीयाज्ञवल्क्य तीच कथा ॥
श्रवण भरद्वाज पुन्हां करि ती त्याचेकडून साधुपथा ॥ ३ ॥
श्रोते वक्ते उभयहि समदर्शी साधुशील बुधसम जे ॥
स्वकरतलामलक जसा, निजबोधें ज्यां त्रिकालही समजे ॥ ४ ॥
हरिलीला वर्णिति ते; इतरहि हरिभक्त संत सुज्ञानी ॥
गाती ऐकति चिंतिति संतत ज्या गाइल्या रसज्ञांनीं ॥ ५ ॥

---

*किंवा– बैसे प्रभू तरुतलीं, कपि वृक्षशाखीं। ऐसेंहि ते निजसमानचि राम लेखी।
हें देखनां वदतसे तुळशी स्ववाणी। स्वामी सुशीलनिधि रामविना न कोणी १३

मीही वराहक्षेत्रीं हीच कथा गुरुमुखें जरी परिसें ॥
परि मी अजाण बालक यास्तव चित्तीं ठसे न तें सुरसें ॥ ६ ॥
कथा श्रीरामाची अतिशय असे गूढ रमणी
तिला श्रोता वक्ता उभयहि हवे पंडितमणि ॥
कलीच्या पापांनीं ग्रसित जडगा जीव मम हा ।
कळावी त्या मूढा कशि मधुर तीची चव अहा ! ॥ ७ ॥
तथापि प्रेमानें गुरुवर पुन्हां तीच सुकथा ।
कितीदा जैं सांगे , कळलि मज ती मन्मति यथा ॥
प्रबोधाया माझें हृदय, मम भाषेंत करतों ।
हरि प्रेरी जैसा मम मतिविवेकांसि भर तो ! ॥ ८ ॥
संदेह मोह हृदिंचे भ्रम घालवीती । नौका मला भवसरित्तरणास हो ती ॥
विश्राम सुज्ञमतिला सकलप्रहर्षा । वर्णीन राघवकथा कलिपापकर्षा ॥९॥
पुण्या कथा भरणिशी$ कलिपन्नगाला । बोधाग्निलागिं अरणी जणु जन्ममूला
वाटे कलीमधिल ती जणु कामधेनु । संजीवनी जणुं मुळी सुजनासि वानूं ॥
पीयूषपूर्ण सरिता वसुधातलींची । कीं भेक जो भ्रम तया भुजगीच साची ॥
नाशीतसे भय तसें , नरकासि वेगें । याकारणें असुरसेनतुलेसि§ ती घे ११
जी साधुदेवकुलरक्षक हो भवानी । लक्ष्मीच सज्जनपयोनिधिमाजिं कोणी ॥
पृथ्वी जणों अचल विश्वभरा वहाती । कालिंदि कालमुखकृष्णमसी* अशी ती १२
जीवासि मोक्षद अशी जणु काय काशी । पुण्या प्रिया रघुवरा तुलसीच जैशी
माता हिता तुलसिला हुलसीच‡ धन्या । शंभुप्रिया अनघ मेकलशैलकन्या× १३

---

$भरणि–१ सर्पविष उतरविणारा एक मंत्र अगर मणि;
२ भरणि नांवाचा एक पक्षी. सापाला पाहून हा अंग संकोचून पडतो; सापानें त्यास गिळतांच हा पंख फुलवून सापास फाडून बाहेर पडतो असें वर्णन आहे. निरनिराळे अर्थ टीकाकारांनीं केले आहेत.

§असुरसेन– गयेंत याच्या पृष्ठावर विष्णुपदीं पिंडप्रदान करतात व नरकनाश साधतो.

*मसी– शाई.

‡हुलसी– श्रीतुलसीदासांच्या आईचें नांव.

×मेकलशैलकन्या– नर्मदानदी, अगर गौरी.

मम सकलहि दोषा ऐकुनी पाहुनीही । सरलहृदयरामें मानिलें त्यासि नाहीं
निरखिलि परि माझी बुद्धि सद्भावनेची । रघुपति अतितोषें वानिता होय तीचि
वचन जरि कसेंही नष्ट हो; चित्त मात्र । विमलतम जयाचें, तो प्रभुप्रीतिपात्र
नच रघुवरचित्तीं भक्तदोषांसि ठाव । स्मरत परि कितीदा श्रीप्रभू भक्तभाव ! ११

ज्या पापा निरखूनि वालिस वधी श्रीराघव व्याधसा ।
सुग्रीवेंहि पुन्हां तसेंचि करितां, त्यातें परी ना तसा ॥
तैसें तेंचि बिभीषणेंहि करितां रामें मनीं नाणिलें ।
सन्मानें भरतासि भेटवुनि त्यां सप्रेम वाखाणिलें !! ॥ १२ ॥

तरुतलिं वसला प्रभु प्रसन्न । तरुशिखरांवरि ते कपी निषण्ण ॥
परि निजसम त्यांसि राम मानी । प्रभु तुलसीमतिं रामसा न कोणी ! १३*
साधू न रामसम, त्यासम न प्रभूही । तो लाभकारि सकलांसचि नित्य होई ॥
सत्योक्ति ही जर, तरी तुलसीस झालें । दाहीं दिशां, सकल काल फळास आलें !
सांगोनि आत्मगुणदोष असे अशेष । सर्वांसि वंदन करुनि विनम्रशीर्ष ॥
वर्णीन मी यश अनुत्तम राघवाचें । जें आयकोनि कलिकल्मष काय वांचे ?

—: इति ' षट्शरणागतसर्वस्तुतिवर्णनं ' नाम अष्टमस्तरंगः :—

## तरंग ९ वा.

सांगीतली जी मुनि याज्ञवल्क्यें । ऐके भरद्वाज कथा सुवाक्यें ॥
संवादरूपें कथणार मी ती । सच्छ्रोतृवृंदांप्रति सौख्य देती ॥ १ ॥
श्रीशंभु निर्मि बहु शोभन हें चरित्र । तें पार्वतीसि कथिलें प्रभुनें पवित्र ॥
अत्यंत रामरति काकभुशुंडि याची । पाहूनि त्याप्रति पुन्हां कथि शंभु तेंचि २

काकभुशुंडीकडुनी ऐके श्रीयाज्ञवल्क्य तीच कथा ॥
श्रवण भरद्वाज पुन्हां करि ती त्याचेकडून साधुपथा ॥ ३ ॥
श्रोते वक्ते उभयहि समदर्शी साधुशील बुधसम जे ॥
स्वकरतलामलक जसा, निजबोधें ज्यां त्रिकालही समजे ॥ ४ ॥
हरिलीला वर्णिति ते; इतरहि हरिभक्त संत सुज्ञानी ॥
गाती ऐकति चिंतिति संतत ज्या गाइल्या रसज्ञांनीं ॥ ५ ॥

---

*किंवा– बैसे प्रभू तरुतलीं, कपि वृक्षशाखीं । ऐसेंहि ते निजसमानचि राम लेखी ।
हें देखतां वदतसे तुलसी स्ववाणी । स्वामी सुशीलनिधि रामविना न कोणी १३

मीऽहि वराहक्षेत्रीं हीच कथा गुरुमुखें जरी परिसें ॥
परि मी अजाण बालक यास्तव चित्तीं ठसे न तें सुरसें ॥ ६ ॥
कथा श्रीरामाची अतिशय असे गूढ रमणी
तिला श्रोता वक्ता उभयहि हवे पंडितमणि ॥
कलीच्या पापांनीं ग्रसित जडगा जीव मम हा ।
कळावी त्या मूढा कशि मधुर तीची चव अहा ! ॥ ७ ॥
तथापि प्रेमानें गुरुवर पुन्हां तीच सुकथा ।
कितीदा जैं सांगे , कळलि मज ती मन्मति यथा ॥
प्रबोधाया माझें हृदय, मम भाषेंत करतों ।
हरि प्रेरी जैसा मम मतिविवेकांसि भर तो ! ॥ ८ ॥
संदेह मोह हृदिंचे भ्रम घालवीती । नौका मला भवसरित्तरणास हो ती ॥
विश्राम सुज्ञमतिला सकलप्रहर्षी । वर्णीन राघवकथा कलिपापकर्षी ॥९॥
पुण्या कथा भरणिशी$ कलिपन्नगाला । बोधाग्निलागिं अरणी जणुं जन्ममूला
वाटे कलीमधिल ती जणु कामधेनु । संजीवनी जणुं मुळी सुजनासि वानूं ॥
पीयूषपूर्ण सरिता वसुधातलींची । कीं भेक जो भ्रम तया भुजगीच साची ॥
नाशीतसे भय तसें , नरकासि वेगें । याकारणें असुरसेनतुलेसि§ ती घे ११
जी साधुदेवकुलरक्षक हो भवानी । लक्ष्मीच सज्जनपयोनिधिमाजिं कोणी ॥
पृथ्वी जणों अचल विश्वभरा वहाती । कालिंदि कालमुखकृष्णमसी* अशी ती १२
जीवासि मोक्षद अशी जणुं काय काशी । पुण्या प्रिया रघुवरा तुलसीच जैशी
माता हिता तुलसिला हुलसीच‡ धन्या । शंभुप्रिया अनघ मेकलशैलकन्या× १३

---

$भरणि-१ सर्पविष उतरविणारा एक मंत्र अगर मणि;

२ भरणि नांवाचा एक पक्षी. सापाला पाहून हा अंग संकोचून पडतो; सापानें त्यास गिळतांच हा पंख फुलवून सापास फाडून बाहेर पडतो असें वर्णन आहे. निरनिराळे अर्थ टीकाकारांनीं केले आहेत.

§असुरसेन- गयेंत याच्या पृष्ठावर विष्णुपदीं पिंडप्रदान करतात व नरकनाश साधतो.

*मसी- शाई.

‡हुलसी- श्रीतुलसीदासांच्या आईचें नांव.

×मेकलशैलकन्या- नर्मदानदी, अगर गौरी.

जी सर्वसिद्धिसुखवैभवराशि मूर्ता । जी सद्गुणामरगणा अदिती सुमाता ॥
श्रीरामभक्तिरतिची परमावधीसी । सेव्या सदैव रघुनाथकथा सुधीसी ॥ १४
मंदाकिनीच जणुं रामकथा अवीट । हें चित्त सुंदर गमे गिरि चित्रकूट ॥
सत्प्रेमभक्तिसुभगोपवनांत तेथें । सीतारघूत्तम रमे, तुलसी कथी तें ॥१५॥

सीतारामकथा मनोहर अशी भक्तासि चिंतामणि ।
कीं शृंगाररुचि ती गमे करितसे सद्बुद्धि ही कामिनी ॥
रामाचे गुणराशि मंगल जगा धर्मार्थकामप्रद ।
तैसे मुक्तिद योगबोधविरतिश्रीसद्गुरू कोविद ॥१६॥

संसारामय घोर नष्ट करण्या जे मूर्त धन्वंतरी ।
सीताराघवभक्तिचे जनक जे मातापित्यांचे परी ॥
साऱ्याही व्रतधर्मनित्यनियमां जे जाहले बीजसे ।
जेणें संसृतिपापताप शमती शोकासि थारा नसे ॥१७॥

लोकांचे प्रिय रक्षिते इहपरीं श्रीराघवाचे गुण ।
राजा साधुविचार, शूर सचिव प्रख्यात तद्भूषण ॥
ते कीं होत अगस्ति शोषत महा लोभाब्धिचें जीवन ।
दारिद्र्याख्य दवानला शमविते ते भूरिवर्षी घन ॥१८॥

कामक्रोध दुरंत पाप कलिचें मत्त द्विपांचे गण ।
त्यांतें शावक सिंह लोकमनिंच्या कांतारिं ते सद्गुण ॥
श्रीशंभु त्रिपुरारि त्यासि अतिथी जे पूज्य झाले मनीं ।
सन्मंत्रें विषयाहिचें विष महा जे नाशिणारे मणि ॥ १९ ॥

जे कीं नाश करीति उग्र लिखितें भाळावरी कोरिलीं ।
सूर्यांशू जणु दिव्य मोह-तिमिरें ज्यांनीं झणीं वारिलीं ॥
वर्षोनि प्रतिपाळिते घन जणों जे दासशालींप्रति ।
जे कीं सज्जनचित्तशारदनभीं नक्षत्रराशिद्युति ॥ २० ॥

देती सर्व अभीष्ट ते जणुं तरू स्वर्गातले कामद ।
भक्तां सौख्यद विष्णु शंभु जणुं ते, सुप्राप्य ज्यांचें पद ॥
यांतें राघवभक्त मानिति जणूं कीं जीवनद्रव्य तें ।
कीं ते भोग अतीव पुण्य फळुनी भोगावया लाभते ॥ २१ ॥

किंवा ते निरुपाधि संतचि जणूं जागे जगाच्या हिता ।
वाटे सज्जनचित्तमानससरीं ते हंस कीं तत्त्वतां ॥
गंगेचेच तरंगसंघ जणु ते विश्वाप्रती पावन ।
ह्यावी रामगुणांसि काय उपमा सर्वोत्तमा याहुन ? ॥२२॥

दुस्तर्क दुश्चरण दंभ कली कुमार्ग । पाखंड तेविं कपटात्मकतादिवर्ग ॥
या इंधनासि सगळ्या झणिं जाळणारा । अग्नि प्रचंड जणुं रामगुणौघ सारा ॥२३॥
चरित रघुपतीचें पौर्णिमेच्या शशीसें । भरित निजगुणांनीं सर्वही विश्व तोषें
परि अधिक विशेषें लाभ कल्याण थोर । सुजनकुमुद घेती चित्तरूपी चकोर ।२४।
[ चरित रघुपतीचें पौर्णिमाचंद्र तें कीं । सुखवि निजगुणांनीं ही समग्रा त्रिलोकी
परि अधिक तयांचा हर्ष वाटे विशेष जगीं कुमुदचकोरां सज्जनां भाविकांस २४]

—॥ इति रामायणमाहात्म्ययथार्थवर्णनं नाम नवमस्तरंगः ॥—

## तरंग १० वा.

करी प्रश्न जैशापरी श्रीभवानी । तिला बोलिलें तें जसें श्रीभवांनीं ॥
प्रसंगास त्या सर्व गाईन आतां । रचोनी विचित्र प्रबंधां समस्तां ॥१॥
जयांनीं नसे ऐकिलें या कथेतें । न वाटो तयां कांहिं आश्चर्य येथें ॥
कथा ही असामान्य चित्रा अनंता । न आश्चर्य त्याचें गमे बुद्धिमंता ॥२॥
नसे राघवाच्या कथाब्धीस पार । असा ये बुधांच्या मनीं कीं विचार ॥
जगीं राघवाचे असंख्यावतार । शतें कोटि रामायणांचा प्रसार ॥३॥
जगीं कल्पभेदें अनेकें चरित्रें । मुनी गाति जीं कीं सुरम्यें पवित्रें ॥
न घेतां मनीं कांहिं त्यांमाजि शंका । कथा सेविजे आदरें निष्कलंका ॥४॥
अनंत तो राम अनंत तद्गुण । अनंतविस्तारचि तत्कथागण ॥
विचार ज्यांचे शुचि, ते महामती । न चित्र, रामायणभेदिं मानिती ॥५॥

करूनी या रीतीं सकलपरिंचे संशय दुरीं ।
धरूं भावें धूली रज गुरुपदाब्जोद्भव शिरीं ॥
करांतें जोडोनी पुनरपि समग्रां विनवितों ।
न कीं लागावा या विमल कवना दोष लव तो ॥६॥

आतां नमूं हरिहरांप्रति आदरानें । श्रीरामसद्गुणगणां वदुं मंजु गानें ॥
हें वर्ष षोडश शतें वर एकतीस । या संवतीं तुलसिदास लिही कथेस ॥७

ही चैत्रशुद्धनवमी दिन भौमवार । साकेतिं हें प्रकट होत चरित्र थोर ॥
या रामजन्मदिनिं येति समग्र तीर्थें । साकेतिं, सांगति असें श्रुति, संत, वेत्ते
येतात देव, मुनि, मानव, दैत्य, नाग । सेवावया रघुवरासि तसे विहंग ॥
जन्मोत्सवा करिति सज्जन भक्तिमूर्ति । गाती नितांतमधुरा रघुनाथकीर्ति ९

सज्जनवृंदें मज्जन पावन शरयूजलामधें करुनी ।
जपती श्रीरामातें ध्यानें तो श्यामसुंदर स्मरुनी ॥१०॥

जिच्या दर्शनस्पर्शनीं, स्नानपानीं । हरे पाप, ही ख्याति वेदीं पुराणीं ॥
नदी थोर, पुण्या तिच्या पार नाहीं । न वर्णू शके शुद्धधी शारदाही ॥११॥

सुरम्या अयोध्यापुरी ख्यात लोकीं । जगत्पावनी रामधामप्रदा कीं ॥
तियें त्यागितां देह जीवप्रकारा । चुके संसृतीचा समग्राहि फेरा ॥१२॥

पुरी ती मनोज्ञा असे सर्वरीतीं । खनी मंगलांची, यशें सर्व देती ॥
शुभारंभ येथें करीं मी कथेसी । स्मृता कामदंभोन्मदां जी विनाशी ॥१३॥

या ‘ रामचरितमानस ’ रसभवना नाम ठेविलें कवना ॥
कवणांहि ऐकतांक्षणिं देइल संतोष संतत श्रवणा ॥ १४ ॥

विषयदवानलकाननिं चित्तमतंगज नितांत होरपळे ॥
तत्ताप या सरोवरिं ‘ मानसिं ’ होतांचि मग्न, दूर पळे ॥ १५ ॥

मुनिंना रमवी, शमवी दोष त्रिविधहि विनष्ट तूर्ण करी ॥
दारिद्र्य दुःख यांना दावानलसेंच जाळुनी विखरी ॥ १६ ॥
कलहदुराचारादिक कलिकलुषां नुरवि कवन शिवरचित ॥
हें ‘ रामचरितमानस ’ पावन सेवन करावया उचित ॥ १७ ॥
रचना करुनि महेश्वर निजमानसिं रामचरित ठेवी तें ॥
सुसमयिं मग तें त्यानें सांगितलें आवडीं स्वदेवीतें ॥१८॥
त्या ‘ रामचरितमानस ’ म्हणउनि सन्नाम कल्पिलें प्रभुनें ॥
रससुखद तें वदें मी, श्रवणें सादर मनें तया सुजनें ॥१९॥

हे ज्या प्रकारिं जगिं ‘ मानस ’ निर्मियेलें । तैसें जगीं प्रसृत ज्यास्तव सर्व केलें
तो मी प्रसंग कथितों सगळाच आतां । ठेवोनि शंभुगिरिजापदपद्मिं माथा २०

इति रामचरितमानसप्रारंभश्रीअयोध्यास्वरूपप्रभाववर्णनं नाम दशमस्तरंगः ।

## तरंग ११ वा.

शंभुप्रसाद हृदयीं उल्लसवी शुभमती, म्हणुनि तुलसी ॥
हें ' रामचरितमानस ' रचितों सुंदर, मति स्फुरेल जशी ॥१॥
सज्जन सहृदय रसिकें परिसावें काव्य हें सुरस रुचिर ॥
न्यूनाधिकां सुधारुनि सेवावा रस तयांतला सुचिर ॥२॥
वेदपुराणमहोदधि शोषुनियां साधुमेघ वृष्टि करी ॥
सन्मतिभूमीवरतीं अगाध हृदयस्थलासि पूर्ण भरी ॥३॥
तें जल रामयशोमय निर्मल शुचि मधुर मंगलावास ॥
रसिकमनोहर सौख्यद सेवुनि बुध घालवी भवायास ॥४॥

गातात संत हरिच्या सगुणात्मलीला । ज्या नाशिती हृदयिंच्या सकला मळीला
जी वृष्टिंतील हरिभक्ति अवर्णनीय । ती वारिची मधुर शीतलताच होय ॥५॥
पानीय तें सुकृतशालिंसि पथ्यकारी । श्रीरामभक्तजनजीवन तेंच वारि ॥
मेधाक्षितीवरतिं पावन वारि ये तें । वाहोनियां श्रुतिपथें भरि मानसातें ॥६॥
त्या सुस्थला भरुनि तें स्थिर वारि राही । सर्वांसि पथ्यकर शीतल सौख्यदाई ॥
जें सौरसें अतुलनीय असेंचि हो कीं । सौंदर्य तादृश चिरंतन नान्य लोकीं! ७
संवाद सुंदर अतीव विचारपूर्व । जे बुद्धिनें रचियले जणुं हर्षपर्व ॥
ते चार होत जणु घाट सुरम्य साचे; । पावित्र्यपूर्ण हृदयंगम मानसाचे ॥८॥

कांडें सप्त सरोवरास सजती सोपानशीं सुंदर ।
ज्ञानाच्या नयनीं तयां निरखितां आनंदतें अंतर ॥
माहात्म्य प्रभुचें अगाध जल कीं ज्या ना मिती ना गुण ।
सीतारामयशा सुधाचि उपमा ऐसें करूं वर्णन ॥ ९ ॥

काव्योपमा अतिमनोहर वीचिलीला । चौपाइ वारिरुहपत्रसमा विलोला ॥
वक्रोक्ति मंजुळ मनोरम शुक्ति होती । अभ्यंतरीं विखुरलीं जणुं दिव्य मोतीं ! ॥
दोहे नितांतमधु सोरठपद्यजाती । ते छंद सुंदर रसाळ विराजताती ॥
जे भासती कमलसंघ मनोज्ञरंगी । शोभा धरीति बहु काव्यसरोवरांगीं ॥ ११॥
भाषा सुरम्य, मधु भाव, अतुल्य अर्थ । हे गंध गोड मकरंद पराग त्यांत ॥
हो पुण्यपुंज जणुं मंजुल भृंगपंक्ति । ज्ञानादि वर्णित विरक्तिहि हंस होती १२

ध्वनि चतुरोक्ति मनोहर गुणजाती हे अनेक काव्यगुण, ।।
बहुविध मीन जणों ते सुंदर या मानसीं ग्रंथ निपुण. ।। १३ ।।
धर्मार्थ-काममोक्षज्ञानादि विचार योगविज्ञान ।।
नवरस विराग जपतप यां जलचर हेंचि चारु उपमान ।। १४ ।।

पुण्यात्म साधुजन नामगुणादि गाती । ते चित्ररंगि जणुं वारिविहंग होती ।।
सत्संघ भोंवतिं सुशोभति आंबराई । श्रद्धा वसंत ऋतु पोषक नित्य होई १५

जें भक्तिचें निरूपण विविध परींचें दया क्षमा यांचें ।।
ते जणुं लतादुमांचे मंडप रसिकास आवडायाचे ।। १६ ।।
शमदमनियमविवेचन पुष्पें हीं, ज्ञान हीं फळें मधुर ।।
हरिपदवर्णन तद्रस उत्तम ज्या वेद वर्णिती चतुर ।। १७ ।।
तैशा अवांतरकथा नानाविध ते प्रसंग रम्य तसे ।।
ते तेथिल बहुरंगी मधुभाषी शुकमयूरकोकिलसे ।। १८ ।।

रोमांच जे, तनुवरी उठती विशेष । त्या वाटिका उपवनीं वनिं भक्तिपोष ।।
आनंद त्यांवरि विहंगविहार; तेथें । स्नेहांबु माळि मन लोचनिं सिंचितें तें !
हें भक्तिनें चरित जे जन साधु गाती । ते या सरा चतुर रक्षणकारि मूर्ति ।।
जे आदरें परिसती नर आणि नारी । ते मानसप्रभु खरे चरिताधिकारी ! २०
दुष्टान्तरात्म विषयी बककाकरूप । कुमार्गि त्यां गति सरापाशिंही दुराप ।।
थारा इथें विषयगोष्टिरसां न नाना । शंबूक, बेडुक, शृगाल अशांसमानां
या कारणेंच कधिंही बककाक कामी । येती न या निकटही विषयानुगामी ।।
येऊं पहाति जरि ते बहुत श्रमांहीं, । येणें सरा हरिकृपेविण शक्य नाहीं ! २२
हो दुष्ट संगति कुमार्ग भयाण उग्र । व्याघ्राहि–सिंहसम दुष्टवचें समग्र ।।
जंजाल पाश गृहिंचीं बहुसाल कार्यें । तीं तुंग दुर्गमगिरीसम दुर्निवार्यें ।।२३।।
संमोहमानमदरूप अरण्य दाट । त्यामाजि भीषण कुतर्कनद्या; न वाट ।।
श्रद्धाबळें रहित, ज्यां नच संगिं संत । ना रामिं भक्ति, न तयां गति मानसांत

अशांही कष्टांतीं जरि कुणि सरासन्निध रिघे ।
तिथें पोंचे तों त्या क्षणिं निबिड निद्राचि विलगे ।।
तसें त्याचें अंगीं भरत जडतारूप हिंवही ।
अभाग्या त्या नाहीं सरनिकटिंही स्नान लवही ।।२५।।

ज्यांतें राम कृपाकटाक्षिं निरखी त्यांना न हीं संकटें ।
ते या सादर डुंबती सरिं; न त्यां तापत्रयांचे झटे ॥
ज्यांची रामपदांबुजीं अतिशय प्रेमार्द्र झाली मति ।
केलें कांहिं, तरी सराप्रति न या केव्हांहि ते सोडती ! ॥२६॥
कोणी वांछि करावयासि जर कां या सत्सरीं मज्जनें ।
त्यानें आधिं करावयासिच हवा सत्संग शुद्धें मनें ॥
व्हावा मानसचक्षु हाच जन हो ! या ' मानसीं ' लागला ।
स्नानें याच सराचिया कविमती ही जाहली निर्मला ॥२७॥
आनंदवीचि हृदिं उल्लसल्या अनंत । प्रेमौघ हर्षहि उचंबळले मनांत ॥
तोच प्रवाह कवितासरिदोघ झाला । श्रीरामनिर्मलयशोजलिं पूर आला ! ॥२८॥
नामें ती सरयू नदी, उगम हो जीचा महन्मंगलें ।
लोकांचें मत, तेविं वेदमत हीं कूलें जिच्यीं मंजुलें ॥
पुण्या मानसनंदिनी, जलभरें जी नेइ वाहूनियां ।
तीरींच्या तृणवृक्षमूलसदृशां पापां कलींच्या भयां ॥ २९ ॥
तसे श्रोते वृंद त्रिविधपरिचे भाविक बरे ।
तिच्या दोहीं तीरांवरि जणुं पुरें, ग्राम, नगरें ॥
सभा संतांची तो अनुपम अयोध्याचि गमली ।
प्रसू मांगल्याची सकल दुरितें जेथ शमलीं ॥ ३० ॥

—: इतिश्रीरामचरितमानसवर्णनं नाम एकादशस्तरंगः :—

## तरंग १२ वा.

श्रीरामकीर्तिरूपी सुंदर शरयूतरंगिणीजल तें ।
श्रीरामभक्तिरूपी सुरसरितेलागिं संगमें मिळतें ॥ १ ॥
सानुज रघुरायाचें पावन यश युद्धमूल जें पसरे ॥
तोच महानद शोभन शोणाभिध मग तिच्यामधेंच सरे ॥ २ ॥
त्या सरयूशोणांतरिं साजतसे सुरसरिद् विशेषचि ती ॥
कीं ती विरतिविवेकां संगत शोभे सुमूर्त भक्ति अति ॥ ३ ॥
भक्तत्रितापहारी प्रवाह मग तो मुलत्रयें मिळतो ॥
रामस्वरूपसागरिं, सकलशरण्य प्रभाव हा कळतो ॥ ४ ॥

मानसिं जन्मा येउनि शरयू गंगेसि संगता झाली ॥
हीच्या श्रवणें सज्जनचित्ता पावन गुणाढ्यता आली ॥ ५ ॥
मध्यें मध्यें साजति चित्रविचित्रें कथानकें सुरसें ॥
तीं शरयूतीरींचीं उद्यानें काननेंचि वाटतसे ॥ ६ ॥
श्रीशिवगिरिजा यांच्या लग्नाचीं वर्णनें बहुत रुचिरें ॥
जाणों तींच जलचरें अगणितपरिंचीं, मती तिथें विचरे ॥ ७ ॥
श्रीराघवजन्माच्या आनंदोत्सवकथा शरयुसरितें ॥
आवर्त-तरंग तशा शोभति अति, रसिक तुष्ट ज्यांवरि ते ॥ ८ ॥
बालचरित्रें चारहि बंधूंचीं कमलराशि बहुवर्णी ॥
नृपराज्ञीपरिजनकृत सुकृतें अलि, जलविहंग, कवि वर्णी ॥ ९ ॥
सीतास्वयंवरकथा मधुरा सुकांता । ती झांकली जणुं नदीसुषमा अनंता; ॥
सत्प्रश्न जे कुशल, वाटति त्याच नावा । जीं उत्तरें चतुर, नाविक धीर ते वा !
अन्योन्यसंकथन सच्छ्रवणादि तेथें । तीरावरी पथिकसंघचि वाटती ते ॥
ती घोर धार जणुं भार्गवरामरोष । रामोक्ति घाट जणुं काय सुबद्ध तीस !॥११॥
सानुजरामविवाहोत्सव सर्वांलागिं सुखद शुभकर ते ॥
वाटे शरयूचे कीं पूरचि उल्लासले तिच्यावरते ॥ १२ ॥
हीच्या पठणें, श्रवणें बाह्यांतरिं हृष्टकाय जे होती ॥
सुकृती प्रसन्न संतत संत तपोमूर्ति तद्रसिं नहाती ॥ १३ ॥
श्रीरामयौवराज्याभिषेक-मंगलमहोत्सवादि तसे ॥
तत्तीरीं मिळलेला पर्वमहोत्सवसमाज वाटतसे ॥ १४ ॥
कैकेयी कुटिलमती आणी जीं संकटें विविध विकट ॥
तीं शरयूसलिलांतिल भासति जणुं काय शैवलें प्रकट! १५ ॥
शमन करिती उत्पातांच्या असंख्य गणांप्रती ।
भरतचरितें, तत्तीरींचीं जणों जप-याग तीं ॥
अवगुणकथा दुष्टात्म्यांच्या सपाप कलींतल्या ।
जलमल बकां-काकांऐशा सरित्तटिं वाटल्या ॥ १६ ॥
श्रीराममूर्तिशरयू साहीहि ऋतूंत सर्वही कालीं ॥
अत्यंत रम्यदर्शन पावनतम सर्वसुभगगुणशाली ॥ १७ ॥

शिवहिमशैलसुतांचा विवाह हा ऋतु तिच्यांत हेमंत ॥
जन्मोत्सव रघुपतिचा शिशिर गमे हा सुखप्रद अनंत ॥१८॥
श्रीरामजानकीचें लग्नसमारंभ-वर्णन विराजे ॥
ऋतुराज वसंत जणों देई सुख, हर्ष, मंगल मना जें ॥१९॥
वनगमन राघवाचें हाच जणों होय दुःसह ग्रीष्म ॥
तेथें वनवासकथा पंथा पवनातपें प्रखर भीष्म ॥२०॥
भीषण निशाचराशीं केलें जें तुमुल युद्ध घनघोर ॥
वर्षर्तु तोच सुरकुलशालींतें सुखद पथ्यकर थोर ॥२१॥
श्रीरामराज्यसुख जें, रामाचे विनयवैभवादि तसें ॥
यांचें वर्णन सुंदर शरदृतु जाणों प्रसन्न साजतसे ! ॥२२॥
सतीशिरोरत्न पवित्र सीता । तद्वर्णनांची रमणीय गाथा ॥
ती वाटते सद्गुणराशि साची । अनुत्तमा निर्मल त्या जलाची २३
भरतस्वभाववर्णन वाटतसे कीं मनोज्ञ शीतलता ॥
जीतें न खंड केव्हां, यद्गुण कवणां कधीं न ये तुलतां ॥२४॥
त्यांचें परस्परनिरीक्षण, बोलणें तें । ती प्रीति, मीलन तसें हसणेंहि तें तें
सौभ्रात्र तें अतुल बंधुचतुष्टयांत । हीं कीं नदीजलिं मधुत्व सुगंध होत २५ ॥
माझें सुदीनपण आर्ति विनम्रता हीं । तैसें लघुत्व जलिं त्या; परि खोडि नाहीं
सौंदर्यवृद्धि गुण उत्तम वारिचा तो । मोठ्या गुणांत लघु दोष बुडोनि जातो !
तें वारि अद्भुत खरें; श्रुतही सुखासी । आशातृषा हरुनि चित्तमलाहि नाशी
तें रामभक्तिस विपोष करी नितांत । नाशीत किल्बिष कलींतिल दुःखजात ॥
संसारखेद शमवी करि हर्षपोष । दारिद्र्यदुःखदुरितादि विनाशि दोष ॥
निर्दाळि मोहमदकोप तसाच काम । पोषी विराग सुविवेक विशुद्धिधाम २८
या आदरें सलिलिं मज्जन पान होतां । हृत्ताप पाप शमुनी, न उरेचि चिंता ॥
ज्यांनीं न आत्ममन या धुतलें जलांत । भीतां तयांसि कलिकालविपत्तिपात ॥
तृष्णात्रस्त असे ते; रविकरसंसाररूप हें वारि ॥
पाहूनि जीव मृगसा फेरे घे ; कोण तें असुख वारी ? ! ॥ ३० ॥
गुणगण सुजलाचे गाउनी, जेविं येत, । सुचिर मम मनाला स्नान घालूनि त्यांत
स्मरुनि हृदिं भवानी-शंकरांच्या पदांना । रघुपतिसुकथेच्या मी करीं रम्य गाना

श्रीरामपादपद्मां धरुनि हृदीं तत्प्रसाद सेवून ॥
वर्णूं मुनिवर्यद्वयसंवाद स्वादु जो सुधेहून ॥३२ ॥

—* इति मानसरूपकं समाप्तं नाम द्वादशस्तरंगः *—

## तरंग १३ वा.

### अथ कथाप्रारंभः

होते भरद्वाजमुनि प्रयागीं । अतीव जे रामपदानुरागी ॥
निधान जे शांतिदयादमांतें । ज्ञानी तपस्वी परमार्थनेते ॥ १ ॥
माघीं रवी मकरराशिंत जैं प्रवेशी । येती प्रयागिं सगळे जन भक्तिराशि ॥
देवौघ-दैत्यवर-किंनर-मानवांसी । वाटे त्रिवेणिजलिं मज्जन पापनाशी ॥२॥
ते आवडीं भजति माधवपादकंजें । स्पर्शोनि अक्षय वटा तनु हृष्ट साजे;
अत्यंत पुण्यकर आश्रम तो मुनीचा । व्हालीत जो ऋषिवरांसहि मोह साचा ॥३॥
स्नानार्थ जे ऋषिमुनी बहुसंख्य तेथ । त्या तीर्थराजिं सगळेच समूह येत ॥
उत्साह–भक्तियुत आश्रमिं त्या प्रभातीं । अन्योन्य ईशगुणगानिं रमोनि जाती ॥
चाले ब्रह्मनिरूपण धर्मविधी तत्त्वभाग ते कथिती ।
भगवद्भक्तिविवेचन वैराग्यज्ञान ते जणों मथिती ॥ ५ ॥
स्नानें करूनि अशिं ते मुनि माघनासीं । सारेहि जात परतोनि निजाश्रमासी ॥
आनंद थोर लुटती प्रतिवर्षि ऐसा । स्नानार्थ येत मकरीं ऋषि तीर्थवासा ॥६॥
ते एकदां स्नान करूनि मागुतीं । मुनींद्र आले निज आश्रमांप्रति ॥
श्रीयाज्ञवल्क्यासि तथापि तो मुनि । घेई भरद्वाज नमूनि ठेवुनी ॥ ७ ॥
प्रक्षालि आदरें तो पावन तत्पादपंकजें विमलें ॥
देऊनि आसन करि पूजन, हृत्ताप यद्गुणें शमले ॥ ८ ॥
व खाणुनि तद्यश मुनि अति मृदुवचनीं तया पुसे ऐसें ॥
" मुनिवर्य ! एक संशय मोठा माझ्या मनामधें वैसे ॥ ९ ॥
आहेत वेदतत्त्वें करगत बदरें तशीं तुम्हां ठावीं ॥
पुसण्यास भीति लज्जा लवहि बुधाला कदा न वाटावी ॥१०॥
होई अकार्य जर मी नच तें पुसेन । देवरुती मुनिपुराणकथा सुजाण –
गातात कीं, कपट आचरितां गुरूशीं । न ज्ञान निर्मल हृदंबुरुहीं प्रकाशी ११

मी यास्तव प्रकटितों मम चित्तमोह । नाशा तया, करुनियां करुणाप्रवाह ॥
आहे प्रभाव अमित प्रभुरामनामीं । हें गाति संत निगमागम भक्तिकामी १२
तो ज्ञानराशि अविनाशि गुणाधिवास । हें नाम संतत जपे हृदयीं महेश ॥
विश्वांतले सकल आकर जीवजाति । काशींत मृत्यु घडतां हरिपाशिं जाती १३
नामप्रभाव मुनिवर्य! रघूत्तमाचा । हाही गमे, शिवहि तें उपदेशि वाचा ॥
'हा राम कोण?' मज वाटतसे पुसावें । तुम्ही वदा मजसि तें स्वकृपास्वभावें
साकेतराज-सुत राम जगांत एक । सार्‍यांस ठाउक रघूत्तम तो सुरेख ! ॥
नारीवियोग करि ज्यास सशोक भारी। संक्रुद्ध तो दशमुखा रणरंगिं मारी १५
सांगा प्रभो ! हर जपे हृदिं कोण राम? । सर्वज्ञ केवल तुम्हीं मुनि सत्यधाम
तो तोच दाशरथि राम? किं अन्य कोणी? सांगा विवेकनयनीं मनिं पारखोनी
जेणें निमेल मम हा भ्रम सर्व थोर। वर्णा कथा अशि सुविस्तृत सौख्यपूर."
तैं याज्ञवल्क्य वदले वच मंदहासें । "रामप्रभावगुण जाणसि तूं विशेषें १७
देहें मनें वचनिं राघवभक्त होशी । मातें कळे चतुरता तव चित्तिं कैशी; ॥
तूं गूढ रामगुण जाणुं पहासि सारे;। हें नेणत्यापरि उगा पुससी असा रे ! १८
वत्सा ! करीं श्रवण सादर एकचित्तें । सांगेन राघवकथा अति रम्य तूतें ॥
काली कराल महिषासुर मोह नाशी । ऐशी रघूत्तमकथा गमते मनासी ॥१९
कीं कौमुदीच जणुं राघवचंद्रगाथा । होती चकोर जणुं, संत तियेसि गातां ॥
पूर्वीं उमाहि धरि अंतरिं हीच शंका । तैं ही वृषांकहि कथी तिज निष्कलंका
तूतें कथिन यथामति उमाहरांचा असा कधीं झाला ।
संवाद, तैंचि ऐकें, नेइल विलया तुझ्या विषादाला ॥ २१ ॥
॥ इति याज्ञवल्क्यभरद्वाजसंवादे त्रयोदशस्तरंगः ॥

## तरंग १४ वा

त्रेतायुगांत शंकर अगस्त्यमुनिपाशिं एकदां आले ॥
संगें सतीहि होती, विश्वपित्या पूजुनी मुनि निवाले ॥ १ ॥
मुनिवर्यें रामकथा वर्णियली परम पावना सुखदा ॥
तच्छ्रवणें परमात्मा परमसुखीं मग्न होय शंभु तदा ॥ २ ॥
हरिभक्ति त्या ऋषीनें शोभन पावन महेश्वरा पुसली ॥
कथिली ती त्यास तयें कीं श्रवणीं योग्य वृत्ति त्या दिसली ३ ॥

रामाचे गुण सांगतां परिसतां तेथें अगस्त्यासवें ।
कैलासेश्वर दीर्घ काल रमला सौख्या न ज्या वर्णवे ॥
येई तो मग मागुतां स्वभवना तेथूनियां शंकर, ।
संगें दक्षसुता सती मतिमती होती प्रिया सादर ॥ ४ ॥

श्रीराम त्या अवसरीं रघुवंशिं आला । भूपृष्ठदुर्धरभरा उतरावयाला ॥
सोडूनि राज्यवर तातवचें युवाच । संचारि दंडकवनांत विरक्तसाच ॥५॥

मार्ग क्रमीत असतां हृदयिं म्हणे हर ' कसा बघूं राम ?
गुप्तपणें अवतरला, मीं बघतां, उघड हो घनश्याम ! ' ॥ ६ ॥

एकीकडे दर्शनलुब्ध लोचन । पहावया धैर्य न हो कथंचन ॥
ऐशापरी क्षुब्ध उमेशवृत्ति ती । कांहींच नेणे, तुलसी म्हणे, सती ॥ ७ ॥
पौलस्त्य मानुषकरें निजमृत्यु याची । सत्या करूं बघतसे प्रभु वाग् विधीची ॥
गेलों न मी समयिं या तर होय हानि । चिंती असें हर परी नच ये बघूनी ८
ऐशापरी हृदयिं खिन्न असा महेश । तों त्याचवेळिं दशशीर्ष दिसे तयास ॥
मारीच जात अतिनीच तयाच संगें । मायामृगत्व धरि कांचनरूपरंगें ॥९॥
सीतेसि रावण हरी फसवूनि मूढ । रामप्रताप न तदा समजे निगूढ ॥
श्रीराम बंधुसह ये मृग जों वधूनी । पाहूनि आश्रम, भरे नयनांत पाणी १०
होऊनि आर्त नरसा हृदिं रामराय । बंधूसवें विपिनिं शोध करीत जाय ॥
ज्यातें नसेचि मुळिं योगवियोग कांहीं । पावे पहा विरहदुःख विभू तसाहि ! ! ११
आहे विचित्र अति, रामचरित्र सारें । तें जाणतात जग सुज्ञचि सत्प्रकारें ॥
जे मूढ मोहवश मंदमती अतीव । ते मात्र मानिति तया विपरीत सर्व ॥१२
रामासही निरखि शंकर त्याच काळीं । तच्चित्तवृत्ति अतिहृष्ट विशेष झाली ॥
लावण्यसिंधु बघि तो नयनीं भरून । कीं त्या कुवेळिं हर ओळखि दाखवी न ! ॥

' पुण्यारामा ! जय जय विभो ! सच्चिदानंद रामा ! '
उद्गारूनी निघत पुढतीं शंभु, जो नाशि कामा ॥
जातां तैसें जवळि दयिता दक्षकन्याहि होती ।
भक्त्युद्रेकें पुलकिततनू शंभु हो प्रेममूर्ति ॥ १४ ॥
देखे जेव्हां निजपतिस ती त्या स्थितीमाजिं देवी ।
झाली शंकाकुल, निजमनीं ती विचारीत तेव्हां : ॥

नों. ग्र.

' विश्वाचे हे प्रभु हर जगद्वंद्य, ज्यांतें नमीती
नम्रें शीर्षें सुरनरमुनी, कां अशी तत्स्थिती ती ? ॥ १५ ॥
कां हें यांनीं वनचर अशा राजपुत्रा बघोनी
चित्तोद्गारें ' जय जय विभो सच्चिदानंद ! ' वाणी ॥
बोलोनी त्याप्रति नमियलें ? प्रीतिनें मग्न झालें
तत्सौंदर्यी मन, अजुनि त्यां आवराया न आलें ! ॥ १६ ॥
जें कीं मायारहित, न कळे जें श्रुतींच्या विचारा
भेदातीत, प्रकट सकलव्यापि ज्याचा पसारा ; ॥
ना ज्या इच्छादिक, नच कला, नाहिं ज्या आदि अंत ;
तें कैसें ही धरुनि नरता ब्रह्म धुंडी वनान्त ?! ॥ १७ ॥
जो श्रीविष्णू नरतनु धरी देवकार्या कराया
तो सर्वज्ञ त्रिपुरहरसा ; त्या छळी केविं माया ? ॥
तो नारीतें हुडकिल कसा अज्ञसा श्रीमुरारि ?
ज्ञानाचा सन्निधि असुरहा भक्तविघ्ना निवारी ॥ १८ ॥
होईल ना परि हरोक्ति मृषा कधींही । श्रीशंभुतें विदित संतत सर्व कांहीं ' ॥
शंका सतीहृदयिं येति अशा अपार । ज्ञाना न तेथ गवसे लवही प्रसार १९
ना बोलुनी प्रकटवी जरि तें भवानी । तें शंकरा सकल अंतरिं ये कळूनी ॥
बोले " स्वभावचि असा म्हणुनी मनांत । शंका धरीशि सति ! योग्य परी न होत
ज्याच्या अगस्त्यमुनि गाति चरित्रलीला । यद्भक्ति मी परिसवीत तया मुनीला
तें इष्ट दैवत असे रघुवीर माझें । ध्यातात धीर मुनिहीर मनीं सदा जें २१
योगिमुनीश्वर सिद्ध नियमपर भजती ज्यातें विमलमनें ।
गाती कीर्ती सकल यथामति निगमागम ज्या ' नेति ' म्हणे; ॥
विश्वव्यापक जगदधिनायक परब्रह्म हा रचि माया ।
स्वतंत्र राघव भक्तहितास्तव अवतरुनी ये भुवना या. " ॥ २२ ॥
ऐसा जरी बहु हरें उपदेश केला । ना तो मुळींच परि मानवला सतीला ॥
माया दुरन्त हरिची गणुनी मनांत । बोले हसूनि दयितेप्रति विश्वनाथ — ॥
' संदेह गे ! तव मनीं जर फार वाहे, । तूं कां स्वतःच न परीक्षिसि जाउनी हें ? ॥
येशील जों परतुनी मजपाशिं मी तों । पाहात वाट वटवृक्षतळीं रहातों ॥ २४

जाईल जेविं तव मोह मतिभ्रमादि । तूं तेविं उत्तम विवेक करूनि साधीं' ॥
ऐसें प्रियें सुचवितांचि सती निघाली । चित्तीं परीं ' करुं कसें ? ' अशी वृत्ति झाली
शंभू मनांत अनुमान करी असें कीं । आतां सतीप्रति दिसे नच भद्र लोकीं; ॥
माझ्याहि ही न वचनें त्यजित स्वशंका । वाटे विधीच विपरीत करीत हे का ! ॥
जें नेमिलें रघुवरें घडणार तेंच । कां वाढवा हृदिं वितर्कतरू उगाच ? ॥
ऐसें म्हणूनि करि तो जप रामनाम । ती जाय, राघव जयास्थलिं सौख्यधाम ॥

पुनः पुन्हां चित्तिं विवंचुनी सती । समग्र सीतासम रूप घेत ती ॥
चले जिथें राघव येत ज्या पथें । प्रभाव त्याचा बघण्यास इच्छिते २८

जाणेचि लक्ष्मण उमाकृत वेष तैसा । साश्चर्य चिंतित 'धरी भ्रम शंभुयोषा !'
कांहीं तथापि न वदे, दिसला गभीर । जाणे प्रभाव हरिचा मतिमान् सुधीर
जाणे सतीकपट तें प्रभु रामराय । जो सर्वसाक्षि सकलांतरवासि होय ॥
अज्ञाननाश झणिं ज्या स्मरतांचि व्हावा । सर्वज्ञ तो नुमजतांचि कसा रहावा ?
मांडी सती परि तिथेंहि असत्यभाव, । नारीस्वभावचि असा कुटिलप्रभाव ॥
मायाबला निजमनामधिं चिंतुनीयां । श्रीराम हांसुनि वदे मृदु भाषणीं या ३१
जोडी स्वहस्त करि वंदन राम तीतें । सांगे स्वनाम पितृनामहि सन्मती तें ॥
तैसें विचारि तिज कीं ' वृषकेतु कोठें ? कां एकल्या फिरतसां विपिनांत येथें ? '
ऐकोनि रामवच तें मृदु आणि गूढ । झाली सती हृदयिं लज्जित बुद्धिमूढ ॥
ती भीत भीत पतिसान्निध येउं लागे । चित्तांत दुःख तिचिया अति तीव्रता घे
' म्यां मानिली नच हरोक्ति मुळींच आधीं । मी अज्ञता मम रघूत्तमिं मंद लादीं
आऊनि उत्तर हराप्रति देउं केवीं ? ' । ऐशी जळे हृदयिं दारुण दाहिं देवी
श्रीराम जाणत सती अति खिन्न झाली । मच्छक्ति आज लव तीस कळून आली ॥
जातां सती नवल एक बघी पथांत । श्रीराम भासत पुढें निजबंधुयुक्त ॥ ३५
मागें बघे तरि दिसे तिज तेंच भासे । सीता सलक्ष्मण रघूत्तम रम्य वेषें ॥
पाहे कुठेंहि तरि राघव ये दिसोन । सेवेसि ज्यास मुनि सिद्धगण प्रवीण ॥
देखे महेश, विधि, विष्णु अनेक तेथें । ज्यांचे प्रभाव अमितप्रभ थोर ते ते
सारेच ते करित वंदुनि रामसेवा । शोभे तयां विविध वेष मनोज्ञ सर्वां ॥ ३७

ज्या ज्या वेषें देखे सुंदर विधि, हरि, तसाच तो शर्व ।
त्या त्या परींच देखे सावित्री, इंदिरा, सती सर्व ॥ ३८ ॥

जेथें जेथें रघुपतिरूपें जितुकीं सतीप्रती दिसलीं ॥
तेथें तेथें तितुकीं शक्तिसहित देवसंघसहित भलीं ॥ ३९ ॥
विश्वांतील चराचर दिसले निज जीवजातही तेथें ॥
बहुविधवेषविभूषित सुर सारे पूजितात रामातें ॥ ४० ॥
रामाचें रूप दुजें दिसलें नाहीं तिला तिथें कोठें ॥
सीतेसह रघुपति बहु, परि सारे ते समानसे होते ! ॥ ४१ ॥
रघुपति-लक्ष्मण-सीता-रूपें तीं तींच पाहुनी भ्याली ॥
कांपे हृदब्ज, तनुचें भान नुरे, नेत्र मिटुनि पथिं बसली ! ॥ ४२ ॥
पुनरपि उघडुनि नेत्रां निरखी तों कांहिं ना विशेष दिसे ॥
वारंवार रघुवरा नमुनि मनीं आलि जेथ शंभु असे ॥ ४३ ॥
येतां समीप पुसिलें हंसुनी गिरीशें । देवीप्रती कुशल, तेविं विचारि ' कैसें
केलें परीक्षण तुवां रघुनायकाचें ? । सारें मला प्रियतमे सति ! सांग साचें. '
॥ इति श्रीरामलीलाद्भुतसतीमोहनवर्णनं नाम चतुर्दशस्तरंगः ॥

## तरंग १५ वा

जरि ती अंतरिं भीता रघुवीराचा प्रभाव घे स्मरणीं ॥
तरि ती सती शिवाच्या सन्निध लपवूं बघे स्वकृत करणी ॥ १ ॥
बोले " मीं न परीक्षेसाठीं त्यांच्या न कांहिं आचरिलें ॥
तुमच्याच परी केली प्रणति महाराज ! चित्त नावरिलें ! ॥ २ ॥
आपण जें वदलां तें नाहिं कदाही असत्य व्हायाचें ॥
आलें प्रत्यंतर अजि अंतःकरणासि माझिया याचें " ॥३॥
तदां अंतर्ध्यानें मदनरिपु तो सर्व निरखी ।
कळों आलें त्यातें चरित करि जें वल्लभ सखी ॥
असत्यें जी प्रेरी गुणवति सतीच्याहि वचनीं ।
प्रभूची ती माया नमित हर काया लववुनी ॥ ४ ॥
हरीच्छा जी भावी कधिंहि न चुकावी बलवती ।
असें चिंती चित्तीं त्रिपुरहर सर्वज्ञ सुमति ॥
सतीनें सीतेच्या अनुसरुनि वेषा वरियलें ।
विशेषें या भावें हरमन विषादें धरियलें ॥ ५ ॥

जर प्रीती आतां करिन दयिता ही समजुनी ।
पथा भक्तीच्या, ती उखडिल अनीती उपजुनी; ॥
महासाध्वी टाकूं कशि ? अघ महा होयहि रति ।
विचारें ना बोले, शिव परि जळे अंतरिं अति ! ॥ ६ ॥

तदा भक्तिनें वंदुनी रामपाय । स्मरे राघवा; चिंतिता चित्तिं होय – ॥
' सतीची न भेटी पुन्हां याच देहें ! ' । मनीं निश्चयें शंकरें कल्पिलें हें ॥७॥
असें धीर तो चिंतुनी चालुं लागे । स्वधामा; स्मरे राघवा अंतरंगें ॥
घडे तों तदा स्पष्ट आकाशवाणी । जिला ऐकुनी खिन्न होई भवानी ॥ ८ ॥

नभोवाग् उद्गारी " जय जय महेशा ! त्रिनयना !
दृढा भक्ती रामीं तव निरुपमा, कामदमना ! ॥
तुवां केला ऐसा पण करुं शके अन्य कवण ?
नसे ऐसा भक्त प्रभु रघुवराचा तुजविण ! " ॥ ९ ॥

झाली सचिंत मनिं ऐकुनियां सती हें । ती भीत भीत वचनार्थ निवाडुं पाहे ॥
ईशा पुसे ' पण तुम्हीं कसला जि ! केला ? । सांगा प्रभो ! मजवरीं करुनी दयेला '

त्यातें पुष्कळ ती पुसे परि न तो कांहींच सांगे हर ।
तेव्हां मानि सती, ' समग्र समजे सर्वज्ञ तो ईश्वर ॥
त्याशीं मीं कपटें समाचरिं; असो धिक्कार ऐशा मला ! ।
जात्या स्त्री, सहजींच मूढ जड मी, विश्वीं मला ना तुला ! ' ॥११॥

[ बहुप्रकारें जरि ती विचारी । कांहीं न सांगे तिजला पुरारी ॥
मानी सती ' शंकर सर्व जाणे । मी वागलें नाहिं खरेंपणानें ' ॥ ११ ॥ ]

जल पयीं मिळतां मिसळे सम । प्रणयरीति अशी अति उत्तम; ॥
कपट आम्ल तिथें पडतां कुठें । अलग हो रस; एकपणा फुटे ! ॥ १२ ॥

जाणोनि ती स्वकृति शोक मनीं करीत । झाली साचिंत हृदयांत सती नितान्त
वाटे तिला 'हर कृपाब्धि अगाध होय । बोलें न तो प्रगटि दोष महान् मदीय '
मुद्रा बघोनि पतिची समजे मनांत । कीं त्यागि नाथ मज; दुःखित ती नितान्त. ॥
जाणे स्वपाप; तिज कांहिंच बोलवेना । आव्यापरी जळुनि अंतरिं होत दीना १४
पाहोनि दुःखित अतीव सती जहाली । सांगे कथा तिजसि सुंदर चंद्रमौली ॥
मार्गीं तिला रमवि रम्यरसेतिहासें । कैलासिं ते उभय येति अशा प्रवासें ॥ १५

तेथें पुन्हां निजहृदीं स्मरुनी पणाला । पद्मासनीं वटतलीं हर बैसलेला ॥
झाला निमग्न रमला सहजस्वरूपीं । लागे समाधि जिस खंड न हो कदापि ॥
कैलासिं राहत सतीहि तदा, परी ती । होती मनांत अधिकाअधिक दुःखवृत्ति ॥
त्याचें न वर्म परि आकळलें कुणाला । वाटे युगासम तिला दिन एक झाला ॥
शोकोर्मिपूर हृदयीं भरती किती ते । ' दुःखाब्धिपार कधिं सांपडणार मातें ? ॥
मीं राघवासि अनयें अवमानियेलें । नाथोक्ति मानुनि असत्य, तशीच गेलें ॥
देशी मला मदपराधफलें विधात्या ! । योग्याच आर्ति जरि सर्वपरीं मला त्या
श्रीशंकरा विमुख या असल्या स्थितींत । अद्यापि तूं मजसि ठेविसि कां जिवंत ? ' ॥
ना वर्णवे हृदयदुःख सतीस हो जें । चित्तीं स्मरे सुमति राघवपादकंजें ॥
प्रार्थी " प्रभो ! प्रथित दीनदयाळ ऐसा । गाती श्रुती करिशि तूंचि भवार्तिनाशा;
यासाठिं जोडुनि करां तुज याचना ही । सोडीव देह म्हणिं हा मज सह्य नाहीं !
भक्ती असेल जर शंभुपदीं मदीय । वाक्-चित्त-देहिं जर मद्व्रत सत्य होय २१
ऐकोनि मद्विनति हे समदर्शिनाथा ! । ऐसा करीं तर उपाय म्हणींच आतां;
जेणें मला मरण येइल अश्रमेंचि । होईल दुःसह विपत्तिहि दूर साची. " २२
ऐशापरी बहुत दुःखित दक्षजाता । तद्दुःख येइल कुणाहि न वर्णु जातां
तेरा सहस्र उणिं वर्षशतें सहस्र । होतां सरे हरसमाध्यवधी अजस्र ! ॥२३॥
श्रीरामनामजप तो करि शंभु जेव्हां । जाणे सती, हर समाधि विसर्जि तेव्हां;
जाऊनि ती नमित भर्तृपदारविंदें । शंभू तियेसि निजसम्मुख आसना दे. २४
सांगे त्रिलोचन कथा हरिच्या रसाळा । झाला प्रजेश जगिं दक्ष तयाच काळां
त्या सर्वयोग्य बघुनी विधि त्यास देत । सर्वप्रजापतिमुखत्व जनाधिनाथ. २५
दक्ष प्रजापति महान् अधिकार पावे । गेला भरोनि हृदयीं अभिमानगर्वें ॥
नाहीं जगांत कुणि, ज्या अधिकार येतां । नाहीं प्रमत्तपण ज्या शिवलेंचि चित्ता.
घे दक्ष सर्व मुनिमंडळ बोलवोनी । आरंभि त्याकरविं यज्ञ महाप्रयत्नीं ॥
आमंत्रि सर्व सुर तो अति आदरानें । ज्यांना असे यजनभाग विशेष देणें २७
गंधर्व, सिद्ध, मुनि, किन्नर, नाग सर्व । आले स्त्रियांसहित कीं मख तो अपूर्व
ब्रह्मा, महेश, हरि सोडुनि देव ते ते । झाले बसूनि निज वाहनिं सर्व येते २८
देखे सती नभिं अनेक महा विमानें । नानाप्रकार अति सुंदर दिव्य यानें ॥
ज्यांच्यांत देवललना मधुगान गात । जें ऐकतां मुनिसमाधिहि भग्न होत २९

भर्त्यासि ती पुसत तैं सगळें वदे तो । ऐकोनि तातमख हर्ष तियेसि होतो ॥
चिंती सती, जर महेश करील मातें । आदेश, कांहिं दिन तातगृहासि जातें.

भर्ता त्यजि यास्तव ती अतिशय दुःखाकुला सती हृदयीं ॥
निज अपराधा चिंतुनि तीतें वदवेहि ना तयासमयीं ॥ ३१ ॥
परि ती अखेर पतिला वदली विनयें मनोहरें वचनें ॥
ज्यांमाजिं भीति, लज्जा, प्रेमहि परिपूर्ण योजिलीं रचने ॥ ३२ ॥

" आहे पित्याघरिं महोत्सव, तो पहाया । आज्ञा कराल तर जाइन देवराया !
आहे मनांत मम आवड ही दयाळा ! द्यावी मला अनुमती प्रियभक्तपाळा !"
बोले महेश " वच योग्य, रुचे मलाही । हा दोष एकचि; निमंत्रण मात्र नाहीं!
तातें तुझ्या, सकल बोलविल्या स्वकन्या । मद्वैर यास्तव चुके तुजला अनन्या ॥
माझ्यावरीं विधिसभेमधिं रुष्ट झाला । तो दक्ष आजवरिं मानि न आपणांला ॥
आमंत्रणाविण तिथें चलतां भवानि ! । राहील शीळ, महती, ममता कुठूनी ? ३५
जावें जरीहि सदना,न निमंत्रितां कां । स्वामी, सुहृद्,गुरु,पिता इतुक्यां, न शंका;
नाहीं तथापि गमनीं हित, यांत वैरी । कोणी असेल तर मानिनि ! तूं विचारीं."
नानाप्रकारिं समजावित शंभु तीतें । न ज्ञान, भव्यवश अंतरिं घेचि ती तें ॥
'आमंत्रिल्याविण तिथें जर जाशि जाये ! वाटे मला' हर म्हणे , ' न भलें अम्हां ये'
यत्नें अनेकपरि सांगुन तीस पाहे । सुज्ञाच दक्षदुहिता परि ती न राहे ॥
तेव्हां हरें तिजसवें गण मुख्य कांहीं । देवोनि पाठविलि ती निजतातगेहीं ॥ ३८ ॥
माहेरिं पोंचलि सती परि तीस मान । कोणींच दक्षभय मानुनियां दिला न ॥
माताच एक तिज भेटलि आदरानें । साऱ्या स्वसा परि तिरस्कृतिच्या सुरानें ! ॥
दक्षें न कांहिं पुशिलें कुशलादि तीस । पोळे जणूं अनलिं ,पाहुनि तो सतीस ॥
गेली मखासि बघण्यास सती , परी ती । देखे नसेचि मखभाग कुठें हरार्थीं ॥ ४० ॥
तेव्हां पटे तिजसि सर्वहि शंकरोक्ति । 'म्यां वंचिलें उगिच त्यां,' म्हणुनी कढे ती
ना पूर्विचेंहि निज दुःख तसें विदाही । पोळे जशी समयिं या अपमानतां ही
आहेत यद्यपि जगीं अति दारुणार्ति । सर्वांमधें कठिण ही अपमानजाति ॥
ती क्रुद्ध हो अतिशयेंचि हरापमानें । माता किती समजवी परि तें न माने.
तीतें सहे नच मुळींच शिवापमान । चित्तीं प्रबोधहि ठरे तिचिया तदा न
क्रोधें तदा मखसभासद हाटकोनी । साऱ्यांसि बोलति हठें वचनें भवानी ४३

"ऐका सभासद ! मुनींद्र ! समग्र लोक ! । सर्वां तुम्हां फल मिळेलचि उग्र एक
कीं निंदिलें तुम्हिं हरा, श्रविलेंहि तेंच । हा मत्पिताहि अनुतापिं पडेल साच !
रीतीच ही,- जर कुठें हरिशंभुसाधु । यांना वधेल जन निंदक कोणि निंदूं ॥
हो कापणें उचित जीभहि कीं तयाची, । वा कान झांकुनि दुरीं निघणें स्वतांचि
आत्माचि सर्व जगता, त्रिपुरारि सेव्य । विश्वासि हा जनक नित्य करीत भव्य;
त्या निंदि बाप मम दक्ष अदक्षसाच । तच्छुक्रसंभव शरीर मदीय साच ! ४६
हा देह मी त्यजित यास्तव या क्षणास । चित्तीं धरूनि शशिशेखर तो महेश !"
योगानलीं जळुनि गेलि, वदोनि ऐसें; 'हा ! हाय ! हाय !' जन तैं मखिं दे उसासे !

सती दग्धा झाली परिसुनि असें शंभुगण ते ।
मखा विध्वंसाया झणिं सरकले रुष्ट पुढतें ॥
परी पाहोनी त्यां निजबल नियोजी भृगुमुनी ।
मखातें संरक्षी त्वरित कुपितां त्या अडवुनी ॥ ४८ ॥

कळे जैं समाचार तो शंकराला । रुषें धाडि तो वीरभद्रा कराला ॥
तयें जाउनी यज्ञविध्वंस केला । यथायोग्य तो शासि देवादिकांला ४९
झाली जगद्विदित दक्षगतीहि तैसी । जी शंभुला विमुख पावति पापराशि ॥
आहेच कीं विदित, तो इतिहास लोकां । संक्षिप्त यास्तवचि म्यां कथिला, विलोका.
मृत्युक्षणीं वर सती हरिपाशिं मागे । कीं जन्मि जन्मि रति शंभुपदींच लागे !
याकारणें जनु हिमालयगेहिं घेई । आख्या तदा मिळत तीप्रति 'पार्वती' ही ५१
उमा जन्मल्यापासुनी शैलगेहीं । महासिद्धिसंपत्ति येऊनि राही ॥
मुनींनींहि तेथें निजावास केले । दिलीं आश्रमां सुस्थलें त्यांसि शैलें ५२
द्रुमांचे नवे तेथ नाना प्रकार । फुलांचा फळांचा सदा ज्यां बहार ॥
तशा निर्मिल्या तेथ सद्रत्न-खाणी । तिथें वैभवा कोणत्याही न वाणी ५३
गिरिवरि सरितांचे वाहती पुण्य ओघ । खग-मृग-मधुपांना सौख्य वाटे अथांग
सकल सहजवैरा त्यागिती प्राणि तेथें । गिरिवरि सकलांचें प्रेम संवृद्ध हो तें ५४
नगपति गिरिजेच्या आगमें शोभु लागे । जन उपजुनि भक्ती रामिं, जेविं प्रभा घे
नव नव गृहिं त्याच्या मंगलोत्साह होती । सुरवर विधि ऐसे कीर्ति त्याचीच गाती
ऐकोनि वृत्त, मुनि नारद कौतुकानें । आले गिरींद्रसदनाप्रति गात गानें ॥
केला तयांस बहु आदर शैलराजें । प्रक्षालि तच्चरण, नाशि भवव्यथा जें ५६

त्यां बैसवूनि वर आसनिं तो सुभक्त । वंदी पदाब्ज गृहिणीसह शैलनाथ ॥
तत्पादतीर्थ सदनांतरिं सिंचुनीयां । सौभाग्य वर्णि निज तो, मुनिदर्शनीं या
बोलावुनी निजसुतेसि मुनीशपाद । तो वंदवी तिजकडूनि; वदे समोद ॥
"सांगा मुने ! मम सुतागुणदोष आम्हां । सर्वज्ञ सर्वगति या पुरवाल कामा ?"
बोले मुनी हंसुनि गूढ सुकोमलोक्ति । "आहे सुता सुगुणखाणि, सुशीलमूर्ति
सौंदर्यराशि सुमती शुभलक्षणांनीं । संपन्न; नाम सजणार 'उमा', 'भवानी'
ही अंबिका प्रियतमा पतिची सदैव । सौभाग्यपूर्णचरिता पतिभक्तिभाव ॥
मातापित्यांसि करणार सुकीर्ति-जोड । पूज्या जगांत सकला, हिजला न जोड.
सेवा हिची नुरवि दुर्लभ कांहिं भक्तां । हीतें स्मरूनि भवसागर तीर्ण होतां ॥
नारी कठोरहि पतिव्रत आसिधार । आचारशील करितील; गुणा न पार ॥६१॥
सल्लक्षणी तव सुता, परि ऐक आतां । जे दोन चार दिसती मज दोष चित्तां
हीतें मिळेल पति, दोष विशेष ज्यांत । जोगी जटाधर, अमंगलवेषयुक्त ॥६२॥
ज्यातें न मान, गुणही न, अलज्ज, नग्न । जो कीं उदास, जननीजनकादिहीन
ज्याचें अकाम मन, तो पति होय हीस । ऐसें हिची वदतसे जणुं हस्तरेष !"
अशि मुनिवरवाणी सत्य जी व्हावयाची । परिसुनि गिरिमेना यांस चिंतार्ति जाची
परि मुदित उमा हो; नारदा तें कळेना । नयन जलिं तिघांच्या भेद त्या आकळेना
सख्या पार्वती शैल मेनादिकांस । भरे अश्रु डोळां, उभे रोमहर्ष ॥
न हो कीं मृषा सर्व देवर्षिभाषा । उमा ती हृदीं राखि, पावे प्रहर्षा ६५

उमाचित्तीं प्रेमा शिवचरणकंजीं उपजला ।
तिला शंका ही कीं – कठिन असला लाभ मजला ॥
नसे चिंतेचा हा परि समय आतांच गणुनी
सख्यासंगीं बैसे प्रणय मनिंचा रोधुनि मनीं ॥ ६६ ॥

सुरर्षिवचनें कधीं वितथ नाहिं होणार तीं ।
म्हणोनि गिरिजासख्या तशिच शोचती दंपती ॥
नगोत्तम मनामधें धरुनि कांहिंशी धीरता ।
पुसे मुनिवरा 'प्रभो ! करुं उपाय या कोणता ?' ॥ ६७ ॥

मुनि वदत "हिमाद्रि ! ऐक; जें जें ललाटीं । विधि लिहित असें तें तेंचि येईल गांठीं
सुरनरमुनिनागां दानवां वा कुणांही । विधिलिखित पुसाया शक्तिसामर्थ्य नाहीं !

तरिहि सुचवितों मी ऐक ऐसा उपाय। सफल तरिच व्हावा, हो जरी दैव साह्य.
मुळिं न दिसत शंका वर्णिला म्यां तसाच। वर तव तनयेला प्राप्त होईल साच.
म्यां वर्णिले सकलही वरदोष जे गा! ते सर्व लागति पहा, प्रभु शंकरांगा॥
होईल कीं जर विवाह हिचा हराशीं। दोषांस विश्वहि म्हणेल गुणाढ्यराशि ७०

शेषावरि हरि शयन करी परि दोष न त्याला बुध देती।
सेविति भानू तेविं कृशानू सर्व रसांना तरि सुमती॥
समला विमला वाहे सलिला तरिहि सुरसरी पावन हो।
अग्निरवीसें हरिगंगेसे समर्थ त्यांसहि दोष न हो॥ ७१॥

ईर्ष्येमुळें जर कुणी असल्या प्रकारें। सुज्ञानगर्व धरुनी करुं पाहि सारें॥
तो मूर्ख कल्पभरही नरकीं पचेल। हो काय जीव कधिं ईश्वरतुल्यलील? ७२
भागीरथीजल नियोजुनि मद्य केलें। संतांसि सेव्य परि तें न कदापि झालें॥
गंगौघिं तें मिळुनि होत पुन्हांहि गंगा। लोपे अनीशपण लाभुनि ईशसंगा॥
शंभू समर्थ भगवान्, दुसरा असा न। त्याशीं विवाह शुभकारक सत्य जाण॥
आराधणें कठिण हो जरि तो महेश। होतोहि तुष्ट झणिं, यास्तव आशुतोष.
कन्या तुझी जर तपश्चरणें करील। शंभू भविष्यहि शके फिरवू सलील॥
विश्वामधें वर अनेक जरी असोत। हीतें न योग्य हरवांचुनि कोणि होत ७५
देई वरा, प्रणतदुःख विनाशणार। भक्तासि सौख्यद दयाजलधी उदार
देतेचि इष्ट फललाभ दया शिवाची। कोटीहि योग, जप शंभुविना फुकाचि!"
सांगोनि हें स्मरत नारद भक्तिमूर्ति। श्रीविष्णुपादकमलें भविं भव्यकर्ती॥
आशीर्वचें गिरिसुते वितरुनि बोले। "शंका त्यजीं गिरिवरा! शुभ हो उदेलें!"

—: इति सतीपरित्यागपुनर्जन्मवर्णनं नाम पंचदशस्तरंगः :—


## तरंग १६ वा

बोलुनि ऐशा वचना नारदमुनि जाय सत्यलोकाला॥
पुढलें चरित्र ऐका— यच्छ्रवणें नाश होय कलिकाला॥ १॥

एकांतिं आत्मपतिलागिं विचारि मेना। "नाथा! मुनींद्रवच तें मजला कळेना
लाभे कुलादिक वरीं तिजयोग्य ऐसें। तेव्हांच लग्न करणें मज युक्त भासे २
राहो सुता मम उमा अथवा कुमारी। प्राणाहुनीहि मजला प्रिय होय गौरी॥
तीतें मिळे नच पती जर योग्यतेचा। लोकांत बोलतिल हो जड 'शैल' साचा ३

ऐसा विचार करुनीच विवाह व्हावा। जेणें न होय हृदया अनुताप केव्हां " ॥
बोलोनि हें नमित ती निजवल्लभासी;। प्रेमें वदे तिज नगाधिप उक्ति ऐसी ४
" चंद्रांतुनीहि अनल प्रकटेल पाहीं। मिथ्या परी न कधिं नारदवाक्य होई ॥
चिंता त्यजीं, स्मर हरी, सृजि जो उमेतें। कल्याण तोच भगवान् करणार कांते!
आतां सुतेवरि तुझा जर जीव होय। तूं तीस हाच उपदेश कर स्वकीय ॥
जेणें करूनि तप, तीस मिळे महेश। क्लेशा निवारि न दुजा सदुपाय लेश ६
न व्यर्थ नारद वदे; शुभ हेतु त्यांत। शोभे समग्रगुणिं सुंदर विश्वनाथ. ॥
तूं हा विचार करिं सोडुनि सर्व शंका। ना दुष्कलंक कुठलाहि असे, वृषांका."
ऐकोनि भर्तृवच हर्षलि फार चित्तीं। गेली उमेजवळिं शीघ्र उठूनियां ती ॥
गौरीस देखुनि भरे नयनांत पाणी। अंकावरी तिजसि घे ममता करूनी ॥८॥
घडिं घडिं कवळूनी घे उमेसी उराशीं। गहिंवरुनि गळा ये, मौनली प्रेमराशी ॥
समजलि जगदंबा सर्व चित्तीं भवानी। तुलकर जननीतें बोलली गोड वाणी
" गे! ऐक आइ! दिसला मजलागिं एक। स्वप्नांत विप्रवर गौरतनू सुरेख!
त्यानें मला सुवचनीं उपदेश केला। जो म्यां असे हृदयसंपुटिं सांठवीला १०
तो बोलला ' गिरिसुते! तप जा कराया। तूंतें मुनींद्र कथि नारद, तें न वायां
मातापित्यांसहि तुझ्या मत हेंचि माने। सौख्या करीत तप; दुःखगिरी लया ने
धाता तपोबलिंच सृष्टि विनिर्मि सारी। विश्वासि विष्णुहि तपोबलिं सत्य तारी;
संहारतोहि हर सृष्टि तपोबलानें। भूभार शेष धरि तो शिरिं त्याप्रमाणें ॥१२
आधार सृष्टिसि असे तप हाच गौरि! तूं निश्चयें म्हणुनि जा तपण्या कुमारि!"
ऐकोनि तें वचन विस्मित होय माता। स्वप्नासि ऐकवित बोलवुनी स्वकांता
मातापित्यांसि समजावुनि सर्वरीतीं। गेली प्रसन्नमनिं शैलसुता तपा ती ॥
आतेष्ट तातजननी परिवार तीचा। होवोनियां विकल त्यां वदवे न वाचा १४
येवोनि तेथ मग वेदशिरा मुनींनीं केलें तयांसि परिसांत्वन तत्त्ववाणी ॥
ऐकोनि शैलतनयामहिमा तयांस। झाला प्रबोध मग शोक नुरे विशेष ॥१५
प्राणेशपादकमलां हृदयीं धरूनी। गेली वनीं तप समाचरण्या भवानी ॥
होतें शरीर सुकुमार, तपा अयोग्य। भर्तृस्मृती धरुनि ती त्यजि वस्तु भोग्य ॥
झाली मनीं उदित नित्य शिवानुरक्ति। देहासही विसरुनी तपली सुभक्ती ॥
वर्षें सहस्र अवघें फलमूल खाय। शाकेंचि केवळ, तिचें शतवर्ष जाय १७

चित्रकार—श्रीविनयकुमार मित्र ] श्रीशंकरपार्वती [ मानमांक, कल्याण कृपेनें.



देवाधिदेव ! अहिराजविभूषितांगा ! । श्रीरामसद्गुणकथा मजलागिं सांगा ॥
वंदूनि मी शिरतसें चरणाब्ज माथां । जोडूनि अंजलि तुम्हां विनवीत नाथा ! ॥

सुश्लोकमानस
बालकांड तरंग १९-२९,३०

नों. नं. ७४८७७ ८८८५३

ती नेइ कांहिं दिन केवळ वारिवातें । काटीत कांहिं दिन ती त्यजुनीहि वा तें
खावोनि बेल अवघा पडुनी सुकेला । तत्काळ तीस शतवर्ष सरोनि गेला ! १८
ती सोडि तेथुनि पुढें सुकल्याहि पर्णा । झालें म्हणूनि तिज नाम भलें 'अपर्णा.'
पाहोनि फार कृशता गिरिजाशरीरीं । वाणी गभीर नभिं हो मग याप्रकारीं १९
" झाले मनोरथ तुझे परिपूर्ण बाले ! क्लेश त्यजीं; हर मिळे तुज अल्प कालें
नाहींच कोणि तप यापरि आचरीत । झाले अनेक मुनि सन्मति धीरचित्त २०
ब्रह्मप्रसादवच हें वरसें धरीं तूं । हें नित्य, सत्य शुचि, यांत धरीं न किंतु ॥
येई पिता तुजसि बोलविण्यास जेव्हां । सोडूनि हट्ट गृहिं जा, गिरिपुत्रि ! तेव्हां.
सप्तर्षि भेटतिल गे ! तुज जेधवां ते । तूं तेधवां समज हें वच सत्य होतें. "॥
ऐकोनि ही विधिगिरा गगनीं उदेली, । झाली उमा पुलकितांग सुतुष्ट ठेली ! २२
म्यां गाइलें बहुमनोज्ञ उमाचरित्रा । आतां कथूं हरकथा, परिसा सुचित्रा ॥
जाई सती त्यजुनि देह, पुढें तिथूनी । झाली विरक्ति शिवचित्तिं अतिप्रमाणीं
तेव्हां जपे सतत तो रघुनाथनाम । ऐकेहि रामगुणगान मनोविराम ॥
चित्तीं धरी सकललोकमनोभिराम । संचार यापरि करी हर सौख्यधाम ॥२४
आनंदचिन्मय वि-मोहमदाद्यकाम । जाई यथेष्ट, भजनीं रत सर्व याम; ॥
ज्ञानोपदेश मुनिंना करितो कुठें तो । कोठें रघूत्तमकथारस आळवीतो ॥२५॥
होई अकाम भगवान् परि भक्तकाम । तो पूरवी विरह नाशुनियां निकाम ॥
झाला अतीत बहु काल अशा प्रकारें । प्रीती रघूत्तमपदीं नव नित्य थारे २६
ते प्रेम नेम बघुनी हरमानसाचे । भक्ती दृढा अविचला तुळुं ये न वाचे ॥
सौंदर्यशीलनिधि तो करुणाळु राणा । श्रीराम तैं प्रकटला हरसन्निधाना ॥२७
तेजोनिधान रघुराय, हरप्रशंसा । संतोषुनी करित त्या वदला महेशा
" शंभो ! तुम्हांविण करी व्रत कोण ऐसें ? " नानापरी समजवीत कृपाविशेषें
त्यातें करी विदित, जन्म सती कशी घे । शैलाधिराजतनया म्हणुनी निजांगें
गौरीतपश्चरण, राम हरासि वर्णी । प्रेमें सविस्तर, कृपानिधि सत्यवाणी ॥२९
बोले रघूत्तम ' विभो ! मजठायिं भाव । आहे तुम्हां हृदयिं तो जर कीं सदैव
मत्प्रार्थना अजिं तुम्हीं तर आदरावी । जाऊनि सत्वर तुम्हीं गिरिजा वरावी ! '
शंभू म्हणे ' उचित हें तितुकें जरी न । आज्ञा तथापि तुमची शिरिं मी धरीन ॥
जें बोलतां, परम धर्मचि तो करीन । आहे प्रभो ! तुमचिया चरणीं विलीन ॥

माता पिता गुरुजन प्रभु सांगती तें । मानून सर्व शुभ, आचरणें सुभक्तें ॥
कल्याण सर्व करणार तुम्हीच मातें । तुम्हां प्रणाम मम नित्य रघूत्तमातें ' ॥
ऐकोनि तें वचन शंकर बोलला जें । सद्धर्म भक्ति सुविचार जयीं विराजे
संतोषुनी वदत राम ' भवत्प्रतिज्ञा । सत्या असे, मम धरा वच चित्तिं सुज्ञा !"
ऐसें वदोनि रघुनायक गुप्त होय । तद्रूप सांठवि मनीं हर दर्शनीय ॥
सप्तर्षि येति तितुक्यांत हराकडे ते । बोले प्रभू वचन उत्तम हें तयांतें ॥ ३४
" मुनिवर ! अजिं तुम्हीं पार्वतीपाशिं जावें । मजवरतिं तिचें जें प्रेम तें पारखावें
गिरिकरविं तियेला लावुनी द्या स्वगेहा मम मत तिज सांगा, गौरि ! चिंता न वाहा"
गेले ऋषी तैं झणिं गौरिपाशीं । साश्चर्य होती बघुनी तियेसी ॥
ती भासली त्या ऋषिलागिं कैशी ? । जणों तपाचीच सुमूर्त राशि ! ३६
मुनि पुसत तियेला, 'ऐक गे शैलकन्ये ! करिसि तप महा हें कां बरें ? लोकधन्ये !
निजहृदयिं कुणासि ध्यासि? इच्छीसि काय श्रवण करविं आम्हां सत्य जें मर्म होय'
ऐकोनियां ऋषिवचा वदली भवानी । गूढा मनोरम अशी अति योग्य वाणी
" संकोच वाटत मला वदण्यासही तें । माझें जडत्व निरखूनी हंसाल मातें.
मी नायकें मम हितोक्ति हठें कुणाची । पाण्यावरीं उभवु पाहत भिंत साची..
मी नारदोक्तवचनांवरि विश्वसोनी । पंखांविना गगनिं जाउं बघें उडोनी !३९
देखा मुनींद्र ! अविवेक मदीय हो हा । भर्ता मला हर मिळो ! मम हीच ईहा."
एकोनि तें मुनि हंसोनि तिला म्हणाले । " त्वद्देह 'शैल'भव यास्तव जाड्य आलें!
गे ! नारदें कथियल्या वचनोपदेशें । कोणास गेह नच होत जगीं नकोसें ?
जे दक्षपुत्र उपदेशियले तयानें । त्यांनीं गृहा त्यजुनि घेतलिं वाट ! रानें !४१
तें चित्रकेतुगृह नारद हाचि नाशी; । यानें हिरण्यकशिपुस्थिति केलि कैसी ?
जे नारदें शिकविले नर आणि नारी । ते सर्व टाकुनि गृहा, फिरती भिकारी !
हा साधु नारद दिसे वरि, भोंदु आंत ! तो आपल्यासम करूं बघतो समस्त
तूं त्याचिया वचनिं विश्वसुनी कशी गे ! । भर्ता उदास वरुं पाहसि सानुरागें ?
निर्लज्ज निर्गुण कपालि कुवेषधारी । ज्यातें नसे कुल, न गेह, सदा भिकारी ॥
जो हो दिगंबर, अहीच जया विभूषा । ऐसा पती मिळवुनी सुखिं केवि आशा ?
वाटे शठोक्तिवरि मोहुनि भाळलीस । तूं जाणसी, वदति लोक ' शिवें सतीस ॥
आधीं विवाह करुनी मग वंचियेलें । तैसें तियेसि मरणेंचि विमुक्त केलें ! ' ४५

देखें सुखेंचि शिव झोंपत आज आतां। भिक्षाटनें उदर पोशित, त्या न चिंता।।
आहे फटिंग सहजींच, अशास नारी। कैशी खपेल सदनामधिं सांग गौरि! ४६
बाळे! अजूनि तरि आइक सांगतों तें। आम्हीं असे निवडिला वर योग्य तूंतें।।
अत्यंत सुंदर सुखप्रद शीलशाली। ज्याचीं यशें श्रुतिमुखीं शुचि गाइयेलीं ४७
लक्ष्मीश सर्वगुणसागर दोषशून्य। वैकुंठलोक, वसुनी करि जो सुधन्य ।।
ऐसा पती तुजसि भेटवुं आणवूनी"। तें ऐकुनी हंसुनि उत्तर दे भवानी ४८
"हो! सत्य शैलभव जें म्हणतां तनू ही। तेणेंचि नैव मम हट्ट ढळे अणूहि!
पाषाणसंभव असे जगिं सर्व हेम। तें जाळितांहि न गुणा त्यजि, हाच नेम.
माझें जळो भवन वा उजळो, तरीही। मीं नारदोक्ति कधिंही त्यजणार नाहीं!
विश्वास ज्यांस गुरुवाक्यि नसेल त्यांना। स्वप्नींहि सौख्यलव, सिद्धिहि ती मिळेना
शंभू असो जरिहि दुर्गुणपूर्ण सांठा। विष्णू असो सकलसद्गुणराशि मोठा ।।
ज्याचें तथापि, मन ज्यावरि रंगलेलें। हो काम त्याशिंच तया; नच अन्य चाले!

—* इति नारदोपदेशपार्वतीतपस्यावर्णनं नाम षोडशस्तरंगः *—

## तरंग १७ वा

आधींच भेट तुमची ऋषिवर्य! होती। तैं ऐकतें शिकवणी तुमचीहि हो! ती;
हा मीं दिल्यावर हरा मम जीव-आतां। कोणास हो! उचित तद्गुणदोषचिंता?
आहे जरी तुमचिया हृदिं हट्ट साच। कीं योजिल्याविण वधूवर राहुं ना च;
कां कौतुकोत्सुक जनें बसणें रिकामें?। लोकीं वधूवर असंख्य विवाहकामें!!
जरी कोटिवेळां मला जन्म आला। तरी हाच निर्धार माझा जहाला।।
वरीं मी तरी त्या हरातें वरीन। न हो तें, तरी मी कुमारी मरीन!! २
मी नारदोक्त कधिंही परि न त्यजीन। सांगो स्वतांहि जरि शंभु शतप्रमाण!"
बोले उमा "नमित मी तुमच्या पदांला। जा स्वाश्रमांसि मुनिवर्य! विलंब झाला"
ज्ञानी मुनी म्हणति भक्ति तशी बघूनी "हे अंबिके! जयजयाजि! शिवे भवानि!
श्रीशंभु होय भगवान् जगदीश; माया। त्याचीच तूं; जनकतात तुम्ही जगा या"
लावोनियां शिर तिच्या पदपंकजांतें। झाले मुनी पुलकितांग सहर्ष जाते!!
जाऊनि अद्रिपतितें झणिं पाठवीती। तेणेंहि आणिलि गृहा मग पार्वती ती
सप्तर्षि ते फिरुनि जाति हराकडेही। गौरीकथा सकल सांगति त्याप्रती ही
तल्लीन हो हर, उमाप्रणय श्रवोनि। सानंद साति मुनि जाति गृहां निघोनी।।

केलें पुन्हां स्थिर हरें निज चित्त वेगें । सर्वज्ञ तो रघुवराप्रति चिंतु लागे;
हो तारकासुर तयासमयीं जगांत । ज्याचे प्रताप बल तेज विशाल होत ॥८॥
त्रैलोक्य लोकपति जिंकुनि, सर्व देव । संपत्ति सौख्य हरि तो अतुलप्रभाव
जिंकी जरामरणशून्य तशा न कोणी । युद्धें करूनि सुर जाति किती दमोनी
तेव्हां विधीसि सुर सांगति दुःख सर्व । तोही बघे अमरदुःख तसें अपूर्व ॥
सांगे विरिंचि समजावुनियां तयांना । कीं "शंभुवीर्यज वधील तया, दुजा ना
जो सांगतों अजि उपाय तुम्हां, करा तो । लाभेल सिद्धि जर ईश्वर साह्य हो तो.
पूर्वीं सती त्यजित दक्षमखीं स्वतांला । घे जन्म ती मग हिमालयगेहिं बाला
गौरी करी तप पती हर हो म्हणोनी । ध्यानीं निमग्न हर हो सकल त्यजूनी
नोहे समंजस जरी तितुकी, तरीही । ऐकाच सांगिन तुम्हांप्रति युक्ति कांहीं
शंभूकडे रतिपती तुम्हि पाठवा, जा । तो शंभुच्या बहुपरीं चळवो हृदब्जा ॥
जाऊं अम्हीहि तितुक्यांत, हरा नमूनी । पाणिग्रहार्थ करुं उत्सुक बद्धपाणि
होईल देवहित या विधिनें अनंत" । तें मान्य त्या सुरजनां मत सर्व होत ॥
त्यांनीं स्तवोनि अति, आठविला मनोज । तों त्यांपुढें प्रकटला स्मर रूपराज !
कळविति मग कामा सर्व आपत्ति देव । समजुनि मनिं चिंती तो तदा कार्यभाव
कुशल मजसि नोहे शंकराच्या विरोधें । हंसुनि परि वदे तो काम चित्तप्रबोधें
"तरिहि करिन हें मी देवकार्य स्वतोषें । श्रुति कथि,'उपकारें सर्वदा धर्म पोषे'
परहित करण्यानें जो करी देहनाशा । करिति अमित त्याची संत नित्य प्रशंसा"
सर्वांसि वंदुनि निघे वदुनी असें तो । घे पुष्पचाप, निजसैन्यहि साह्य घेतो ॥
मार्गीं करी मनिं विचारहि हाच काम । कीं शंभुवैर करतां ध्रुव मृत्युधाम ! ।१७।
आत्मप्रभाव मग तो प्रकटी रतीश । केलें तयें सकल अंकित विश्वकोश ॥
प्रक्षोभला जगतिं जैं स्मर मीनकेतु । गेले विभंगुनि पळांतचि वेदसेतु ॥१८॥
तें ब्रह्मचर्यमय सद्व्रत संयमादि । विज्ञानयोग, जप, धर्म, विचारबुद्धि, ॥
ज्ञानाप्ति, साधुकृति, धैर्य पळोनि शीघ्र । गेलीं विवेककटकें भिउनी समग्र ।१९।

विवेक पळुनी ससैन्य गेला, वीर तयाचे रणिं पडले
सद्ग्रंथहि ते पळुनी जाउनि गिरिवनकंदरिं झणिं दडले ॥
न कळे होइल कैसें कोणा, नुमजे गडबड काय तरी ?
कोण असा कीं ज्या जिंकाया मदन करीं निजधनुसि धरी ?

चर अचर जगीं जे स्त्रीपुमान् नामधारी । कृति सकल करीती ते अमर्याद सारी
अधिवश मदनाला होउनी त्यांहिं केलें । प्रकट निजमनाचे भाव ते त्याच वेळे
सकलहृदयिं कामें लालसा चेतवीली । तरु लवविति शाखा स्वीय, पाहूनि वेली
जलनिधिंमधिं जाया धावल्या निम्नगाही । मिळु बघति तडागांमाजिं वापी प्रवाही

जडांचीही झाली जर अशि दशा तेथ मदनें ।
सचेतांची कैशी घडलि मग ती काय वदणें ? ॥

पशू, पक्षी, प्राणी स्थलजलनभश्चारि सगळे ।
तदा झाले कामा अधिवश, न त्यां काळहि कळे ! ॥ २३ ॥

कामांध आकुल असे जगिं सर्व लोक । रात्रंदिनीं बघति केवळ शास्त्र कोक !॥
देवासुरादि नर किन्नर नाग भूत । वेताळ,दास मदना बनले समस्त ! २४

त्यांची दशा किति वदूं ? मुनि, सिद्धि, योगी । वैरागि लागति रमूं अति कामभोगीं
ते भ्रष्ट होति निजसद्व्रत टाकुनीयां । ऐसा प्रताप जगिं गाजविला स्मरें या ॥

झाले स्मरवश मुनीश तापस मग इतरांची काय कथा !
ब्रह्ममयचि जे बघति चराचर नारीमय ते बघति अतां ॥
अबला बघती विश्व पुरुषमय, अबलामय तें नर बघती
चमत्कार हा दोन घटींभर भरुनि राहिला ही जगती ॥ २६ ॥

धरवे नच तो कुणाहि धीर । सकलांचीं हृदयें हरीत मार ॥
रघुवीरचि वांचवी जयांना । अवघे वांचति तेचि तैं, दुजे ना ! ॥२७॥
झाला चमत्कार असा घटिद्वय । पोंचे हरा जोंवरिं काम तन्मय
तो, देखतां शंभुसि, चित्तिं घाबरे । तत्काल विश्वांतहि शांतता भरे ! ! २८

उतरतां मदु मद्यप शांत हो जग तसें झणिं शांत नितांत हो ॥
बघुनि रुद्र असा भगवान् शिव । मदन हो हृदयीं भयविक्लव ॥२९॥
परतहि मग त्याला लाज जाऊं न दे ती । मरणचि मज यो या निश्चयें योजि युक्ति
प्रकटुनि, ऋतुराणा कांति दे दर्शनीया । कुसुमित तरुराजी शोभली सर्व ठायां ३०

वापी तळीं सुंदर शोभणारीं । दिक्प्रांत उद्यानवनादि सारीं ॥
जिथें तिथें प्रेम जणों उदेलें । जेणें मुमूर्षूसहि चेतवीलें ॥ ३१ ॥
मरणोन्मुखिही स्मर स्फुरे जैं कवण वनश्री वर्णिल ती ? ॥
शीतल मंद सुगंध समीरण मदनाग्नीचा सखा अती ॥

सरीं विकसलीं कमलें त्यांवरि मंजुल गुंजति भृंगतती ॥
हंससारिकाशुकपिकमधुरव गाती नाचति सुरयुवती ! ॥ ३२ ॥
कोटि प्रकाशी सकला कला निज । ससैन्य ही तो हरलाचि चित्तज ॥
चळे समाधी तरिही न शांकरी । म्हणूनि कोपे स्मर कार अंतरीं ॥ ३३ ॥
रसालशाखा बघुनी विशाल । रतीश सावेश चढे सलील ॥
स्वपुष्पचापीं निज बाण जोडी । आकर्ण ओढूनि सरोष सोडी ! ॥३४॥
तो शंकराच्या हृदिं बाण लागुनी । समाधि त्याची क्षणिं जाय भगुंनी ॥
क्षोभे हराचें अति तेधवां मन । सर्वत्र देखे उघडोनि लोचन ॥ ३५ ॥
दिसे तदा त्या स्मर आम्रपल्लवीं । प्रक्षुब्धतेनें हर विश्व कांपवी ॥
तृतीयनेत्रा उघडूनि तों त्वरें । केलें स्मरा जाळुनि भस्म शंकरें ! ॥ ३६ ॥
हाहाःकार उडाला जगतीं अतिमात्र ज्या नसेचि सरी ॥
भ्याले सुरगण सारे; बहु सुखसंचार होय तैं असुरीं ! ॥३७॥
कामसुखा संस्मरुनी कामुक झाले विशेष दुःखितसे ॥
परि तैं साधक योगी निष्कंटक भोगिती सुखासि तसें ॥३८॥
मुनिंना संकट नुरलें, पतिगति ऐकुनि मूर्च्छित होय रती ।
व्याकुल बहुपरि भाकी करुणा जाउनि शंकरसन्निध ती ॥
अतिप्रीतिनें करयुग जोडुनि शिवसम्मुख ती विनवितसे
तिजसि कृपाळू आशुतोष हर अबला जाणुनि वदत असें– ॥३९॥
“ बाइ गे रति ! तुझा पति काम । पावुनी आजि ‘अनंग’ चि नाम ॥
व्यापणार जगिं देहविनाही । ऐक मीलन पुन्हां कधिं होई ! ॥४०॥
—: श्रीशिवसमाधि-मदनविजय-कामविध्वंसनं नाम सप्तदशस्ततरंगः :—

## तरंग १८ वा

“ होईल कृष्ण अवतीर्ण यदुप्रवीर । न्याया लयासि अवनीतलभार थोर ॥
होईल कृष्णसुत तैं पति गे ! त्वदीय । ना अन्यथा कधिंहि वाक्य मदीय होय ! ”
ऐकोनि शंभुवच जाय रती निघोनी । सांगू कथा अपर आम्हि अतां इथोनी–
देवांसि वृत्त कळतां सगळेच आले । वैकुंठलोकिं विधिसंगति देवमेळे ॥२॥
तेथूनि विष्णुविधि घेउनियां समेत । ते सर्व येत हर वास करीत जेथ ॥
त्यांहीं अनंतपरिं संस्तविला महेश । झाला प्रसन्न शशिशेखर पूर्ण त्यांस ॥३॥

बोले कृपाजलधि तो वृषकेतु त्यांस। "कां पातलां अमर हो ! मज हे अशेष ?"
ब्रह्मा वदे "प्रभु तुम्ही सकलाधिवासी। आम्ही तथापि वदुं भक्तिवशां तुम्हांसी
आहे मनांत सकलांहि सुरांचिया हे। सोत्कंठ ईप्सितचि एक निवेदिताहें—
कीं, देखुं आत्मनयनीं परमोत्सवानें। शंभो ! विवाह तुमचा अविलंबमानें !
डोळे भरून सुर उत्सव हा पहाती। ऐशी करा, मदनगर्वहरा ! कृपा ती ॥
कामासि दग्ध करुनी करुणांबुधीनें। केले रतीस वरदान भलें सुधीनें ! ॥
शासोनि ही फिरुनि तो करणें प्रसाद। हा कीं स्वभावचि गमे प्रभुचा अगाध.
झालें उमातप अपार; करा तियेचा। स्वीकार आपण अतां प्रभुवर्य ! साचा"

ऐसें प्रार्थित आयकोनि विधिचें, रामोक्तिही जाणुनी।
बोले शंकर त्यां 'तथास्तु !' म्हणुनी आनंदलेला मनीं॥
तेव्हां देवहि वाजवीति, हृदयीं आनंदुनी, दुंदुभी।
पुष्पें वर्षुनि गर्जती 'जय विभो ! विश्वप्रभो !' हें नभीं ॥ ८ ॥

सप्तर्षि तों उचित काल बघोनि येती। त्यां तूर्ण धाडित विधी गिरिच्या गृहान्तीं
गेले तदा प्रथम ते गिरिजानिवासा। ते बोलती छलयुता परि गोड भाषा. ९
"आम्हीं तदा कथियलें परि नायकोनी। तूं ऐकिलेंसि कथिलें तुज नारदांनीं.
खोटाच होइल तुझा पण आज आतां। नेलाच तो कुसुमचाप हरेंहि अंता!"
हांसोनि बोलत उमा "ऋषि हो! सुजाण !। जें बोललां मजसि तें उचितार्थपूर्ण!
हो! मानितां तुम्हि हर स्मर जाळि आज?। होता सकाम शिव तोंवरि योगिराज?
मम मति-शिव हा सदैव योगी,। अज, अनवद्य, अकामही, अभोगी; ॥
जरि हरि रुचि कायवाङ्मनानें। करिल कृपानिधि मत्पणाप्रमाणें !! ॥१२

जें तुम्ही म्हणतां हरें स्मर असे कीं जाळिला, तें गमे।
कीं मोठा अविवेक होय तुमचा; देखा, पुढें जैं हिमें— ॥
येती तैं सहजस्वभाविं नुरती तीं पावकाच्या गुणें।
तैसा मन्मथही महेशनिकटीं; हें कां तुम्हां सांगणें ?" ॥ १३ ॥

ऐकोनि तीचें वच सप्त ते मुनि। प्रहृष्ट झाले शिवभक्ति देखुनी॥
सुनिश्चया ते तिचिया प्रशंसिती। गिरीस जाती, नमुनी उमेप्रती १४

गिरींद्रातें त्यांनीं झणिं कळविलें वृत्त सगळें।
स्मराच्या वार्तेनें गिरिवर मनीं तैं कळकळे॥

रतीलागीं देवें वर वितरला हें परिसुनी ।
तयालागीं झालें बहुत सुख संतोषुनि मनीं ।। १५ ।।
शंभुप्रभाव मनिं चिंतुनि त्या मुनींतें । पाचारि सादर हिमाद्रि सहर्ष चित्तें ॥
नक्षत्र वार घटि उत्तमशी बघोनी । तो लग्ननिश्चय करी श्रुतिच्या मतांनीं ॥
सप्तर्षिहस्तिं गिरि तीच सुपत्रिका दे । प्रार्थी तयां नमन आचरुनि प्रमोदें ॥
ते पत्रिका विधिसि नेउनि देति, तेणें । झाला प्रहृष्ट हृदयीं विधि पूर्णतेनें ॥
वाची ती विधि पत्रिका, श्रुत करी तें वृत्त सर्वांप्रति ।
ज्यातें आयकितां प्रहर्ष सकलां देवांसि झाला किति ! ॥
आकाशांतुनि पुष्पवृष्टि पडती तैं दुंदुभी वाजती ।
तैसे मंगलकुंभही दशदिशां संस्थापिले साजती ।। १८ ।।
सकल सुर करीती सिद्ध नाना प्रकारें । निज रुचिर विमानें वाहनें चारुसारें
शुभकर शकुनांनीं मंगला जाणवीलें । सुरयुवति करीती गान आनंदलेलें १९
श्रीशंभुचे तैं गण लेववीती । शृंगार शंभूसि, कथूं परी ती ॥
केला जटांचा मुकुटप्रकार, । जयावरी साजत नागमोर ! ।। २० ।।
तीं कुंडलें कर्णिं, करांत कंकणें । हीं व्याल योजूनिच केलिं भूषणें ॥
भस्में तनू लेपुनि, सिंहचर्मही । लेई तसें तें जणु जानवें, अही ! ॥२१॥
भालीं शशी सुंदर, शीर्षिं जह्नवी । त्रिनेत्र, कंठस्थलिं ती विषच्छवी ॥
वक्षःस्थलीं ती नररुण्डमाळिका । अमंगला मंगलधाम झालि का ? ! २२
त्रिशूल हस्तीं डमरूहि साजला । नंदीवरीं बैसुनि शंभु चालला ॥
अनेक वाद्यध्वांने वाजुं लागती । वेषें अभद्रा परि भद्रमूर्ति ती !! २३
बघोनी शंभूतें हंसति मनिं त्या देवललना ।
‘ वराया भार्या या सकल जगतीं योग्य कुणि ना ! ’ ॥
हरिब्रह्मादी तैं सुर निघत ते वाहनिं निज –
‘ वरातें साजेशी ’ म्हणति ‘ न वराती कुतुकज ! ’ ॥ २४ ॥
विष्णू तदा सकल दिक्पतिंना विनोदें । बोले, “ चला अलग; मिश्रण हें नसो दे
आपापलेच जन घ्या तुम्हिही समेत । चाला पृथक् पृथगसे; न कुणी हंसोत !
नाहीं वरास अनुरूप वरात ही हो ! । ना या परस्थलिं कदा अपुलें हंसें हो !”
ऐकोनि विष्णुवच, सस्मित देव झाले । घेऊनि जाति जन संगतिं आपुलाले ॥

हांसे महेश मनिं आणि वदे " कधींही । थट्टा विनोद हरिचा सुटणार नाहीं !"
बोलावि तो निजगणांप्रति भृंगिहस्तें । येतांचि ते म्हणति 'नाथ! विभो! नमस्ते!'
हांसे बघोनि गण ते निज चंद्रमौली । तीं वाहनें विविध, वेष विनोदशाली ॥
कोणां नसेचि मुख, कोण महामुखाचे । कोणी अपाद, कुणि पाणिविहीन साचे !
कोणां अनेक कर, कोण अनेकपाद, । कोणां अनेक नयनें, कुणि पूर्ण अंध !
कोणी विशालतनु पुष्ट कुणी तयांत । होते अतीव कृशदेह सुदाम मूर्त ! २९

क्षीणतनू कुणि, पीन अती कुणि, पावन कुणि, कुणि अशुभ असे ।
कुणि शुभभूषण, कुणि धरि भीषण कपाल रक्तस्नात असें ॥
कुणि श्वानमुख, कुणि सूकरमुख, शृगालमुख कुणि, खरमुखही ।
अवर्ण्य अगणित भूतप्रेतें, पिशाच्च, जोगी, गण कांहीं ॥३०॥
कोणी नाचति, कोणि गाति लहरी, श्रीशंभुचे ते गण ।
सारे बोलति मत्तसे, दिसति ते विक्षिप्त सारे जण ॥
जैसा तो नवरा, वरात सजली सारी तयासारखी ! ।
जातांना गमती कितीक दिसती, ज्यां सुज्ञ तो पारखी ॥३१॥
मंडप हिमालयानें इकडे रचिला अतीव सुंदरसा ॥
चित्रविचित्रपरीचा वर्णाया त्या समर्थ कोण कसा ? ॥३२॥
जे जे सर्व जगांत थोर लघु वा ज्यांना असे ना मिति
ज्यांचें वर्णनही अशक्य असले विश्वांमधें नांदती ॥
त्या त्या सागर-शैल-कानन-नदी-वापी-तडागांप्रती
प्रेमानेंचि निमंत्रणें गिरिवरें धाडीयलीं संप्रति ॥३३॥

ते कामरूप अतिसुंदर देहधारी । आले समग्र परिवार, सहस्त्रनारी ॥
ते गात गात शुभ मंगल गोड गीतें । झाले हिमाद्रिभवनाप्रति सर्व येते ॥३४॥
आधींच योजित गिरींद्र समृद्ध रम्य । त्यांना निवास करण्यास कितीक हर्म्य
पाहूनियां नगरिची रमणीयता ती । कौशल्यराशि गमली विधिचीहि कोती ! ३५

नगरश्री ती लाजवि विधिच्या कौशल्यातें निजविभवें ।
वनें, उपवनें, कूप, नद्या, तळिं यांची कवणा भा वदवे ? ॥
अनेक तोरणकेतुपताका मंगल शोभति घरोघरीं ।
सुंदर चतुरा नरनारींना निरखुनि मुनिंसिहि मोह वरी ! ॥३६॥

अवतरुनि जगीं ये ज्यापरी विश्वमाता। कवण करुं शके? तद्वर्णना वर्णुं जातां
सकल सुखसमृद्धी सिद्धि संपत् तियेंत। सतत नवनवीना वाढुनी नित्य येत
ऐकोनि आलि नगरानिकटीं वरात। झाली महोत्सवविभा महती पुरांत ॥
होवोनि सज्ज निजवाहनयुक्त पौर। तैं स्वागतार्थ निघती सगळे समोर ३८
झाले प्रहृष्ट जन पाहुनि देवसंघ। अत्यंत होति हरिलागिं बघोनि दंग ॥
आलोकती शिव गणांसह जेधवां ते। तद्वाहनें भिउनियां पळती समस्तें ! ३९
जे पोक्त वृद्ध जन ते त्यजिती न धीर। पोरें परी पळुनि जाति घरीं समग्र!॥
जेव्हां तयांस पुसती गृहिं आइबाप। तीं देति उत्तर अशीं सहभीतिकंप ४०
"हो! काय सांगुं? वदणें तरि काय आतां? हें कां वऱ्हाड? अथवा यमसैन्य, ताता!
वेडाच कीं वर, सवार वृषावरी तो। जो भस्म, भूषण, कपाल, अही धरीतो! ४१

भस्मलिप्ततनु, कपालभूषण, कंकण अहिंचें, नग्न, जटी।
भूतप्रेतपिशाचसमेतहि राक्षस, जोगिणि ज्यानिकटीं ॥
भयद असा वर बघुनिहि वांचे, थोरचि त्याचें भाग्य दिसे !
उमाविवाहा तोचि बघुं शके!" गृहिं गृहिं पोरें कथिति असें ॥४२॥

सामोरे जे गेले आणति ते त्या वऱ्हाडि लोकांस ॥
सादर देतीहि तयां योग्य सुशोभित गृहें जनावास ॥४३॥

मैना शुभा सिद्ध करीत आरती। गाणीं स्त्रिया मंगल गाउं लागती ॥
घेऊनि हस्तीं तबकें सुकांचनीं। ओवाळण्या शंभुसि जाति हर्षुनी ॥४४॥

पाहिलें विकटवेष शिवाला। तोंच जाति पळुनी गृहिं बाला ॥
भीति तद्हृदिं करीत निवासा। शंभु जाय अपुल्या जनवासा ॥४५॥
हो अतीव मनिं आकुल मैना। घे उमेसि निज अंकिं सुदीना ॥
श्यामलाब्जनयनीं जल आलें। दुःखिता वचन गौरिसि बोले ॥४६॥
" काय गे ! विधि नितान्त अजाण !। जो तुला वितरि रूपनिधान॥
तोच देत तुजला वर कैसा। मूर्ख, बावळट, मूर्त पिसासा ! ॥४७॥
कसा विधी तुज पिसाट वर हा योजी, निर्मुनि तुज सुभगा।
कल्पतरूचित फलासि द्यावें लावुनि बाभुळिं काय उगा ? ॥
गिरिहुनि तुजसह लोटिन मज मी, मरेन अनलीं, जलधिंत वा।
जावो गृह वा कुकीर्ति होवो ! विवाह करविन तव न शिवा ! "४८

दा. क्र. ५८६५

मैनेसि दुःखित बघोनि तदा स्त्रिया त्या। झाल्या अतीव विकळा, सुकुमार जात्या
प्रेमा सुतेवरिल पोळित माउलीतें। शोकें विलाप करतां वदली अशी ते ४९
"मी नारदासि कधिं आचरिं का वितुष्ट।? कां नांदत्या मम गृहा करि तो विनष्ट?
तेणेंचि या मम सुते उपदेशियेलें। ऐशा पिशासि वरण्या तपिं युक्त केलें! ॥५०
नाहींच लोभ ममता मुळिं नारदातें। वैरागिया धन न धाम कलत्र हो तें!
लज्जा न भीतिहि तया परगेहघातीं। वांझेप्रती कळतसे प्रसवार्ति का ती ?!
मातेसि पाहुनि सशोक उमा भवानी। बोले तिला मृदुल गोड विवेकवाणी
"माते! विचार मनिं तूंच असा करावा गे! कोण भालिं लिहिल्या फिरवील दैवा?
वेडा असेल लिहिला वर मल्ललाटीं। द्यावा न बोल दुसऱ्याप्रति त्याजसाठीं ॥
तूंतें न नष्ट करवे मम भाललेख। ध्यावें तुवां उगिंच लावुनि कां कलंका ? ५३

कलंक लावुनि नच घे माते ! हो न मोहवश, समय न हा।
सुखदुःखें जीं लिहिलीं भाळीं, कुठेंहि मज तीं येति पहा !" ॥
विनीत कोमल उमावच असें ऐकुनि अबलागण सारा !।
निंदी बहुपरि विधिसि, सुदुःखें नयनिंहि सोडी जलधारा ! ॥५४॥

तों लग्नवृत्त कळतांच मुनींद्र तेथ। सप्तर्षि नारदसमेत समग्र येत; ॥
सांगोनियां सकल पूर्वकथादि तूर्ण। सर्वांसि नारद तदां समजावि पूर्ण ॥५५॥

"मैने ! सत्यचि जें तुला कथितसें, तें ऐक माझें वच।
कन्या ही तव जाण विश्वजननी, आद्यंत जीतें नच ॥
शक्ती ही अविनाशिनी, वसत जी श्रीशंकरार्धी सदा।
निर्मी, रक्षि, विनाशि, विश्व अवघें, भक्तांसि भव्यप्रदा ॥ ५६ ॥
स्वेच्छेनें जगिं लीलया अवतरे जी दक्षकन्याभिधें।
पावे नाम सती, अतीव तनु घे सौंदर्यसंपन्नसें ॥
तेथेंही वरिलें हरासचि इनें; विख्यात लोकीं कथा ॥
सर्वांना विदिता असेचि, परि ती निर्देशितों मी अतां ॥ ५७ ॥

ती एकदां पतिसवें असतां तयांना। श्रीरामदर्शन घडे वनिं हिंडतांना ॥
ही भ्रांतचित्त परिसेहि न शंकरोक्ति। श्रीजानकीसम सती धरि वेष, मूर्ति ५८

सीतावेषा सती धरी ती यास्तव तिजला हर टाकी।
पतिविरहार्ता तातमखामधिं योगानळिं तनु जाळित कीं; ॥

जन्मुनि आतां तव गृहिं तपली निजपतिलाभास्तव हीच ।
जाणुनि सारें, संशय सोडीं, हरप्रिया ही नित साच !" ॥ ५९ ॥

ती नारदाची परिसोनि वाणी । विषाद गेला हृदिंचा निमोनी ॥
क्षणांत तें वृत्त पुरीं कळालें । घरोघरीं लोक समग्र धाले ॥ ६० ॥

तदा पार्वतीच्या पदाब्जांसि मैना । हिमाद्रीहि वंदी किती वर्णवेना ॥
अती हर्षले अंतरीं सर्व पौर । स्त्रिया बालवृद्धादि ज्यांतें न पार ॥ ६१ ॥

संगीत मंगल पुरीं जन गोड गाती । सौवर्णकुंभ शुभ सिद्ध तसे करीती ॥
नानापरीं करिति खाद्यविशेष सिद्ध । जे सूपशास्त्र कथि वर्णुनि सुप्रसिद्ध ॥
तें कोण वर्णन करूं शकणार अन्न । नांदे त्रिलोकजननीच जिथें प्रसन्न ॥
बोलाविले सकल सादर देव तेथ । ब्रह्माहरिप्रभृति जे जगतीतलांत ॥६३॥
तेव्हां असंख्यमित भोजनपंक्ति होती । ज्यांतें अती कुशल वाढपि वाढताती ॥
देवां विलोकुनि सुभोजनिं मग्न मोदें । देवी तयां रमविती वदुनी विनोदें ॥६४

मधुर रवें सुरयुवती गाती ध्वन्यर्थवचें सुलवीती ।
सुरभोजन तैं सरे विलंबें सुखसंवादीं जैं रमती ॥
प्रहर्ष त्यांचा कोटिमुखांनिंहि कवणहि वर्णू नच शकता ।
आंचवुनी ते तांबुल घेउनि निजवासाच्या धरिति पथा ॥६५॥

निवेदिती तों मुनिवर्य येउनी । हिमालया लग्नमुहूर्तही झणीं ॥
मुहूर्त जाणूनि तयें निमंत्रिले । विवाहकार्या सुर जे भुकेजले ! ॥६६॥

बोलाविले सकळ सादर देव तेणें । सर्वां यथोचित असें बसवीत मानें ॥
शास्त्रानुसार रचिली शुभ रम्य वेदी । गात स्त्रिया सुभग मंगल गीतकादि ॥
सिंहासनासम मनोहर दिव्य वेदी । शोभा जिची करिल वर्णन कोण बुद्धि ॥
विप्रांसि वंदुनि तसें निजनाथ राम । ध्याऊनि तीवर चढे हर हर्षधाम ॥६८
बोलाविलें मग उमेसि मुनीश्वरांनीं । शृंगारुनी तिज सखीजन तेथ आणी ॥
सौंदर्य देखुनि तिचें भुललेहि देव । तें रूप कोण कवि वर्णु शकेल सर्व ?!
जाणोनि शंभुदयिता जगदंबिका ती । तीतें प्रणाम करिती सुर आत्मचित्तीं ॥
सौंदर्यसागर असीम उमास्वरूप । तें वर्णवेल नच कोटिमुखीं अमूप ॥७०॥

असंख्य वदनिंहि वदवेना जी निरुपम गिरिजाकांति महा ।
थके जिथें श्रुति, शेष, शारदा – तेथ मंद किति तुलसि पहा ॥

मंडपिं शंकरसन्निध गेली उमा भवानी रूपखनी ।
लाजुनि शिवपदकंजा न बघे जरि मति तेथें रत अलिनी ॥ ७१ ॥
जैं सांगतीं मुनि तदा गिरिजाशिवांनीं । वंदीयला गणपति प्रभु अग्रमानीं ॥
शंका मनांतहि धरोत इथें न कोणी; । कीं दैवतें सकलहीं असती पुराणीं ॥७२॥
जैसा विवाहविधि सच्छ्रुति वर्णितात । तैसाच तो मुनि करीति तदा समस्त ॥
कन्या समर्पि गिरिनायक दर्भपाणि । धन्या भवासि, समजूनि तिला भवानी ॥७३
केलें करग्रहण जैं परमेश्वरानें । तैं जाहली सकल देवमनें प्रसन्नें ॥
वेदोक्त मंत्र मुनिवर्य उदात्त गाती । ते गर्जनी 'जय जयाजि !' अशा सदुक्ति ७४
गौरीहरांवरि घडे किति पुष्पवर्ष । वाद्यें अनेकपरिचीं करितात घोष ॥
ऐसा विवाह घडला गिरिजाहरांचा । आनंद उत्सव भरे जगतांत साचा ! ॥७५॥
नाना तुरंग, रथ, कुंजर, दासदासी । वस्त्रादि, धेनु, मणि, मौक्तिक-रत्नराशि ॥
सौवर्ण भाजनसमूह भरोनि अन्नें । केलीं वराप्रति वितीर्ण अवर्ण्यमानें ॥७६॥

नानापरि गिरि देइ देणगी जोडुनि करयुग पुन्हां वदे ।
'पूर्णकांक्षा ग्रावें ईशा काय ?' म्हणुनि पदिं नमित मुदें ॥
अपुल्या श्वशुरा कृपांबुधि हरें तोषविलें तैं सर्वपरीं ।
वदे सुवचनीं शिवपदकमलां धरुनी मेना प्रेमभरीं ॥ ७७॥

"प्राणासमा मम उमा इजलागिं घ्यावें । मानूनि आत्मगृहकिंकरशी स्वभावें॥
माझे क्षमोनि अपराध समग्र देवा ! दावा कृपा, वर मला अजि ! हाच द्यावा"
नानापरीं समजवी हर सासुतेंही । वंदोनि शंभुपद ती सदनांत जाई ॥
बोलावुनी मग उमेप्रति घे निजांकीं । तीतें करीत उपदेश सुरम्य हा कीं ॥
"बाळे ! करीं सतत शंकरपादपूजा । नारीस देव पति, धर्म नसेचि दूजा"
हें बोलतां नयनिं वारि भरूनि येई । बालेसि घेत कवळूनि वदे पुन्हां ही ॥
"नारींसि जन्म वितरी तरि कां विधाता? स्वप्नींहि तें सुख नसे परतंत्र चित्ता"
प्रेमें अशी विकल होय अतीव मैना । दु:खा न ठाव म्हणुनी वरि धैर्यमाना
आलिंगुनी कवळि पाय पुन:पुन्हां ती । तें प्रेमवर्णन कुणा करवेल उक्तीं ? ॥
सर्वा स्त्रियांसि गिरजा मग भेट देई । मातेचिया कुशिं शिरे कितिदा पुन्हांही ! ॥

पुन:पुन्हां ती आइस कवळी, आशीर्वचनें दिलिं सकळीं ।
माते पाही फिरुनि फिरुनि तैं, सख्या नेति तिज पतिजवळीं ॥

सर्व याचकां सुखवुनि ये हर गौरीसंगें निज भवना ।
वाजवुनी नभिं मधुर दुंदुभी वर्षति हर्षें सुर सुमनां ॥ ८३ ॥
अत्यादरें त्यांप्रति पोंचवाया जाई नगाधीश उमेशसंगें ॥
नानापरींनीं परितोषवूनी निरोप दे, आणखि येइ मागें ॥ ८४ ॥
येतां गृहीं त्वरित तो नगराज दानें । शैलां सरांसि वितरी अति आदरानें ॥
देऊनियां मग निरोप सनम्रभाव । सप्रेम बोळवित त्यांप्रति अद्रिदेव ॥ ८५ ॥
कैलासिं येत हर जोंवरि तोंवरीच । गेले समग्र सुर आत्मगृहासि साच; ॥
होती उमाहर जगा जननीपिता ते । शृंगारवर्णन बरें न दिसेचि मातें ॥ ८६ ॥
कैलासिं भोगिति अनेकपरीं विलास । त्यांचे तसे गणहि सेविति ते तयांस ॥
ते नित्य नूतन विलास समाचरीती । त्यांचा गमे बहुत काल अशाच रीतीं ॥
जन्मासि षड्वदन येत तदा कुमार । जो तारकासुर वधी समरीं प्रवीर ॥
वेदीं कथा प्रथित शास्त्रपुराणिं होय । प्रेमें कुमारजननादिक विश्व गाय ॥८८॥
ख्यात जगीं हो कुमारसंभवकीर्तिपराक्रमपुरुषार्थ ।
अतिसंक्षेपें म्हणुनि वर्णि मी हरतनयाचें शुभचरित ॥
जे नरनारी उमाहरांचा विवाह गातिल परिसतिल !
विवाहमंगलिं सिद्धि त्यांस ये, सुखकल्याणें सेवितिल ॥८९॥
आहे अपार गिरिजापतिचें चरित्र । त्याचा न पार गवसे श्रुतितेंहि चित्र ! ॥
अत्यंत मंदमति हा तुलसी असा तें । वानील गांवढळ बालिश काय त्यातें ?
—: इति श्रीमहेशचरितपरमानन्यभावभक्तिदर्शनवर्णनं नामाष्टदशस्तरंग :—

## तरंग १९ वा

असें ऐकोनीयां रसभरित तें शंभुचरित ।
भरे अत्यानंदें मुनिवर भरद्वाज अमित ॥
तयाचा हृत्प्रेमा अतिशय कथेमाजिं जडला
भरे डोळां पाणी, तनुवरतिं रोमांच चढला ॥१॥
गळा दाटे प्रेमें वचनहि मुखांतूनि न निघे ।
दशा ऐशी त्याची मुनि सुमति तो हर्षुनि बघे ॥
वदे भारद्वाजा " अतिशयचि तूं धन्य जगतीं ।
तुला प्राणाऐसा प्रियतम गमे कीं पशुपति ! ॥२॥

नसे ज्यांची प्रीती हरचरणपद्मावरतिं ते ।
कदापि स्वप्नींही रघुपति–मतींतें न रुचते ॥
असे ज्यांचा प्रेमा अकपट असा शंभुचरणीं
खरे ते रामाचे प्रियतम असे भक्तनृमणि ॥३॥
असे शंभूऐसा कवण रघुनाथव्रतधर ? ।
सतीशीहि त्यागी अनघ दयिता जो प्रभुवर; ॥
प्रतिज्ञेनें ज्याची दृढ रघुपदांभोजिं सुमति ।!
तया शंभूऐसा प्रिय न पर मानी रघुपति ॥ ४ ॥

मीं गाइलें शंभुचरित्र आधीं जाणावया मर्म तुझ्या मनाचें ॥
परी तुझी निर्मल रामभक्ती पाहूनियां मन्मन हृष्ट नाचे ॥ ५ ॥
म्यां जाणिलें त्वद्‌गुणशील सारें आतां करूं वर्णन रामलीला ।
त्वत्संगतीं हा जन रंगुनीयां सौख्याब्धिमाजीं अजि मग्न झाला ! ६
मुनींद्र ! ही रामकथा अपारा ये कोटिशेषांसहि वर्णितां न ।
तथापि तो राघव वागधीश वंदूनि, जैसें श्रुत तें वदीन ॥ ७ ॥
श्रीशारदा भासत दारुनारी, अंतःस्थ तो राघव सूत्रधार ॥
करी कृपा ज्यावरि तो तयाच्या वाणी मनःप्रांगणिं नर्तणार ! ॥ ८ ॥
मी वंदुनी तोच कृपालु राम त्याचा करीं पुण्य गुणानुवाद ॥
कोदंडधारी रघुराय मातें देवो वरस्फूर्ति करो प्रसाद ! ॥ ९ ॥

कैलास शैलवर हो अतिरम्य जेथ । श्रीशंभु शैलतनया वसती करीत ॥
तेथेंचि सिद्ध, मुनि, किन्नर, देव, योगी । राहोनि शंभुपद सेविति पुण्यमार्गी १०
जे कीं अधर्मरत, जे हरविष्णुवैरी । अश्रद्ध त्यांसि नच वास तशा प्रकारीं ; ॥
त्या शैलिं एक वटवृक्ष विशाल रम्य । जो नित्य नूतन सपुष्प सुदैवगम्य ॥११॥
जेथें समीरण सुगंधित शीत मंद छायेंत त्या हर बसे, स्तवि ज्यास वेद ॥
त्या वृक्षसन्निध रिघे प्रभु एकवार । छाया बघून हृदिं घे परितोष थोर ॥ १२ ॥
तो सिंहचर्म पसरी स्वकरें तियेंत । बैसे वरी सहज शंभु दयार्द्रचित्त ॥
कुंदेंदुशंखसम शुभ्र भुजा सुदीर्घ । वेषें मुनींद्रसम वल्कलभूषितांग ॥१३॥
रक्तोत्पलें विकसलीं नव, तेविं पाद, । ज्यांची नखद्‌युति मनासि करी विशुद्ध
ज्या भस्म, नाग तनुभूषण, जो पुरारी । ज्या शारदेंदुसम कांति मुखासि भारी १४

ज्यातें जटामुकुट, शीर्षिं सुरापगा ती । ज्यातें विशाल नयनांबुज, दिव्य कांती ॥
बालेंदुमौलि, शितिकंठ मनोजवैरी । तो शंभु शांतरससाच गमे शरीरी ! ॥१५
जाणोनि योग्य समया जगदादिमाता । गौरी तयाजवळिं जाय विनम्रचित्ता ॥
तैसी प्रिया बघुनि, सादर शंभु तीतें । तो वामभागिं निज आसनिं घेत कांते १६
ती बैसली शिवसमीप अतिप्रमोदें । तैं पूर्वजन्मगतवृत्त मनांत कोंदे ॥
जाणोनि हृष्ट पतिमानस, ती हंसोनी । बले प्रिया मधुरवाक्, पतिला भवानी १७
जी सत्कथा सकल लोकहिता करीत । ती त्यासि शैलतनया पुसुं पाहि तेथ ॥
कांता वदे "पुरहर ! प्रिय ! विश्वनाथ ! । त्रैलोक्य जाणत विभो ! महिमा समस्त १८
सारे चराचर मनुष्यसुरादि नाग । त्वत्पादवारिरुह सेविति सानुराग ॥
शंभो ! समर्थ सकलज्ञ कलागुणांचे । तुम्हीच धाम, नतकामतरूच साचे ! १९

जें ज्ञान वैराग्य तसाच योग । यांचे तुम्ही राशिच कीं अथांग ॥
माझेवरी होउनियां प्रसन्न । अज्ञान माझें निरसा जि ! पूर्ण ॥२०॥

सांगा मला विविध सुंदर राघवाच्या । रम्य. कथा परम पावन गोड वाचा ॥
जो कल्पवृक्षतलिं वास करीत त्यासी । दारिद्र्य दुःख लवही कधिं काय कर्षी ? २१
आणोनि हें हृदयिं, नाथ ! परिश्रमातें । माझ्या अशेष पळवा करुणार्द्रचित्तें ॥
हे इंदुभूषण विभो ! मुनितत्त्ववेत्ते । हा ब्रह्म राघव अनादि कथीति कीं ते २२
गातात शेष निगमागम शारदादि । सारेच राघवगुणांचि महाप्रमोदीं
हे कामनाशन विभो ! तुम्हिही सभक्ति । श्रीरामनाम जपतां दिन आणि राती

तो कीं अयोध्याधिपपुत्र राम । जो निर्गुणानादि अलक्ष्य धाम ॥
असे जरी तो नृपपुत्र साच । व्हावा कसा ब्रह्म अनादि तोच ! २४
वेडावला तो दयितावियोगें । चरित्र हें पाहुनि वाटुं लागे— ॥
कीं ब्रह्म तो केविं खरें असावा ? । या संशयीं आपण मार्ग दावा २५

सांगावें मज हें, असेल जर कीं श्रीरामचि ब्रह्म तें ।
जें हो ईश्वर कामशून्य सकलव्यापी अणूरेणुतें ॥
ही मी अज्ञतमा न व्हा मजवरी सक्रोध देवा ! हृदीं ।
सारा नाशुनि मोह हा, मम करा संशुद्ध निःशंक धी ॥२६॥

रामप्रभुस्व विपिनींच मला कळालें । मी भीतिविक्लव तुम्हांप्रति तें न बोलें ॥
आला न बोध मलिना परि मन्मनाला । हा योग्यसाच मजला फललाभ झाला ! ॥

(सं. तं. ७२५८०९)

आहे अजूनहि मनीं मम कांहिं शंका । मी वंदुनी विनवितें, करितें कृपा का ?
तेव्हांहि घातलि तुम्ही समजूत माझी । जाणून कोप न करा मज ~~एवढा जी~~ ।।
ना मागिल्यापरि विशेष विमोह मातें । मच्चित्त लुब्ध बहु रामकथेवरी तें ।।
देवाधिदेव ! अहिराजविभूषितांगा ! । श्रीरामसद्‌गुणकथा मजलागिं सांगा ।।
वंदूनि मी धरितसें चरणाब्ज माथां ।,जोडूनि अंजलि तुम्हां विनवीत, नाथा ! ।।
वेदान्त मंथन करोनि सुसार लब्ध । जें रामचंद्रयश तेंचि कथा विशुद्ध ३०
मी स्त्री जरी अनधिकारिच होय ऐसी । वाक्‌चित्तकर्मिं परि मी तुमचीच दासी
साधूंसि आर्त अधिकारि कुणीहि येत । ते ठेविती नच तया परमार्थ गुप्त ३१
सांगा जि ! बालरघुरायचरित्रसार । सीता कशी वरिलि तेंहि कथा समग्र ।।
राज्य त्यजी रघुप, कोण तयांत दोषी । लीला अपार करि, जाउनिही वनासी
हे देववर्य ! पुसतें अति आर्त चित्तें । सांगा कृपा करुनि रामकथा मला ते
कां ब्रह्म निर्गुण तसें सगुणत्व सेवी । हो रामचंद्र अवतीर्ण कशास तेवीं ३३
कैसा तयें समरिं रावणनाश केला ? । येऊनि राज्यिंहि करी बहु आत्मलीला
तें सर्व हो ! मज कथा प्रभुराय ! वृत्त । आनंदसागरिं डुबो मम नाथ ! चित्त
आश्चर्यकृत्य रघुनाथ करीत जें जें । स्वर्गासि सप्रज कसा रिघला स्वतेजें ?
सांगा विभो ! मजसि सर्वहि तत्त्वसार । ज्ञानी मुनी रमति ज्यांमधिं सद्विचार

सांगावें मजला तसेंचि विभु हो ! जें ज्ञानविज्ञान तें ।।
वैराग्यादिकथा विशेष मजला, वानूनियां भक्तितें ।।
वर्णावेंहि पुनः पुन्हां बहुपरी त्या त्या विभागादिकां ।।
जेणें चित्तिं विवेक होउनि कळे श्रीराम मातें निका ।।३६।।

जें मी नसेल पुसलें, मज तें निवेदा ! शर्व ! प्रभाव तुमचा न कळेहि वेदा
त्रैलोक्यसद्‌गुरु तुम्हीच दयांबुराशि । कैसें कळे सकल दुर्बल पामरासी " ३७
ऐकोनियां सरल रम्य विचारणा ती । झाले प्रसन्न अति शंकर आत्मचित्तीं ।।
त्यां आठवे हृदयिं रामचरित्र सारें । रोमांचुनी, नयनिं लोटति अश्रुनीरें ३८
त्या जाहलें प्रकट अंतरिं रामरूप । झाला प्रहर्ष, सुख होय हृदीं अमूप ।।
(तें वर्णवेल कवणा सुखसार साचें ! । मी वेचिं बोल तुलसीमुखसारसाचे) ।।३९
होऊनि मग्न घटिकाद्वय त्या सुखांत । ध्यानांतुनी वळवि बाहिर शंभु चित्त ।।
आनंदुनी हृदयिं रामचरित्र गाया । लागे महेश; पुलकांकित होत काया ४०

—: इति श्रीउमाप्रश्नशिवध्यानवर्णनं नामैकोनविंशतिस्तरंगः :—

## तरग २० वा

असत्य हें विश्व गमे खरेंच । न जाणतां ज्यासि समग्र साच ॥
रज्जू अहीशीच जशी गमावी । जों ज्ञान ना सत्यपणासि दावी ॥१॥
स्वप्नासि जागृति क्षणीं करि लोप जैसी । यज्ज्ञान विश्वपरिभास तसें विनाशी ॥
तो बालराम हृदयीं नमितों सदैव । यन्नाम चित्तिं जपतां यश कार्यिं सर्व ॥२॥
जो मंगलायतन, नाशि अमंगलांतें । जो खेळला दशरथांगणिं हृष्ट चित्तें ॥
तो बाल राम करुणाद्रवयुक्त नित्य । माझे वरी करुं कृपा प्रभु भक्तभृत्य !॥३॥
वंदोनि रामचरणां त्रिपुरारि चित्तीं । हर्षोनियां अमृतपूर्ण वदे सदुक्ति ॥
"तूं धन्य धन्य गिरिराजकुमारि ! धन्य ! । नाहीं जगीं तुजसमा उपकर्ति अन्य
विचारिशी रामकथाप्रसंग । भागीरथीचा जणुं पुण्य ओघ ॥
करीतसे पावन सर्व लोकां । जो हर्षपूरें नुरवीत शोका ॥५॥
प्रीती तुझी रामपदाब्जि मोठी । जगद्धिताचाच विचार पोटीं ॥
याकारणें प्रश्न करीसि गौरि ! ऐसें जगीं कोण परोपकारी ? ॥६॥
वाटे, रघूत्तमकृपें तव चित्तिं नाहीं । शोकभ्रमा स्थल, तसेंचि न संशयाही ॥
नाहीं विमोह तुज पार्वति ! तूं तरीही । प्रश्नें करीशि जगतीतल पूत, पाहीं ॥
जे कान सेविति न रामकथासुधेसी । ते वाटती मज भुजंगबिळेंचि जैसीं ! ॥
जे नेत्र देखति न सज्जन भक्तिलोल । ते वाटती नयन मोरपिसांवरील ! ॥८॥
जें शीर्ष विष्णु-गुरुपादिं न नम्र होत । तें भोपळाच जणुं भासत मूर्तिमंत ॥
ज्यांच्या न होय हरिची हृदयांत भक्ति । ते प्राणि केवल कलेवरसेच होती !९
जी जीभ रामगुणगान करी न साची । ती मानवी न, परि वाटत दर्दुराची !
ज्या हर्ष नाहिं हृदया हरिच्या कथेनें । तें वज्रसेंच अति निष्ठुर होत मानें १०
हे गौरि ! तूं परिस राघवरम्यलीला । देवांसि ज्या शुभद, नाशक राक्षसांला ॥
ही कामधेनु जणुं रामकथा वदावी । जी सेवकासि सुख उत्तम नित्य दावी ११
तो सत्समाज गमतो सुरलोक साच ! हें जाणुनी हरिकथा बुध सेवितीच ॥
नाशूनि पाप, भजका बहु पुण्य दे ही । साधीत आत्महित सेवुनि हीस देही. १२

—: इति श्रोतासावधानकृते विंशतिस्तरंगः :—

## तरंग २१ वा

कथा श्रीरामाची गमत करिंची टाळि सुभग ।
स्वनादें जी देई उगवुनि दुरी संशयखग ॥
म्हणूं किंवा तीतें कलितरुकुठारीच सुशिता ।
उमे ! ऐकावी त्वां प्रमुदितमनें राघवकथा ॥ १ ॥

गाती श्रुती अमित सुंदर राघवाचें । तें जन्मकर्म गुणनाम चरित्र वाचें ॥
श्रीरामचंद्र भगवान् प्रभु तो अनंत । त्याचीं कथागुणयशेंहि अनंत होत ॥२

मीं जें ऐकियलें यथामति तुला सांगेन तें पार्वति ! ।
प्रीती रामपदांबुजांवरि तुझी अत्युत्कटा निश्चितीं ॥
जे जे प्रश्न विचारिले अजि तुवां, अत्यंत ते साजिरे !
होती सौख्यद साधुसंमत तसे माच्चित्त हर्षें भरे ! ॥ ३ ॥
गाती वेद जयास भक्तियुत ज्या ध्याती मुनी अंतरीं ।
तो श्रीराम, विचारिशी प्रियतमे ! कोणी दुजा कीं तरी ? !
मोहें व्यापियली जरी तव मती, त्वत्प्रश्न हा भासत ।
ना शोभावह अल्पही तव मुखीं हें मात्र माझें मत ॥ ४ ॥

नाचे जयांहृदयिं मोहपिशाच्च ऐसें । पाखंड जे अधम, भक्ति न ज्यांत पोसे॥५
जे मूर्ख मंदमति अंध तसे अभागी । ते मात्र गे! भकति बोल असे, शुभांगि!
ज्यांच्या मनोमुकुरिं हो विषयादि लेप । शैवालसा चिकटला करि धीविलोप॥
जे कोणि लंपट, लबाड, कुमार्गशील । स्वप्नींहि सज्जनसभेमधिं जे न लोल ६
जे लाभहानि नच जाणति आत्मचित्तीं । ते मात्र बोलति अशी श्रुतिरोधि उक्ति ॥
जे अंधसेच, उपनेत्रहि अंध ज्यांचें । ते रामरूप कधिं कां बघतील साचें? ७
ज्यांतें नसे सगुणनिर्गुण बोध कांहीं । जे जल्पती उगिच कल्पित शुष्क पाहीं ॥
त्यांचें नसे नवल कीं, तिनिही जगांत । मायेमधीं हरिंचिया भ्रमती समस्त ८
उन्मादवायु करि ज्यांस विवेकहीन, । किंवा पिशाचवश यन्मति होय पूर्ण ॥
जे मूढ मोहमदमत्त करीति उक्ति । ध्यावी कुणी श्रवणिंही पडुनी न कां ती ९
टाकूनि संशय, विचार मनीं करून । तूं आत्मचित्त करिं रामपदाब्जलीन ॥
उक्ती मदीय मनिंचें तम वारणारी । भानुद्युतीच गणुनी मतिं घेइं गौरि! १०

इतिउमाप्रश्नोत्तर-श्रोताभयदर्श-आश्वासन-प्रतिसावधानकृतैकविंशतिस्तरंगः

## तरंग २२ वा

नाहीं निर्गुणता तशी सगुणता यामाजिं भेदा स्थळ ।
ऐसें गाति पुराणवेद मुनिही धीमन्त जे निर्मळ ॥
ज्यातें ना गुण जन्मरूप, नयना जो दृश्यही ना मुळीं ।
भक्तिप्रेम गुणेंचि तो सगुणता घेऊनि ये भूतळीं ॥ १ ॥

नाहीं विभेद जल आणिक गार यांत । तैसाच तो सगुण निर्गुण एक होत ॥
जो भ्रांतिचें तम निवारणिं सूर्य मूर्त । त्याच्या कसा करिल मोह मतीस आर्त ?

हा सच्चिदानंद दिनेश रावत्र । व्यामोहरात्री न तयापुढें लव ॥
श्रीराम आहे सहजप्रकाश कीं । नोहेंचि विज्ञानपहांट त्या निकी ! ॥

ज्ञानाज्ञान, विषाद, हर्ष, गुण हे, तैशी अहंकारता, ।
होती हे जगिं जीवधर्म; न कुणी टाकी तयां तत्त्वतां; ॥
आहे राम सनातन प्रभु जगद्व्यापी परब्रह्म तो
पूर्णानंद परेश निस्तुळ तया मी सर्वदा वंदितों ॥४॥

जो कीं प्रसिद्ध परमेश जगत्प्रकाश । मायेश विश्वपति राघव चिद्विलास ॥
स्वामी मदीय नमिं मी लववूनि माथा । माझा प्रणाम बहुवार तया अनंता ॥
जाणे न मोहवश अज्ञ निजभ्रमातें । आरोप सर्व करितो प्रभुठायिं तो ते ॥
पाहूनि मेघपटलें भरल्या नभास । बोले अपंडित, 'रवी लपलाचि खास' ! ॥६
डोळ्यावरी धरुनि अंगुलितें पहातां । आहे शशिद्वय असा भ्रम होइ चित्ता
तैसाच रामविषयीं तव मोह भासे । कीं व्योम, धूम, तम धूलिमुळेंचि तैसें ७
एकत्र जैं विषय इंद्रिय देव जीव । होती परस्पर सचेतन सर्व भाव ॥
देतो प्रकाश परि या सकलांसि पूर्ण । तो तूं अनादि रघुनायक राम जाण ॥८॥
विश्व प्रकाश्य, रघुराय तया प्रकाशी । मायाधिनाथ गुणसागर चिद्विलासी ॥
ज्याच्या प्रभावें गमते जणु सत्य माया । तूं जाण पार्वति ! तया हृदिं रामराया ॥
शुक्तींत हो रजतभास; उन्हीं जलाचा । खोटेंच तें परि विलोप न होय साचा ॥
ईशाश्रयेंचि जरि त्यापरि विश्व भासे । वाटूनि सत्य बहु दुःखद होय तैसें ! ॥१०
स्वप्नीं गमे जर कुणी स्वशिरासि कापी । तें दुःख जाग्रतिविना न सरे कदापि ॥
ज्याची कृपा नुरवितें भ्रम हा क्षणांत । तो एक राम विभु हें समजें मनांत ॥ ११
ज्याचा कळे न कवणासहि आदि अंत । गाती यथामतिच वेदहि हेंचि सूक्त ॥
" चाले पदाविणहि, अश्रुति आयकेही । कर्में करी विविध, हस्त जरीहि नाहीं. ।

नाहींच वक्त्र तरि सर्व रसांसि सेवी । वाणीविना वदत थोरचि योगि जेवीं ॥
स्पर्शी तनूविण, अलोचनही पहातो । घ्राणाविना सकल गंधहि घेतसे तो १३
ज्याचीं अशीं जगिं अलौकिक कृत्यजातें। माहात्म्य ये सकल का कधिं वर्णितां तें?
ज्या गाति सर्व बुध, वर्णिति वेद व्यास। ध्याती मुनी,सकृप भक्ति असा रमेश
काशींत जंतु मरतां मधुनी जयाचें । घेऊनि नाम करिं मी भवमुक्त साचें ॥
तो हाच राम विभु होय चराचरेश । जो व्यापि सर्व हृदयांतरिंचा प्रदेश १५
जें नाम घेतां अविचारितें ही । त्यांचीं अघें संचित सर्व दाही ॥
जो आदरें घे हरिनाम चित्तें । भवाब्धि हा गोष्पदसाच त्यातें ॥१६
तोच श्रीराम असे परमात्मा सत्य हें पुरें समज ।
संशय याविषयीं तव, गौरि ! गमे सर्वथा अयोग्य मज ॥ १७
जो अशा संशया थारा देतसे निजमानसें ॥
तो निज ज्ञानवैराग्यसद्गुणां दूषवीतसे " ॥ १८ ॥
ऐकोनि शंभुवच तें भ्रमभंगकारी । सोडी कुतर्क मनिंचा झणिं सर्व गौरी ॥
निष्ठा तिची जडलि सादर रामपायीं । कैशी तयें मलिनता मतिची न जाई?।
पुनःपुन्हां ती प्रभुपादपंकजें । धरोनि जोडी करवारिजें निजें ॥
वदे प्रियातें वचनें गुणान्वितें । जयांमधीं प्रेम भरोनि राहतें ॥२०॥
—* इति उमामहेश्वरसंवादे श्रीरामस्वरूपवर्णनं नाम द्वाविंशतिस्तरंगः *—

## तरंग २३ वा

ऐकूनि तुमची वाणी रूपिणी जणुं कौमुदी ॥
शरदातप लोपे मन्मोहरूप क्षणामधीं ! ॥ १ ॥
कृपेनेंचि तुम्हीं सर्व माझे संशय नाशिले ॥
रामस्वरूप मच्चित्ता हें प्रभो ! कळलें भलें ॥ २ ॥
कृपेनें आपुल्या गेला विषाद मम सर्वथा ॥
प्रसादें प्रभुपादांच्या पावलें मी प्रसन्नता ॥ ३ ॥
असें मी अज्ञ ही नाथ ! आपुली लीन किंकरी ॥
स्वभावेंचि जडा बुद्धि स्त्रियांची प्रथिता जरी ॥ ४ ॥
सांगा जी ! मजला नाथा आधीं जें मी विचारिलें ॥
असाल जर कीं आतां माझे विपर्यि हृष्टले ॥ ५ ॥

अविनाशी परब्रह्म सच्चिदानंद राम हा ॥
जो कीं निर्गुण सर्वांच्या वसे हृन्नगरीं, पहा ! ॥ ६ ॥
धरावी कां तयें येथें जन्मोनी नरता अशी ?
सांगावें भगवन्! मातें पडो ध्या समजाविशी ! " ॥ ७ ॥
गौरीचें अतिनम्र तें वच, तशी रामायणीं सादर।
पाहोनी मति पावना अतिशय प्रेमें भरे शंकर ॥
जो कामारि विवेकशील मुळचा ज्ञानी कृपासागर
बोले हृष्टमना प्रशंसुनि पुन्हां तीतें असें ईश्वर ॥ ८ ॥
" हें रामचरितमानस परिस उमे ! विमल मंगलायतन ॥
पूर्वी काकभृशुंडी करि जें गरुडा खगेश्वरा कथन ॥ ९ ॥
संवाद सुंदर कथामय तो तयांचा । झाला तसा कथिन नंतर साग्र साचा ॥
आधीं वदूं परममंगल हेंचि आतां । रामावतारचरित-श्रुतिरम्य गाथा ॥१०॥
श्रीरामचंद्रगुणनामकथांबुराशी । ज्या पार ना परि यथामति वर्णुं त्यासी ॥
तूं आवडीं परिस गे ! गिरिराजबाले ! श्रीरामरम्यचरितें मन हो निवालें ११
हरिचरित्र विशुद्ध मनोहर । श्रवण तूं गिरिजे ! कर सादर ॥
स्तविति ज्या निगमागम पावन । प्रभुयशें तुज तीं करुं वर्णन ॥१२॥
अवतरे प्रभु ज्यास्तव भूवरी । जगिं अतर्क्यचि तें कवणा जरी ॥
गमत राम अगम्य वचा मना । परिस तूं परि सन्मतिकामना ॥ १३
तरि पुराण मुनिश्रुति साधु ते । जशि यथामति वर्णिति या कथे ॥
कळुनि ये मज ज्यापरि तें, तुला । सकल मी अजि वर्णिन हेतुला ॥१४
जेव्हां जेव्हां छळित जगता घोर सद्धर्मनाश ।
वाढूं लागे असुरकरणी नष्टनीती विशेष ॥
गोविप्रांना सुरधरणिंना त्रास होत प्रचंड ।
तेव्हां तेव्हां प्रभु अवतरे रक्षणीं आत्तदंड ॥ १५ ॥
सज्जना होत ती पीडा हरी हरि कृपानिधि ॥
घेउनी विविधें रूपें येत तो अवनीमाधिं ॥ १६ ॥
वधुनि असुर सर्व स्थापणें वेदसेतु । सदवन विबुधांचें हाच तज्जन्महेतु ॥
जगतिं विपुल कीर्ती उज्ज्वला पुण्यराशि । भरुनि निववि संतां राम येतां क्षितीसी

गाऊनि तेंच यश, भक्त तरे भवाब्धि । येतां विभू सदय लोकहितेंचि साधी ॥
तज्जन्महेतु जरि चित्र अनेक होत । हे एक दोनचि सविस्तर सांगु येथ १८
तूं ऐक गे ! सुमति ! गौरि ! अनन्यचित्तें । जे द्वारपाल हरिचे प्रिय पूर्वि होते॥
आतेच ते, जय तसे विजयाख्य दोन । जे विप्रशापिं जगिं दैत्यकुलावतीर्ण १९

होती हिरण्यकशिपू आणि हिरण्याक्ष हेच ते दोन ॥
विख्यात जे पळविती इंद्राच्याही मदास जिंकोन ॥ २० ॥
ते वीर नित्य विजयी समरीं परि त्यां हरीच संहारी ॥
एका नरहरिरूपें, वराहरूपें दुज्यास तो मारी ॥ २१ ॥
भक्त प्रह्लादाचें आह्लादक यश जगांत गाजविलें ॥
यन्महिम्यानें लोकीं लीलेनें ते सुधेंदु लाजविले ॥ २२ ॥
पुढतीं तेच निशाचर बलशाली वीर लोकविख्यात ॥
अवतीर्ण पुन्हां झाले जे रावण कुंभकर्ण जगतांत ॥२३॥

इतिश्रीउमामहेश्वरसंवादे श्रीरामावतारीमतमतात्सूक्ष्मवर्णनं नामत्रयोविंशतितरंगः

## तरंग २४ वा

झाले न मुक्त राक्षस जरि त्यां भगवान् हरि स्वयें मारी ॥
कीं तीन जन्मवरि त्यां होता द्विजशाप; कोण तो वारी ? ॥१॥
म्हणुनी त्यांचिस्तव घे पुनरपि अवतार देव सदयमनें ॥
भक्तीं कृपाळु ईश्वर, लीला त्याची कुणास आकळणें ॥२॥
कश्यप, अदिती दशरथकौशल्यारूपिं फिरुनि अवतरती ॥
ज्यांचे पोटीं भगवान् जन्मा ये रामचंद्र भूवरतीं ॥३॥
घेउनि अवतार असा एका कल्पीं चरित्र विभु दावी ॥
जें सर्व विश्वपावन लीला त्याची कशापरि वदावी ? ॥४॥
एका कल्पीं सगळे सुर दमले करुनि बहुत संग्राम ॥
जालंदर दैत्याशीं परि विजयश्री वरी न सुरधाम ॥५॥
दुःखितदेवसहाय्या शंभुहि संग्राम थोर त्यासिं करी ॥
परि तो दनुज महाबल कांहीं केल्या मरेच्चना समरीं ॥६॥
कारण त्या दैत्याची भार्या होती पतिव्रता थोर ॥
तेणें शंभुहि त्यातें शकला जिंकावयासि न समोर ॥७॥

परि हरि कपटें तद्व्रत भंगुनि सुरकार्य साधिता झाला ॥
मर्म कळोनी येतां कोपुनि शापी सती हरिस त्याला ॥८॥
तो शाप स्वीकारी आनंदें विष्णु कौतुकनिधान ॥
भक्तकृपाकर भगवान्; जालंधर रावणत्व धरि फिरुन ॥९॥
श्रीराम त्या वधोनी झाला कैवल्य-धामिं मग नेता ॥
प्रभुच्या अवताराचें कारण तें वर्णिलें तुला आतां ॥१०॥

सदवतारकथा प्रभुच्या किती । बहुपरी मुनि सादर वर्णिती ॥
प्रभुसि शापियलें मुनिनारदें । अवतरे क्षितिं राम तदा मुदें ॥ ११ ॥

ऐकोनी वच तें उमा चकित हो, बोले ' कसें हो ! मुनि ।
ज्ञानी नारद विष्णुभक्त विभुतें ते टाकिती शापुनी ? ॥
झालें कारण काय शाप असला द्यायास देवाप्रति ? ।
कैसा तो अपराध आचरि तरी सर्वज्ञ लक्ष्मीपति ? ॥१२॥
सांगा जी ! मजला प्रसंग सगळा; आश्चर्य हें केवढें ? ।
कीं शुद्धा मुनिचीहि बुद्धि असल्या मोहामधें सांपडे ! ' ॥
देई सस्मित शंभु उत्तर ' नसे ज्ञानी कुणी मूढही; ।
जैसें जें जइं राम आचरि तसें तें व्हावयाचें तईं ! ॥ १३ ॥

भरद्वाजा ! प्रेमें परिस रघुनाथोत्तमकथा ।
तुला मी ही आतां कथन करितों सद्गुणयुता ! ॥
त्यजोनी गर्वातें भज रघुपतीतेंचि तुलसि ! ।
भवा नाशायातें पर कवण शक्ती धरि अशी ? ॥ १४ ॥

हिमगिरीवरि एक असे महा । सुरसरित्तटिं पुण्यतमा गुहा ॥
बघुनियां स्थल रम्य अती तिथें । सुरमुनी मनिं नारद इच्छि तें १५
बघुनि शैल, नदीतट तें वन । हरिपदीं रतिनें भरलें मन ॥
हरिपदस्मरणें श्वसन स्थिर । सहज मग्न समाधिंत अंतर ॥ १६ ॥
बघुनि तद्गति भी मघवा मनीं । जवळ बोलवि तो मदना झणीं ॥
वदत सादर 'तूं मजसाठिं रे ! । स्वबल घेउनि जा तिकडे त्वरें !' १७
मदन हृष्टपणें मग चालला । सुरपती मनिं चिंतित " आपला
मुनि हरील किं नारद ठाव हा । स्मरचि जिंकिल त्याप्रति हा महा !१८

नों. नं. ८१८१७३
६५

जगतिं जे जन लोलुप कामुक । कुटिल काकसमानचि ते निक ॥
निजमनीं डरती सकलांप्रती । नियम हाच खरा दिसतो किती !॥१९॥
मृगपतिस बघोनी श्वान जो धांवु लागे । निजमुखिं पकडूनी शुष्कही हाड वेगें
मनिं जणुं गमतें त्या सिंह कीं तें छिनील । सुरपतिमनिं तैशी जाहली लाज फोल !
श्रीनारदाश्रमाच्या सन्निध जेव्हां अनंग तो जाय ॥
तेव्हां निजमायेनें वसंत ऋतु तो सृजी निजसहाय ॥ २१ ॥
विविध तरू बहुरंगी काननिंचे होति शोभित फुलांनीं ॥
कूजति कोकिल, करिती गुंजारव भृंग दंग मधुपानीं ॥ २२ ॥
पवन सुगंधित शीतल वाहूं लागति मनोहर नितान्त ॥
चेतविती कामाग्निस, चित्त रहावें कसें मग सुशान्त ! ? ॥ २३ ॥
रंभादिक सुरयुवती कामकलेच्या सरांत रमणाऱ्या ॥
सुस्वर गाती, नाचति, क्रीडाकौतुक निदर्शविति साऱ्या ॥ २४ ॥
देखोनी सगळें विमोहक तसें साहाय्य, हर्षे स्मर ।
तोही कौशल दर्शवी बहुपरी मोहावया अंतर ॥
त्याची कामकला तथापि विकला झाली मुनीचे पुढें ।
तेव्हां मात्र मनोज भीति-जलधीमध्यें स्वपापें बुडे ! ॥२५॥
ज्या क्षेत्रा रक्षिता आहे स्वतां लक्ष्मीपती बली ॥
कोण तें क्षेत्र खायातें शकेल जगतीतलीं ? ॥२६॥
झाला भयार्त सहसैनिक पंचबाण । मानूनियां निज पराजय तेथ पूर्ण ॥
होई विनम्र मुनिनारदपादकंजीं । प्रार्थी तयां, विनतभीति निवारिती जीं २७
होता न रोष मुळिं नारदचित्तगेहीं । ते सांत्विती मदनचित्त मृदू वचांहीं ॥
तेव्हां ऋषीश्वरपदीं नमवून माथा । जाई ससैन्य रतिनाथ सुतुष्टचेता ॥२८॥
सुशीलता आपुलि, थोर तें व्रत । मुनींद्र तो इंद्रसभेंत वर्णित ॥
आश्चर्य वाटे सकलां सभासदां । श्रीशासि ते वंदिति, तेविं नारदां २९
गेले नारद शंकराप्रति पुढें, चित्तांत गर्वान्वित ।
कीं मी जिंकुनि सोडला स्मर कसा, झालों न त्या अंकित ॥
तें सारें परिसोनि शंकर मनीं श्रीनारदांची स्थिति ।
आणोनी वदले दयायुत तयां ऐशापरी सन्मती ॥ ३० ॥

" विनवणी मुनिवर्य ! तुम्हां अशी । मज कथा वदलां तुम्हि ही जशी
हरिपशीं न तशी कधिंही वदा । हरि दुरावुनि येइल आपदा " ३१
जरि करी हर त्या उपदेश हा । परि न नारद आचरि तो, पहा ।।
परिस कौतुक गोष्ट अशी मुने ! । घडत, जें रुचते हरिकामने ।।३२।।

असे जी रामेच्छा घडत जगतीं तेंचि न दुजें ! ।
तियेतें भंगोनी उलट करण्या कोणि न धजे ! ।।
न तें शंभूचें ये सुवचन परी नारदमना ।
तिथोनी गेले ते मुनिवर पुढें ब्रह्मसदना ।।३३।।

एकदा धरुनि सुस्वर वीणा । गात गात हरिचे गुण नाना ।।
क्षीरसिंधुसि रिघे मुनिनाथ । वेदशीर्ष विभु नांदत जेथ ।।३४।।

भेटे उठोनि मुनितें हरिखें रमेश । बैसे वरासनिं तयासह सप्रहर्ष ।।
बोलें चराचरविभु स्मितपूर्व त्यातें ' केली कृपा मुनिवरा ! कितिकां दिसां ते ? '
सांगीतलें स्मरचरित्र समग्र तेणें; । ना आचरी कृतिसि शंभुवचाप्रमाणें ।।
ऐशी प्रचंड जगतीं रघुनाथमाया; । तो कोण जो क्षम असे हिस आकळाया ? ३६

वदन रूक्ष, परी मृदु भाषणें । ऋषिस विष्णु वदे हितकारणें ।।
" स्मरण ही तुमचें मदहारण । करित मानविमोह निवारण ।।३७।।
न ज्या मनीं ज्ञान, न वा विरक्ति । मोहास लाभे स्थल त्याच चित्तीं
जे ब्रह्मचारी स्थिरधी तुम्ही हे । छळील त्यांतें स्मर काय मोहें ? " ३८
धरुनियां अभिमान वदे मुनि । " सकल हें तुमच्याच कृपागुणीं ! "
प्रभु म्हणे करुणानिधि अंतरीं । " उदित गर्वतरू मुनिच्या उरीं; ३९
परि तयासि समूल उखाडणें । मजचि हें करणें ऋषिकारणें ।।
मम असे पण भक्तहिताप्रति । सतत आपण कीं जपणें अति ।।४०।।
कल्याण होय मुनितें, मजहि विनोद । होई असाच करणें सदुपायशोध " ।।
वंदोनि विष्णुचरणीं परते मुनीश । चित्तामधें परि अतीवचि गर्व त्यास ।।४१।।

प्रेरि तोंवरि हरी निज माया । ऐक निष्ठुरकृती तिचिया या ।
निर्मि ती नगरि तत्पथिं रम्या । दीर्घ योजनशता बहुहर्म्या ।।४२।।

नगररचना तेथें होती अतीव मनोहर ।
जणुं गमत ती वैकुंठाच्या पुरीहुनि सुंदर ।।

वसत नगरीमध्यें तेथें स्त्रिया नर रम्य ते ।
रतिमदनसे जे भासोनी मनाप्रति मोहिते ॥४३॥
राजा शीलनिधी नामें राज्य तीवरती करी ।
असंख्य लोक, सैन्यादि, गजवाजी तदंतरीं ॥४४॥
शत इंद्रांहुनी त्याचे विलास विभवादिक ॥
रूप शक्ति प्रभा नीती यांचें तो धाम कीं निक ॥४५॥
त्याची कन्या जिचें नाम शोभलें विश्वमोहिनी ॥
सौंदर्या पाहुनी जीच्या जावी लक्ष्मीहि लाजुनी ॥४६॥
तीच साक्षाद्विष्णुमाया सद्गुणांची जणूं खनी ॥
सौंदर्या वर्णितां जीच्या वाणी देवीहि ती उणी ! ॥४७॥
स्वयंवर कुमारीचें राजानें मांडिलें तिथें ॥
असंख्य नृपती तेव्हां आले देखावयासि तें ॥४८॥
कौतुकें नारदमुनी पातले त्या पुरामधीं ॥
पुरवासी जनांलागीं पुसती, ' कोण हा विधि ? ' ॥४९॥
कळतां सर्व तें वृत्त राजप्रासादिं ये मुनि ॥
पूजूनि बैसवी राजा नारदां देखतां क्षणीं ॥५०॥
कन्येतें आणवी भूप दाखवी नारदास ती ॥
पुसे मुनीस ' सांगा हो ! गुण, दोष हिचे किती ? ' ॥५१॥
लावण्य पाहतां तीचें वैराग्य विसरे मुनि ॥
होईच ना तृप्ति त्यांना तीतें कितिहि पाहुनी ॥५२॥
लक्षणें देखुनी तीचीं गेले भुलुनि नारद ॥
हृदानंद परी साचा दावीना मुनि सावध ! ॥५३॥
म्हणती मुनि ' हे राजा ! जो हिला वरणार तो
लोकीं अमर होवोनी रणीं सर्वांस जिंकितो ' ॥५४॥
पाहोनि लक्षणें तीचीं, स्वहेतु लपवी मुनि ॥
भूपतीसि निवेदी तो उगाचि लव बोलुनी ॥५५॥
' सुलक्षणी सुता आहे ' हें सांगूनि नृपाप्रति ॥
गेले मुनि, परी त्यांच्या विचार मनिं चालती– ॥५६॥

" जेणें मलाच सुतनू नवरी वरील । ऐशा प्रयत्नि करं हा मुनि नावरील !॥
नाहीं मला जप, तप प्रिय या क्षणाला !। व्हावी विधे ! कशि मला वश राजबाला?
ऐशा प्रसंगिं मज होय अवश्य रूप । लावण्य थोर; जर हें मज ना दुराप ॥
पाहूनि तें अमित सुंदर रूप माझें । घालील माळ मज ती भुलुनी सुतेजें !५८
घेऊं शकेन हरिपासुनि चारु रूप । जा-येमधेंचि परि काल सरेल खूप ॥
माझे हिता करि असा हरिसा दुजा न । हो तोच साह्य मज या समयीं,न आन."
प्रार्थी असें बहुपरी मुनि त्या प्रसंगीं । झाला प्रभु प्रकट त्या कुतुकेंचि शार्ङ्गी !
पाहूनियां प्रभुवरा मुनिनेत्र धाले । होगार कार्य म्हणुनी मन तुष्ट झालें ॥६०॥
सांगे प्रभूसि अति आर्तपणें स्ववृत्त– "व्हावें मला अजि सुसाह्यक विश्वनाथ !
सौंदर्यधाम निज द्या मज देवराया !। नाहींच अन्य पथ तें मजला मिळाया
कल्याण जेविं मम होइल ज्यापरीं तें। वेगें करा जि ! गणुनी निज दास मातें"
मायाबला अपुलिया बघुनी विशाला । तो दीनबांधव हरि स्मितचित्त झाला !

" सन्मुने ! कथितों तुम्हां तुमचें हितसार तें ॥
मीही तेंच करीं; नान्य. वाक्य माझें न हो रितें !! ॥६३॥

मागे कुपथ्य जरि आकुल आर्त रोगी । तें देत नाहिं परि, वैद्य हितोपयोगी
तैसें हितेंचि तव आचरुं योगिनाथ!" । बोलोनि हें प्रभु दयानिधि गुप्त होत.

मायाविवश मुनी तो होई तैं मूढ; नाकळे त्याला ॥
गूढार्थ हरिगिरेचा; सत्वर जाता स्वयंवरा झाला ॥ ६५ ॥
त्या मंडपीं वरासनें नृप निज परिवारसहित असलेले ॥
दिसले त्या मुनिवर्या उत्तम नटुनी थटूनि बसलेले ॥ ६६ ॥
मुनिवर हर्षभरानें मानी निज रूप सर्व सुंदरसें ॥
' वरिल कशी नवरी ही इतरा, मज डावलूनियां अरसें ' ? ॥ ६७ ॥

मुनिहितास्तव देव दयाघन । अतिकुरूपचि त्या वितरी पण ॥
नच कुणासहि तें कळलें तदा । सकल सादर वंदिति नारदा ॥६८॥

होते रुद्रगण तिथें, दोघेजग ज्यांस सर्व ठाउक तें ॥
जे द्विजवेषें कुतुकें सर्वत्र पहावयासि संचरते ॥ ६९ ॥
सुंदर मीचि विशेषें मानुनि हें ज्या समाजिं मुनि बैसे ॥
जाणो कुणि न म्हणोनी शिवगणही बसत विप्रवेषिं तसे ॥ ७० ॥

थट्टेंत बोलति परस्पर गोष्टि ते या। जाव्यात ज्या परि मुनिप्रति आयकाया ॥
" सौंदर्यसार किति दे हरि नारदातें। भाळोनि यास नवरी न वरील कां तें ?"
मोहूनि जाय मुनिनायकचित्त ऐसें। थट्टेंत शंभुगण चोरुनि तेविं हांसे ॥
ये नारदासि जरि ती कुजबूज कानीं। तो भ्रांतचित्त मुनि ती मुळिंही न मानी ७२
तें देखिलेंहि न कुणी इतरां जनांहीं। भूपात्मजा परि मुनीप्रति तेथ पाही ॥
देखोनि भीतिकर मर्कटतुंडरूप। संक्रुद्ध भूपतनया प्रकटी स्वकोप ! ॥७३॥
घेऊनि संगतिं सख्या, जणुं राजहंसी। ती चालली नृपसुता बघण्या नृपांसी ॥
साजे तिच्या विजयमाळ करांबुजांत। शृंगारमूर्ति पतितें वरण्यास जात ॥७४॥
गर्वाढ्य नारद जया दिशिं बैसलेले। भूपांगजा फिरकवीहि तिथें न डोळे !
उंचावि मान बहुवार मुनी अधीर। पाहूनि तें हरगणां हंसु येइ फार ! ॥७५
आले कृपाळु नृपवेषिं रमेश तेथें। हर्षे वधू; वरि तया जयमालहस्तें ॥
घेऊनियां नववधू हरि जाय वेगें। ओशाळले नृप तदा निजकामभंगें ! ॥७६
बहु विकल मुनीही तेधवां चित्तिं होय। जणुं गमत तया कीं गांठिचें रत्न जाय।
हरगण विहसूनी बोलले वाक्य एका। 'निजमुख तरि विद्वन् ! दर्पणीं हो! विलोका'
हें बोलुनी उभयही पळती भयार्त। तेव्हां मुनी निजमुखासि जलीं पहात ॥
पाहूनि रूप निज तें,मुनि रुष्ट झाला। शापी भयंकर वचें झणिं त्या द्वयाला !७८
" होऊनि राक्षस तुम्ही कपटात्म पापी। जन्माल भूवरि." असें मुनि त्यांस शापी
"जें हांसलां तुम्हि मला, फल घ्या तयास। कोणा कराल मुनिचा कधिं का प्रहास?"
पुनरपि जलिं पाहे तों दिसे पूर्वरूप। तरिहि मुनि न तोषे; होत चित्तीं सकोप;
थरथर अधरांची चित्तसंक्षोभिं होय। चलतचि मुनि पद्माकांतसद्मासि जाय८०
" शापीन त्यास अथवा, मरणा वरीन। लोकीं प्रहास मम विष्णु करी,दुजा न"
हें चिंति तोंवरि पथीं बघि तो हरीतें, । लक्ष्मी तशी नववधूहि सवेंचि तेथें !८१
लक्ष्मीपती मधुर शब्दिं पुसे मुनीतें " चित्तीं हताश दिसतां, मुनिवर्य ! कां तें ?"
तों क्रुद्ध होय मुनि नारद आत्मचित्तीं। मायावशें नच उरे मनिं बोधशक्ति८२
" विष्णो ! तुम्हां न बघवे परसंपदेस ! ! ईर्ष्या तसें कपट हे तुमचे विशेष !
तुम्हीं समुद्रमथनीं शिव वंचियेला ! देवांसि चेतवुनि हो ! विष पाजवीला ८३
दैत्यां सुरा तुम्हि दिली, विष शंकराला। तुम्हीं रमेसहित कौस्तुभ दिव्य नेला !
स्वार्थी तुम्ही सतत हो ! कुटिलस्वभावी। तुम्हांअशी कपटरीति दुजा न ठावी !८४

सर्वस्वतंत्र तुम्हि, कोण तुम्हां शिरीं न। ये जें मनास, करतां तुम्हि तेंचि पूर्ण
सत्या असत्य करतां, उलटें हि तें वा;। नाहीं तुम्हांस हरि ! हर्षविषाद ठावा !८५
हो ! काढतां सकलदोष तुम्ही सदैव। हव्यास हाच तुमचा; मनिं भी न नांव !
नाहीं तुम्हांप्रति शुभाशुभकर्मबाधा; । कोणी गुरूहि न तुम्हां करणार साधा !८६
परि उचित ग्रहातें जाय हें आज वाण, । कृतिस फळ मिळाया आज यावी न वाण!
नृतनु धरुनि मातें जें तुम्हीं वंचिलें हो। नृतनुच तुम्हि पावा; शाप माझा खरा हो!
मजसि तुम्हि दिलें कीं वानराचें कुरूप। म्हणुनि तुम्हिहि साह्या वानरें घ्याल खूप
मजवरि तुम्हि केला जो विवाहापकार।म्हणुनि तुम्हिहि सोसा स्त्रीवियोगार्ति फार "
हर्षेंचि शाप मुनिचा प्रभु घे स्वशीर्षीं । तो देवकार्य परिपूर्ण करावयासी ॥
आकर्षि तो बलवती निज शक्तिमाया। कोणास येइल कृपा हरिची गणाया? !८९
जेव्हां निवृत्त हरिची झणिं होय माया। नोहे रमा, नृपसुताहि नवीन जाया;
तेव्हां भिऊनि मुनि विष्णुपदां धरीत। जीं निश्चयें प्रणतदुःख सदा हरीत ९०
बोले मुनींद्र "मम शाप खरा न हो हा"। बोले दयाळ विभु "ती मम होय ईहा !"
"मी दुर्वचें बहुत हो ! वदलों तुम्हांला। तें पाप होय लय केविं ?" मुनी म्हणाला९१
सांगे हरी "जपत जा शिवनाम भावें। व्हावेंचि चित्त झणिं शांतिमय स्वभावें !
नाहीं हरासम मला प्रिय कोण लोकीं। विश्वास हा हृदयिंचा क्षणही न टाकीं९२
ज्याचेवरी करि कृपा नच चंद्रमौळी। त्याला सुलभ्य मम भक्ति कधीं न झाली
तूं हें हृदीं धरुनि संचर वा ! जगीं या।आतां छळील तुज नैव मदीय माया"९३
प्रभु बहुपरि बोधी नारदाच्या मनासीं। त्वरित मग जहाला गुप्त कारुण्यराशी
रघुवरगुणगानीं रंगुनी भक्तिपूर्ण। करि गमन मुनीही सत्यलोकासि तूर्ण ॥९४॥
हरगण मुनिलागीं भेटले मार्गिं जातां। मुनि दिसत तयांना पूर्ण संतुष्टचेता ॥
सभयचि मुनिपाशीं येउनी दोनिही ते ! मुनिपद कवळूनि बोलले आर्त चित्तें९५
'हरगण मुनिवर्या ! आम्हि हों; विप्र कैंचे? गुरुतम फळ आलें आज आम्हां अघाचें
सदयहृदय नाथा ! द्या जि! उःशाप कांहीं' समजवि मुनि त्यांतें तेधवां या वचांहीं
" होणार राक्षस तुम्ही जरि हें खरेंच। पावाल तेज, बल, वैभव हेंहि साच,॥
जेव्हां स्वबाहुबळिं जिंकुनि विश्व घ्याल। विष्णू तदा अवतरेल मनुष्यलील९७
होणार विष्णुकरिं अंत तुम्हां रणांत। पावाल मुक्ति, नच व्हाल पुन्हां भवार्त"
दोघेहि जाति निघुनी नमुनी मुनीतें। येती निशाचरकुलीं मग जन्मुनी ते९८

एका कल्पीं यास्तव हरि घे मनुजावतार खलदमना ॥
अमरा रमवुनि सज्जन सुखवुनि भूताप पूर्ण ने शमना ॥ ९९ ॥
आहे यापरि जन्मकर्म हरिचें अत्यंत सौख्यावह ।
आश्चर्यें भरलें मनोहर तसें विस्तीर्ण पापापह ॥
जें जें चित्र चरित्र आचरि विभू प्रत्येक कल्पांतरीं ।
तें तें वानुनि गाइल्या मुनिवरीं पुण्या कथा भूवरी ॥१००॥
विविधपरि तयांनीं वर्णिले ते प्रसंग । नवल न, सुजनांचें चित्त त्यामाजिं दंग॥
हरिसि,हरिकथांसी,नाहिं दोघांहि अंत। रमति किति तयांच्या ठायिं धीमंत संत!
चरित रघुवराचें सर्वसौंदर्यसार । सुमधुर, पठतांही कल्पकोटीं न पार ॥
तुजसि कथियली मी जे कथा हे भवानि ! प्रकटवि हरिमाया जिंकिता हो न कोणी!
माया हरीची मुनिंनाहि मोही । प्रभू जगीं कौतुक मात्र पाही ॥
भक्तासि नेई हरि दुःखपार । शरण्य ऐसा न कुणी उदार ॥ १०३ ॥
सुर नर मुनि यांच्यामाजिं नोहोचि कोण । प्रबलतम हरीची मोहि माया जया न
मनिं समजुनि ऐसें, सर्वमायापतीतें । भजुनि शरण जावें राघवातें स्वचित्तें १०४
इतिश्रीत्रयावतार-भेदाभेद-मतमतान्तसिद्धान्तजिज्ञासुसावधानकृते चतुर्विंशतिस्त.

## तरंग २५ वा

तूं ऐक शैलतनये ! दुसराहि हेतु । जेणें अतुल्य, अज, निर्गुणही परंतु ॥
ये ब्रह्म तें दशरथात्मज रामरूपें । ज्याच्या शुभस्मृतिमुळें भवताप लोपे ॥१॥
जो देखिला वनिं तुवां, ऋषिवेषिं जातां । संगें जया अनुजही मुनिसाच होता
ज्याचें चरित्र बघतां भ्रमलीस तूंही । भ्रांती सतीसमयिंची अजुनीहि राही ! ॥२॥
त्या तूं चरित्र विभुचें अति आदरानें । हें ऐक; जें भ्रमगदासि पुरें त्या ने ॥
सांगेन वर्णुनि यथामति भाविकेला । त्या पुण्यराशि रघुनाथचरित्रलीला ॥३॥
मुनिवर्य भरद्वाज ! ऐकुनी हरभाषित, ॥
उमा संकोचुनी चित्तीं झाली सप्रेम सस्मित ॥ ४ ॥
रामावतारहेतूची वर्णी शंकर जी कथा ॥
तीच मी कथितों तुम्हां मुनिनाथ ! रसान्विता ॥ ५ ॥
ऐकावी ती कथा पुण्या कलिपापविनाशिनी ॥
पवित्रा रसगंगा जी सर्वमंगलदायिनी ॥ ६ ॥

स्वायंभू मनु, तैसी त्याची पत्नी गुणाढ्य शतरूपा ॥
नरसृष्टि सर्व त्यांचेपासुन झाली जगांतिल अमूपा ॥ ७ ॥
सद्धर्माचरणीं रत होते ते दंपती सुविख्यात ॥
सत्कीर्ति धर्मनिष्ठा त्यांची सज्जन अजूनिही गात ॥ ८ ॥
त्यांचाच पुत्र होता राजा उत्तानपाद या नांवें ॥
ज्याचेपासुन झाला ध्रुव त्याचें भक्तिभाग्य वानावें ॥ ९ ॥
त्याचा कनिष्ठ पुत्र प्रियव्रत श्रुतिपुराणिं संस्तविला ॥
या नररत्नीं मनुचा सुफलित सद्वंशवृक्ष तो झाला ॥ १० ॥
मनुशतरूपा यांची तनया हो देवहूति नाम तिचें ॥
कर्दममुनिपत्नी ती, कपिलप्रभु उदरिं येइ त्या सतिचे ॥ ११ ॥
तो सांख्यतत्त्ववेत्ता प्रसिद्ध भगवान् महामना कपिल ॥
दीनदयाळ कृपात्मा स्मृतिहि जयाची करील धी विमल ॥ १२ ॥

बहुकाल करी राज्य मनुराजा महीवरी ॥
ईशार्शेकरुनी धर्मं प्रजापालन तो करी ॥ १३ ॥

भवनवसति केली ये जरा तों तरीही । हृदिं विषयविरक्ती लेशही आलि नाहीं
हरिभजन विना हा सर्वही जन्म गेला । म्हणुनि मनुनृपानें अंतरीं शोक केला
तो आग्रहें मग सुता निज राज्य देई । भार्येस घेउनि तपोवनिं भूप येई ॥
सेवीत तीर्थवर नैमिष पुण्यकारी । जें साधका वितरि सिद्धि अभीष्ट सारी १५
येतात ज्या स्थलिं महामुनि सिद्धवृंद । सानंद त्या मधिंच ये; त्यजि गेहबंध
राज्ञीसमेत नृप पाहुनि त्या प्रकारीं । ते बोध-भक्तिच जणों गमले शरीरी ! १६
मार्गें क्रमें उभय गोमतितीरिं येती । त्या तीर्थनिर्मलजलीं मग ते नहाती
भेटावयास बुध, सिद्ध, मुनी अनेक । येती तयांस, कळतां नृप सद्विवेक
ज्या ज्या स्थलीं सुभग पावन तीर्थ होतें । त्या त्या स्थलीं मुनि तयांसह जाति वेत्ते
लेऊनि वल्कल, कृशांग तपस्विमूर्ति । सद्वृंदिं ते हरिकथा बहुभक्तिं गाती १८

ते ' ॐनमो भगवते वासुदेवाय ' यापरी ॥
सप्रेम जपती मंत्र भक्तिनें द्वादशाक्षरी ॥ १९ ॥
वासुदेवपदांभोजीं दंपतीचें तदा मन ॥
अत्यंत लुब्ध होवोनी जाहलें हर्षभाजन ॥ २० ॥

कंद शाक फलें मात्र यांचा आहार घेउनी ॥
सच्चिदानंद जें ब्रह्म त्याच्या रमति चिंतनीं ॥ २१ ॥
फलमूलादि टाकोनी सेवोनी जल केवल ॥
करिती तप ते दोघे देवा–प्रीत्यर्थ निर्मल ॥ २२ ॥
अभिलाष मनीं ऐसा धरी संतत दंपती ॥
कीं तो नयनिं भेटावा प्रभु श्रीकमलापति ॥ २३ ॥
जाणती परमार्थज्ञ ज्यातें आद्यंत-खंड न ॥
निर्गुणा ज्या वेद वर्णी 'नेति नेति' च गाउन ॥ २४ ॥
अंशापासूनही ज्याच्या ब्रह्मा विष्णु सदाशिव ॥
होती, त्या भगवंताची मूर्ति दृष्टीं पडो लव ! ॥ २५ ॥
वर्णिलें जें श्रुतीनें कीं तो प्रभू भक्तिकारणें ॥
स्वरूप दर्शवी दासां सलील तनुधारणें ॥ २६ ॥
जर ही श्रुतिवाक् सत्य असेल जगतीं तरी ॥
करील भगवान् म्यां जें वाहिलें ध्येय अंतरीं ! ॥ २७ ॥
ऐशा रीतिं जलाहारें वर्षे जाति सहस्र सा ॥
सात वर्ष सहस्रांचा काल वाताशनें तसा ॥ २८ ॥
तेंही टाकोनि तत्काळ दशवर्षसहस्र ते ॥
क्रमिती केवळ उभे एका पायींच राहते ! ॥ २९ ॥

त्यांचें अपार तप तें बघुनी तयांतें । ब्रह्मा महेश हरि येत अनेकदां ते ॥
ते मोहवीति मनुतें 'वर माग' ऐसें । ना धीर तो त्यजि तपा, परि, मोहपाशें ॥
अनन्यभावें तप आचरीत्यां । राज्ञीनृपां दासचि मानुनी त्यां ॥
सर्वज्ञ विश्वप्रभु दीननाथ । उद्धारुनी व्योमगिरा कृतार्थ– ॥ ३१ ॥
म्हणे नभोवाग् 'वर माग, माग !' । गंभीर पीयूषधरा अथांग
मृतासि संजीवन काय देती ? । अशीच झाली जणु त्या द्वया ती ! ॥३२
कर्णी सुधेची जणु धार कोणी । ओतूनियां ती नृप आणि राणी ॥
केलीं शरीरें जणु लुप्तकष्ट । अत्यंत दिव्यद्युति हृष्टपुष्ट ॥ ३३ ॥
आतांचि ते कीं नृपमंदिरांतुनी । आले असे भासति भास्वराननीं ॥
प्रफुल्ल रोमांचितकाय तो मनु । मावे न त्याच्या हृदिं हर्ष तो जणू ३४

वदे करोनि प्रणिपात भूपति । " तूं कामधेनूच विभो ! अम्हांप्रति ॥
पदाब्जरेणू विधि–शंभु–माधव । तुझे नमस्कारिति सौख्यसंभव ॥३५॥
तूं सेवकां लाभसि आणि रक्षिसी । चराचरांचा अधिनाथ शोभसी ॥
अनाथकल्याण विभो ! अम्हांवरी । दया करीं, दे वर एवढा हरी ! ॥३६॥
स्वरूप तूझें शिवचित्तिं जें वसे । मुनीहि ज्याचेस्तव होति तापसे ॥
भ्रशुंडि-हृन्मानस-हंस ! ईश्वरा ! । श्रुती वदे तूं गुणि निर्गुणी खरा ॥३७॥
डोळेभरी तें तव रूपदर्शन । व्हावें असें वांछित आमुचें मन ॥
कृपा करोनी प्रणतार्तिमोचना । कृतार्थता दे अमुच्या विलोचनां " ॥३८॥
तें दंपतीचें वच गोड लागलें । जें भक्तिभावें विनयादरें फुले ॥
कृपानिधी तो प्रकटे सुनिर्मल । तिथें जगद्व्यापक भक्तवत्सल ॥ ३९ ॥
जो नीलपद्मासम, नीलरत्नसा । सुश्याम नीलांबुद शोभतो जसा
ज्याच्या तनूची सुषमा विलोकुनी अनंतकोटि स्मर लाजती मनीं ! ॥४०॥

इति महाराजराज्ञीपरमत्यागतपोवैराग्यज्ञानपराभक्तिपरमपुरुषप्राप्तिदर्शनं नाम पंचविंशतिस्तरंगः

## तरंग २६ वा

सौंदर्यसीमा शरदिंदुभा मुखीं । कपोल चारू, हनुही सुरेख कीं ॥
ग्रीवाहि कंबूपम, दंत सुंदर । मनोज्ञ नासा, अरुणप्रभाऽधर ॥ १ ॥
चंद्रांशुसंवच्छवि हास्य निर्मल । नवाब्जलक्ष्मी नयनांत वे स्थल ॥
कटाक्षशोभा स्पृहणीय सुंदर । मनोजचापभ्रुकुटी मनोहर ॥ २ ॥
भालप्रदेशीं तिलकद्युती दिसे । नक्राकृती कुंडलयुग्म गोडसें ॥
वक्रालकश्री अलिपुंजशोभना । श्रीवत्सकांती वनमालभूषणा ॥ ३ ॥
तेजस्विरत्नांकित हार कंधरीं । सिंहोन्नतांसावरि जानवें धरी ॥
मनोहरें बाहुंवरी विभूषणें । भुजा जशा कीं करिहस्त भासणें ! ॥ ४ ॥
कोदंड हस्तामधिं तें विराजलें । तैसेच ते बाणहि तेथ साजले ॥
भाते शरांचे, कटिभाग मंडिती । जे स्वप्रभावें रिपुराशि खंडिती ॥ ५ ॥
तडिल्लतेची द्युतिही विलोपवी । पीतांबराची अशि शोभली च्छवी ॥
वलित्रयीनें उदरा विभूषिलें । नाभी न, भोरे यमुनाजलांतले ! ॥ ६ ॥

पदाब्जशोभा कशि वानिजेल ती ! । मनें मुनींचीं अति जेथ खेलती ॥
वामांगिं सौंदर्यनिधान मंगला । जी आदिमाया अनुकूल केवला ॥ ७ ॥
जीचा लवांशहि सृजी अमिता भवानी । लक्ष्मी तसेंचि सहजीं विधिचीहि पत्नी
त्या जानकीस निजसंगतिं वामभागीं । घेऊनि तैं प्रकटला रघुराय वेगीं ॥८॥

सौंदर्यजलधि हरिला अनिमिष लावुनि पहाति एकटक ॥
मनुशतरूपा अनुपम निरखिति, परि निरखुं पाहती अधिक ! ॥ ९ ॥
हर्षवशत्वें त्यांना नुरलें तनुभानही तदा अपुलें ॥
घालूनि दंडवत त्या प्रभुचीं ते उभय धरिति पदकमलें ॥ १० ॥
निजकरकंजें प्रभुही स्पर्शुनि तन्मस्तकांसि तैं त्वरित ॥
उचलुनि धरित प्रेमें भगवान् करुणानिधान सच्चरित ॥ ११ ॥

वदे तो दयाब्धी प्रसन्नें स्वचित्तें । "अहो ! तुष्टलों मी" असें दंपतीतें ॥
"महोदार मी हें मनीं वागवोनी । हव्या त्या वरा घ्या जि ! माझेकडोनी" १२
प्रभूची अशी ऐकुनी गोड वाणी । नमी तैं तयां जोडपें बद्धपाणी ॥
वदे धैर्य आलंबुनी यापरी तें । "पदाब्जा पहातां प्रभो ! चित्त धातें ! १३
जरी पूर्ण येणेंचि मत्काम झाले । तरी एक कांक्षा मनामाजिं आले ॥
सुसाध्या, तशी ती असाध्याहि वाटे । म्हणूनीच ती बोलवेही न कंठें ! ॥ १४ ॥
न ती दुष्करा आपणां पूरवाया । परी लाज माझ्या मना दाविते या ॥
जरी कल्पवृक्षा दरिद्री मिळाला । तरी मागवे थोर लक्ष्मी न त्याला ॥ १५ ॥
न तो कल्पवृक्षत्व जाणें तयानें । तसें चित्त माझें भरे संशयानें ॥
तुम्ही जाणतां हेतु जो मन्मनाचा । करा तेवढा हो ! प्रभो ! पूर्ण साचा" १६
वदे नाथ "संकोच सोडीं नृपाला ! । नसे तें, न जें ये तुला द्यावयाला !"
तदा भूप बोले "कृपेच्या निधाना ! । प्रभूचें सुदातृत्व येईल कोणा ? ! ॥१७॥
खरें वाटतें चित्तिं जें, तेंच, नाथा ! । तुम्हां सांगतों; लेश आतां न चिंता॥
तुम्हांसारिखा पुत्र व्हावा अम्हांला; । असे हीच इच्छा उगा कां न बोलां ?
बघे भक्ति, ऐके अमोला गिरा ती । वदे कीं "तथाऽस्तु !" प्रभु प्रेममूर्ति ॥
"कुठें शोधुं मी पुत्र माझ्यासमान ? । तुझा पुत्र रे ! मीच होईन जाण !"

बद्धांजलि उभ्या तेथें शतरूपेसि देखुनी ॥
बोले प्रभु तिला "माग वर इच्छिसि जो मनीं" ॥ २० ॥

ती वदे “ वर जो कांतें चतुरें प्रार्थिला असे ॥
करुणाब्धे ! मलाही तो अतीव प्रिय मानसें ॥ २१ ॥
धाष्टर्य होईल तें माझें वदणें कांहिं त्याहुनी ॥
तथापि भक्तकल्याण अभीष्ट तुमच्या मनीं ॥ २२ ॥
जगत्स्वामी तुम्ही नाथा ! विश्व ब्रह्मादि निर्मितां ॥
सर्वांतर्यामिं जें ब्रह्म तेंहि तुम्हीच तत्त्वतां ॥ २३ ॥
जाणोनि हें चित्त माझें भीतसे वदण्यासही ॥
तथापि प्रभुची आज्ञा मानितें मी प्रमाण ही ॥ २४ ॥
भो नाथ ! तुमचे भक्त अनन्य मिळवीति जें ॥
सौख्य वा गति ती मातें लाभो ! न म्हणणें दुजें ! ॥ २५ ॥
तीच भक्ति, पदांभोजीं रति, तोच विवेकही
तेंच सच्छील मातें द्या; प्रार्थना मम एक ही ” ॥ २६ ॥

ऐकोनि ती मृदुल गूढ मनोज्ञ उक्ति । बोले कृपानिधि मनोहर पुण्यकीर्ति !!
“ जें जें असे तव मनामधिं इष्ट तें तें । मी सर्वथा करिन; नैव चुकेन त्यातें
माते ! अलौकिक विवेक तुझ्या मनास । नित्य स्फुरेल, कधिं ज्या नच लेश नाश
माझा अनुग्रह तुझेवरि नित्य राही । हा देतसें तुजसि मी वर धन्य, पाहीं ”
पुनः पुन्हां वंदुनि भूप पाउलें । वदे “ प्रभो ! एकचि मागतों भलें ॥
तुम्हांवरी पुत्र म्हणोनि आवडी । सदा असावी मम आस एवढी !
म्हणोत मातें कुणि मूढही जरी । तरी असो जीवन हें तुम्हांवरी !
जलाविना मीन, मणीविना अही । तुम्हांविना हो मम तेविं जीवही ! ”

मागोनि यापरि वर, प्रभुच्या पदांतें । तो आकळी; प्रणतनाथहि हृष्ट चित्तें
बोले “तथास्तु ! मम शासन हेंच आतां, जा इंद्रलोकिं तुम्हि; कांहिं नसोचि चिंता
राहूनि तेथ तुम्हि यापरि कांहिं काल । सेवोनि भोग बहुतांपरिचे विशाल ॥
साकेतभूप फिरुनी तुम्हि येथ व्हाल । मी पुत्र होउनि तुम्ही मज खेळवाल !
घेईन इष्टतम हा अवतार ऐसा । येईन गेहिं तुमच्या पुरवीन आशा ॥
येतील तेथ मम अंशहि देहयुक्त । लीला करील सुखमग्न मदीय भक्त ॥३३॥
जे आदरें परिसतील सुभाग्यशाली । लीलाचरित्र मम पावन सर्वकालीं ॥
त्यागून गर्व ममतादिक बंध सारे । संसार ते तरुनि जातिल सत्प्रकारें ॥३४॥

जी आदिशक्ति जग निर्मित सर्व, तीही । माया मदीय अवतार धरील देहीं ॥
त्वत्काम पूरविन होउनि मी अपत्य। हें सत्य,सत्य,मम होइल वाक्य सत्य!!"
पुनःपुन्हां सांगुनि हें तयांसी । तो गुप्त होई करुणांबुराशि ॥
चित्तांत भक्ति प्रभुची धरोनी । ते राहती भूपति आणि राणी ॥ ३६ ॥
त्या आश्रमीं यापरि काल कांहीं । काढोनि ते त्यागिति लोक हाही
त्रासाविना ठेवुनि देह जाती । ते इंद्रलोकाप्रति पुण्यकीर्ति " ॥ ३७ ॥
सांगे उमेतें हर पुण्यदायिनी । कथा अशी ही स्तवियेलि सज्जनीं
ऐकें भरद्वाजमुने ! अणीकही । श्रीराम जेणें अवतीर्ण हो महीं ॥३८॥

इति श्रीउमामहेश्वरसंवादे दंपत्योस्सीतारामचन्द्रदर्शनवरप्राप्तिर्नाम षड्विंशतिस्तरंगः ।

## तरंग २७ वा

ऐका कथा पावन ही पुरातन । गौरीस जी सांगत शंभु वर्णुन ॥
विख्यात जो देश मनोज्ञ कैकय । हो सत्यकेतू नृप तेथ दुर्जय ॥ १ ॥
धर्मीं रती, नीति अतीव त्या प्रिय । प्रताप-तेजो-बलशीलसंचय ॥
झाले तयातें सुत दोन उत्तम । जे सद्गुणाराम सुवीर्यविक्रम ॥ २ ॥
जो ज्येष्ठ तो राज्यधनी स्वभावतां । प्रतापभानू अशि त्याप्रति प्रथा ॥
दुजा विराजे अरिमर्दनाख्य तो । बलाढ्य शौर्याढ्य रणीं न थाकतो ॥३॥
त्या बंधुबंधुंमधिं ऐक्य अतीव नांदे । प्रीती हृदीं अकपटा विलसे प्रमोदें ॥
लाभो परेश म्हणुनी वनिं वृद्ध राय । ज्येष्ठासि राज्य वितरूनि तपासि जाय ॥
प्रतापभानु क्षितिपाळ होतां द्वाही फिरे राज्यिं तशा प्रकारें ॥
पाळी प्रजेतें श्रुतिदिष्टमार्गें, राही अघाचें लवही न वारें ! ॥ ५ ॥
मंत्री नृपाचा हितकारि सुज्ञ आख्या जया धर्मरुची विराजे ॥
तो शुक्रसा; बंधु बलाढ्य वीर स्वतां प्रतापी रणधीर गाजे ॥ ६ ॥
सेना अपारा चतुरंग त्याची असंख्य झुंझार जिच्यांत वीर ॥
ऐकोनियां दुंदुभिघोष तीचा प्रतापभानू धरि हर्ष थोर ॥ ७ ॥
तो सज्जसेनेसह वाद्यघोषें निघे मुहूर्तीं नृप दिग्जयार्थ ॥
अन्यां नृपां जिंकुनि शौर्यतेजें केले तयें ते नत संगरांत ॥ ८ ॥

भूमंडला जिंकुनि सार्वभौम प्रतापभानू नृप थोर झाला ॥
स्वराजधानीमधिं येउनीयां धर्मार्थकामीं सुखमग्न ठेला ॥ ९ ॥
प्रतापभानुप्रभुच्या प्रतापें भू कामधेनूच जणों जहाली ॥
दुःख त्यजोनी सकलप्रजाही धर्मेंचि सेवी सुख सर्व कालीं ॥ १० ॥
सचिव धर्मरुची हरिभक्तिनें । शिकवि नीति हितार्थ नृपाप्रती ॥
नृपहि सेवि गुरु-द्विज-देवता, । पितर, संत तसे विनयें अति ॥ ११ ॥
नृपति आचरि धर्म यथाश्रुति । सकल सादर हृष्टमनें निकें ॥
प्रतिदिनीं बहुदान करोनियां । श्रुतिपुराणकथादिक आयके ॥ १२ ॥
वापी अनेकविध कूप, तडाग, बागा । सद्वाटिका सुमयुता मधुलोलभृंगा ॥
देवालयें द्विजगृहें बहुदर्शनीय । तीर्थें मनोज्ञपरि बांधवि भूपराय ॥ १३ ॥
पृथक् पृथक् सांगितले कराया जे जे पुराणश्रुतिमार्गिं याग ॥
ते ते सहस्रावधि वेळ केले भूपें तयें भक्तिमनेंचि सांग ॥ १४ ॥
धरोनि पोटीं न फलानुरक्ति, ज्ञानी विवेकी बुध भूमिनाथ ॥
वाचा मनें जें करि धर्म कर्म करीत कृष्णार्पण तें समस्त ॥१५॥
तो एकदां बैसुनि उत्तमाश्वीं घेऊनि लोकां मृगयेसि जाय ॥
विंध्याचलाच्या गहनीं अरण्यीं मध्यें मृगें मारि अनेक राय ॥ १६ ॥
तैं हिंडतां त्या वनिं राय देखे वराह, जो कीं जणुं राहु भासे ॥
शशी जयें ग्रासियला, परी न मावे मुखीं तो नुगळीहि रोषें ! ॥१७॥
वराह दंष्ट्राद्युति वानिली ही; तनू तयाची महती अतीव ; ॥
ऐकोनियां अश्वरवा बघे तो उभारुनी कान सभीतिभाव ॥ १८ ॥
नीलाचलाच्या शिखरासमान विशाल देखोनि वराह तैसा ॥
प्रेरी प्रतोदें हय शीघ्र मागें, त्यावीण तो त्या मिळताच कैसा ? ॥१९॥
दूरततर हय येतो मागुनी हें बघोनी । पवनगति वराहें घेतली शीघ्र यानीं
त्वरित नृप तयातें बाण जोडोनि सोडी । परि दबुनि भुईशीं तो तयां व्यर्थ पाडी !
पुनरपि बहुवेळां नेम घेऊनि बाण । नृप वितरि वराहीं तो परी लागुं दे न
प्रकटुनि कधिं धावे तो लपेही क्षणांत । चिडुनि नृप तयाच्या मागुनी धांव घेत
अति गहनिं वराहें दूर केला प्रवेश । न पथ हयगजांना जेथ लाभेल लेश
वन गहन अती तें, एकटा तो नरेश, । तरिहि न मृगमार्गा तो त्यजी जातरोष

देखे वराह, नृप पाठ न सोडि ऐसें । तो धाउनी गिरिगुहेमधिं गूढ बैसे ॥
देखोनि दुर्गम वना, नृप खिन्न होत, । ये मागुतां, परि तदा चुकलाचि पंथ !
श्रमक्लांत राजा, तसा वाजि त्याचा । क्षुधेनें तृषेनें अतिक्रांत साचा ॥
नदी वा तळें तें कुठें लाभणार ? नुरे व्याकुलत्वें नृपा त्राण फार २४

विपिनिं फिरतां तेथें एका बघे उटजाप्रति ।
कपटमुनिच्या वेषें राहे जिथें कुणि भूपति ॥
परिभवुनि ज्या, या सम्राटें असें जितलें रणीं; ।
त्यजुनि कटकें गेला राजा पळोनि तया वनीं ॥२५॥

प्रतापभानूप्रति वेळ चांगली । परी स्वतांतें प्रतिकूल जाहली ॥
पाहूनि ऐसें नृप खिन्नमानसीं । गेला पुन्हां ना निजराधानिसी ॥२६॥
स्वरोष चित्तांतचि गुप्त ठेवुनी । तो रंकसा राहि नृपाल काननीं
तपस्वि वेषें, अभिमान अंतरीं । पाहे कधीं येइल वेळ ती बरी ॥२७॥

गेला प्रतापरवि त्या मुनिच्या समीप । तो ओळखे त्वरित त्यासि मनीं सकोप ॥
राजा तृषाकुल न त्या मुनिलागिं जाणे । त्या साधुवेषिं गणिला मुनि थोर त्यानें

उतरुनि अश्वावरुनी प्रतापभानू प्रणाम मुनिसि करी ॥
चतुरस्वभाव राजा त्यातें निज नांव ना वदेचि परी ॥ २९ ॥
तृष्णाकुला भूपतितें बघून, सरोवरा दावि मुनी तयास ॥
करोनियां मज्जनपान त्यांत, अश्वासवें भूपहि सेवि हर्ष ॥ ३० ॥

सारेच श्रम लोपोनी जाहला स्वस्थ भूपति ॥
त्यास तापस तो नेई आपल्या आश्रमाप्रति ॥ ३१ ॥
सूर्यास्तकाल जाणोनी नृपा आसन देउनी ॥
गोडशब्दीं वदे त्यातें यापरी कपटी मुनि ॥ ३२ ॥
" कोण ? तूं विपिनीं ऐशा हिंडशी केविं एकला ? ॥
असुनी सुंदर, युवा जीव कां तुच्छ लेखला ? ॥ ३३ ॥
भासशी चक्रवर्ती तूं लक्षणांवरुनी मला
पाहतांच तुझी येते करुणा मज कोमला ! " ॥ ३४ ॥
" प्रतापभानु या नांवें असे जो अवनीपति ॥
त्याचा सचिव मी आहें मुनिवर्य ! महामति ॥ ३५ ॥

धांवतां मृगयेपाठीं मार्ग मी चुकलों, परीं ॥
महाभाग्येंचि मी पावें तुमचें पद यापरी ॥ ३६ ॥
आम्हांस कुठुनी व्हावी तुमची भेट दुर्लभ ॥
दिसतें कांहिं व्हायाचें कल्याणचि मला शुभ !" ॥ ३७ ॥
वदे मुनि " अरे बाबा ! पहा तिमिर ' मी ' म्हणें ॥
तुझें नगर येथून दूर सत्तर योजनें ! ॥ ३८ ॥
ही घोर रात्र, घनदाट अरण्य, पंथ । सुज्ञासही न कळणार म्हणून येथ ॥
राहोनि आज, निघणें उदियां सकाळीं!" । कोणास ये चुकवितां लिहिलें कपाळीं !
तुलसिदास म्हणे, ' भवितव्यता जशि असेल, तशी घडत स्थिति ।
नच रिघे नियती कवणाप्रती परि तयासिच खेंचुनि घेत ती !' ॥ ४०
इति राजाभानुप्रतापदिग्विजये कपटमुनिमिलापवर्णनंनाम सप्तविंशतिस्तरंगः

## तरंग २८ वा

" हो, ठीक; साधुवर !" बोलुनि याप्रमाणें । आज्ञा शिरीं नृप धरी अति आदरानें
बांधी हया तरुतळीं, मुनिपाशिं बैसें । प्रेमें स्तवी मुनिस, भाग्यहि वानि तैसें. १
बोले पुन्हां मृदुवचें अतिरम्य कांहीं । " मानी तुम्हां प्रभु, पिता; करतों धिटाई !
जाणोनियां मजसि आत्मजसें, मुनीश ! । मातें यथार्थ निजनाम कथा अशेष" २.
जाणे न भूप जरि त्या मुनितें तथापि । जाणे तयास मुनि तो कपटात्म पापी ॥
तो क्षत्रवंशभव भूप, तशांत वैरी । स्वार्थार्थ तो कपट आचरि त्या प्रकारीं ३
त्या आपलें विगतवैभव आठवूनी । आंव्यापरी जणु जळे हृदयांत अग्नि ॥
ऐकोनि भूपवच आर्जवयुक्त तैसें । चित्तीं स्मरोनि मुनि वैर मनांत हांसे. ४
कपटवाक्यि वदे मृदु तो मुनी । " उघड आम्हि भिकारिच हे असे !
कुठुनियां धन केतन वा अम्हां ? । जगिं अकिंचन कोण दुजा दिसे ?" ५
बोले नृपाळ विनयें " मुनिवर्य ! धन्य ! । विज्ञानसागर तुम्ही अभिमानशून्य ॥
जे राहतां तुम्हि सदैव निगूढरूप । वेषें अमंगल असे फिरतां अपाप ॥ ६ ॥
होती दरिद्रीच खरे प्रभुप्रिय । गाति श्रुती साधुहि हें सुनिश्चय ॥
तुम्हां अगेहा, अधना भिकारया । बघोनि घेती विधि शंभु संशया ॥७॥
कोणीहि आपण असां-नमितों तुम्हां मी माझेवरी सकृप व्हा अजि ! नाथ तुम्ही"
देखोनि भूपममता सहजा अशी ती । विश्वासही दृढ तसा मुनि चिंति चित्तीं

सर्वस्विं त्यासि निजपाशिं भलें धराया । त्याच्या मनीं अधिक भाविकता भराया
बोले मुनी अधिक तो कपटेंकरून । "मी हा इथें बसुनि हो बहु कालमान ॥९॥
येथें मला कुणिच आजवरीं न भेटे । मीही नसे प्रकटिलें निज रूप कोठें !
लोकांत मान्यपण हें अनलासमान । जाळून टाकित तपोमय थोर रान!" ॥१०॥
जैसे सुवेष बघुनी भुलतात मूढ । तैसे न ते भुलति, जे जन सुज्ञ गाढ ॥
देखा, म्हणे तुलसि, सुंदररूप मोर । केका सुधा-मधु, परी अहि खाद्यसार !
" मी याचसाठिं जगिं गुप्तपणेंचि राहीं । नाहीं प्रयोजन मला हरिवीण कांहीं
ना सांगतांहि समजे परि देवराय; । लोकांस रंजवुनि लाभ अम्हांस काय?!
तूं सन्मती मजसि आवडशी अतीव । प्रीती तशी मजवरी तव थोर भाव ॥
ठेवीन गुप्त तुजपासुनि कांहिं आतां । होईन मी तर भयंकर पापकर्ता " १३

वैराग्यवृत्तान्त कथी मुनी जसा । नृपासि विश्वासहि वाढला तसा;
बघोनि त्यातें वश कर्मवाङ्मतें । वदे बकध्यानि मुनी नृपास तें ॥१४॥
" मन्नाम हो 'एकतनू' म्हणून " । ऐकोनि राजा नमवीत मान ॥
वदे " मला अर्थ यथार्थ बोला । स्वदास मातें समजोनि चाला ! "॥१५॥
" जैं आद्यसृष्टी उपजे तदाच । उत्पन्न झालों जगिं मीहि साच ! ॥
होतीच माझी तनु ही अजूनी । आख्या मला 'एकतनू' म्हणूनी !!१६
आश्चर्य पुत्रा ! नच मान याचें । नाहीं तपा दुर्लभ कांहिं साचें
तपोबलानें सृजि सृष्टि धाता, । तपोबलें विष्णुहि तीस पाता ॥ १७॥
तपोबलें संहरि शंभु तीही । तपा नसे दुर्लभ लोकिं कांहीं ! "
ऐकोनि, भूपा मुनिभक्ति वाढे । पुराणिंचे वानि मुनी पवाडे ! ॥१८॥

तो धर्म, कर्म, इतिहासकथा अनेक । वैराग्यबोधविषयीं कथि गोष्टि कैक ॥
उत्पत्तिपालनविनाशकथादि वर्णी । आश्चर्यगोष्टिहि अपार वदे पुराणीं ॥१९॥

ऐकोन राजा वश हो मुनीतें । स्वनाम त्यातें कथि सत्य जें तें ॥
म्हणे मुनी " जाणत मीहि सारें । त्वच्छद्म हेंही रुचलें मला रे ! ॥२०॥
राजा ! अशी रीतिच कीं, जिथें तिथें । स्वनाम भूपें वदणें न कोणतें ॥
पाहूनि चातुर्य तुझें, तुझ्यावरी । मच्चित्त हें बा ! अति लालसा धरी !! २१

राया ! प्रतापरवि हें तव नाम आहे । दे सत्यकेतु नृपती तुज जन्म, पाहें
मी सर्व जाणत असें, गुरुच्या वरांनीं । ऐसें स्वतां परि कथूंहि नयेचि कोणीं २२

देखोनि निर्मल तुझी सहजा मती ही । हा भक्तिभाव, दृढ नीतिहि धर्मवाही,
माझे मनीं तुजवरी ममता उदेली । तत्काल मीं मम कथा तुज वर्णियेली !
झालों तुझेवरि खरा आजि मी प्रसन्न । घे मागुनी वर, करीन समग्र पूर्ण !"
ऐकोनि तें वच, नृपाल भरे प्रहर्षे । वंदोनि त्यास विनवी बहुवार ऐसें– २४
" मुने ! दयाब्धे ! बघतां तुम्हांप्रती, । माझ्या करीं चारहि अर्थ लाभती ॥
प्रसन्न पाहूनि तुम्हांसि मागतों । मी हेंचि जेणें न उरेल शोक तो ! २५
जरामृत्युदुःखें नसावींत मातें । रणींही मला कोणिं जिंकू नये तें ॥
असो राज्य माझेंच एकातपत्र । निराबाध हें एकशें कल्पमात्र !"॥२६॥
वदे तो मुनी " हे नृपा ! होय तेंही । परी ऐक त्यामाजि जें विघ्न कांहीं॥
जगीं विप्रवंशास सोडून राया ! । गमे काळही तूज यावा नमाया ॥२७॥
तपोबलें विप्र वरिष्ठ ते सदा, । नसेचि त्यांचा कधिं कोप जो मुधा ॥
तूं केलिया ते वश विप्र आपणां, । होतील शंभू, विधि, विष्णुही पुन्हां २८
परि प्रतिज्ञेंकरुनीच मी वदें, । न ब्राह्मणां जिंकिल कोणि दुर्मदें ॥
न विप्रशापेंविण नाश केवळ ।तुझा नृपाळा ! कधिं कालिं होइल !"२९
ऐकोन तें वच नृपाल सहर्ष होय । बोले "प्रभो ! मम न होइल नाश काय ?
आहां कृपानिधि तुम्ही, तुमच्या प्रसादें । कल्याण सर्व मम होइल निर्विवादें"
"तथास्तु राजन् !" वदला पुन्हां मुनि । केली ठकें त्या सगळी भुलावणी !
म्हणे, "फुटो हा नच मेळ आपला । अनिष्ट होतां नच दोष दे मला!! ३१
म्हणोनि तूं वर्जचि सर्व ही कथा; । नाहीं तरी घोर अनर्थ तत्त्वतां; ॥
षट्कर्णि जातां, घडलें समग्र हें, । होईल रे नाश तुझाच विग्रहें! ॥३२॥
वार्ता फुटोनि अथवा द्विजशापयोगें । भानुप्रताप ! तव नाश घडेल रागें
त्यावीण मृत्यु तुज येइल ना कधींच । आले जरी कुपित शंभुहरीहि साच!"
वंदोनि भूप म्हणतो, " वदलां खरें तें; । रक्षील कोण गुरुविप्र जर प्रहर्ते ?
कोपे विधी तर तदा गुरु एक पाळी । होतां सकोप गुरु, नाशचि ये कपाळीं!
जें सांगतां त्यापरि मी न वागतां । जो नाश त्याचें मज दुःख ना तथा ॥
माझ्या मनीं एकच भीति डाचते । न ब्रह्मशापापरि कांहिं घोर तें ! ॥३५॥
कोण्या उपायें मज विप्र ते वश । होतील तें सांगुनि, द्या मला यश ॥
माझ्यावरी आचरणें तुम्ही दया । कल्याणकारी दुसरें मला न या"॥३६॥

“ ऐकें नृपा ! जगतिं त्यास उपाय नाना । ते कष्टसाध्य; फलसिद्धिहि निश्चयें ना !
आहे उपाय सुगमोत्तम एक माझा । त्यातेंहि एक गुरुविघ्न असेचि, राजा ! ॥३७
आहे अधीन मम तो सदुपाय राया ! । नाहीं परी, तव पुरीं मज शक्य याया;
गेलों न मी अजिवरीं कवणाचियाही । ग्रामीं गृहींहि अथवा लवमात्र, पाहीं.३८
आतां पुराप्रति तुझ्या जर मी न यावें । होईल हानि कितुकी कवणा न ठावें
मोठाच पेंच पडला मजलागिं आज !” । त्यातें विनीत वदला वच भूमिराज३९
“स्वामिन्! वदे सकल शास्त्र अशीच्र नीति–। मोठे सदा लघुवरीच कृपा करीती
अद्री तृणांसि धरि संतत शीर्षदेशीं । फेनासि पृष्ठिं जलधी, शिरिं भू रजांसी.”४०
बोलोनि हें नृप नमूनि पदीं मुनीसी । प्रार्थी “प्रभो! तुम्हि कृपालु मला विशेषीं
माझ्यावरी सदय होउनि दुःख सोसा ! होवो सुदीन जन हा न तुम्हां नकोसा”४१
झाला अधीन नृप पाहुनि सर्वरीतीं । बोले मुनी कपटपूर्ण तयास उक्ती ॥
“राजा! वदें वचन मी तुजलागिं सत्य। कांहीं मला जगतिं नाहिं अशक्य कृत्य.४२
आहेस तूं परमभक्त मदीय राजा ! तेणें अवश्यचि तुझ्या करणार काजा ॥
लोकांत योग, तप, मंत्र तशाच्र युक्ति । होतात सिद्धिद नरा जर यत्निं भक्ति.४३
मीच स्वतां करिन भोजनपाक सिद्ध । तूं वाढ, ठेवुनि मला मुळिं अप्रसिद्ध
जो जो मदन्न करि सेवन तें नृपाळा ! । तो तो तुला वशचि होइल सर्व काळां४४
त्याच्याहि गेहिं जर जेविल कोणि, तोही । होईल रे ! वश तसा तुजलाच, पाहीं.
जा तूं तरी, कर उपाय असाच राया !। संकल्प वर्ष कर, हा नच जाउ वायां ४५
लक्ष द्विजां नवनव्यां, घरिं भोजनातें । बोलीव तूं सपरिवार, विशंक कीं तें
मी पाकसिद्धि निजहास्तिं करीन नित्य । होतील विप्र सहजीं वश तूज सत्य!४६
देवार्थ विप्र करिती जगिं यज्ञ होम । विप्रांस देव वश त्यास्तव पूर्णकाम
मी आणखी तुजसि मात निवेदितों ही । येईन वेषिं मम या, तव मी न गेहीं!!४७
आणीन मी तव इथेंचि पुरोहितास । मायाबलें करुन, देइन त्या स्ववेष ॥
माझ्यासमान करुनी स्वतपोबलानें । ठेवीन वर्षभर, जें न कुणीहि जाणे ॥४८
घेऊनि मी तव पुरोहितरूप साच । राहीन मी तुजपशीं, नुमजे कुणाच !
आतां असो; बहु विचार पुरे, निजावें, । झाली निशा बहुत, तूं श्रम नैव घ्यावे४९
भेटूं अम्ही पुनरपी त्रयरात्रिपाठीं । येईन मी तव पुरामधिं त्याजसाठीं ॥
आतां तुला, तव हयासह निद्रिताही । माझ्या तपें तव पुरीं झणिं नेत, पाहीं५०

येईन मी तेथ तयाच वेषें । कळेल तो ना तुजही विशेषें, ॥
एकांतिं जें सांगिन मी तुला तें । तेव्हांच तें सर्व कळेल तूंतें" ॥२१॥

—: इति कपटमुनिपाखण्डवर्णनं नामाष्टविंशतिस्तरङ्गः :—

## तरंग २९ वा

आदश तो परिसुनी निजला नरेन्द्र । बैसे निजासनिं मुनी कपटी अनिद्र ॥
श्रांतीमुळें नृपतितें अति झोंप येत । चिंतेमुळें परि मुनीस तसें न होत ॥१॥
तों येत तेथ रजनीचर कालकेतु । राजास जो फसवि सूकररूपहेतु ! ॥
त्या होय सख्य अति तापस त्या मुनीचें । प्रावीण्य ज्यास कपटाचरणांत साचें
त्या पुत्र होत शत, बंधु दहा तसेच । सारे अजिंक्य सुरपीडक दुष्ट साच !॥
ते विप्र, साधु, सुर यां अतिदुःख देते । शासी प्रतापरवि आधिं रणीं तयांतें ३
पूर्वील वैर खल राक्षस साधि तप्त । भेटोनि तापस नृपा करि मंत्र गुप्त ॥
जेणें उपाय रिपुनाश करावयातें । चिंतीयले, परि नृपा कळणें कसे ते ! ॥४॥
तेजस्वि शत्रु जरि एकहि का असेना । त्यातें कधींच लघु हा म्हणुनी न माना
राहू अजूनि अवशेषितशीर्षही तो । ग्रासूनि सूर्यशशिंना किति दुःख देतो ?!
तो तापसी नृप बघे निज मित्र आला, । हर्षें उठोनि अति सौख्यि मिळे तयाला
बोले कथा सकल राक्षसही तयास । "साधूं अभीष्ट अविलंबिं विनाप्रयास ॥६॥
जो ऐकिला सदुपदेश मदीय तूं रे ! । तो जाण शत्रु जितलाच भल्या प्रकारें ॥
सोडूनि काळजि नृपा ! सुखिं झोप घे जा । रे ! औषधाविणाचि रोग विनष्ट तूझा !
नाशूनि मी रिपुसि सर्व कुलांसमेत । चौथ्या दिशींच तुजपाशिं रिघेन येथ"॥
झाला अतीव हृदिं तापस भूप तुष्ट, । गेला महाकपटि राक्षस रुष्ट दुष्ट ! ॥
भानुप्रताप तुरगासहही तयें हा । केला क्षणामधिंच पोंचविता स्वगेहा ॥
राज्ञीपशीं निजविला नृपमंदिरीं तो । अश्वास अश्वगृहिं राक्षस पोंचवीतो ॥

पुरोहितातेंहि तदा नृपाचिया नेलें तयानें उचलूनि सत्वरीं ॥
मायावशें मोहवुनी तयातें ठेवीयलें निश्चळ अद्रिकंदरीं ॥१०॥
स्वयेंचि घेऊनि पुरोहिताकृति घे तो तयाच्या शयनावरी निज ॥
जागा प्रभातें नृप होउनी बघे साश्चर्य तो मंदिर पत्तनीं निज ॥११॥
प्रभाव तो त्या मुनिचा गणोनियां उठोनि जाई नृप अश्व घेउनी ॥
न सांगतां राणिस वा कुणासहि प्रवेशिता होय पुन्हांहि काननीं ॥१२॥

सं. क्रं.......८५
ग्र०क्र ७२९

मध्याह्निं तो ये परतोनि तेथुनी तेव्हां प्रजा पाहुनि त्यासि हर्षली ॥
घरोघरीं उत्सव थोर मांडले, वाद्यें मनोज्ञें बहु वाजुं लागलीं ! ॥१३॥
पुरोहितातें जंव भूप देखे साश्चर्य त्याला निज कार्यही स्मरे ॥
ते तीन त्याचे दिन दीर्घ वाटले युगापरी त्यासि विलुब्ध अंतरें ॥१४॥
मती नृपाची कपटी मुनीच्या पायीं अती लीन असे जहाली ॥
पुरोहितें येउनि त्यास वृत्त निवेदिलें सर्वहि योग्य कालीं ॥१५॥
राजा तया ओळखुनी मनांत प्रहृष्ट झाला, न उरे विवेक ॥
निमंत्रिले लक्ष तयें त्वरेंचि सद्विप्र आप्तांसमवेत, देख ॥१६॥
पुरोहितें सर्वहि पाकसिद्धि केली यथाशास्त्र चतुर्विधा ती ॥
मायाप्रभावेंचि जियेंत शाक, कोशिंबिरी आदि अनेक होती ! ॥१७॥
नानापरींचें मृगमांस तेणें असे निथें रांधियलें द्विजार्थ ॥
त्याच्यांत दुष्टें द्विजमांसखंड घालून केले सगळे पदार्थ ! ! ॥१८॥
बोलाविले विप्र समस्त रायें जेवावयातें अति आदरानें ॥
प्रक्षाळुनी तत्पद बैसवी तो थाटामधें मांडुनि पाट-पानें ॥१९॥
वाढी तयां जों नृप, तोंच झाली आकाशवाणी; वदली द्विजांना ॥
" हे विप्र हो ! तांतडिनें उठा, जा गेहा; न जेवा; अति घात जाणा !
हा विप्रमांसें युत अन्नपाक ! " हें ऐकतां विप्र तसेंच थांबले ।
हो भूप तैं व्याकुळ बुद्धिमूढ, वदे न कांहीं भवितव्यताबलें ! २१
सरोष तेव्हां द्विज शापिती हें–" राजा ! न केलास मुळीं विचार; ॥
होशील तूं राक्षस सर्व आप्तांसमेत मूढा ! न विलंब फार ! ॥ २२ ॥
होईल वर्षांतचि नाश तूझा स्वकीय आप्तांसह निश्चयेंचि ! ॥
न व्यक्ति कोणी, पितरांस पाणी देण्यासही राहिल वंशिं साची! " २३
ऐकोनि तो शाप, नृपाळ झाला तत्काळ शोकाकुल दीनचेता ॥
आकाशवाणीहि पुन्हां गभीरा होऊनि विप्रां वदली समस्तां ॥ २४ ॥
" हे विप्र हो ! शाप तुम्हीं दिला हा विचार कांहीं न करून यातें ! ॥
नसे नृपाचा लवही प्रमाद ! " ऐकोनि हें ब्राह्मण थक्क कीं ते ! ॥
राजा तदा जाउनि पाकशाले बघे तिथें तों नच अन्न ना कुणी ! ॥
फिरोनि येई; बहु चिंति चित्तीं द्विजांसि सारें कथि दीनवाणी ॥२६॥

अत्यंत तो व्याकुळ होउनीयां भूमीवरी भूप पडे सशोक ।।
तयासि तेव्हां द्विज बोलले ते " राजा ! चुके भावि कदा न देख ।।२७।।
जरी तुझा कांहिंच नाहिं दोष, तरीहि खोटेपण विप्रशापीं ।।
सुदारुणीं घोरतमीं कशानें येणार नाहींच नृपा ! कदापि ! " ।।२८।।
बोलोनि हें ब्राह्मण जाति मार्गे; वृत्तान्त पौरां समजे समग्र ।।
ते लोकही दूषण देति दैवा जें राजहंसा करि काक शीघ्र ! ।।२९।।
पुरोहिता पोचवुनी पुरातें, तें वृत्त त्या तापस राक्षसासही ।।
निवेदिलें सत्वर कालकेतुनें आनंद त्यांच्या हृदयीं न माई ! ।।३०।।
साऱ्या नृपांना लिहुनी निमंत्रिलें त्या तापसें सैन्यसमेत यावया ।।
ते सज्ज होऊनि समस्त पातले प्रतापभानुप्रति निर्दळावया ।।३१।।
त्याच्या पुरातें झणिं वेढिलें तयीं वाद्यें रणाचीं ध्वनुं लागलीं रवें ।।
चालोनिया कंदन थोर सारखें परस्परां हाणिति वीर ते जवें ।।३२।।
प्रतापभानू निजबांधवांसह विनाश पावे, कुणि त्या कुलीं नुरे ।।
असत्य कैसा द्विजशाप होइल ! झालाच त्याचा परिणाम सत्वरें ।।३३।।
जिंकूनि शत्रूसि समग्र भूप ते स्वराजधानींप्रति जाति मागुतीं ।।
यशोजयश्री मिळवूनि वैभवें; दैवें कुणा ये न कळे कशी गती ! ।।३४।।
मुने ! भरद्वाज ! पहा विधी जैं होई जया वक्र, तयास हो जगीं ।।
धूलीहि मेरूपरि, बाप मृत्यु-सा, व्यालापरी हारहि, ही न खोटि गीं।।३५।।
येतांच ती वेळ, नृपाळ, हे मुने ! झाला स्वकीयांसमेत राक्षस ।।
प्रचंड तो 'रावण' नाम वीर हो शीर्षें दहा ज्यास भुजा तशा विस ! ।।
बंधू नृपाचा 'अरिमर्दना'ख्य तो हो 'कुंभकर्णा'ख्य बलाढ्य दुर्मद ।।
मंत्रीहि जो 'धर्मरुचि' प्रसिद्ध तो कनिष्ठ हो बंधु 'बिभीषणा'भिध।।३७।।
बिभीषण ख्यात रमेशभक्तिमान् । तो ब्रह्मवेत्ता शुभकीर्ति पुण्यवान् ।।
जे पुत्र वा सेवक वा नृपाप्रती । असंख्य ते राक्षसजन्म पावती ।।३८।।
ते क्रूरकर्मे कपटी भयंकर । दुष्टात्म, ज्यांना लव ना विचार ।।
पापी दयाशून्य जगद्विहिंसक सर्वांसि पीडाकर सद्विनाशक ।।३९।।

होता पावन शुद्ध वंश जरि तो पौलस्त्य ज्या ना मिति ।
त्यातें ब्राह्मणशाप होउनि तिथें पापात्म ते जन्मती ।।

भ्राते तीनहि ते अतीव तपती अत्युग्र नानापरी ।
धाता त्यांसि म्हणे 'प्रसन्न अजिं मी, मागा वरा सत्वरीं !'॥४०॥
तेव्हां ब्रह्मपदीं शिरें लववुनी प्रार्थीतसे रावण ।
' ऐका हें जगदीश्वरा ! मज विभो ! द्या एवढें आपण ॥
मातें कोण वधूं शको न जगतीं कोण्याहि योनींतलें ।
एका मानववानराविण दुजें, हें द्या जि ! मागीतलें !!'॥४१॥
' तथास्तु ' बोले विधि तैं तयासी । ' तुवां तपें केलिं अनंतराशि ॥
प्रसन्न तूंतें विधि मी जहालों । द्याया तुला रे ! वर मीच आलों !॥४२॥
ये कुंभकर्णापुढतीं विधाता । पाहूनि त्या विस्मय होत चित्ता ॥
म्हणे मनीं ' हा खळ नित्य खाय । राहील लोकां मग अन्न काय ? ॥
प्रेरूनियां यास्तव शारदेला । धीभ्रंश त्याचा विधिनेंचि केला ! ॥
मागे तदा तो वर कुंभकर्ण । निद्रान्वि षाण्मासिक एक पूर्ण ॥४४॥
बिभीषणापाशिं पुढें विधाता । जाऊनि बोले ' वर माग आतां ' ॥
प्रार्थीतसे तो भगवत्पदाब्जीं । विशुद्ध भक्ती सुखदा सदा जी ॥४५॥
त्यांना असे दे वर देवराय । तो सत्यलोका मग हृष्ट जाय ॥
कथीं मनोज्ञा तुलसी कथा हे । श्रीराम जीतें अनुवादताहे ॥४६॥
मंदोदरी नाम सुता मयाची । ललाम नारीजनिं विश्विं साची
मयें दिली ती मग रावणाला । जाणोनि तो राक्षसराज झाला ॥४७॥
पौलस्त्यही हृष्ट अतीव झाला । कीं लाभली उत्तम दिव्य बाला ॥
बंधुद्वयाचेहि पुढें, तयानें । विवाह केले अति थोर मानें ॥४८॥
भव्य त्रिकूटगिरि दुर्गम सिंधुमाजीं । जो धातृनिर्मित तया मय दे विभा जी ॥
हैमीं गृहें रचुनि रत्नमयें तशींच । तीं कोण वर्णन करूं शकणार साच ? ४९
भोगावती जशि पुरी अहिवंशवासा । देवेन्द्रवास अमरावति होय जैसा ॥
त्यांच्याहुनीहि सुभगा अतिमात्र लंका । ती रावणाधिवसती नच यांत शंका !
जिच्या चारि बाजू गभीरांबुधीनें । जणों वेष्टिल्या खंदकें वारिपूर्णें ॥
जया रत्नसंबद्ध सौवर्ण कोट । अभेद्यां तयां कोण वर्णील नीट ? ॥५१॥
प्रत्येक कल्पिं जगिं राक्षसराज जो हो । शूर प्रतापबल तोच तिच्यांत राहो ॥
श्रीविष्णु हें ठरवुनी नियमेंकरूनी । लंकापुरी रचित राक्षसराजधानी ॥५२॥

पूर्वीं निशाचर असंख्य तिथें रहात । वीरांस त्या सुर पराभविती रणांत ॥
इंद्रें कुबेरपृतनागण रक्षणार्थ । लंकेंत ठेवुनि दिले बहु कोटि तेथ ॥५३॥
ये रावणश्रवणिं ही जंव गोष्ट सारी । लंकेसि सैन्य निज पाठवि आणि घेरी॥
पाहून राक्षस असंख्य अतीव उग्र । गेलीं पळून झणिं यक्षचमू समग्र ॥५४॥
लंकापुरा फिरुनि रावण सर्व पाही । निश्चिंतता वरुनि अंतरिं हृष्ट होई ॥
देखोनि दुर्ग अति दुर्गम जो कुणाही । तो राजधानि करुनी तिजमाजिं राही
तो राक्षसांस सदनें तिथलीं विसर्जी । तद्योग्य ती वितरि त्यांप्रति सौख्यराजि
स्वारी करूनि जिणि तो झणिं यक्षराजा । तत्पुष्पका हरुनि लावित आत्मकाजा

येतीं रावणगेहिं नित्य नव तीं नाना सुखें संपदा ।
सेना, शक्ति, जय, प्रताप, महती ना लभ्य कोणा कदा ॥
झाले पुत्र, अनेक मित्र; सगळे वाढीस ते लागती ।
लाभामागुनि लोभ तेविं अधिकाधिक्येंचि त्यांची गति ! ॥५७॥
जो कुंभकर्णनामा भ्राता, त्याचा बलाढ्य अतिमात्र ॥
विश्वीं वीर न दुसरा झाला त्याला तुलायला पात्र ॥५८॥
तो मद्यपान करुनी षण्मासावधि निगाढ घोरतसे ॥
परि जैं जागा होई तो तैं त्रैलोक्य निखिल पीडि तसें ॥५९॥
प्रतिदिनिं जागृत जर तो खाता तर विश्वि जीव ना उरता ॥
शूरहि तसाच समरीं त्यासि लढायासि कोण भट पुरता ? ! ॥६०॥
वीर असंख्य असे जे बिभीषणादिक बलाढ्य संगरिं ते ॥
त्यांचें यथार्थ वर्णन होणें दुर्घट कवीश जरि करिते ! ॥६१॥
रावणनंदन मोठा पराक्रमी ‘ मेघनाद ’नामक तो ॥
वीराग्रणींत पहिला विश्वामध्यें अनन्य जो तुकतो ॥६२॥
समरीं त्याच्यापुढतीं ठाकूं शकणार कोण वीर दुजा ? ॥
सुरलोकींचे भटही तो पळवी, नुरवि त्यांचिया गमजा ॥६३॥
वीर अकंपन, दुर्मुख वज्रद्विज, धूमकेतु, अतिकाय ? ॥
एकेकटेहि जिंकूं शकते जग; त्यापुढें इतर काय ? ॥६४॥
ते कामरूप सगळे मायावी धर्म वा दया ज्यां ना ॥
अल्पहि कधीं शिवतसे सुकवि कसे वार्णतील मग त्यांना ? ॥६५॥

एके समयीं रावण सभेंत बैसे स्वकीय जनसहित ।।
सुतपौत्र दासदासी राक्षससेनेसमेत जे महित ।।६६।।
निरखुनि अगणित अपुला नानापरिचा बलाढ्य परिवार ।।
क्रोधें मदें भरोनी रावण गर्विष्ठ काढि उद्गार ।।६७।।
" हे राक्षसवीरांनो ! ऐका; वैरी अम्हां सुर समग्र ।।
परि रणधीर न ते हो, पळती बघतांचि शत्रुबल उग्र ।।६८।।
त्यांचें मरण दिसे परि एका गोष्टींत, सांगतों परिसा ।।
मख-होम-श्राद्ध-द्विज-भोजनविध्वंस आचरा अरिसा ।।६९।।
क्षुद्व्याकुळ बळनाशें येतिल सहजचि समग्र सुर शरण ।।
मारूं वा त्यां सोडूं मग जर धरतिल अम्हांसि सरळपण " ।।७०।।

तो मेघनादा मग बोलवोनी । वाखाणि त्या बोलुनि गोड वाणी ।
पराक्रमा वानुनि देववैर । दिलें तयें वाढवुनी अपार ।।७१।।

" जे कोण वीर रणधीर बलिष्ठ देव । युद्धार्थ ज्या खुमखुमी अभिमानभाव
जिंकूनि बांधुनि तयां मजपाशिं आण; । वत्सा ! असेचि पितृशब्द तुला प्रमाण "
आज्ञा अशा वितरुनी सकलां स्वतांहि । घेऊनियां करिं गदा लढण्यास जाई
चाले दशानन तदा अवनीहि कांचे ! तद्गर्जितें स्रवति गर्भ सुरस्त्रियांचे ।।
संक्रुद्ध येत रिपु रावण, आयकोनी । ते देव जाति गिरिमेरुगुहान्ति कोनीं !
दिक्पाललोक जंव जिंकुनि घ्यावयास । तो येत तों निरखि तेथ समग्र ओस।।
रोषें अतीव करि भीषण सिंहघोष । देवां शिव्या वितरि रावण तो विशेष ।।
तो मत्त राक्षस रणार्थ बघी जगांत । लाभे न कोणिच तया प्रतिवीर युक्त७५
भानू, शशी, वरुण, वायु,कुबेर,अग्नी, । दिक्पाळ,काल,यम,देव,मनुष्य कोणी ।।
ते नाग, किन्नर, तसेचहि सिद्धयक्ष । सर्वांसि तो छळित, सच्छलनीं सुदक्ष ! ।।

ब्रह्मसृष्टिमधिं जे तनुधारी । रावणासि वश ते नरनारी ।।
सर्व येउनि तयाप्रति भीत । तत्पदीं निजशिरें नमवीत ।।७७।।
जिंकोनि त्यानें सगळेंहि विश्व न राखिलें कोणि तयें स्वतंत्र ।।
तो चक्रवर्ती जगतांत झाला स्वच्छंदिं तें हालवि राज्यसूत्र ।।७८।।
देवांगना किन्नरि नागकन्या । गंधर्वयक्षादि कितीक अन्या ।।
नारी बळें जिंकुनि सुस्वरूप । त्यानें विवाहों वरिल्या अमूप ।।७९।।

जें बोलला इंद्रजिता सुतातें । होतेंच आधीं कृतसें तयें तें ॥
आज्ञापि ज्यां तो, पहिलेंचि त्यांनीं । केलीं कुकृत्यें परिसोत कोणी॥८०॥
ते भीमरूपी अतिदुष्ट सारे । देती सुरां त्रास बहुप्रकारें ॥
नानास्वरूपी गण राक्षसीय । मायाबलें पीडिति देवकार्य ॥८१॥
होईल जेणें जगिं धर्म नष्ट । करीति तें वेदविरुद्ध दुष्ट ॥
जिथें दिसे त्यां द्विज आणि धेनू । असे किती जाळिति देश नेणूं॥
राहे न कोठेंचि शुभासि थारा । न मान राहे गुरुदेवविप्रां ॥
न विष्णुभक्ती जपयज्ञ दान । स्वप्नींहि कोठें श्रुति ना पुराण! ॥३
'जप योग विरक्ती तप मखभक्ती रावण ऐके जर कोठें ।
तर उठोनि जाई स्वतांचि धाई फिरवि तयावरि वरवंटे ! ॥
जग आचारभ्रष्ट असें हो धर्मनाम ये नच कानीं ।
छळुनि तयांतें नाशी, जर का वेद पुराणें पठि कोणी ॥८४॥
कोणीहि वर्णू न शके अनीती । जी घोर तो राक्षस आचरी ती ॥
हिंसाच ज्यांची हृदयाभिलाषा । कैसी तयांच्या मिति पापदोषां ? ८५
पापात्म चोर बहु दुष्ट तसें जुगारी । ऐसेच वाढति तदा जन कामचारी ॥
जे होत लंपट धनें लुटण्या परांचीं। अन्य स्त्रियांसि हरण्या मति भी न ज्यांची
ना मान मातृपितृदेवपदीं कुणाही । तेव्हां उरे; अति विचित्र गती पहा ही !
साधूंसही धरुनि राबविती, उमे ! जे प्राणी तयांसहि 'निशाचर' नाम साजे ! ८७
धर्मग्लानी देखुनी भीषणा ती । चिंती भीति व्याकुला भू स्वचित्तीं ॥
कीं 'अद्री वा, अब्धि वा, ना नद्या ह्या। अन्यद्रोही तेविं मातें असह्या
भासे तीतें सर्वही धर्मनाश । भीतिग्रस्ता ना परी दावि रोष ॥
ती धेनूचे रूप घेई विचारें । देवर्षींना भेटुनी सांगि सारें ॥८९॥
दुःखावेगें ती करी शोक भारी । कोणीही ना युक्तिनें तो निवारी ॥
आले तैं ते ब्रह्मलोकां सुरादि । त्यांचे संगें येत भूधेनु साधि ॥९०॥
जाणे ब्रह्मा सर्व तर्कानुमानें । सांगे चित्तीं चिंतुनी याप्रमाणें:— ॥
"नोहे गोष्टी माझिया हे करींची। तूं ज्या दासी, दास त्या हा विरिंचि!
तोच त्राता तूंस, मातेंहि व्हावा"। सांगोनी हें ध्यात तो देवदेवा ॥
"भक्तार्ती गे ! जाणतो विश्वनाथ। धैर्यें राहीं; त्यांसि दावील अंत"
—: इति रावणदिग्विजयवर्णनं नामैकोनविंशतिस्तरंगः :—

## तरंग ३० वा

सारे असोनी सुर ते करिती विचार । कैसा मिळे विभु ? कुठें हुडकूं उदार ?॥
त्या हाक मारुं कशि? तेथ विचार चाले । 'वैकुंठिं तो सुलभ' हें कुणि भक्त बोले
कोणी म्हणे ' विभु पयोनिधिमाजिं राहे । व्हाया परी प्रकट भक्तिच एक पाहे॥
जेव्हां जसी सुदृढ भक्ति दिसे मनाची । तेव्हां तसें प्रकटणें, हरिरीति हीचि !'
होतों तिथें सुरसभेमधिं गौरि ! मीही । योग्य प्रसंगिं वदलों वचनें अशीं हीं॥
" व्यापून सर्व हरि राहियला समान । प्रेमें दिसे, मम अशी अनुभूति पूर्ण॥
दिक्कालदेशविदिशादिक यांत कोठें । नाहींच ईशाविण ठाव, मुळीं न खोटें॥
आहे चराचरिं, विरागि हि सर्वहीन । तो भक्तिनें प्रकटतो अनळासमान "४

वाटलें वच तें माझें सगळ्यांसिच उत्तम ॥
" साधु, साधु ! " वदे ब्रह्मा ऐकतां वचना मम ॥५॥

मद्वाक्य जैं ऐकत, तैं विरिंचि । प्रहृष्ट हो, लोचनिं वारि सिंची ॥
करि स्तुती सादर बद्धपाणि । एकाग्रचित्तीं स्तवि सार्थवाणी ॥६॥

" अगा देवाधीशा ! जय जय विभो ! लोकसुखदा ।
खळांच्या संहर्त्या ! प्रणतपरिपाळा ! जगिं सदा ॥
हिता गोविप्रांच्या असुरहनना ! श्रीप्रियकरा ! ।
तुझ्या लीला नेणूं निजजनकृपानुग्रहपरा ! ॥७॥
जगद्व्यापी, सर्वांतरिं वससि, आनंद परम ।
चिरस्थायी मायारहित चरितीं पावनतम, ॥
तुझ्या लाभासाठीं निशिदिनिं विरागी यति मुनि ।
तुला ध्याती गाती गुणगणिं तुझ्या पूर्ण रमुनी ॥८॥
असें ज्यानें सृष्टि त्रिविध रचिली, साह्य न दुजें ।
तया अस्मच्चिंता विदित, न अम्हां भक्ति समजे ! ॥
कळेना पूजाही, भवहर ! जगद्दुःखहरण ।
मुनिप्रेमस्थान ! प्रभुवर ! अम्हां तूंच शरण ॥९॥
न वाग्देवी-शेष, श्रुति-मुनिहि ना जाणति तुला ।
जयाच्या वात्सल्या श्रुति कथिति तो तारु सकलां ॥

भवाधारा रम्या ! सकलसुखसारा ! गुणिवरा ! ।
नमीती भ्याले हे सुरमुनि तुला धीरचतुरा !" ॥१०॥
भयें व्याकुळां भूसुरांतें बघोनी। तशी भक्तियुक्त स्तुती आयकोनी ॥
नभीं जाहली एक गंभीर वाणी, जिनें नाशिले शोक-संदेह दोनी !
" मुनींनो ! सुरांनो ! त्यजा भीति सारी । तुम्हांसाठिं मी हों मनुष्यावतारी ॥
मदंशांसवें सूर्यवंशांत जन्म । सुविख्यातिं घेईन मी पूर्णकाम ॥१२॥
पूर्वी कश्यप अदिती करिति महातप, जयां दिला वर मीं
दशरथ-कौसल्या ते राज्य अयोध्येंत करिति सुखधामीं १३
गृहीं तयांच्या अवतार घेऊं । आम्ही रघूच्या कुलिं चार भाऊ ॥
श्रीनारदाची करुं सत्य वाणी; । भूभार नाशूं निजविक्रमांनीं ॥ १४ ।
करीन निर्भीक तुम्हां सुरांना । अधर्म नाशीन; हरीन विघ्नां " ॥
ती ऐकुनी व्योमगिरा स्वकर्णीं । निश्चितता तैं वरिली सुरांनीं ॥ १५ ॥
ते देव आले परतोनि सारे । भू-भी विधाता निवटी विचारें ॥
विश्वास तीतें उपजे मनांत । झाली मनीं ती मग पूर्ण शांत ॥ १६ ॥
सुरांसही सांगितसे विधाता । " घ्यावा तुम्हीं वानरजन्म आतां ॥
क्षितीवरी जाउनि ईशसेवा । करा, तुम्ही घ्या सुख देवदेवा " ! ॥१७॥
गेला विधाता मग सत्यलोकीं । स्वस्थानिं भूदेवहि ते तसे कीं ।!
आज्ञा विधाता करि तैशि तूर्ण । केली सुरांनीं सगळीच पूर्ण ॥ १८ ।
क्षितीमाजीं त्यांनीं वनचरतनू वेगिं धरिली, ।
प्रतापें वीर्यानें अतुलित असे वानर बली ॥
नखें, अद्री, वृक्ष प्रचुर अशि त्यां आयुधतती ।
प्रभूच्या येण्याची सुमति जगतीं वाट बघती ॥ १९ ॥
अरण्यीं सैन्यांचे कितिक रचिती ते तळ भले ।
असंख्यांनीं त्यांनीं गिरिकुहर कित्येक भरले ! ॥
चरित्रें हीं सारीं रुचिर कथिलीं मीं अजि तुम्हां; ।
परी अद्यापी जें अकथित कथूं त्यामधिं रमा ! ॥२०॥
अयोध्येमध्यें हो रघुकुलमणी भूप सुगुणी ।
सदा धर्में चाले दशरथ असा वर्णित जनीं ॥

महाज्ञानी धीमान् हृदयिं रत जो श्रीशचरणीं ।
अशा पुण्यात्म्यांच्या जननिं निखिला धन्य धरणि ॥२१॥
कौसल्यादिक त्याच्या भार्या आर्या विनीत पुण्यतमा ॥
पत्यनुकूला साध्वी हरिपदिं निरता जयां नसे उपमा ॥२२॥

इति श्रीरामचरितमानसानुवादे कलिकलुषविध्वंसने बालकांडे उमामहेश्वर-संवादे देवस्तुतिब्रह्मवरवाणीवर्णनं नाम त्रिंशतिस्तरंगः

## तरंग ३१ वा

तों एकदां भूप मनीं सचिंत । कीं नाहिं मातें सुतरत्न कांत; ॥
गेला गुरूच्या गृहिं भक्तिभावें । नमूनि याची, 'हित तेंचि व्हावें' ॥१॥
वदे वसिष्ठा सुखदुःखगोष्टी । सुतार्थ भूपाळ अतीव कष्टी ।
गुरू तयातें समजावि, बोले "धरीं नृपा ! धैर्य; सुदैव आलें ।२।
होतील तूंतें सुत चार राया ! । त्रैलोक्यविख्यात, भया हराया" ॥
पाचारुनी शृंग ऋषीस आणी । तो पुत्रकामेष्टि करी म्हणोनी ॥ ३ ॥
त्या यज्ञिं दे आहुति भक्तिभावें । पुण्यात्म तो शृंगमुनि स्वभावें ।
तैं अग्नि साक्षात् चरुहस्त येत । वेदीमधें तो प्रकटूनि मूर्त ॥ ४ ॥
वदे प्रभू "होय वसिष्ठचित्तीं, । झाली पहा सिद्धचि कामना ती ।
जाई नृपा ! हा हवि वाटुनीयां । द्यावास राण्यांप्रति आपुलीया" ॥५॥

हें सांगुनी सर्व सभेसमक्ष हो अग्निनारायण वेगिं गुप्त ।
प्रहर्ष जो भूपतितें जहाला मावे न तो तद्हृदयीं प्रभूत. ॥ ६ ॥

बोलावी नृपती तेव्हां आपुल्या प्रियकामिनी ॥
कौसल्यादिक तैं आल्या तयां दे हवि वाटुनी ॥ ७ ॥
अर्धभाग दिला त्यानें कौसल्येप्रति आदरें ।
राहिला अर्ध जो, त्याचे केले दोन पुन्हां करें ॥ ८ ॥
कैकेयीस दिला एक भाग रायें तयांतला ।
राज्ञी ज्येष्ठा कनिष्ठा त्या भाग घेती नृपें दिला ॥ ९ ॥
राहिला शेष जो त्याचे दोन भाग पुन्हां सम ।
करोनी ते दिले दोनी सुमित्रेप्रति उत्तम ॥ १० ॥

कौसल्येनें निजप्रेमें स्वहस्तें एक अर्पिला ।
कैकेयीनेंहि आनंदें स्वकरें एक तो तिला ॥ ११ ॥
यापरी सर्व त्या राज्ञी सगर्भा जाहल्या तदा ।
सौख्यांचा पूर त्यां झाला अपारानन्दसंपदा ॥ १२ ॥
ज्या दिनापासुनी गर्भी प्रभूचा वास सांठला ।
तेव्हांपासूनि सौख्याचा हर्षाचा पूर लोटला ॥ १३ ॥
राजाच्या सर्व त्या राज्ञी आपुलाल्या स्वमंदिरीं ।
शोभा-शील-द्युतींच्या कीं भासल्या खाणिंच्या परीं ॥१४॥
सुखयुक्त असा काल आणखी कांहिं जाउनी ।
प्रभुजन्मघडी आली विश्वमंगल पावनी ॥१५॥
तैं योगलग्नग्रहपुण्यवार तिथीहि सारीं अनुकूल होत ।
चराचरां विश्विं सुखा न सीमा, कीं रामजन्मीं सुखहेतु मूर्त ! ॥१६॥
पवित्र चैत्रीं नवमी तिथी ती विशुद्धपक्षीं अभिजित् सुयोग ॥
मध्याह्न, ना उष्ण अती, न शीत। सत्कालिं जैं लोक सुखान्तरंग ॥१७॥
वाहे सुगंधी हलु वात शीत; । आनंदले देव; सुखांत संत; ॥
वनें प्रफुल्लें, गिरि रत्नकान्त, । नद्या जलें ना, अमृतें वहात ! ॥१८॥
कळे तो जन्माचा सुसमय विरिंचीप्रति तदा ।
विमानें देवांनीं सजविलिं; निघाले अति मुदा ॥
निरभ्रीं आकाशीं सुरगण असंख्यात गमले ।
थवे गंधर्वांचे हरिगुणकथालापिं रमले ! ॥१९॥
सुरांनीं पुष्पांच्या भरुनि सृजिल्या अंजलि किती ।
नभीं वाजोनीयां घन रव भरी दुंदुभि अती ॥
स्तुती गाती हर्षें सुरमुनि तसे नाग बहुत ।
असे तेव्हां सारे प्रभुसि निजसेवा वितरित ॥२०॥
स्तुती करोनी बहु या प्रकारें देवादि गेले मग ते स्वगेहा ॥
जगन्निवास प्रभु जन्म पावे; विश्वासि विश्राम अनन्य कीं हा ! ॥२१॥
परम दयाळू अतिकनवाळू कौसल्येचा हितकारी ।
प्रकट जहाला तैं आनंदित जननी झाली हृदंतरीं ॥

अद्‌भुत सुंदर मुनिमानसहर नयनरम्य तनु घननीला ।
रूप चतुर्भुज सायुध, शोभासागर, भूषण वनमाला ॥२२॥
जोडुनि करयुग वदली जननी " स्तुति तव भगवन् ! करूं कशी ?
वेदपुराणां अगम्य, मायाज्ञान-गुणांहुनि पर असमी ॥
दयानन्दमय तूं गुणसागर गाति तुला श्रुति संत जसे ।
तसा प्रकट मम हितासाठिं तूं भक्ताधीना ! येसि असें ॥२३॥
ब्रह्मांडें यद्रोमरोमिं ही माया वर्णिलि वेदांनीं ।
तो तूं माझ्या कुशीस येशी हा उपहासचि म्हणो कुणी; " ॥
कौसल्येच्या ज्ञानें सस्मित विभु बहु लीला दावाया ।
पूर्वजन्मिच्या कथित कथा तिज पुत्रप्रेमा निर्माया ॥२४॥
मोहुनि गेली माता बोले " ताता ! त्यज हें रूप तव ।
प्रेमल अनुपम शैशवलीला लाडिक अपुल्या मज दाव ! " ॥
ऐकुनि तें वच धीमान् विभु तो होउनि बालक, करि रुदन ।
गातिल जे हें चरित, हरिपदा येतिल, चुकवुनि भवपतन ॥२५॥
मायागुणेन्द्रियातीत स्वेच्छें घे नरजन्मता ॥
तो प्रभू विप्र-धेनूंच्या सुर-संतांचिया हिता ॥२६॥
। इति श्रीपरमपुरुषाविर्भावश्रीकौशल्यादर्शनं नामैकत्रिंशतितस्तरङ्गः ।

## तरंग ३२ वा

रुदन करि शिशू हे ऐकुनी गोड वाणी । सकलहि मग येती धाइनें तेथ राणी
प्रमुदित मनिं दासी धांवती जेथ तेथ । सकल नगरवासी जाहले हृष्टचित्त॥
ऐके जेव्हां पुत्रजन्मासि राय । ब्रह्मानंदातुल्य त्या हर्ष होय ॥
प्रेमोद्रेकें हर्षरोमांच आले । हर्षास्रूंनीं नेत्र ही होति ओले ! ॥२॥
ज्याचे नामें होय कल्याणलाभ । तो मद्गेहा येइ इंदीवराभ ॥
ऐसें चित्तीं येउनी हर्ष लोटे । भाग्या त्याच्या वर्णना जोड कोठें ?! ।३।
बोलावूनी मंगलें वाद्यवृंदें । आज्ञापी त्या वादनालागिं मोदें ॥
बोलावूनी घे वसिष्ठां गुरूंना । येती तेही घेउनी विप्र नाना ॥४॥
जैं ते सारे देखती दिव्य बाळ । तत्सौंदर्यीं दृष्टि थारे न लोल ! ॥
वर्णोनी त्या विश्वसौंदर्यसारा । तृप्ती कैंची त्यांचिया वाग्विहारा ?! ॥५॥

नांदीश्राद्ध, जातकर्म विधीतें । केलें रायें आदरें सर्व तें तें ॥
रत्नें, धेनू, वस्त्रहेमादि दानें । केलीं विप्रांलागिं भूपोत्तमानें ॥६॥

ध्वज, तोरणें, पताका पौरांनीं उभविल्या तदा नगरीं ॥
ज्यांची शोभा वर्णन करणें दुष्कर, सरी न जिस दुसरी ॥७॥
झाल्या आकाशांतुनि कितिदां तैं पुष्पवृष्टि भूलोकीं, ॥
ब्रह्मानंदीं सारा मग्न तदा होय पौरजन तो कीं ! ॥८॥

शृंगारपूर्ण ललना सहजीं नटोनी । गेल्या अनेक मग धांवत त्या उठोनी ॥
ताटांमधें धरुनि मंगलकुंभ हैमी । संगीत गात रिघती किति राजधामीं ! ॥९॥
त्या मंगलारति करीति मुलावरून । त्यातें पुनःपुनरपि प्रणती करून ॥
तैं सूत मागध असे गुणवर्णि बंदी । वर्णीति राघवगुणां स्तवनप्रबंधीं ॥१०॥
दानें कितीक दिधलीं सकलां, परी तीं । त्यांनींहि वाटुनि दिलीं इतरां सुरीतीं
कस्तूरिचंदन सकुंकुम ठायिं ठायीं । सांठोनि वीथिमधिं पंकहि तेथ होई !
झाले गृहीं गृहिं किती शुभ वाद्यघोष । आनंदकंद विभु जन्मुनि दे प्रहर्ष ॥
सारेच पौर नर नारि अनेक वृंद । सानंद डुंबति सुखोर्मित ते अमंद ! १२

केकयसुता—सुमित्रा यांसहि सत्पुत्रलाभ तैं झाला ॥
तें सुखवैभव वदवे सरस्वतीला न वा न शेषाला ! ॥१३॥
अयोध्यानगरी तेव्हां जणों रात्रिच वाटली ॥
कीं जी रामासि भेटाया प्रत्यक्ष जणुं थाटली ! ॥१४॥

अयोध्यापुरी भासली यापरी ती । बघाया प्रभूतें निशा काय येती !
परी आढळोनी तिला सूर्य तेथें । तिला भासला खास संकोच चित्तें १५
तथापी धरी मूर्त संध्यास्वरूप । जिथें अंधकारापरी गंधधूप ॥
गुलालामुळें दावि संध्याच लाली । जणों सौधरत्नेंच तारा जहालीं ! १६

तो भूपमंदिराचा कळस महोदार इंदुसा गमला ! ॥
जो वेदघोष तो कीं मृदु मधु खगवृंद गायनीं रमला ! ॥१७॥
त्या कौतुका बघोनी रविसहि जणुं मोह जाहला खास ॥
गेला कसा कळेना त्यास सरोनी पुरा असा मास ! ॥१८॥

झाला तिसांचा दिन एकसाच । हें मर्म कोणाहि कळे न साच ॥
रथासवें ही रवि थांबलासा । यावा निशाकाल तशांत कैसा ? ! ॥१९॥

श्रीरामपंचायतन



वागर्थ, वारिलहरी जरि भिन्न बोलीं । आहेत तीं परि अभिन्नाचि, ना निराळीं ॥
श्रीजानकीरघुपतीहि तसे अभिन्न । तत्पादिं मन्नमन: त्यां प्रिय फार दीन ॥

सुश्लोकमानस बालकांड तरंग ५–३७

हें रहस्य न कळे कवणाही । गात रामयश भानुहि जाई ॥
तो महोत्सव ऋषी, सुर, नाग । हेहि पाहति सुधन्य अथांग ॥२०॥
श्रद्धा तुझी दृढतमा म्हणुनीच गौरि!। मी सांगतों परिस गे! गुज एक भारी॥
मीही भुशुंडिसह मानुषरूपधारी । होतों तयासमयिं पाहत गोष्ट सारी ॥२१॥
प्रेमार्द्र चित्त, हृदयीं परमप्रहर्ष, । गेलों पथीं पथिं पहात विभाविशेष; ॥
हें देहभानहि तदा नुरलें अम्हां गे! हें जाणतील जन राघवभक्तियोगें ॥२२॥
त्या मंगलावसरिं भूप अनेक दानें । देई यथेष्ट सकलां गज, अश्व, रत्नें, ॥
धेनू, हिरण्य, रथ, वस्त्र किती परींचें । देऊनि हृष्ट सकलां करि भूप साचें!
सकलांनीं संतोषीं दिधल्या भूपासि यापरी आशी ॥
कीं, तुलसिदासदैवत मिळवुत हे तनय दीर्घ आयूंसी ! ॥२४॥
* इति श्रीरामजन्मोत्सवलीलावर्णनं नाम द्वात्रिंशतिस्तरङ्गः *

## तरंग ३३ वा

यापरी दिवस जाउनि कांहीं । भान रात्रिदिनिंचें नच राही ॥
नाम मंगल सुतां प्रति द्याया । तो निमंत्रि नृपती मुनिराया ॥१॥
पूजि तो नृप वसिष्ठ मुनींतें । प्रार्थि त्यांसि वचनें सुविनीतें ।
" पुत्रनाम मुनिवर्य ! तुह्मीच । द्या यथार्थ अतिउत्तम साच ! ॥२॥
आवडे तुमचिया हृदया जें । तेंच नाम तनयां मम साजे ! " ॥
तैं वसिष्ठ वदले, " नृपते ! यां । नामराशि अतिरम्य अमेया ॥३॥
सांगतों परि यथामति कांहीं । हर्षसिंधु सुखमंदिर पाहीं ॥
रेणुपासुनि महत्त्रय लोक । रक्षि तोच विभु 'राम' विलोक ॥४॥
विश्राम तो 'राम' जगत्त्रयाला । आराम जो योगिमनासि झाला ॥
विश्वासि जो पोषित सन्निधान । करूं तयाला 'भरता'भिधान ॥५॥
स्मृतीहि ज्याची रिपुराशि नाशी । 'शत्रुघ्न' ऐसें म्हण नाम त्याशी ॥
श्रुतींसही संमत नाम ज्याचें । विख्यात लोकीं श्रुतिरम्य साचें!" ॥६॥
आधार सर्व जगताप्रति एक शेष । जो सद्गुणां विषय होय जगीं विशेष ॥
रामप्रिया करि तया मुनिवर्य नाम । त्रिश्रीं उदारतम 'लक्ष्मण' हर्षधाम॥७॥

वसिष्ठ मुनि त्यांस हीं निजविचारिं नामें करी, ।
वदे, ' सुत तुझे नृपा ! चतुर वेदतत्त्वें खरीं; ॥
निधान मुनिचित्तिंचें, प्रिय शिवा, जगा जीवन, ।
अगार शिशुकेलिचें ! ' सुखित तैं नृपाचें मन ! ॥८॥

शैशवापासुनी लक्ष्मणाचे मनीं । राघवा लागुनी भक्तिची जोडणी ॥
जाणिलें कीं तयें रामराय स्वयें । आपले स्वामि हे भव्य तेणेंचि ये ! ॥९॥
शत्रुघ्न तैसा भरतासि मानी । प्रभु स्वताचा हितकारि कोणी ॥
जोड्या अशा श्यामल गौर दोनी । माता मनीं हर्षति त्या बघोनी ॥१०॥
त्या दृष्ट काढिति सुतांवरुनी किती तें । चारीहि रूप-गुण-शीलनिधान होते ॥
त्यांतूनही परमसौख्यमहासमुद्र । अत्यंत सुंदर मनोहर रामचंद्र ॥११॥

त्याचिया हृदयिं इंदुच हो कीं । हास्यकांति मधुरा मुखिं फांकी ॥
पाळण्यांत अथवा निज अंकीं । खेळवीत जननी किति त्या कीं ! ॥१२॥
जें व्यापक ब्रह्म परं निरंजन । अजन्म विश्वंभर पूर्ण निर्गुण ॥
तें प्रेमभक्तिप्रति होत अंकित । मातेचिया होउनि बाळ अंकित ॥१३॥

नीलांग कोटिमदनांपरि रूपकांति । श्यामांबुदाभ असितांबुजरम्यदीप्ति ॥
रक्तोत्पलाभचरणीं नखकांति ज्याची । मोतींच अब्जदलिं ठेविलिं होत साचीं !
वज्रांकुशध्वज अशा तळपायिं रेखा । यन्नूपुरध्वनि मुनींसहि मोहि देखा ॥
त्या किंकिणी कटिं, वलित्रय तेविं पोटीं । नाभी गभीर कशि वर्णिल ज्या न दृष्टी ?
बाहू विशाल बहु भूषणिं शोभलेले । वक्षस्स्थलीं हरिनखें, नग चारु ठेले ॥
तें रत्नहारपदकीं उर कांतिधारी । तैसें चि ज्या भृगुपदच्छवि रम्य भारी ! ॥
ज्या कंबुकंठ, अतिमोहक हो हनूही । वक्त्रीं अनंत मदनच्छवि लीन राही !
तें दंतयुग्म वर खालिल, ओष्ठ लाल; । नासा तिलादिक विभा कसि वर्णिजल ? !
ते कर्ण सुंदर, मनोहर ते कपोल । ते बोबडे मृदुल लाडिक गोड बोल ॥
नीलांबुजद्युति विशाल विलोचनाभा । भ्रू वक्र, भाल धरि पिंपळपानशोभा !
ते स्निग्धकेश कुरळे शिरिं कृष्णकांति । माता जयां करित नीट पुनः पुन्हां ती ॥
अंगीं झगा पहिरला पिंवळा असा तो । रांगूनि जानुकरिं राम विमोहवीतो !
तें रूप वर्णुं शकती नच वेद, शेष । स्वप्नीं तरी निरखि, तो लव वर्णु त्यास; ॥
जो सौख्यसार, नच पार कुणाहि ज्याचा । तो प्रेमभक्तिवश बालक होय साचा ! !

ज्ञान वागिन्द्रियातीत मोहशून्य असा हरी ॥
पुण्यशैशवलीलांनीं वडिलांच्या मना हरी ॥२१॥

— इति बाललीलावर्णनं नाम त्रयस्त्रिंशतिस्तरङ्गः —

## तरंग ३४ वा

माता पिता खचित जो भुवनत्रयासी । साकेतवासिजन तो करि मग्न हर्षी ॥
जे होत गौरि! रघुनाथपदाब्जलीन । त्यांनाच हो सुलभ तो सुखसिंधु पूर्ण ॥१॥

रामा विमुख होत्रोनी केल्याही यत्नकोटिंनीं ।
भवपाशांतुनी कोण सुटाया शक्त हो जनीं ? ॥२॥

केलें जिनें स्ववश सर्व चराचरातें । मायाहि ऐशि भयभीत जया स्तवीतें; ॥
जो तीस नाचवि निजभ्रुकुटीविलासें । सोडून त्यास, भजणें कवणासि कैसें ?॥३॥
वाक्कायचित्तिं जर राघवभक्ति होय । टाकून गर्व ममतादिक सर्व वाय ॥
ऐसें घडे तर कृपा रघुनायकाची । व्हायास कांहिंहि उणीव मुळीं नसेचि ! ॥

न जाणे कौसल्या दिनरजनिही रामजननी ।
कसे जाती अष्टप्रहर दिनिंचे नेणत मनीं ॥
सुतस्नेहोद्रेकें शिशुचरित लीला निजमुखीं ।
किती गीतीं गाई अमृतमय आई अति सुखीं ॥५॥

एकदां बालरामासी कौसल्या न्हाउं घालुनी ॥
तीट काजळ लावूनी निजवी त्यास पाळणीं ॥६॥
स्वतांही स्नान करुनी आपुले कुलदैवता ॥
भगवान् गिरिजानाथा पूजी ती भक्तिभाविता ॥७॥
देवा नैवेद्य अर्पोनी जाई ती पाकमंदिरीं ॥
पुन्हां देवघरीं ये तों देखे जेवितसे हरी ! ॥८॥
घाबरी होय चित्तांत धावुनी पाहि पाळणा ॥
तों तेथें दिसला राम झोंपला बाळ देखणा ॥९॥
देवागारीं पुन्हां देखे तों बघे राम जेवतो ॥
हृदयीं घाबरी होय माय देखुनि भास तो ॥१०॥

गळे धैर्य, गमे तीतें, काय हें सत्य कीं भ्रम ॥
आकुला बघुनी माता हांसला शिशुसत्तम ॥११॥

मातेसि दर्शवित अद्‌भुतरूप राम । ब्रह्मांडकोटि धरि ज्यामधिं रोमरोम ॥
ऐसें अनंत निजरूप, जयांत भानू । सोमादि, शंभुविधि, कोण शकेल वानूं ?
देखे असंख्य गिरि, अब्धि, नद्या, धराही। ज्ञान, स्वभाव, गुण, काल अतर्क्य ते ही
जीं दृष्ट ना श्रुत कधीं आशींही कितीक । दृश्यें बघे नवलपूर्ण तदा सुरेख १३
मायाहि तेथ दिसली तिजला अमेया । जोडूनि हात, भयभीत तयाच ठायां ॥
ती ज्यास नाचवि, दिसे तिज तेथ जीव । भक्तीहि मुक्त करि त्यास निरीक्षि माव

कौसल्या तैं पुलकिततनू शब्द कांहीं फुटेना ।
डोळे झांकी प्रभुपदिं नमी, भक्तिभावांत लीना; ॥
ऐशा तीतें बघुनि विभु तो रामचंद्र स्वरूप ।
बाल्याचें तें पुनरपि धरी; सर्व लीला अमूप ! ॥१५॥
कौसल्येतें स्तुतिहि न सुचे, वाटली तीस भीति ।
कीं विश्वाच्या जनकिंहि कशी ठेविं मी पुत्रवृत्ति ॥
मातेलागीं समजवि किती सांगुनी रामराय ।
बोले 'ना हें कळवुंस कुणा !' तेधवां तुष्ट माय ॥१६॥

पुनःपुन्हां माउलि हात जोडुनी करीत त्यातें विनती सुहासिनी ॥
"माया प्रभो रे! तव ना कधीं मला व्यापो! असावी मम धी विनिर्मला

॥ इति श्रीरामबालचरित्राद्‌भुतरसवर्णनं नाम चतुस्त्रिंशतितरङ्गः॥

## तरंग ३५ वा

बहुपरि शिशुलीला श्रीहरी आचरी तो, सकल निजजनांना जो प्रहर्षे भरीतो
परिजनसुखदायी बंधु ते कांहिं कालें दशरथसुत सर्वी आपुल्या थोर झाले १

चूडाकर्मा आचारी तैं वसिष्ठ विप्रां लाभे दक्षिणा भूरी इष्ट ॥
चारीही ते बाळ रम्या स्वलीला । दावोनीयां जाति साऱ्या दिशांला ॥२॥
कर्मा, चित्ता, वाणिला जो अगम्य । खेळे भूपप्रांगणीं तो सुरम्य ॥
बोलावी त्यां भोजनातें नृपाळ । ना ते येती टाकुनी मित्र बाळ ॥३॥

कौसल्या जों जाय त्यां बोलवाया । तो लाडीकें लागती ते पळाया ॥
वेदांनाही गम्य जो 'नेति' 'नेति'। त्यातें आई धांवुनी आकळी ती!! ॥४॥
शंभूतेंही लागला ना यदन्त । कौसल्या त्या दाटुनी आणि आंत ॥
ज्याचीं अंगें धूसरें धूलिसंगें । त्या रामातें तात मांडीवरी घे ॥५॥
चित्तीं त्याच्या खेळ हो जेवतांही । दृष्टी साऱ्या चूकवोनी पळेही ॥
उष्टया हातीं तो दहींभात सारा,। उष्टया तोंडीं धांवतो बाळ सैरा! ॥६॥

चरित्रें शिशुरामाचीं वाक्श्रुती शंभुशेषही ॥
मनोज्ञें, सरलें गाती धन्य तेणें असे मही ॥७॥
ऐशा या बाललीलांनीं चित्तें ज्यांचीं न रंगती ॥
निर्मिले ते विधात्यानें करंटे केविं दुर्गति ! ॥८॥
होतां ते सर्वही भ्राते कौमार्याप्रति भाजन ॥
गुरु माता पिता यांनीं केलें तद्व्रतबंधन ॥९॥
गेले गुरुगृहा राम विद्या सर्व पढावया ॥
अल्पकालेंचि त्या साऱ्या आत्मसात् जाहल्या तयां ॥१०॥
ज्याच्या सहजनिःश्वासें जन्मल्या चारही श्रुती ॥
तो हरी पढतो विद्या सांगणें चित्र हें किती ?॥ ११॥
विद्याविनयसंपन्न गुणशीलादिभूषित ॥
क्रिडा खेळति त्या त्यांच्या राजत्वासि विराजत ॥१२॥
कराब्जां सुषमा त्यांच्या चापबाणें अतीव ये ॥
रूपशोभा पहातां ती चराचर भरे स्मयें ॥१३॥
ज्या मार्गें जाति ते बंधु विहारास्तव, तेथिल ॥
नरनारी बघोनी त्यां होती चकित केवल ॥१४॥
आबालवृध्दतरुणां अयोध्यानगरांतल्या ॥
रामीं हो अधिक प्रीति प्राणांहुनिहि आपल्या ! ॥१५॥

घेऊनि संगतिं सखे निज, आणि बंधु । श्रीराम जाइ मृगयेसि दयैकसिंधु ॥
जे मेध्य होत मृग त्यांसचि नित्य मारी आणूनि दाखवि नृपाप्रति तो शिकारी ॥
जे मारिले हरिण काननिं रामबाणें । स्वर्गासि ते रिघति कीं हत राघवानें !
एकत्र सर्वजण जेवति बंधु मित्र । तातोक्त सर्व करिती विजयी सुपुत्र ॥१७॥

जेणेंकरूनि सुख पौरजनांसि व्हावें । तैसेंचि आचरित ते सकृप स्वभावें ॥
ते ऐकती सकल वेदपुराणसूक्ति । बंधूंसि राम निज बोधुनियां कथी ती ॥१८॥
ब्राह्मीं मुहूर्तिंच उठे रघुराय नेमें । मातापित्यां गुरुजनां सुखवी प्रणामें ॥
तो पौरकार्य करि आदिशलें पित्यानें । हर्षांन्चिया परम कोटिस तो तया नें ॥१९॥
जो व्यापक प्रभु अनीह अनामरूप । जो कीं अजन्म, न कळे कवणा, अमूप ॥
तो भक्तकारण अनेक चरित्रलीला । दावीतसे परम पावन सर्व कालां ॥२०॥

इति श्रीराम-कौमार-पौगण्ड-परमविचित्रचरित्रवर्णनं नाम पञ्चत्रिंशतिस्तरङ्गः ।

## तरंग ३६ वा

या सर्व चरितातें मीं गाइलेंसें सविस्तर ॥
पुढील सत्कथा आतां ऐकोनी घ्यावि सादर ॥१॥
विश्वामित्र महाज्ञानी मुनिवर्य विराजत ॥
राहोनि काननीं त्यातें निजाश्रमचि मानित ॥२॥
यज्ञयोगजपादी जें आचरी तो महामुनि ॥
तें मारीचसुबाहूंच्या भीतीनें जाय लोपुनी ॥३॥
चालतो यज्ञ देखोनी विध्वंसायास राक्षस ॥
येतां ते बघुनी होत ऋषि उद्विग्नमानस ॥४॥
गाधिपुत्र मनीं चिंती, ' वधाया राक्षसाधमा ॥
न समर्थ असे कोणी वांचूनि पुरुषोत्तमा ' ॥५॥
तोंवरी स्मरलें त्यातें ' भूभारहरणास्तव ॥
भूवरी पातला आहे करुणानिधि माधव ॥६॥
या मिषें तरि पाहीन प्रभूचें चरणांबुज ॥
बंधुद्वया प्रार्थुनीयां वदेन हृदिंचें गुज ! ॥७॥
सकलज्ञानवैराग्यसद्गुणायतनेश्वरा ॥
डोळे भरुनि पाहीन उत्कंठा हे मदंतरा ' ॥८॥

अशा प्रकारें बहु चिंतुनी मनीं । मुनी अयोध्येप्रति येउनी क्षणीं ॥
स्नानादि सारें सरयूजलीं करी; । येई नृपोत्तंससभेस सत्वरीं ॥९॥

कळे नृपा जैं मुनिवर्य येतसे । विप्रांसवें स्वागत तो तया पुसे ॥
सन्मानुनी वंदुनि त्या ऋषीप्रती । सिंहासनीं बैसवि त्याधि भूपति ॥१०॥
प्रक्षाळुनी तत्पद पूजि सादर, । वदे ' नसे मत्सम धन्य भूवर ' ॥
नानापरी भोजन त्यास घालुनी । केला नृपाळें अति तुष्ट तो मुनि ॥११॥
घाली तयाच्या पदिं चारही सुत; । देखोनि रामा मुनिभान विस्मृत ! ॥
पाहोनि त्याची मुखभा अलौकिकी । तो पूर्णचंद्रीं रमला चकोर कीं ? ॥१२॥
प्रसन्नचित्तें नृप बोलला, ' मुने ! । केली कृपा आजवरी न कां ? ' म्हणे—॥
'हें आज आलां मुनिवर्य ! कां बरें ? । वदा मला धन्य करावया त्वरें '॥१३॥
वदे मुनी ' पीडिति फार राक्षस, । करावया याचन पातलों तुस ॥
बंधूसवें दे मज राम, जो करी । सुधन्य मातें; पिशिताश संहरी ॥१४॥
अज्ञान, मोह त्यजुनी मनांतले, । द्यावेस मातें सुत दोनि आपले ॥
लाभेल तेणें तुज पुण्य, कीर्ति रे ! कल्याण यांचेंहि घडेल साजिरें ! ' ॥१५॥
वाणी अशी अप्रिय ऐकुनी अती, । नृपाल कांपे; लपली मुखद्युति ॥
म्हणे 'अहो ! हे सुत वार्द्धकांतले,। आहेत माझ्या, तुम्हिं हें न चिंतिलें! ॥१६॥
मागा मुने ! भू, धन,कोश, धेनु वा । सर्वस्व देईन तुम्हां न वानवा ! ॥
न प्राणदेहांहुनि कांहिं लाडकें, । अर्पीन तेही निमिषीं तुम्हां निकें ॥१७॥
प्राणांपरी सर्वचि पुत्र लाडके, । द्याया तुम्हां राम, मुने ! न मी शकें ॥
कठोर ते घोर कुठें निशाचर ? । किशोर कोठें मम पुत्र सुंदर ? !' ॥१८॥
वात्सल्यपूर्णा परिसोनि ती गिरा । सुज्ञा मुनींच्या अति हर्ष अंतरा ॥
वसिष्ठ तेव्हां समजावि सर्वथा । भूपांतरींची शमवूनियां व्यथा ॥१९॥
प्रेमादरें बोलवि पुत्र भूपति । धरूनि पोटीं, पढवी तयां किती ! ॥
म्हणे, ' मुने ! प्राणचि दोनही सुत, । तुम्ही पिता, अन्य न कोणि त्यांप्रत ! '॥
बहुपरि नृप आशीर्वाद पुत्रांसि देई । मुनिकरिं मग तेणें सोंपवीलें द्वयाही ॥
प्रभु निजजननीच्या जाउनी मंदिरांत । पदकमळ तियेचें वंदुनी हृष्ट जात ॥
दोघेहि वीर नरसिंह कृपानिधान । विश्वास कारण तसे, करणार्थ पूर्ण ॥
हर्षेंचि ते निघत त्या ऋषिच्या समेत । तच्चित्तभीति पळवीत क्षणीं समस्त ॥२२॥

—इति श्रीविश्वामित्रागमनश्रीरामयात्रावर्णनं नाम षट्त्रिंशतितरङ्गः ।—

## तरंग ३७ वा

अरुण लोचन, बाहु विशालसे । विपुल वक्ष मनोज्ञ अती दिसे ॥
सुतनु नील सरोरुहकांतिची । वरतमालदलाभविभा तिची ॥१॥
वसन पीत, कटीस विराजलें । कुशिं निषंग भले लटकावले, ॥
रुचिर सायक चाप करद्वयीं । असित गौर तनू अति चारु ही ॥२॥
उभय बंधु कुमार महानिधि, मुनि नृपाकडुनी जणुं घे सुधी ॥
मुनि म्हणे 'मनिं हा प्रभु जाणला; सदय भूपवरें दिघला मला !' ॥३॥
मुनि तसें चलतां पथिं ताटका । रघुवरा क्षितिपाळकुमारका ॥
सहजिं दाखवि, तों अति वाम ती । विकट धांवलि त्यांवरि दुर्मति ॥४॥
शर तिच्यावरि एकचि सोडुनी । प्रभु तिचे असु शोषुनि घे क्षणीं ॥
तिजसि मुक्ति दिली सदयेश्वरें । निजपदीं तिज ठेवियलें खरें ! ॥५॥

स्वतांच्या स्वामीतें उमजुनि मनीं हर्षभरित ।
तया विद्यानाथा मुनि निजहि विद्या वितरित ॥
प्रभावानें जीच्या अतुल बलतेजां मिळवुनी ।
क्षुधा तृष्णा त्रासा चुकवित कुमारद्वय क्षणीं ! ॥६॥

निजाश्रमीं आणुनि त्या प्रभूतें । शस्त्रास्त्र सारें मुनि देत तें तें ॥
दे भक्तकल्पद्रुम देवराया । तो कंद मूलें फल भोज्य खाया ! ॥७॥
प्रभातीं मुनीतें वदे रामराय । तुम्ही निर्भयें चालवा यज्ञकार्य ॥
तदा होमकर्मीं मुनी मग्न सारे । जयां होति राम स्वतां रक्षणारे ! ॥८॥
तसें ऐकुनी क्रुद्ध मारीच आला सहायांसवें यज्ञविध्वंसनाला ॥
तया राम हाणी फलावीण बाण । दुरीं सिंधुच्या पार त्या फेकि तूर्ण ॥९॥

एकाच पावकशरें मग रामानें सुबाहुवध केला ॥
इतरहि राक्षसगण तो लक्ष्मणरायेंचि मृत्युपथिं नेला ! ॥१०॥
मारूनि सर्व असुरां ब्राह्मण निर्भय समस्त जे होती ॥
तें त्या रघुवीरांना देवमुनी वानिती प्रसन्नमतीं ॥११॥
तेथेंचि राहुनि तदा बहु दिन रघुराय सदय हृदयानें ॥
दावी अनुग्रह किती विप्रांना तोषवीत विनयानें ॥१२॥

ऐके विप्रांकडुनी भक्तिपुरस्सर कथापुराणादि ॥
यद्यपि होतें ज्ञातचि सर्वशा तें समग्रही आधीं ! ॥१३॥
मुनिवर्य तदा प्रभुतें सांगे सादर " बघावया नवल ॥
जाऊं सारे आपण दुर्मिळ दावी प्रसंग भूमितल " ॥१४॥
कार्मुकयज्ञा परिसुनि रघुवर संतुष्ट जाहले चित्तीं ॥
मुनिवृंदसंगतीं ते निघती मिथिलेसि जावया सुमती ॥१५॥
मार्गांत एक आश्रम त्यांतें दिसला परी तयांत नसे ॥
खग मृग अथवा जीवनधारी जंतू कुणी न तेथ वसे ॥१६॥
एका शिलेसि तेथें पाहुनि मुनितें पुसे रघुकुलेश ॥
सकल कथा मुनि तेव्हां सांगे प्रभुतें सविस्तर विशेष ॥१७॥
" गौतमपत्नी झाली शापानें जी शिलाशरीर अशी ॥
तव पदपद्मरजांची पाहे ती वाट; करिं कृपा तिजसी " ॥१८॥
पदरजें तशीं पुण्य पावनें । उपलिं लागतां शोकनाशनें ॥
प्रकट जाहली गौतमांगना । शुभसती तपःपुंज शोभना ॥१९॥
सकलसौख्यदा राघवाप्रती । करयुगांबुजें लीन जोडि ती ॥
हृदय भक्तिनें पूर्ण भारलें । पुलक अंगिंही हो उभारले ! ॥२०॥
गहिंवरें गिरा कंठिं दाटली । नयनिं अश्रुची धार लोटली
चरणिं लागुनी राघवाच्चिया । वदलि ' मत्समा नान्य विश्वि या ! ' ॥२१॥
धरुनि धीर ती राघवा बघे । अतिकुतूहलें भक्तिसौख्य घे ॥
प्रभुकृपेमुळें निर्मलें वचें । स्तवन ती करी रामकीर्तिचें ॥२२॥
" रघुवरा ! प्रभो ! रावणान्तका ! जनसुखांबुदा ज्ञानदर्शिका !
भवनिवारका ! विश्वपावना ! अघ निवारिं रे ! पद्मलोचना ! ॥२३॥
शरण मी तुला, होय राघवा ! पथ मला विभो ! तूंच आघवा ॥
सहज पापिणी स्त्री तुझ्याविना । कवण रक्षिता ? दीनरक्षणा ! ॥२४॥
मजसि शापिलें जें मुनीश्वरें । गमत तें मला फार साजिरें ! ॥
जणुं कृपाचि ती थोर जाहली । प्रभुपदांबुजें आजि पाहिलीं ॥२५॥
विदित लाभ हा शंकरा असे, । प्रभुवरा ! तुम्हां प्रार्थि मी असें ॥
तव पदांबुजीं भृंग मन्मन । सतत राहुं दे दंग होउन ॥२६॥

वर नको मला अन्य कोणता । सहज अज्ञ मी तूंचि जाणता ।।
मतिस माझिया शुद्ध तूं करीं । दृढ वसो तुझी भक्ति अंतरीं ! ।।२७।।
परमपावनी देववाहिनी । उगम पावली ज्या पदांहुनी ।।
मम शिरीं पदें ब्रह्मवंद्य तीं । रघुवरा ! तुझीं आजि लागती ।।२८।।
चरणतीर्थ तें शंभुही धरी । निज शिरीं अति प्रीतिनिर्भरीं ।।
सदय ईश्वरा ! त्वत्पदीं रती । सतत ही असो पाप वारि ती " ।।२९।।
ऐशी अहल्या वदुनी स्ववाणी । प्रेमाश्रुनीं राघवपाद न्हाणी ।।
लोटांगणें घालि रघूत्तमातें । देई प्रभू तीप्रति इष्ट जें तें ।।३०।।
गेली अहल्या पतिलोकिं हृष्टा । जिची जगीं कीर्ति सतीवरिष्ठा ।।
श्रीराम ऐसा जगिं दीनबंधु । कृपा करी तो करुणैकसिंधु ।।३१।।
दयेसि तो कारण नैव पाहे । निर्हेतु त्याचा करुणौघ वाहे ।।
संसारजंजाल असार टाकीं । घे रामभक्ती तुलसी ! शठा ! कीं ! ।।३२।।

।। इति विश्वामित्रयज्ञरक्षणमहल्यातरणवर्णनं नाम सप्तत्रिंशतिस्तरङ्गः ।।

## तरंग ३८ वा

आले मुनींच्या सह रामलक्ष्मण । गंगा नदी जेथ जगासि पावन ।।
वंदी प्रभू सानुज जाह्नवीप्रती । चित्तीं अतिप्रीति धरी महामति ।।१।।
ज्या कारणें भूवरि आलि जाह्नवी । ती सत्कथा त्यां ऋषिवर्य ऐकवी ।।
ऋषीसवें स्नान तियेंत राघव । करिती ते बंधु सुनीतिवैभव ।।२।।
मुनींचिया संगति येति चालुनी । सानंद ते राजकुमार सन्मणि ।।
तैं राजधानी मिथिलापुरीप्रती । बघोनि होती हृदिं हृष्ट ते अती ।।३।।

वापी, कूप, नदी, सरें बहुविधा होतीं तिथें शोभत ।
ज्यांचीं स्वादुपयें सुधेसम जयां सोपान रत्नांकित ।।
नाना रंगिं विहंग गाति, फुललीं नानापरी अंबुजें ।
तेथें गुंजति भृंगसंघ मधुरारावें रसीं दंग जे ।।४।।
वाहे शीतल सौख्यदायक सदा सद्गंध मंदानिल ।
उद्यानीं सुमवाटिका विलसती उत्फुल्ल पुष्पाकुल ।।

माधुर्यें कलकूजनीं रत तिथें पक्षी किती नांदती ।
शोभा देति फुलें फलें किसलयें त्या राजधानीप्रती ॥५॥
वर्णवेल कशि ती पुरशोभा । सर्व वस्तु मनिं निर्मिति लोभा ॥
चारुदृश्य नगरींतिल पेठा, । हर्म्य दाविति अतीवचि थाटा ॥६॥
रत्नपूर्ण जणुं ती रचि वेधा । संपदा अतुल दे हृदिं मोदा ॥
जेथले धनदतुल्यचि वाणी, । नाहिं जेथ लवमात्रहि वाणी ॥७॥
पण्य वस्तु असती किति तेथें ; राजमार्ग शुचि सुंदर ते ते ॥
चारुदर्शन ल्हानहि वाटा । गंध निर्मिति सुवासिक लाटा ॥८॥
मंदिरें तिथलिं सुंदर सारीं । त्यां जणूं मदन मूर्त चितारी ॥
साधु सुंदर जिथें नरनारी । धर्मशील गुणवंत विचारी ॥९॥
निरुपम जनकाचा कोण वर्णी निवास ! । सुरहि चकित व्हावे देखुनी तद्विलास ॥
नवल मनिं विनिर्मी कोट मोठा पुरीचा । निरसि मद जणूं तो रम्य लोकत्रयाचा !
धवलवर्ण असे मणिमंदिर । कनकपट्टविराजित अंतर ॥
वसत जेथ मनोहर जानकी, । कवण वर्णिल तेथिल भा निकी ॥११॥
पुरीच्या त्या वेशी सुभग तरिही वज्रकठिना ।
सदा द्वारीं दाटी नृपभटनटां, चारणगणां, ॥
गजांच्या, अश्वांच्या विपुल पृथु शाला किति तिथें ।
जयांमध्यें हस्ती हय, रथ, किती नित्य वसते ॥१२॥
तसे योद्धे, मंत्री, चतुरमति सेनापति किती ।
जयांचीं सद्मेंहे नृपसदनतुल्यें विलसती ॥
तडागांच्या तीरीं क्षितिपति सरित्कांठिं अमित ।
तिथें आलेले ते वसति करुनी होति सुखित. ॥१३॥
बघोनी तैं योग्या वसतिस अशी आम्रतरुची ।
तिथें रम्या राई मुनि म्हणति ' येथें मम रुचि ॥
इथें सारे आम्ही उतरुं, रघुनाथा ! मम मतें ! ' ।
दयाब्धि श्रीराम प्रभु म्हणत ' माझेंहि मन तें ! ' ॥१४॥
तदा तेथें साऱ्या मुनिततिसवें ते उतरले ।
कळे तैं तें वृत्त प्रभु जनकरायाप्रति भले ॥

अति प्रीतीनें तो नृप निजसवें घे द्विजवर ।
गुरू, मंत्री, योद्धे निघत मुनिंभेटीस चतुर ॥१५॥
तयां वंदी राजा चरणिं शिर ठेवूनि विनत ।
मुनी आशीर्वादा वितरि जनकालागिं मुदित ॥
द्विजांनाही साऱ्या नृप नमित अत्यादरयुत ।
गमे भाग्या त्याच्या लवहि नच कीं पार उरत ! ॥१६॥
विचारी भूपातें मुनि कितिकदां क्षेमकुशल ।
स्वतांपाशीं त्यातें मुनि बसवुनी घेत विमल ॥
तदा तेथें आले दशरथशिशू बंधुयुगल ।
बघाया गेलेले कुतुकिं कुसुमोद्यान चपल ॥१७॥

सुश्याम गौर सुकुमार कुमार दोघे । त्रैलोक्यचित्तहर लोचन ज्यांत रंगे;
येतांचि ते सकलही उठले समान, । घेई स्वतांजवळिं त्यां मुनि बैसवून १८
झाले सुखी सकलही बघतां द्वयातें । हर्षांस्रु येति पुलकें वृतगात्र कीं ते ! ॥
पाहूनि सुंदर विमोहक राममूर्ति । होई विदेह जणुं सार्थ ' विदेह ' चित्तीं ॥
प्रेमीं निमग्न मन जाणुनि आवरूनी । चित्तीं विवेक करुनी नृप धैर्य आणी ॥
शीर्षें मुनीशपदिं नम्रपणें नमूनी । बोले सद्गद नरेश गभीरवाणीः— ॥२०॥
" सांगा मुने ! नयनसुंदर दोन बाळ । आहेत हे मुनिकुलोद्भव कीं नृपाळ? ॥
जें ब्रह्म वेद उपवर्णिति 'नेति नेति' । तें हेचि कीं उभयरूप अमूप मूर्ति!! २१
माझें विरागि मन जें सहजस्वभावें । तेंही चकोरपरि इंदुमुखीं रमावें ! ॥
मी याजसाठिंच पुसें प्रभुतें सुभावें । तें सांगुनी मुनिवरें मज हर्षवावें ! ॥२२॥
पाहोनि यां मनिं अती मम भक्ति दाटे ब्रह्मासिसौख्यहि फिकें मज आजि वाटे!"
हांसोनि सांगत मुनी, ' वदसी नृपा! जें । तें योग्य भाषण तुझें जगिं सत्य साजे!
जे प्राणिमात्र जगिं, त्यां प्रिय हे समस्तां !' । संवाद ऐकुनि वरि स्मित रामचित्ता ॥
बोले ऋषी 'रघुकुलोत्तम हे स्वपुत्र । प्रेषीयले दशरथें मजसाठिं मात्र ! ॥२४॥
हे रामलक्ष्मण मनोहररूपधाम । सामर्थ्यशीलनिधि पूरितभक्तकाम ॥
यांनींच यज्ञ मम रक्षुनि शौर्यतेजें । रक्षोगणां निवटिलें; जग साक्षि साजे!' ॥२५॥
राजा वदे " मुनिवरा ! तुमच्या पदांचें । पुण्येंचि दर्शन घडे मज आजि साचें!
माझें गमे खचित भाग्य अवर्णनीय । मी बंधु सुंदर बघें सितनीलकाय ॥२६॥

हे श्याम गौर हृदयंगम दोन बंधू । आनंदनंदन सुखप्रद सौख्यसिंधु ॥
प्रीती परस्पर जयांमधिं पात्रनी ती । ना वर्णवे हृदयगम्यचि जी सुरीति ”
आनंदुनी नृप म्हणे “ मुनि हो ! पहावें । ही ब्रह्मजीवसम तन्मयता स्वभावें ”
रामासि देखि मिथिलेश पुनः पुन्हांही । रोमांचकाय अधिकाधिक तुष्ट होई २८

बाखाणोनि मुनीसि नम्रपणिं तत्पादाब्ज वंदोनियां ।
जाई तो अवनीश आत्मनगरीं घेऊनि सार्‍यां तयां ॥
देई त्यांस निवास सुंदर असा सर्वर्तुसौख्यप्रद ।
पूजी तो मुनितें समग्र विधिंनीं सेवोनि घे संमद ॥२९॥

विदेह गेला मग आत्ममंदिरीं । ऋषींसवें भोजन राम आदरी ॥
विश्रांति घेऊनि सराम, लक्ष्मण । कांक्षी कराया मिथिलाभिवीक्षण ॥३०॥
परि प्रभूच्या, मुनिच्या भयामुळें । वदे न तो लक्ष्मण जें मनांतलें ॥
न दावि तो हेतु मनांत आणला श्रीरामरायें परि सर्व जाणला ! ॥३१॥
तैं भक्तवात्सल्य उफाळुनी मनीं । पुसे मुनीतें विनयस्मिताननीं ॥
श्रीराम आज्ञा मिळतां गुरुप्रिय । सांगे तयां लक्ष्मणकौतुकाशय ॥३२॥
“ प्रभो ! पुरीदर्शन कांक्षि लक्ष्मण संकोच भीती वदुं दे न त्या पण ॥
होईल आज्ञा जर आपुली तया । येईन मी दाउनि हो ! महोदया !”३३

ऐकोनी वच तें विनीत वदले प्रेमें मुनी राघवा ।
“ मर्यादा कशि पाळिशील न विभो ! तूं हेतु धर्मोद्भवा ॥
प्रेमें आकळिलासि तूं निजजनीं, तूं सौख्यदाता तयां ।
भक्तांची अनिवार आर्द्रहृदया ! तूंतेंचि यावी दया ! ॥३४॥

सुखनिधान तुम्ही द्वय बंधुही नगरदर्शन घेउनि या अहो !
वदन सुंदर दाखवुनी जनां नयनसार्थक त्यां सकळांसि हो ! ”॥३५॥

॥ इति जनकविश्वामित्रपरमरहस्यसंवादे श्रीराममुनिवाक्यपरमरसवर्णन नामाष्टात्रिंशतिस्तरङ्गः ॥

## तरंग ३९ वा

मुनिपदकमलांतें वंदुनी दोनि बंधू । निघत, सकल लोकां होत जे सौख्यसिंधू ॥
बघुनि अति मनोज्ञ राघवांची तशी भा । शिघ्रजन नगरींचे येति पाहूनि शोभा !

पीतवस्त्र कटिसी शरभातें । चारु कार्मुकशरां धरिती ते ॥
साजतें उटणिं चंदनिं अंग । श्यामगौरयुगिं सौख्यतरंग ! ॥२॥
सिंहकंधर विशाल भुजांचे, । रत्नहार उरिं उज्ज्वल ज्यांचे ॥
नेत्रपद्म अति सुंदर लाल । वक्त्रचंद्र भवताप हरील ! ॥३॥
कर्णिचें कनकपुष्प सुकांत । पाहतांचि हरि तें जणुं चित्त ! ॥
नेत्र चारु, कुटिलभ्रु वरी ती । भालिंचा तिलक भान हरीती ! ! ॥४॥
चारकोनि रुचिरा शिरिं टोपी । स्निग्ध केश शिरिं वक्र तथापि ॥
बंधु ते नखशिखान्तहि चारु । कांति ज्यांमधिं करीत विहारु ! ॥५॥

देखावया नगर राजकुमार आले । हें वृत्त जों विदित पौरजनांसि झालें ॥
तों सर्व तीं रिघति टाकुनि काम, सार्चीं । रकेंचि धांवति लुटी करण्या निधीची !
बंधुद्वया सहजसुंदर त्या बघोनी । होती सुखी जन; दिलें फल लोचनांनीं ॥
देखवाया युवति त्या गृहिंच्या गवाक्षीं ! । लागोनि, राम बघतां द्रवती मृगाक्षी ॥
प्रेमें परस्परवचें वदती विलोला । ' गे ! कोटिकामसुषमाभर यांत आला ! ॥
नाहीं तुला मुनिसुरासुरनागलोकीं । लावण्य यापरि कुठेंचि न ऐकिलें कीं ॥
विष्णूसि चार भुज; चार मुखें विधीतें । शंभूसि पंच वदनें, गलिं रुंडही तें ! ॥
सौंदर्यसार असलें दुसरें न कोणी । देवादिकांतहि गडे ! मम सत्य वाणी ! ॥
हें कोंवळें वय; जणों सुषमानिधान । हे श्यामगौरतनु, धाम सुखात्म पूर्ण ॥
यांच्या तनूवरुनि कोट्यनुकोटि काम । ओवाळिजेतिल सखे ! नयनाभिराम ॥
तो कोण गे ! जगतिं होय असा शरीरी । जो रूप हें बघुनि लुब्ध न होय भारी!' ॥
तेव्हां वदे दुसरि कोणि मनोज्ञवाणी । ' तूं शाहणे ! परिस जें मम येत कानीं ॥
हे दोनही दशरथात्मज गे ! कुमार । हे राजहंस जणुं चित्त विमोहणार ॥
हे रक्षिती शिशुहि कौशिकयज्ञ सारे । हा चापबाणधर राम अतुल्य सारें ॥१२॥
मारीयले किति निशाचर या द्वयानें । हें वीर्यधाम मखविघ्नतती ल्या ने ॥
हा श्यामलांग सरसीरुहलोचनाचा । मारीच आणाखि सुबाहु मथीत साचा ॥
कौसल्येचा पुत्र हा सौख्यखाणी । शोभे मूर्ती गोजिरी चापपाणि ॥
आख्या त्याची ' राम ' ऐशी विराजे । धन्या दृष्टी राघवातें बघे जे १४
हा जो किशोर वरवेष विराजताहे । श्रीरामपार्श्वि शरचाप धरूनि राहे ॥
तो रामबंधु लघु ' लक्ष्मण ' ज्यास नाम सौमित्रि सुंदर विनीत विलासधाम !

विप्रकार्य करुनी उभयांनीं । उद्धरीलि पथि गौतमपत्नी ॥
चापयज्ञ बघण्यास्तव आले । ऐकुनीसकलकर्ण निवाले ! ॥१६॥

रामच्छवी बघुनि बोललि एक रामा " सीता वधू खचित होइल योग्य रामा
पाहील या जनक गे! जर कां नरेश । त्यागूनही पण, सुता वितरील यास !"
कोणी म्हणालि ' नृप जाणत हे समस्त । संमानितो मुनिसि यांसिहि लोकनाथ
रायें परी पण न सोडियलाचि केला ! दुर्दैव त्याकरविं टाकविना हठाला !!'
कोणी म्हणे " जर विधी बुध योग्य देता देईल योग्य फल यांसहि कां न आतां?
मी सांगतें खचित यास वरील सीता । नाहिंच संशय गडे ! मज लेश चिन्ता !
ये योग यापरि जरी जुळुनी सुदैवें । त्रैलोक्यही मुदित होइल सौख्य पावे ॥
हा आमुचा सखि! अशास्तव एक काम । येतील कीं फिरुन येथ सभार्य राम !
ना येरवीं कधिंहि हे दिसणार आम्हां । भाग्याविना कवण पाहुं शकेल रामा ?
हो पूर्व जन्मि जर संचित पुण्य गांठीं तेव्हांच रामवदना बघणें स्वदृष्टीं !!"
बोले दुजी " खचित सत्यचि सांगतेस यांचा विवाह जगता करि सौख्यपोष"
कोणी म्हणे "हरशरासन फार मोठें ! हा सांवळा मृदुलगात्र किशोर कोठें ?२२
सारेंच होय असमंजस हें सये ! ग !" । तेव्हां दुजी करित कोमल वाक्प्रसंग
"आहेत हे सखि! लहान तरीहि यांनीं । केले पराक्रम महान्, म्हणतात कोणी
ज्याचें पदाब्जरज लागुनिही अहल्या होऊनि तीर्ण; अघपंक्ति तिच्या निमाल्या
तो राम काय शिवचाप न भंगणार ? । सीतेसि रामचि वरील गुणाढ्य वीर ॥
जो कीं विनिर्मित विधी अशि गोजिरी ती हा योजिला वर तयें तिज नीलकांति
हें निश्चयें समज गे ! सुविचारि वेधा !" ऐकोनि तें वचन हर्षति त्या सुमेधा
'ऐसेंचि होउं सखि !' त्या वदल्या मृदूक्ति त्या पुष्पराशि उधळीति सहर्षचित्तीं
रामा सुलोचनमुखी सुखसार घेती । ते बंधु जाति तिकडे सुखपंक्ति येती !!२६

—॥ इति जनकपुरदर्शनवर्णनं नामैकोनचत्वारिंशतिस्तरङ्गः ॥—

## तरंग ४० वा

जनकपुरिंच्या जाती पूर्वें सलक्ष्मण राघव ।
अवनिरचना जेथें केली धनुर्यजनास्तव ॥

सुबक पृथुला विस्ताराची अतीव मनोहरा।
विमल रुचिरा मध्यें वेदी विराजत बंधुरा ॥१॥
कनकमय ते होते तेथें चहूंवरि मंचक।
अवनिपतिंना बैसायातें विशाल गुणाधिक ॥
असति रचिलीं त्यांचेमागें कितीक वरासनें।
ताशिंच किति तीं होतीं उच्च स्थळीं, न जयां उणें ॥२॥
पुरजन जिथें बैसों यावे अशीं कितिक स्थलें।
रचिलि विपुलें कौशल्यानें तयांमधि निर्मलें ॥
निकटचि तयां माड्या होत्या विशाल विशुभ्रशा।
कुलयुवतिंना बैसायातें सुयोग्य न त्या कशा? ॥३॥
विविध परिंच्या रंगीं युक्ता मनोरम बैठकी।
सुरचित तिथें केल्या होत्या, न भा वदवे निकी! ॥
सकल रचना जी जी तेथें प्रभुप्रति आदरें।
शिशु नगरिंचे दावीती तैं मृदूक्तिभरें बरें ॥४॥
प्रभुसि शिशु ते प्रेमानें तैं हळूंच कथामिषें।
बघति कुतुकें स्पर्शोनीही तयां उभयां तसें, ॥
हृदिं मुदित ते संस्पर्शोनी मनोज्ञ रघूत्तमीं।
पुलकिततनू होती सारे शिशु प्रभुसंगमीं! ॥५॥
जाणोनि प्रेमवश प्रभुरामा दाविती स्थलें जितुकीं ॥
प्रीतीनें पौरशिशू वाखाणुनि तेहि पाहती तितुकीं ॥६॥
जीं ज्यांस आवडावीं तीं त्यांनीं राघवांसि दावावीं ॥
श्रीरामलक्ष्मणांनीं आवडिनें तीं समग्र देखावीं ॥७॥
बघुनि स्वतांहि रामें दावावी लक्ष्मणासि ती रचना ॥
वर्णन करूनि सांगे बोलुनि मृदु मधुर रम्यतम वचना ॥८॥
ज्याचा आज्ञालवही निर्मी निमिषार्धिं सर्व विश्वांना ॥
सकृप बघे चापमखस्थाना तो राम कुतुकसंपूर्णा ॥९॥
तें कौतुकें पहातां झाला कांहीं विलंब यास्तव ते ॥
चित्तीं गुरुची भीती धरुनी निघती त्वरें स्ववासातें ॥१०॥

अहल्योद्धार

सं. नं. ग्रंथ ...



पदरजें तरी पुण्य पावनें । उपलि लागतां शोकनाशनें ॥
प्रकट जाहली गौतमांगना । शुभसती तपःपुंज शोभना ॥ १९ ॥
मुक्तेश्वरमानस बालकांड तरंग ३७–१९

ज्याच्या भयें भयसहि वाटावें भय असा सुरेश्वर तो ॥
दावी स्वाचरणानें भक्तिगुणां ज्यांस साधु आदरतो ॥११॥
त्या पौर बालकांना प्रेमें मृदु मधुर गोष्टि बोलून ॥
दिधला निरोप रामें; आले मग उभय आत्मगृहिं तूर्ण ॥१२॥
प्रेमें भयें सुविनयें अतिसंकोचें कुमार ते दोन ॥
बसती आज्ञा घेउनि गुरुची तत्पादपद्म वंदोन ॥१३॥
गुर्वाज्ञेंकरुनि तसें संध्यावंदन समाचरिति सारे ॥
रात्रीचे प्रहरद्वय पुराणगोष्ठीतिहासिं रमणारे ॥१४॥
मुनिवर शयन करिति तैं दोघेही चेपती पद तयांचें ॥
वानावें कैशापरि त्यांचें तें प्रेम गुरुवरिल साचें ! ॥१५॥
ज्याच्या पदपद्मांच्या प्रीतीस्तव जपतपें करिति योगी ॥
नानापरी विरागी बंधुद्वय गुरुपदाब्जसुख भोगी ॥१६॥
मुनिवर करि त्यां आज्ञा किति वेळां तैं करावया शयन ॥
जाई तें बंधुद्वय परि लक्ष्मण चेपि रामपदनलिन ॥१७॥
करिं धरुनि पादकंजें रामाचीं चुरित लक्ष्मण सभक्ति ॥
तो भीत भीत लावी निज हृदिं तीं मुदित होउनी चित्तीं ॥१८॥
प्रभु किति सांगे 'बाळा ! आतां रे नीज, कां बससि अजुन ?' ॥
तैं लक्ष्मण निज हृदयीं ध्यात श्रीरामचरण, करि शयन ! ॥१९॥
ऐकोनि कुक्कुटरवा, सरतांचि रात्र। आधींच लक्ष्मण उठे, प्रभुही सुगात्र ॥
ज्ञानी जगत्प्रभु उठे गुरुच्याहि आधीं। ते ऊठती युगल बंधु विनीतबुद्धि ॥
प्रातःकार्यें सर्वही संपवोनी। स्नानादीही नित्यकर्में करोनी ॥
वंदोनीयां स्वामिपादांबुजातें। पूजापुष्पें जाति आणावया ते ॥२१॥
राजोद्यान बघोनि सुंदर तिथें ते तैं मुदें पाहती।
उद्यानावरि ज्या वसंत ऋतुही स्वप्रीति दावी अती ॥
नाना सुंदर शोभती तरु तिथें वेलीहि नानाविधा।
ज्यांचे मंडप, कुंज उत्तम, अशी उद्यानिंची संपदा ॥ २२ ॥
पुष्पपल्लवफलीं भरलेले। वृक्ष ते सुरनगादिक ठेले ! ॥
कीर-चातक-चकोर-पिकादि। गाति, नाचति मयूरहि मोदीं ॥ २३ ॥

उद्यानमध्यीं सर एक सुंदर। सोपान रत्नांचित ज्या मनोहर ॥
स्वच्छांबु पद्में बहुरंगिं ज्यांतलीं। हंसादिकें कूजति, रुंजती अली ॥२४॥
उद्यान तैसें बघुनी सरोवर। हर्षें भरे लक्ष्मणराघवांतर ॥
आराम रामासहि देत जो असा। आराम तो रम्य वदूं जि! कायसा? ॥२५॥

॥ इति धनुर्यज्ञदर्शनवाटिकागमनवर्णनं नामचत्वारिंशस्तरङ्गः ॥

## तरंग ४१ वा

माळ्यांना पुसुनी कुमार फिरती बागेमधें तेधवां।
आनंदें खुडुनीहि घेति रुचिरां पुष्पां तशां पल्लवां ॥
आली होति तिथें तयाच समयीं सीता सख्यांसंगतीं।
गौरीपूजनहेतुकारण जिला माता तिची धाडि ती ॥१॥
सख्या संगें तीच्या चतुर रुचिरा गाति मधुर।
तडागाच्या तीरीं निरुपम उमामंदिरवर ॥
जयाच्या सौंदर्या बघुनि नयनां लोभ उपजे;।
किती वानावें तें सुभग गिरिजास्थान शुचि जें! ॥२॥
ती स्नान आचरि सख्यांसह त्या तडागीं। गौर्यालयीं मुदितचित्ति रिघे शुभांगी ॥
पूजी उमेसि अति सादर भक्तिभावें। प्रार्थी 'सुयोग्य वर लाभुनि भव्य व्हावें!'
सीतेसि सोडूनि तिची सखी कुणी। गेली बघाया फुलबाग ते क्षणीं ॥
देखोनि तेथें परि बंधु जोडि ती। मोहोनि येई झणिं जानकीप्रति ॥४॥
सख्या पहाती तशि तद्दशा जणूं। प्रेमार्द्र डोळे पुलकांकिता तनू ॥
तेव्हां तिला त्या सख्या विचारिती। 'कोठूनि गे! हर्ष असा न ज्या मिति?'
"आलें कुमारयुग बाग बघावयातें। आहे किशोरवय सुंदरता किती ते? ॥
श्यामांग, गौरतनु,भा कशि कोण वर्णी। वाणीस ना नयन, ना नयनास वाणी!"
ऐकोनि हें वच सख्यां चतुरा तिच्या त्या। झाल्या प्रहृष्ट हृदिं कौतुकपूर्ण जात्या ॥
सीतामनींहि अति उत्सुकता बघोनी। तीतें वदे वच मनोज्ञ सखी शहाणी ॥७॥
'मीं ऐकिलें सखि! नृपालकुमार दो हे। आलेत काल मुनिसंगतिं येथ पाहें ॥
रूपें तयीं सकल पौर विमोहियेले नारी-नरां नगरिंच्या स्ववशत्वि नेलें! ॥

यांचेंच लावण्य समग्र लोक । जिथें तिथें वानिति निष्कलंक ॥
अवश्य गे ! आपणही बघाया । जाऊं तयां सत्वर, दर्शनीयां ' ॥९॥
सीतेसही बहुत आवडली प्रियोक्ति । सोत्कंठ त्यासि बघण्या अति ती स्वचित्तीं ॥
चाले सखीस करुनी पुढतीं तदा ती । प्रीती पुरातन कुणा कळणार होती ? ॥
तैं आठवोनि तिज नारदवाक्य सारें । सत्प्रेम पुण्यमय तद्हृदयीं भरारे ॥
देखे सभोंतिं जणुं बालमृगीच भीता । पाहावया रघुवरासि अधीर सीता ॥११॥
ऐकोनियां ध्वनि सकंकण किंकिणींचा । तैसा मनोहरण नूपुरराव साचा ॥
हे लक्ष्मणासि वदला मधुरोक्ति राम । कीं ' दुंदुभी निनदि विश्वजयार्थ काम!' ॥
बोलूनि हें तिजकडे बघतात राम । सीतामुखेन्दुवरि नेत्रचकोरधाम ! ॥
झाले अचंचल विलोचन राघवाचे दृग्वस्त्र टाकि निमि लाजुनि काय साचें !
सौंदर्य तें बघुनि हर्षित होय राम । चित्तीं प्रशंसित तिचें किति रूपधाम ॥
ना योग्यशब्दि करि दर्शित तो स्वभाव । देऊं शके उचित वाग्विभवा न ठाव॥
नैपुण्यपुंण्य निज वेंचि जणों विरिंचि । सीताविनिर्मितिसि, त्याविण हें न होचि ॥
शोभागृहा वितरि दीपशिखा सुकांति । सीताद्युती द्युतिसही वितरीत दीप्ति ॥
उच्छिष्ट सर्व उपमा कविवर्यि केल्या । वैदेहिवर्णनिं नकोतचि योजिलेल्या ॥
सीताच्छवी हृदिं करूनि निजस्थितीहि । श्रीराम बंधुसि वदे उचितां वचांहीं ॥
" हे लक्ष्मणा ! पुरिं जिच्यास्तव चापयज्ञ । हा होय ती जनकजा बघ ही मनोज्ञ
गौर्यर्चनार्थ सखिनीं तिज आणियेलें । उद्यान हें जणुं तिनें द्युतिदीप्त केलें !
हीची अलौकिक विभा बघुनी, मदीय । प्रक्षुब्ध हें सहजशुद्धहि चित्त होय ॥
जाणे समग्र ऋजुकारण एक धाता । माझे शुभावयव हे स्फुरतात ताता ! १८
हा कीं स्वभावचि खरा रघुवंशजांचा । नाहीं कुमार्गिं पदनिर्गम होत ज्यांचा
स्वप्नींहि देखिलि नसे परनार जेणें । विश्वास मद्हृदयिंचा दृढ मीच जाणें !
ज्यांची अरीसि कधिंही दिसते न पाठ । न स्त्रीवरी कधिं दुज्या मन ठेवि दृष्ट
ज्यांचा 'न'कार कधिं लभ्य न याचकांनें । विश्वांत अल्पचि असे नरहीर कीं ते!"
श्रीराम हें जरि वदे वच लक्ष्मणास । सीतेवरीच परि चित्त करीत वास ॥
तें मुग्ध होउनि जणों सुखसार साचें । सेवीत भृंगसम तन्मुखसारसाचें ! ॥२१॥

इति श्रीरामलक्ष्मणवाटिकाविहार-श्रीजानकीसौंदर्यशृंगाररसवर्णनं
नामैकचत्वारिंशस्तरङ्गः ॥

## तरंग ४२ वा

सीता बघे चहुंकडे चकिताक्ष बाला। चिंतीत 'ते नृपकिशोर कुण्या दिशेला' ॥
ज्या ज्या स्थलीं निरखि ते मृगशावनेत्रा। तेथें जणों उधळि ती सितपद्मपत्रां!॥१॥

लताकुंजामागें तिजसि सखया दाविति तयां।
सुनीला गौराभा, क्षितिपतिकुमारांसि उभयां॥
बघोनी त्यां सीतानयन हरिखें तेथ खिळले।
जणों ते त्यां ठेवे मिळत फिरुनी स्वीय पहिले!॥ २ ॥
बघोनि श्रीरामा जनकतनयानेत्र निवले।
न पातीं डोळ्यांचीं मिटति, तनुचें भान नुरलें॥
अतिस्नेहें तीची द्रवलि बघतां त्या ऋजुमति।
शरच्चंद्रातें कीं निरखित चकोरीच जणु ती!॥ ३ ॥
शहाणी ती आणी नयनपथिं रामा निजहृदीं।
मिटोनी घे पातीं जणु परत तो जाउ न कधीं!॥
सख्यांनीं ती जेव्हां हृदयरति तीची निरखिली।
मनीं लज्जायुक्ता नच जनकजा बोलुं शकली॥ ४ ॥
लताकुंजांतूनी प्रकट तितुक्यामाजि युगल।
जहाले ते बंधू जणु उभय इंदूच विमल!॥
रिघाले आकाशीं जलदपटलांतूनि गमती।
किती त्यांची शोभा, कविवरमती ज्यांत रमती!!॥ ५ ॥

ते दोन वीर सुषमानिधि जे असीम। नीलाब्ज-पीतजलजाभतनू निकाम॥
माथां विराजत मयूरमनोज्ञपिच्छें। शोभाविशेषभर ज्यांमधिं पुष्पगुच्छें॥६॥
भालीं टिळे विलसती, वरि घर्मबिंदु। भूषाद्युति श्रवणिं शोभलि सौख्यसिंधु॥
भ्रूवल्लि चारु, कुरळा कचभार शीर्षीं। डोळे नवांबुजविभा धरिती विशेषीं॥७॥
नासा हनू नयनसुंदर ते कपोल। तें हास्य लोल, मन हेंचि जयास मोल!॥
ती आननच्छवि मला कशि वर्णु यावी? जीच्यापुढें मदनकोटि अगर्व व्हावी॥८॥
वक्षस्थलासि मणिहार उदंड साजे। कंबूपमान अतिरम्य गळा विराजे॥
त्या कामकुंजरकरोपम शक्तिलोल। रम्या विराजति भुजा उभया विशाल॥९॥

"जो द्रोण पुष्पिं भरला धरि वामहस्तीं । तो सांवळा कुमर गे! अतिरम्यमूर्ति॥
हा सिंहशावकटि सुंदरशीलराशि । पितांबरें विलसला ! सखि ! देख त्यासी"॥
पाहोनि भानुकुलभूषण त्या कुमारा । सीतासखीजनिं लपे तनुभाव सारा ॥
एका सखी चतुर बोललि जानकीतें । हातीं तिचा कर धरोनि विनोदचित्तें ॥
'गे! ध्यान तूं करिसि कीं अजुनी उमेचें ?! । भूपालबाल तरि हा बघसी न कैंचें ?!'
संकोचुनी मनिं तदा जनकात्मजा ती । खोलूनि नेत्र बघि ती पुढतीं सुमूर्ति ॥
देखे समोरचि तदा रघुसिंह दोघे । ती सांठवोनि सुषमा हृदयांतरीं घे ॥
जाणोनि तें नखशिखान्त मनोज्ञरूप। चिंतूनि तात-पण ती रुसली अमूप॥१३॥
पाहूनि चिंतनपरा अतिमात्र सीते । झाल्या भयाकुल सख्या, वदणें किती तें ?॥
'येऊं पुन्हांहि इकडेच उद्यां अशा गे !'। बोले सखी हंसत एक विनोदरागें ॥
ती गूढ ऐकुनि सखीपरिहासवाणी । संकोचली जनकजा मनिं भी धरोनी ॥
झाला विलंब, जननीहि भरेल रागें। चित्तीं भरोनि झणिं राघवरूप ती घे!॥१५॥
वाटे पुन्हां तिज 'अधीन पित्या अशी मी '। देखूं बघे मृगविहंगमिषेंचि रामीं ॥
पाहे फिरूनि तरुपक्षिमृगादिकांना । न्याहाळि राम, नयनीं तिज तृप्ति हो ना! ॥
प्रेमें भरे अधिक ती परि घेत भीति । कीं शंभुचाप किति तें जड, कष्टमूर्ति ॥
तो श्यामलांग हृदयीं परि सांठवोनी । ती जाउं लागलि गृहा गुणरत्नखाणी ॥
जेव्हां बघे प्रभु, निघालि गृहासि सीता । ती स्नेहसौख्यसुषमागुणराशि मूर्ता ॥
सत्प्रेमपूर्णमासिनें मृदुशी तिची ती। तो चित्तभित्तिवरि काढित राम मूर्ति॥१८॥
दुर्गालयीं फिरुनि जाइ मनोज्ञ सीता । प्रार्थी उमेस नमुनी जुडुनी स्वहस्तां ॥
'हे अंबिके ! जयजयाजि ! गिरीन्द्रकन्ये । हे गौरि ! ईशमुखचंद्रचकोरि ! धन्ये! ॥
तूं जन्मदा गजमुखासि, षडाननासी । विश्वासि तूंच जननी अति दिव्य होसी ॥
ना आदि मध्य तुज, तेविं नसेंचि अंत । न त्वत्प्रभावगणनीं श्रुति ही समर्थ ॥

भवाची उत्पत्ति, स्थितिलय तुझ्या हातिं गिरिजे ! ।
विमोहीसी विश्वा; स्ववश असती खेळ तव जे ॥
सतींमध्यें श्रेष्ठा अतुल पतिदेवा गुणवती ।
न वाग्देवीशेषां अमित गुण तूझे गणवती ! ॥२१॥
तुझी सेवा देई सकल पुरुषार्थांसि वरदे ! ।
सदा श्रीशंभूचें हृदय रमणारें तुजमधें ॥

तुझ्या पादाब्जाची सुखद सकलांतें अपचिति ।
म्हणोनी भक्तीनें सुरनरमुनी त्यास जपती ॥ २२ ॥

तूं जाणसी मम मनोरथ सर्व गौरि! । सर्वांतरीं वससि तूं हृदयाधिकारी ॥
मद्भाव मीं उघड नाहिं, म्हणोनि, केला' । ऐसें स्तवोनि धरि ती पदिं अंबिकेला॥
तैं प्रेमभक्तिविनयें गिरिजा प्रसन्न । होऊनि हार उरिंचा पडला गळून! ॥
तो सत्प्रसाद म्हणुनी शिरिं घेइ सीता । हर्षें भरोनि वदली तिज विश्वमाता ॥
'आशीर्वचा जनकजे ! मम सत्य ऐक । होईल ईप्सित तुझें परिपूर्ण देख ॥
श्रीनारदोक्ति शुचि सत्य सदैव सीते ! । लाभेल तोच वर जो वरलासि चित्तें! ॥

मन तव ज्यावर बसलें तो वर सहजमनोहर सांवळा ।
करुणासागर मिळेल सुचतुर जाणत तव गुण आगळा ' ॥
परिसुनि यापरि उमावैखरी सीता हर्षलि सख्यांसवें ।
तुलसि म्हणे, मनिं नमुनि भवानी, जाती स्वसदनिं सर्व जवें ॥२६॥

प्रसन्नचित्ता बघुनी उमेसि तीं, सीता मनीं हर्षलि तें वदों किती ? ॥
वामांग तीचें स्फुरुं लागलें तदा, जें सूचवी मंगल मंजु संपदा ! ॥ २७ ॥

॥ इति श्रीराम-जानकी-पुष्पवाटिकाविहार-गौरीसत्यवर्णनं नाम
द्विचत्वारिंशस्तरङ्गः ॥

## तरंग ४३ वा

वाखाणीत मनामध्यें जानकीरूपलक्षण ॥
गुरुसन्निध ते बंधू पातले राम-लक्ष्मण ॥१॥
विश्वामित्रासि तो सांगे श्रीराम घडलें तसें ॥
स्वभावीं सरलीं त्याच्या कपटा वासही नसे ॥२॥
आणिल्या पुष्पि पूजोनी, बंधुयुग्मासि कौशिक ॥
'इष्ट लाभो तुम्हां ' ऐशा आशीर्वचनिं दे सुख ॥३॥
भोजनोत्तर ते ज्ञानी मुनि सांगति सत्कथा ॥
बोधप्रद पुराणींच्या दावोनी उत्तमा पथा ॥४॥

सूर्यास्तसमयीं आज्ञा घेवोनी गुरुच्या मुखें ॥
संध्यावंदन साधाया बंधुद्वय निघे सुखें ॥५॥
तों पूर्वभागिं बघुनी शशि हर्षसिंधु। तो जानकीमुख गमे सुखदायि इंदु ॥
चिंतूनि अंतरिं पुन्हां,परि राम मानी। "ये जानकीमुखतुला शशिला कुठोनी?
हा क्षारसिंधुसुत, बंधु हलाहलाचा, । तेजोविहीन दिनिं हा सकलंक साचा ॥
चंद्रांत ह्या गुणकला प्रतिकूल साऱ्या। ये जानकीमुखतुला कशि या विचाऱ्या ?!
तूं वाढतोस, घटतोस, सरोग होशी, । चंद्रा ! किती छळिशि तूं विरही विशेषीं !
संधी बघून तुजला ग्रसतोहि राहू। कोकांस शोकद; कसे तव दोष साहूं?॥८॥
तूं वैरि होसि कमलां, असल्या तुला मी। सीतामुखाशिं जर तोलुं म्हणेन नामी॥
होईल तो मदपराध अयोग्यसा रे !। सीतामुखीं गुण तुझ्याहुनि थोर सारे !"
जाणोनि रात्र बहु हो राघव ये परत आत्मवासातें ॥
विधुच्या मिषें तुलोनी सीतामुखचारुता सुहासा ते ॥१०॥
गुरुपाशीं येउनियां चरणसरोजांसि त्याचिया नमुनी ॥
विश्रांतिस्तव जाई, देई आज्ञा यदा तयांस मुनि ॥११॥
सरतांच रात्र राघव जागा होउनि बघूनि भावास ॥
बोलत "हा उगवतसे अरुण पहा लक्ष्मणा ! प्रभावास ! ॥१२॥
अरुण हा जगता सुखवर्षण, कमल-कोक-जनादिकहर्षण" ॥
परिसुनी, प्रभुशक्तिनिदर्शक वदत लक्ष्मण जोडुनि हस्तक ॥१३॥
"संकोचल्या कुमुदिनी अरुणोदयीं या। ताराहि लागति पहा मलिनाभ व्हाया॥
ऐकोनि आगमन हो तुमचें इथें हें। झाले नृपाळ बलदीप्तिविहीन, पाहें ॥
सारे नृपाळ जरि दाविति तेज, सान। नक्षत्रसे परि धनुस्तम वारिती न ॥
गेली निशा म्हणुनि हर्षति पद्म-कोक। पक्षी तसे भ्रमर हृष्ट पहा अनेक ॥
तैसे प्रभो ! सकल भक्तहि हृष्ट व्हावे ! ऐकोनि चापवरभंग इथें स्वभावें ॥
येतांचि भानु, सहजीं तिमिरा विनाश। तारा विलोपुनि जगीं पडला प्रकाश ॥
दावी निजोदयमिषें रवि हा नृपां या। भव्य प्रताप विभुचा जणु रामराया !॥
उद्घाटि भानु महिमा प्रभुच्या करांचा। हा सूचवी प्रकट कार्मुकभंग साचा!"
ऐकोनि हांसत मनीं प्रभु लक्ष्मणोक्त। सुस्नात होति मग ते मुळचेच पूत ॥
ते नित्यकर्म करुनी गुरुपाशिं येती। दोघे पदाब्ज गुरुचें विनयें नमीती ॥१८॥

इकडे भूप जनक शतानन्दासि बोलवी ॥
विश्वामित्राकडे राजा त्यास त्वरित पाठवी ॥१९॥
विश्वामित्रा निवेदी तो जनकाचें निमंत्रण ॥
मुनिही हृष्ट होऊनी बोलावी रामलक्ष्मण ॥२०॥
प्रभु येऊनि बसले शतानंदास वंदुनी ॥
निवेदी जनकाचें तो आमंत्रणहि त्यां मुनी ॥२१॥
" सीतास्वयंवरा जाऊं, वत्सांनो ! " वदला मुनि ॥
" पाहूं ईश्वर कोणातें महती देइ तोषुनी ! " ॥२२॥

वदे तदा लक्ष्मण " त्यास हें यश; । कृपाळु हो ! आपण व्हाल ज्या वश "
ही लक्ष्मणाची चतुरोक्ति हर्षवी । मुनींस; आशीर्वच देति ते कवि ॥२३॥
ऋषींसवें राम दयाळु तो पुढें । जाई धनुर्यागगृहांगणाकडे ॥
ये रंगभूमीप्रति बंधुयुग्म तें । हें वृत्त झालें जन सर्व ऐकते ॥२४॥
तैं सर्व काजें विसरूनि गेहिंचीं । ते यज्ञशालेप्रति येति सर्वचि ॥
सोत्कंठ नारी, नर, बाल, वृद्ध ते । असंख्य संमर्द मिळे मुदें तिथें ॥२५॥

बोलावूनि तदा सर्व आपुल्या साधुसेवकां ॥
राजा जनक आज्ञापी लोकां आसनदर्शकां ॥ २६ ॥
सर्वां स्थान तदा त्यांनीं दाविलें योग्यतेपरी ॥
उत्तमां, मध्यमां, हीनां, कनिष्ठां यज्ञचत्वरीं ॥ २७ ॥

॥ इति श्रीरघुनाथस्य जानक्या सह गोप्यविरहतापशतानन्द-
कौशिकवार्तावर्णनं नाम त्रिचत्वारिंशस्तरङ्गः ॥

## तरंग ४४ वा

त्याच क्षणीं रघुकुमारहि तेथ आले । सौंदर्यमूर्तियुग तें प्रगटूनि ठेलें ! ॥
ते सद्‌गुणाब्धि वरवीर महाप्रभाव । श्यामांग गौरतनु सुंदर सुस्वभाव ॥१॥
तें भासलें चतुर त्या क्षितिपालसंघीं । कीं पूर्णचंद्रयुग तारकितांबरांगीं ! ॥
ज्यांची जशी हृदयिं उद्गत भावना ती । तैशापरी दिसत त्यांप्रति राममूर्ति ॥२॥

भूपांस राम गमला रणधीर शूर । तो होय देहधर कीं रसमूर्ति वीर ! ॥
भ्याले तयास बघतां कपटात्म राजे । मानून तो रस भयानक मूर्त साजे ! ॥३॥
जे भूपवेषिं जणु राक्षस त्यांत होते । तो मूर्त कालसम राम गमे तयांतें ! ॥
ते दोन बंधु गमले नगरी जनातें । कीं लोकभूषण विलोचनसौख्यदाते ॥४॥
नारीहि हृष्टहृदयीं निज आवडीनें । त्यातें पहाति कुतुकें दयिताभिमानें ॥
शृंगारमूर्ति गमला प्रभुराम त्यांला । अत्यंत सुंदर तनू धरुनी उदेला ! ॥५॥
विद्वज्जनां प्रभु विराट् दिसला विशेषें । ज्यातें असंख्य मुखहस्तपदाक्षिशीर्षें ॥
ते वाटले प्रभु कसे जनकातलोकां ?। आप्त स्वकीयचि जणों निजगेहिंचे का ! ॥६॥
राज्ञीसवें जनकरायहि मानि राम । कीं आपलाचि शिशु तो हृदयाभिराम ! ॥
योग्यांस राम परतत्त्व गमे विशेष । जो शांत शुद्ध सम संतत चित्प्रकाश ॥७॥
ते दोन बंधु गमले हरिभक्तचित्तां । कीं इष्टदेव सकलां सुखभव्यदाता ॥
रामासि पाहुनि मनीं अति हृष्ट सीता । तत्प्रेम केविं कथुं येइल अन्यचित्ता ? ॥
सीतेसही कथवती निज हृद्रती न । ती केविं कोण कवि वर्णु शकेल पूर्ण ? ॥
जैशा प्रकारिं वसला हृदिं भाव ज्याचा । तैसा तयास दिसला प्रभुराम साचा ॥

ते शोभले भूपसमाजिं युग्मक । तेजस्वि जे कोसलराजपुत्रक ॥
त्या सुंदरश्यामल गोरट्या तनू । आकर्षित्या विश्वविलोचनां जणूं ! ॥१०॥

❀ ॥ इति श्रीरामराजसभाप्रवेशवर्णनं नाम चतुश्चत्वारिंशस्तरङ्गः ॥ ❀

## तरंग ४५ वा

मूर्ति त्या सहजसुंदर दोनी । कोटिकामहि उणे तुलनांनीं ॥
वक्त्र शारदशशीहुनि गोड । पद्मनेत्र पुरवी मनिं कोड ॥ १ ॥
दृष्टि काममद-नाशन रम्या । वर्णना कठिन, मानसगम्या ॥
लोलकुंडल विराजत कर्णीं । ते कपोलगुण शक्य न वाणीं ॥ २ ॥
रम्य ती हनु, मनोहर ओष्ठ । शब्द गोड मृदु मोहक कंठ ॥
तें स्मितास्य हरितें शशिकांति, । भ्रूधनू विकटरम्य किती ती ! ॥३॥
भालदेशिं विपुलीं तिलकाभा । केश लोपविति षट्पदशोभा ॥
चौतनी शिरिं विराजत पीत । मध्यि पुष्पकलिका द्युतिमन्त ॥४॥

पोटिं सुंदर दिसे त्रिवलीं ती । कंठ कंबुसम मोहकरीति ॥
मान ती त्रिभुवनीं द्युतिसारा । जी धरीत सुषमाभर सारा ॥ ५ ॥
मालिका तुळसिची उरिं साजे । हस्तिमौक्तिकसरांतहि गाजे ! ॥
सिंह ठेवण, वृषापरि अंस । शक्तिसागर भुजाहि विशेष ॥ ६ ॥
पीत अंबर कटीस सजे तें । शोभती कटितटीसहि भाते ॥
बाण साजति करीं धरलेले । स्कंधिं वामिं वरकार्मुक ठेलें ॥७॥
जानवें विलसलें शुचिपीत । चारुता नखशिखान्त सुमूर्त ! ॥
पाहुनी अतुलरूप तसें तें । नेत्र लुब्ध अधिकाधिक तेथें ! ॥ ८ ॥
तें बंधुयुग्म बघुनी, जनका प्रहर्ष । तो भूप वंदि मुनिचे चरणांबुजांस ॥
सांगे तयास पण आपण योजिलेला। दावीत रंग फिरुनी सकलां मुनींला ॥९॥
ते जेथ जेथ शिशु सुंदर दोन जात । साश्चर्य पाहति तयां जन तेथ तेथ ॥
आपापल्या रुचिं बघे जन सर्व रामा । जाणे न कोणि परि कांहिं विशेष मर्मा ! !
ऋषि म्हणे, " रचना अति उत्तम ! " परिसुनी नृपचित्तिं सुखोद्गम ॥
जनकराय अतीवचि हर्षला । अमृतमेघचि त्यावरि वर्षला ! ॥११॥
पाहूनि मंचक अनुत्तम भव्य सर्व । बंधुद्वया, ऋषिसि बैसवि तेथ राव ॥
देखोनि तेथ विभुतें हृतदीप्ति झाली । भूपालि, पूर्ण विधु पाहुनि तारकाली ! ॥
तैं वाटलें सकलचित्तिं सुनिश्चयें हें । ' रामासि चापवरभंग अशक्य आहे ! ॥
ना भंगतांहि भवचाप विशाल आतां । रामासि घालिलचि माळ मनोज्ञ सीता !'
' ऐसें असेल तर हो ! परतू बरातें । कीर्ति प्रताप बल तेज रमाउं ना तें ' ॥
हे बोल बोलति कुणी नृप, तों तयांतें । भूपाळ कांहिं हसती अविवेकि कीं तें ! ॥
गर्वान्ध ते वदति, 'हें चि वदाजि ! आम्हां । तोडूनही धनु मिळेल वधू न रामा॥
भंगाविनाचि मग केंवि तया मिळावी ? । काळास ही हरवुं; तो जर गर्व दावी !'॥
ऐकोनि तें, अपर भूप गुणाढ्य वीर । जे धर्मशील, हरिभक्त, विवेकशूर ॥
ते बोलले ' हरिल राम नृपालगर्वा । सीतेस तोच वरणार अजिंक्य सर्वां ॥१६॥
कां बोलुनी उगिच मृत्युसि बोलवीतां ? । ना चित्तमोदकिं शमे खरि भूक वार्ता ॥
ऐका तुम्ही कुशल; आम्हि कथूं तुम्हां तें । जाणा त्रिलोकजननी जनकात्मजेतें ॥
जाणा तुम्ही विश्वपिताच राघवा । स्वलोचनां तच्छवि पूर्ण दाखवा ॥
हे दोन बंधू हरचित्तिं राहते । गुणांबुधी सुंदर सौख्यदायि ते ॥१८॥

सुधासमुद्रा जवळील टाकुनी । 'मृगांबुच्या पाथिं मरा न धांवुनी ! ॥
जा जा ! तुम्हां वाटत तें करा तसें । आम्ही तरी आज कृतार्थजन्मसे !' ॥
ऐसें वदोनि हरिभक्त नृपाल रामा । पाहाति सादर अनुत्तमरूपधामा ॥
स्वर्गी विमानिं बसुनी सुरही पहाती । वर्षोनि दिव्य सुमनें मधु गाणिं गाती ॥
जाणोनि योग्य समया, मग पाठवीत । बोलावणें निजसुते मिथिलाधिनाथ ॥
तेव्हां सख्या चतुर सुंदर सर्व येती । सीतेसि घेउन तिथें बहुमानभक्ति ॥२१॥

॥ इति गुरुसंयुक्तश्रीरामरङ्गभूमिप्राप्तिवर्णनं नाम पंचचत्वारिंशस्तरङ्गः ॥

## तरंग ४६ वा

न सीतासौंदर्या कवणहि कधीं वर्णु शकती ।
गुणांची रूपाची खनिच जगदंबा भगवती ॥
तिला वर्णायाला सकल उपमा न्यून गमती ।
जणों त्या सामान्या युवतितनुच्या स्तोत्रिं रमती ! ॥ १ ॥
जरी सीते द्याव्या उपमिति पुन्हां त्याच, कवनीं ।
वृथा कोणीं घ्यावें अयश कुकवीचें डकवुनी ? ॥
स्त्रियांमाजीं सीते जर सदुपमा द्यावि उचिता ।
जगीं ऐशा योग्या युवति तरि कोठें निरखितां ! ॥ २ ॥
गिरा हो वाचाळा, दिसत गिरिजा अर्धतनु कीं, ।
रतीही दुःखार्ता, पति अतनु तीचा नच सुखी ॥
जिच्या हृत्प्रेमाच्या विष तशि सुरा बंधुभगिनी ।
रमा ती सीतेला उपमिति कशी योग्य बनुनी ? ॥ ३ ॥
जरी सौंदर्याचा अमृतनिधि, लावण्य परम ।
तळीं हो तें कूर्म, प्रचुरसुषमा रज्जु सुगम ॥
जरी शृंगाराचा, मथन करण्या, मंदरगिरि ।
स्वतां हस्ताब्जांनीं जर मदन तें मंथन करी ॥ ४ ।
अशा या रीतीनें जर नव रमा तेथ निपजे ।
सुखा सौंदर्यातें उगम जगतीं हो खचित जे ॥

तरीही सीतेला उपमिति तिची योग्य म्हणतां ।
कवीच्या बुद्धीला अतिशयचि संकोच गमता ! ॥ ५ ॥
चतुर त्या सखया तिजसंगतीं । म्हणत गाणिं मधुस्वनिं, चालती ॥
अतुल शोभतसे जगदंबिका । नयनसुंदर नेसलि अंशुका ॥६॥
तिजसि भूषविलें सखिनीं किती । कुशल लेववुनी सदलंकृति ॥
चरण रंगिं तिचे जंव लागती । बघुनि रूप तिचें जन मोहती ॥७॥
अमरिं दुंदुभि वाजविल्या त्वरां । कुसुमवर्षुक गातिहि अप्सरा ॥
करसरोजिं जिच्या जयमाळ, ती । जनकजा लव पाहि नृपांप्रति ॥८॥
चकित ती बघुं पाहत राघवा । नृपसमूह भुले तिज आघवा ॥
उभय बंधु बघे मुनिसन्निधीं । जडति नेत्र तिचे लभतां निधि ! ॥९॥
तेथें तदा गुरुजनां, विपुला समाजा । देखोनि हो जनकजा हृदिं जातलज्जा ॥
आणोनियां निज उरीं, परि राघवाला । राहे सख्यांसि जणुं पाहत चारुबाला ! ॥
बघोनि श्रीरामच्छवि जनकजेचीहि अतुला ।
निमेषोन्मेषांतें विसर सगळ्यांच्याच पडला ॥
मनीं सर्वांनाही अति कठिन चिंतार्ति दुखवी ।
परी लज्जेनें ना वदुनि, जन धात्यासि विनवी–॥ ११ ॥
"हरीं रे ! धात्या ! तूं जनकजडता वेगिं सकला ।
अम्हांऐशी त्याला हितकरमती देचि विमला ॥
जियेनें तो सोडो, न करुनि विचारा, पण निज, ।
परी, सीतारामां परिणयिं करो बद्ध सहज ! ॥ १२ ॥
तयें ऐसें केल्या स्तविल जगही त्यासि निखिल ।
न हें होतां हट्टें हृदिं जनक पस्ताव करिल ॥
वरा श्यामांगा या जनकतनया योग्य रमणी"
विचारीं या ऐशा सकल जनता रंगलि मनीं ॥ १३ ॥
बंदी जनांसि जनकें मग बोलवीलें । ते गात सर्व बिरुदावलि तेथ आले ॥
आज्ञापि त्यांसि नृप, 'मत्पण जा पुकारा !' । तें भाट हर्षभरिं ते निघती भरारा ॥
बंदी तदा उचित शब्दिं असें म्हणाले । "केला असे पण अहो ! जनकें नृपालें ॥
भूपाल हो ! सकलही परिसा सुचित्तें । आम्ही उभारुनि विशाल भुजा कथूं तें ॥

भूपालबाहुबल-चंदिर-राहुसें हो । हें शंभुचाप कठिनात्म गुरू अती, हो !
ज्या बाण, रावण असे भट मोठमोठे । देखोनियां धरिति ते निज शीघ्र वाटे
तें हें कठोर शिवचाप करील भग्न । जो आज वीरवर राजसमाजिं कोण
त्यातें त्रिलोकविजयासह जानकी ही । निःशंकचित्तिं वरणार असे विवाहीं"॥
ऐकोनि तो पण मनीं नृप साभिलाष; । मानी नृपाळ उठती परि साट्टहास !॥
बांधोनि कंबर, किती उठले सवेग । ते इष्टदेव नमिती प्रणतोत्तमांग ॥१८॥
साटोप नेटुनि हटें शिवचाप त्यांनीं । घालोनि हात धरिलें लवुनी कुथोनी ॥
कोटिप्रकारिं तर्थि लावुनि शक्ति सारी । तें पाहिलें उचलण्या, परि येचि हारी!॥
ज्याच्या मनीं लव तरी सुविचार होते । चापासमीपहि महीपति येत ना ते ! ॥
जे मूर्खभूप सजले उचलावयास । लाजोनि ते परतती जणुं सोपहास ! ॥२०॥
तैं वाटलें जणुं हरी नृपशक्ति चाप । तें हो गुरूच अधिकाधिक, ज्या न माप ॥
एक्याच वेळिं धरिती अयुत क्षितीश । चापासि त्या, परि हले नच त्यांसि लेश!॥
तें शंभुकार्मुक तसें स्थिर वाटलें कीं, । जैसें सतीमन चळे नच कामिभाकीं ! ॥
सारे नृपाळ उपहासचि पावले ते । संन्यासि जेविं जगतीं अविरक्तचित्तें!॥२२॥
ते वाहुनी जणुं शरासनिं कीर्ति सारी । शूरत्व आणि जय येति, वरूनि हारी ॥
चित्तीं सलज्ज निहतद्युति भूप सारे । आपापल्या गर्गि उगे बसले बिचारे! ॥
राजा चिडे जनक, देखुनि त्यां नृपालां । रोषें तयांसि वच हें मग तो म्हणाला ॥
" हे लोकहो ! नृपतिंनो ! परिसा मदुक्ति, ना राहवें मजसि यास्तव बोलतों ती ॥
मीं ठेविला पण, तया परिसूनि भूप । द्वीपांतरांहुनि इथें मिनले अमूप ॥
देवासुरादि धरुनी नररूप येथें । झाले असंख्य रणवीर बलाढ्य येते ॥२५॥
धन्या मनोहर वधू, कमनीय कीर्ति । अत्यंत थोर जय, या जिंतणार मूर्ति ॥
नाहीं विरिंचिकरिं निर्मिलि शूरवीरीं !। हें शंभुकार्मुक विभंजुनि शोभणारी ॥
सांगा, नसेल जर हा पण लोभवीता । एकेंहि ना चढविलें शिवचाप हातां ॥
राहो अहो ! चढविणें अथ तोडणें का । ना हालवूंहि शकले तिल कोणि, देखा !
प्रौढी इथून न करो कुणि 'मीच वीर!'। निर्वीर मी समजतों धरणी समग्र !
आपापल्या गृहिं चला, त्यजुनी मनीषा; । सीताविवाह विधिनें लिखिला न जैसा!!
त्यजिन-जर पणा मी, पुण्य माझें विरे हो! । अटळचि, तर कन्या हे कुमारीच राहो!
त्रिभुवनहि असें हें जाणतों वीरशून्य । पण करुनि न घेतों हें हंसें मी अनन्य!"

ऐकोनि ऐसी जनकोक्ति सारी । नारीजनांचीं हृदयें विचारीं ।।
होऊनियां व्याकुल, जानकीतें । पहाति सारे जन आर्त चित्तें!।।३०।।
नृपोक्तिनें क्षोभुनि लक्ष्मणाची । भू वक्र झाली अतिमात्र साची ! ।।
दोनीहि ओष्ठ स्फुरतात कंपें । आरक्तता लोचनिं आलि कोपें !।।३१।।
श्रीरामभीतिस्तव तो न सांगे, । तया नृपोक्ती जणुं बाण लागे ! ।।
श्रीरामपादाब्जिं नमूनि माथा । उक्ती वदे लक्ष्मण जी यथार्था ।।३२।।

" जाणोनिही रघुकुलोत्तम येथ आहे, उक्ती वदे अनुचिता मिथिलेश कां हे ?
जेथें असे कुणिहि राघववंशजात, ना त्या समाजिं अशि उक्ति गमे जि! युक्त !
हे भानुसत्कुलसरोरुहभानुराया! । सद्भावयुक्त वदतों, अभिमान ना या ।।
अज्ञा मिळेल तुमची जर अल्प मातें । ब्रह्मांड चेंडुपरि मी उफळीन हातें !
तें काचकुंभसम चूर्ण करूं शकेन । मेरूहि नाळसम तोडुं शकेन तूर्ण ! ।।
ऐसा प्रताप तुमचा भगवन् ! उदंड । त्या हें पिनाक मग काय जि! जीर्णदंड?।।
जाणोनि हें प्रभुवरें मज आदिशावें । मी कौतुका करिन त्या सहजीं बघावें ।।
हें पद्मनालसम हो ! चढवून चाप । धांवेन योजनशतें, नच लेश ताप ! ।।
तोडीन हें सहजिं छत्रकदंड जैसा । स्वामिन् ! प्रतापबलिं आपुलिया न कैसा ? ।।
मी ना करीन जर हें, तर ना धरीन । हातीं स्वचाप, तुमची शपथ प्रमाण!"

।। इति श्रीजानकीसद्रूपमाविलक्षणजनकवाक्य-लक्ष्मण-वीररस-वाक्योक्ति-वर्णनं नाम षट्चत्वारिंशस्तरङ्गः ।।

## तरंग ४७ वा

सक्रोध लक्ष्मण असें जंव बोलताहे । दिग्दन्ति कांपति, थरारत भूमि राहे ।।
भूपादि सर्व जनता मनिं फार भ्याली । लाजे मनीं जनक; जानकि मात्र धाली ।।
संतोषले गुरुमुनी, रघुनाथ चित्तीं । रोमांचल्या कितिकदा गुणसत्त्वमूर्ति ।।
रामें खुणावुनिच लक्ष्मण आवरीला । सप्रेम आत्मनिकटासनिं बैसवीला ।।
विश्वामित्रमुनी तदा समय तो जाणोनि सन्मंगल ।
संबोधूनि रघूत्तमा वदति हें सप्रेमवाङ्मञ्जुल — ।।

"रामा ! ऊठ धरोनि हें भवधनू तूं टाक रे ! भंगुनी।
चिंता जी मिथिलाधिपा शिणविते तीही निवारीं झणीं !" ॥३॥
ऐकोनी गुरुवाक्य वंदन करी श्रीराम त्यांच्या पदीं।
नोहे हर्ष न वा विषाद लवही श्रीराघवाच्या हृदीं ॥
ठाके राम उठोनि चारु सहज स्वाभाविकें लाघवें।
स्वश्रीनें मृगराजशावहि तयें लाजीवला राघवें ! ॥४॥
उगवला उदयाचलमंचकीं। रघुपती जणुं बालरवीच कीं ! ॥
विकसलीं झणिं सज्जनपंकजें। सकल हर्षित लोचनभृंग जे ॥५॥
आशानिशा नृपसमाजिं विनष्ट झाली !। नक्षत्रपंक्ति वचनावलि लोपवीली !
गर्विष्ठभूपकुमुदें मिटुनी निमालीं। घूकापरी खलनृपालतती दडाली ! ॥६॥
झाले विशोक मुनि, निर्जर हेचि कोक। सेवा करीति सुमवृष्टिभरें अनेक ॥
वंदीत राम गुरुच्या पदिं भक्तिभावें साऱ्या ऋषींप्रति म्हणे 'मज आदिशावें !'
चालूं लागे सहज सकल स्वामि विश्वान्तरात्मा
मत्तेभाच्या सुभग गतिशी चाल ती कांतिसीमा ॥
त्या देखोनी निखिल पुरुषस्त्रीमनें हर्षमग्न ॥
रोमांचांनीं निरुपमसुखें देह गेले फुलून ! ॥८॥
वंदोनी पितरां सुरां स्वसुकृतें चिंतोनि सारीं मनीं
देवां प्रार्थिति "आमुची जर असे पुण्याइ, ती घेउनी ॥
भंगो राम मृणालसें शिवधनू हें वांकवोनी झणीं ॥
विघ्नेशा ! गिरिजासुता! प्रभुवरा ! ही पूरवा मागणी !" ॥९॥
श्रीरामातें पाहि सप्रेमदृष्टि। सीतामाता, होउनी चित्तिं कष्टी ॥
बोलावूनी ती सख्यांतें वदे हें। चिंतार्तीनें व्यापिली माय मोहें ! ॥१०॥
"जे आमुचे म्हणवती हितकारि सारे। ते होति कौतुकचि केवळ देखणारे ! ॥
कोणीच ना नृपतितें समजूत पाडी। कीं 'बाल हा; अहित हट्ट समूल सोडीं !'
ना बाण, रावणहि या शिवले धनूतें। सारेहि भूप हरले ! हललेंहि ना तें ॥
त्या देतसां धनुसि राजकुमारहस्तीं। कीं मंदरा उचलि बालमरालमूर्ति ? !
झाले सख्यांनो ! मतिशून्य भूप.। कीं दैव हें दुष्ट गमे अमूप! ॥
येथें चलेना मति आणि वाणी। स्थिती पहा हे किति दैन्यवाणी !' ॥१३॥

तेव्हां वदे हळुंच एक सखी शहाणी। ' नाहीं अहो ! जगतिं तेज वयःप्रमाणीं ! ॥
कोठें अगस्ति ? जलराशि अपार कोठें ?। शोषूनि अब्धि मुनि घे यश लोकिं मोठें!॥
होतांच जो उदित विश्वतमासि नाशी। तो भानु भासत लघू किति लोचनासी ? ॥
मंत्राक्षरें अति लहान परंतु त्यांनीं। ब्रह्मेशविष्णु दिसले वश कीं करोनी !॥
देहें विशाल मदमत्तमतंगजातें। आणी वशाविं जगिं अंकुश सानसा तें! ॥
घेऊनि काम सुमसायकचाप मात्र। विश्वासही वश करीत; न यांत चित्र ॥
जाणोनि हें सकलसंशय, देवि ! टाका। श्रीराम तोडिल धनुष्य, न यांत शंका'॥
राणी सखीवचनिं घेत दृढप्रतीति। प्रीती भरे हृदयिं, जाउनि खेदवृत्ति ॥
तेव्हां बघे जनकजाहि रघूत्तमातें। ज्या त्याप्रती विनवि भीतमनें तदा तें ॥
चित्ताभयेंचि अतिदीनवचें स्तवी ती। ' व्हा हो ! प्रसन्न गिरिजापरमेशमूर्ति ! ॥
सेवा करा सफल आपुलि केलि मीं जी। मत्क्षेम चिंतुनि धनुर्गुरुता हरा जी ! ॥
मीं सेविलें तुज विभो ! वरदा ! गणेशा! हो चापभार लघु; हे पुरवीं मदाशा'!॥
सीता बघे रघुवरासि पुनःपुन्हांही। देवा स्तवीत हृदयीं धरि धीर कांहीं ॥
प्रेमांबुनें नयनयुग्म भरोनि गेलें। सारें शरीर पुलकांकितगात्र ठेलें ! ॥
डोळेभरीं बघित उत्तम रामरूप। क्षोभे पुन्हां पितृ-पण स्मरुनी अपाप ॥
चिंती 'पित्या! पण सुदारुण रे! तुझा हा। ना लाभ, ना कळत हानि तुला, अहाहा!
मंत्री सुयोग्य उपदेश, पित्या न देती। भीतीमुळें बुधहि योग्य न वर्ततातो ॥
कोठें धनुष्य कुलिशाहुनिही कठोर ?। हा सांवळा मृदुलगात्र कुठें किशोर ?
देवा कसा उरिं धरूं तरि धैर्यलेश ?। कैसें हिऱ्या करिल वेध बरें शिरीष ?
सारी सभाच गमते जणुं बुद्धिशून्य। हे शंभुचाप ! मज तूंच खरें शरण्य !
तूं टाक वाटुन जनां निजभार चापा ! रामा बघुनि तरि हो लघुभार, बापा!
सीतामनास परिताप अतीव वाटे। झालें निमिषहि युगांपरि तीस मोठें!॥२४॥

प्रभूसि पाहे, अवनीकडे पुन्हां। विलोल नेत्रां बघुनी, गमे मना।
शशांकबिंबांतरिं रम्य डोलतें। रतीश्वराचें जणुं मीनयुग्म तें !॥२५॥
मुखांबुजीं वाग्भ्रमरी निरोधिली। लज्जानिशे पाहुनि आंत राहिली ॥
नेत्रांबुही रहात नेत्रकोनिं तें। घरींच सोनें कृपणस्व लोपतें !॥ २६ ॥
सख्याकुलत्वा अति त्या विलोकुनी संकोचुनी धैर्यचि घेत ती मनीं ॥
म्हणे " असे मत्पण सत्य हा जर। होईल कीं, वांछित जें मदंतर! ॥२७॥

वाचा मनें देहिं मदीय या पणा । असेल कीं अंतरिंचा खरेपणा ॥
श्रीरामपादाब्जिं असेल रंगलें । हें चित्त माझें जर सत्य चांगलें ॥२८॥
सर्वांतरस्थ प्रभु तो करील कीं । रघूत्तमाची मज दासिका निकी॥
असेल ज्याची रति सत्य ज्यावरी । तें त्यास लाभे जगिं गोष्ट ही खरी !"॥

पाहोनि प्रभुतें तिनें विरचिला स्वप्रीतिचा जो पण ।
रामानें करुणानिधान विभुनें तो अंतरीं जाणुन ॥
सीतेतें अवलोकुनी, निरखिलें श्रीशंभुच्या कार्मुका ।
वाटे पाहतसे जणों खगपति व्यालाचिया बालका ! ॥३१॥

श्रीराम पाही हरकार्मुका असें । ये लक्ष्मणाच्या नजरेस हें जसें ॥
तो रोमहर्षे भरुनी वदे वच। ब्रह्मांडही दाबुनि नीट पार्थिंच ! ॥३१॥

" दिङ्नाग हो ! सकल कूर्मवराहशेष ! धैर्यें धरा धरणि ना हलुं द्या विशेष ! ॥
श्रीराम शंकरशरासन तोडुं पाहे । आज्ञा तुम्हां करित मी, परिसा भली हे !" ॥
चापासमीप रघुनायक येइ जव्हां । नारीनर स्नरति दैवत पुण्य तेव्हां ॥
सर्वांचिया हृदयिंचें तम आणि शंका, । मंदात्म-भूपमनिंची अभिमान-रेखा, ॥
गर्वाढ्य गौरवहि भार्गवराम याचें, । भीरुत्व तें सुरमुनीश्वर-मानसांचें ॥
सीताविलाप, जनकांतरिंच्याहि आर्ति । राज्ञीमनांतिल अतीव सशोकता ती; ॥
हीं सर्व ठेवुनि जणों हरचाप-नौके । श्रीरामचंद्रचि तिच्यांत चढून ठाके ॥
श्रीरामबाहुबलसागरिं या अपार । श्रीराम हाच करुणाकर कर्णधार ! ! ॥३५॥

विलोकि लोकांप्रति राम वीक्षणीं । ते भासले चित्रसमान त्या क्षणीं ॥
सीतेसही पाहि कृपांबुसागर । तों ती दिसे फारचि दुःखितांतर ॥३६॥

सीतामनीं विकलता इतुकी विशेषा । कल्पापरीच समजे जणु ती निमेषा ॥
प्राणान्त वारिविण जें तृषितासि होय । अन्तीं सुधाब्धि वितरूनिहि त्यासि काय !
गेल्यावरीं कृषि सुकोनि, कशास वृष्टि ? गेल्यावरी समय, होउनि काय कष्टी ?
चिंतूनि हें जनकजेसि विलोकि राम । तत्प्रीति पाहुनि रघूत्तम हृष्टरोम ॥३८॥
चित्तीं प्रणाम गुरुतें करुनी मनेंचि । तें चाप राम उचलोनि सलील घेचि ॥
झालें जशी चमकुनी क्षण वीज मेघीं। तें इंद्रचापसममंडल होय वेगीं ! ॥३९॥
घेतां, बळें चढवितां, धनु खेंचताही । कोणा कळे न, जरि लोक उठोनि राही ॥
तों राम तत्क्षणिंच मध्यिं धनुष्य मोडी । ब्रह्मांडही ध्वनि कठोर भरोनि सोडी! ॥

त्रिभुवनिं घोर ध्वनि भरतां तो रविहय सैरां पथ चलती ।
चित्कारिति दिग्गज, भू कांपे, कूर्म, कोल, अहि कळमळती ॥
सुरासुरमुनी श्रुति करिं झाकिति दचकुनि चिंतिति 'काय घरे!' ॥
तुलसि म्हणे, धनु खंडित रामें कळतां म्हणती 'जय जय रे!' ॥४१॥
होऊन मोहवश जे हरचापनौका । श्रीरामबाहुबलसागरिं घेति देखा ॥
ते मात्र सर्व बुडती, परि वांचले ते । ज्यांचे रघूत्तमपदीं दृढभाव होते! ॥४२॥
॥ इति श्रीरामकरधनुर्भङ्गस्वयंवरविजयो नाम सप्तचत्वारिंशस्तरङ्गः ॥

## तरंग ४८ वा

प्रभूनें दोनही चापखंड भूवरि फेंकिले ॥
देखोनि त्या सर्व लोक मनीं अत्यंत हर्षले! ॥१॥
तो पूतपावन पयोनिधि कौशिकाचा । श्रीरामभक्तिजलपूर्ण अगाध साचा! ॥
पाहोनि पूर्णशशि राघवमूर्तिरूप । रोमांचवीचिभर त्याप्रति ये अमूप! ॥२॥
आकाश दुंदुभिरवें भरलें सुघोषें । नाचोनि गाति अमरीगण भूरिहर्षें ॥
ब्रह्मादिदेवमुनिसिद्धतति प्रभूतें । आशीर्वचें वितरुनी स्तविती किती तें? ॥३॥
नभिंहुनि बहुरंगीं वर्षती पुष्पमाला । सुरस मधुर गाती किन्नरी हर्षलोला ॥
जयजयजयघोषें व्याप्त झाली त्रिलोकी । स्मृतिंतही नुरला तैं चापभंगध्वनी कीं! ॥

सारे लोक परस्परांसि कथिती अत्यंत आनंदुनी ।
कीं रामें बहुभव्यही भवधनू हें तोडिलें हो! झणीं; ॥
बंदी, मागध, सूत रामबिरुदें गाती; किती टाकिती ।
ओवाळूनि तयावरूनि वसनां रत्नां गजाश्वां किती! ॥५॥
तेव्हां झांज, मृदंग, शंख, सनई, भेरी, नगारे, तुरें ॥
वाद्यें लागलिं वाजुं मंगल रवें आनंद विश्वीं भरे ॥
गाऊं लागति अंगनागण तदा सर्वत्र मंजुस्वनीं ॥
राज्ञीही सहचारिणींसहित हो आनंदमग्ना मनीं ॥६॥

राज्ञीमनःस्थिति तशीच गमे विशेष । कीं वाळत्या कृषिसि लाभत वृष्टिपोष ।
झाला मनीं जनक शोकविहीन तैसा । कीं लाभला बुडतयाप्रति तीर जैसा! ॥

होतांचि भंग धनुचा, नृप लुप्तकांति । दीपच्छवी जशि नुरे दिवसां मुळीं ती ।।
सीतामनःस्थिति सुखात्म अतीव कैंची ? । स्वात्यंबुलाभ घडल्या जणुं चातकीची !
रामासि लक्ष्मण विलोकि तसाच साच । चंद्राचि पाहत चकोरशिशू खराच ! ।।
आज्ञा तियेस मिळतां गुरुच्या मुखानें । सीता करीत मग रामसमीपिं येणें ।।
संगें सख्या चतुर मंगल गात गाणीं । मंजुस्वरें जनकजेसह जात कोणी ।।
त्यांची अतीव सुषमा हृदयाभिरामा । त्या बालहंसगति शोभति रूपधामा ।।१०।।
सीता सख्यांमधिं विशेष विराजमान । लावण्यधाम दुसरें न तिच्यासमान ।।
साजे करांबुजिं तिच्या जयमाळ दिव्य । जिंकील विश्वसुषमेसहि दीप्तिभव्य ।।
संकोच देहिं तिचिया, परि थोर हर्ष । ती गूढ चित्तरति जी न कळे कुणास ।।
जाऊनि रामनिकटीं बघि रामकांति । तैं भासली लिखित चित्रसुमूर्तिका ती ! ।।

पाहोनी तशि ती मनःस्थिति तिची तीतें सख्या बोलती ।
" बाळे गे ! जयमाळ सुंदर गळां तूं राघवा ! घाल ती "।।
ऐकोनी वच पाणिपद्मयुगलें ती उंचवी माळ ती ! ।
प्रेमानें विवशा करांतुनि अशा ना ती सुटे खालती ! ।।१३।।

तैं भासलें जलजयुग्म जणों सनाल । तें भीत घालि शशितें जयमाळ लोल ।।
गाती सख्या बघुनि ती छवि तों सुनीता । श्रीरामकंठिं वितरी जयमाळ सीता!।।

रामकंठिं बघुनी जयमाला । देव वर्षति तयांस सुमांला ।।
भूपसंहति हतप्रभ झाली । भास्करें कुमुददीप्ति निमाली ! ।।१५।।

वाद्यें पुरींत गगनांतहि वाजलीं तीं । गेले भिऊनि खळ, साधु सुहृष्ट चित्तीं ।।
देवादि-नाग-मुनि किन्नर लोक गाती । आशीर्वचें जयजयोक्तिहि ते करीती ।।
गाऊनि नाचति किती विबुधांगनाही । पुष्पावली विकिरती, मिति ज्यांस नाहीं ।।
सर्वत्र विप्र करिती शुभ वेदघोष । बंदीहि गाति बिरुदावलि त्या विशेष ।।
भंगोनि चाप, वरि राघव जानकीतें । पातालनाकवसुधे भरि कीर्ति कीं ते ।।
ते मंगलारति करीति समग्र पौर । ओवाळुनी त्यजिति वित्तविशेष थोर !
तें शोभलें युगल राघव आणि सीता । शृंगार आणि सुषमा जणुं काय मूर्ता ।।
सीतेसि सांगति सख्या 'प्रभुपायिं लागें' । भीतीमुळें परि न ती नमवी निजांगें।।

न ती करें स्पर्शि रघूत्तमांघ्रितें । चित्तीं अहल्यागति आठवोनि ते ।।
अलौकिकी प्रीति तशी बघूनियां । मनांत हांसे रघुवंशनाथ या ।।२०।।

तदा सीतेलागीं खळमति कुलांगार नृपति ।
मनीं मात्सर्यानें कढति अभिलाषें निरखिती ॥
चिडोनीयां त्यांनीं उठुनि कवचेंही चढवुनी ।
शिव्या द्याया केली बडबड अनिर्वाच्य वचनीं ॥२१॥

कोणी म्हणे ' जनकजेप्रति न्या हिरोनी । आंधा बळें उभय बंधुहि बंधनांनीं ॥'
चापासि भंगुनिच केवळ कार्य नोहे । कोणा अम्हांविण वरील कुमारिका हे ? ॥
हो कीं विदेहनृप साह्य जरी द्रया या । जिंकू तयासहहि यांस, न शक्ति वायां'॥
हीं ऐकुनी कुवचनें, कुणि साधु राजे । त्यां बोलले "नृपसमाज तुम्हांस लाजे !"
स्वर्गास जाय हरचापसमेत सर्व । शौर्यप्रताप तुमचे बलवीर्यगर्व ॥
हो शौर्य तेंच तुमचें? नव वा कुठूनी? लावी मसी विधि तुम्हां मुखिं या कुधींनीं!॥
डोळे भरूनि निरखा रघुवंशनाथा । टाकूनि कोपमदमत्सर या समस्तां ॥
व्हा लक्ष्मणप्रकुपिताग्नित टोळसे न । तो कीं तुम्हां करिल दग्ध क्षणींच पूर्ण !
कीं, पक्षिराजबलितें मनिं इच्छि काक? शार्दूलभाग मनिं वांछि ससा वराक ! ॥
कीं कांक्षि मानसिं अकारणकोपि भव्य ? वांछीत कीं, हररिपू सुखवित्त सेव्य ॥
लोभिष्ट लंपट यशाप्रति इच्छि कीं तो ! कामी म्हणे जणुं कलंक मला न येतो !
वांछी अभक्त हरिंचा परमा गतीतें । ही लालसा नृपतिंनो ! तशि व्या न चित्तें "
कोलाहला परिसुनी मनिं भीत सीता । राज्ञीपशीं निज सख्या क्षणि नेति धूर्ता ॥
सीतारती स्तवित रामहि ये गुरूनें । ती प्रीति वानिलि अती रघुवंशनाथें ॥
राज्ञी तशी जनकजा अति दुःख पावे । ' हें मांडिलें तरि कसें विपरीत दैवें?' ॥
भूपोक्ति आयकुनि लक्ष्मण पाहि रोषें । रामा भिऊनि परि तो धरि मौन तैसें ॥

रोषें बघे लक्ष्मण रक्तलोचन । नृपांसि वक्रभ्रुकुटी सुदारुण ॥
तदा गमे दन्तिघटा मदोत्कटा । शौर्ये बघे सिंहशिशूच धाकटा ! ॥३०॥

कोलाहला ऐकुनि, पौर सभीत चित्तें । देती शिव्या खल नृपांप्रति निंदुनी ते ॥
ये तेवढ्यांतच तिथें, शिवचापभंग । ऐकूनि, तो भृगुकुलाब्जलसत्पतंग ! ३१
श्येनास देखुनिच लावति जेविं लावे । त्या भार्गवा बघुनि दुर्नृप भीति पावे ॥
गौरांगिं शोभत विभूति विलेपिली जे । भालीं त्रिपुंड्र सुविशालिं तसें विराजे ॥
शीर्षीं जटाभर, मुखेन्दु सुरम्य शोभे । क्षोभामुळें अरुणता लव ज्यास लाभे ॥
भ्रू वक्रतायुत, विलोचन रक्त कोपें, । क्रुद्ध स्वभावचि दिसे जणुं दृष्टिरूपें ! ॥

शोभे नृपांस, भुज वक्ष विशाल, कंठीं । यज्ञोपवीत शुचि, सुंदर चर्म गांठीं ।
साजे कटीस मुनिवस्त्र, कुशींस भाते । खांद्यावरी परशु, बाण धनू करीं ते !
तो साधुवेष, करणी परि उग्र साची । वर्णात्रयासहि न भार्गवरूप येचि ॥
वाटे जणूं मुनितनू धरुनी नृपांत। तेथें तसा अवतरे रस 'वीर' मूर्त !! ॥२५॥
॥ इति श्रीजानकी--जयमाल--ग्रहणं तथा श्रीपरशुरामागमनं नामाष्ट-
चत्वारिंशस्तरङ्गः ॥

## तरंग ४९ वा

देखोनियां भृगुपरूप कराल उग्र । झाले भयाकुल तिथें नृपसंघ साग्र ॥
सारे विनीत निजनाम वदूनि त्यासी । साष्टांगपात नमिती लवुनी स्वशीर्षीं ॥
ज्यातें प्रसन्नमुखिंही भृगुसूनु पाहे । त्यातें स्वमृत्युचि समोर उभा गमे हें ॥
येवोनियां जनक वंदि नमूनि त्यास । सीतेसि बोलवुनि त्या नमवी विशेष ॥
आशीर्वचें तिजसि भार्गवराम देत । हर्षे सख्या चतुर नेत तिला स्त्रियांत ॥
येऊन कौशिकमुनी मग भार्गवातें । पादाब्जिं बंधुयुग घालित नम्रचित्तें ॥
सांगे "दशरथशिशु हे दोघे 'श्रीरामलक्ष्मण' म्हणून" ॥
दे आशीर्वादातें भार्गव तें युग्म उत्तम गणून ॥ ४ ॥
ती कामगर्वमोचन रामाची अमितरूपसुंदरता ।
बघुनी हो श्रीभार्गवरामाची दृष्टि रामचंद्ररता ॥ ५ ॥
बघुनि जनसमाजा तेथल्या घोर घोषा । भृगुसुत पुसु लागे त्रुझही अज्ञ जैसा ॥
अतिशय कुपिता त्या बोलिलें तैं विदेहें । जन नृप सगळे कां त्या स्थलीं मीनले, हें
ऐकोनियां जनकवाक्य, दुजीकडे तो । पाहे, धनुःशकल दोन बघे तिथें तों ॥
बोले कठोर वचनीं अति रुष्टतेनें । "रे ! सांग मूढ जनका ! धनु भग्न कोणें ?
मूर्खा! क्षणींच मज दाव तयास आजीं । राज्यक्षिती न तरि, मी उलथीन तूझी!"
तेव्हां भिवूनि जनक प्रतिवाक्य ना दे । तैं दुष्टभूपहृदिं हर्ष विशेष कोंदे ! ॥
झालें परी अमित दुःख मनीं सुरांना । नागां, मुनींसि, युवतीनरनागरांना ॥
राज्ञी मनीं करि अतीव विवंचनेतें । "सारेंचि कीं बिघडि आजि विधी कसें तें?!
सीतेस जैं कळुनि भार्गवभाव आला । कल्पासमान तिज अर्धनिमेष झाला ! ॥
पाहून लोक भयभीत, तशीच सीता। तो हर्षदुःखविण राम वदे सदुक्ता ॥१०॥

" भंगावया हरधनूसि असेल शक्त । तो कोण ? जो नच विभो! तव एकभक्त ॥
आज्ञा असेल तर कां वदतां न मातें ?" ऐकोनि तें मुनि वदे अति रुष्ट चित्तें ॥
" सेवा करी उचित, सेवक सत्य हो तो। जो सेवि शत्रुपरि तो समरार्ह होतो
हे राम ! ऐक, हरचाप जयें विभग्न । तो कार्तवीर्यसम हो मम शत्रु जाण !
व्हावें तयें नृपततींतुनि या निराळें ! नाहीं तरी सकलही हत जाण काळें ! "
तें ऐकतां वदत लक्ष्मण हांसुनीच । जें लागलें परशुराममनीं झणींच ॥१३॥
"आम्हीं कितीक धनु शैशवि तोडियेलीं स्वामींसि कां न कधि येवढि लालि आली?
कां याच चापिं ममता इतुकी असे ही ?" संतापुनी भृगुप उत्तर त्यास देई ॥
"रे राजबालक ! कसा यमपाशिं जाशी? नाहींच शुद्धि तव वाक्प्रसवासि कैशी ?
सामान्य चापसम रे! जगतीतलांत । तूं कविं हें म्हणसि शंभुधनुष्य होत ?' ॥
हांसोनि लक्ष्मण म्हणे "परिसा प्रभो ! हें । चापें समान सगळीं, मज भेद नोहे।
हो लाभहानि कशि तोडुनि चाप जीर्ण ? । देखेचि राम, तव हें जणु चाप भग्न।
तत्स्पर्श केवळ निमित्त; न दोष रामीं । कां कारणाविणचि गर्जतसां? म्हणें मी "
बोलेहि भार्गव बघोनि निजा कुठारा । " माझा स्वभाव नकळे तुज, दुष्ट पोरा!
जाणोनि बाळ तुज मीं दिधलें न काळा।नूं काय मानिसि मला मुनि कीं गवाळा?
मी ब्रम्हचारि पहिलाच अतीव कोपी । क्षत्रान्तकारि जगतीं विदित प्रतापी !
ही माझिया भुजबळें वसुधा समग्र । निःक्षत्रिया करुनि मी वितरीं उदार॥
विप्रांप्रती बहुतवार; सहस्रबाहुबाहूंसि कापि परशू मम देख पाहूं ! ॥१९॥
हे राजपुत्र ! जननीजनकांसि कैसा । तूं दुःखि लोटिसि अकारण आज ऐसा ?
गर्भांतलेहि वधि अर्भक सर्व तो हा । माझा कुठार निशिताग्र कठोर पाहा?"॥
हांसोनि लक्ष्मण वदे मृदु वैखरी ही । "कां हो मुनींद्र! निजशौर्यि अशी बढाई?
हा दावितां मज कुठार पुनःपुन्हां कां ? । कां पाहतां उडवु पर्वत एक फुंकां ?
ना भोपळा कुणिहि येथ अपक्व लाल । जो तर्जनी तुकवितांहि मरेल ! ॥
पाहोनि वेष, शरचाप, तसा कुठार । मी साभिमान वदलों अजि शब्द चार ॥
जाणोनियां भृगुकुलोद्भव आपणातें । यज्ञोपवीतहि विशिष्ट बघोनियां तें ॥
जें कांहि आपण मला वदलां असाल । दाबूनि कोप मनिं साहिन सर्व बोल ! ॥
देवादि संत, अवनीसुर, आणि गाई । आम्हां कुळीं कधिंहि वैर न यांस होई॥
या मारितां अघ; अकीर्ति पराभवेंही । मातें वधा, परि पडें तुमच्याच पायीं!

कोटिवज्रांपरी बोल हे आपुले ! व्यर्थ कां शस्त्र हें एवढें घेतलें ? ॥
चापबाणां प्रभो ! या कुठारासही । व्यर्थ कां वाहतां? चाड ना लेशही २५
पाहुनी वेष हा बोललों योग्य ना । धीरवर्या मुने ! तें न घेणें मनां ! " ॥
ऐकुनी या वचा भार्गवें कोपुनी बोलिलें ते क्षणीं वाक्य धीरध्वनी ॥२६॥
" कौशिका ! आयका, मंद हा बालक । मृत्युला बोलवी आत्मवंशांतक ॥
भानुवंशेन्दुचा दुष्ट हा डागसा । नाहिं लज्जा मुळीं मूर्ख निःशंकसा ! ॥२७॥
जाय एक क्षणीं मृत्युच्या आननीं । सांगतों स्पष्ट हें दोष द्या ना कुणी ॥
वांचवीणें तरी, त्या तुम्ही बोलवा । क्रोधशौर्या बला माझिया ऐकवा " ॥
लक्ष्मणें बोलिलें "सद्यशें आपुलीं । कोण तुम्हांपरी वर्णिता चांगलीं ! ॥
आत्मतुंडें तुम्हीं आत्मकृत्यें किती । वर्णिलीं सर्वथा ज्यां न कोठें मिति ! ॥
ना पुरें तें, तरी चालवा आणखी । क्रोध तो रोधितां, त्रास सोसाल कीं ! ॥
वीरवृत्ती तुम्ही धीर अक्षोभ्य जे । गालिदातृत्व हें त्यां तुम्हां ना सजे ! ॥

जो शूर तो समरिं कार्य करूनि दावी । तेणें कधीं स्वकृति आपण ना वदावी ॥
पावोनिही रिपु पुढें, रणिं भीरु मात्र । ऐसे प्रलाप करिती अपकीर्तिपात्र ! ॥३१॥
वाटे, तुम्हीं निजसवें हटकोनि काला । हो घेतलें म्हणुनि बोलवितां तयाला ॥
हें माझियास्तव किती बहुवार ऐसें !"। तें ऐकतांच खवळे मुनिवर्य रोषें ॥३२॥
ऐकोनि लक्ष्मणवचाप्रति त्या कठोरा । अत्युग्र भार्गव उगारि करें कुठारा ॥
बोलेहि" द्या मजसि ना कुणि दोष आतां। हा वध्य खासचि शिशू कटुवाक्यवक्ता॥
हा पोर यास्तवचि मीं सहिलें अपार । आतां मरेलचि खरोखर हा कुमार !"
तैं भार्गवा वदत गाधिज " हो! क्षमावें। हे बाळदोषगुण सह्यचि साधुभावें "॥
सांगे तदा परशुराम "कुठार हातीं ।माझ्या अकारणहि कोप वसूनि चित्तीं, ॥
सांडूनि सर्व विनया, मज बोलणार। मी टेविं या, न वधितां, जरि वध्य फार!॥
हें सर्व कौशिकमुने ! तुमच्याच साठीं । नाहीं तरी मम कुठार कसा न काटी
मी फेडितोंचि गुरुचें ऋण अप्रयासें !"। हें क्रूर भार्गव वदे कटुवाक्य रोषें॥

गाधिसूनु हसुनी मनिं बोले । " काय या मुनिमनामधिं आलें ?
लोहसार धनु हें, नच ऊंस ! कां अजूनिहि कळे न मुनींस ? " ॥२७॥

बोले लक्ष्मण " शील सर्व तुमचें साऱ्या जगा ठाउकें ।
झालां कीं अनृणी तुम्ही मुनिवरा ! मातापित्यांचे निकें ! ॥

आतां हें गुरुच्या ऋणासहि तुम्ही फेडूं पहातां भलें ।
फेडाया स्थलही तुम्हांप्रति भलें आतांच कीं लाभलें ! ! ॥३८॥

जाणों तें ऋण माझिया शिरिं तुम्हीं हें मारिलेंसें दिसे ।
वाटे व्याजहि वाढुनी बहुदिनीं हो देय मोठेंचसें ! ॥
आतां हा व्यवहार सर्व सरु द्या, बोलावुनी घ्या क्षणीं, ।
वेगें त्या धनकोसि, थैलि मम मी घालीन हो ! खोलुनी ! " ॥३९॥

ऐकोनि हें कटुकवाक्य, करें कुठार । संतापुनी परशुराम उगारि उग्र ॥
तेव्हां समग्र जनता करि 'हाय ! हाय!' ॥ बोले परी वचन लक्ष्मणराय काय?
तो बोलला " भृगुवरा ! मज हा कुठार । हो क्षत्रशत्रु तुम्हि दावितसां उदग्र॥
आहांत विप्र म्हणुनीच तुम्हांस कांहीं । मी हानि अल्पहि विभो ! करणार नाहीं!
वाटे, तुम्हां न कधिं आजवरी न होता । योद्धा रणांगणिं खरा मद हारवीता॥
देवा-द्विजांसि बहुमान मिळे घरींच । तैसे रणांगणिं न मानिति त्यांसि साच!"
तैं सर्व लोक म्हणती " वच योग्य हें न !।" श्रीराम आवरित बंधुसि खूणवून॥
बोलेंहि योग्य वच राघव भार्गवातें । जेणें मनें निवलिं लक्ष्मण-वाक्यदीप्तें!४३
जी लक्ष्मणोक्ति जणु आहुतिशीच होत । क्रोधाग्नि भार्गवमनीं करण्या ज्वलन्त॥
त्याचिवरी सलिलवृष्टिच काय मानूं । सामोक्ति, जी करित राघववंशभानू !॥
"भो नाथ, बालकिं कृपा उचिता असे या। हा शुद्ध दुग्धमुख; यावरि कोप वाया
ठावी तयास असती महती प्रभूची । कां हा बरोबरि अशी करता खुळाचि !॥
हो बालकाकरिं जरी कधिं कांहिं खोडी । माता पिता गुरुहि मानिति हर्ष गोडी॥
दावा दया; मनिं गणा शिशु हा स्वदास; ज्ञानी मुनी सुजनता त्यजती न लेश!"
रामोक्तिनें परशुराम जरा निवाले । तों लक्ष्मणें वदुनियां स्मित कांहिं केलें! ॥
त्या हांसतां बघुनि भार्गव पूर्ण कोपी । बोले " तुझा अनुज फारचि राम ! पापी॥
गौरांग हा परि मनामधिं कृष्णवर्ण । हा कालकूटमुख, दुग्धमुखत्व या न ! ॥
तेढा मनें सहज हा, तुजसा गुणी न। हा नीच मानि मज मृत्युपरीच जाण !"
हांसोनि लक्ष्मण वदे " मुनिवर्य !ऐका, हा क्रोध कारण खराच अघां अनेकां॥
क्रोधांध हा अनुचिताचरणें करीत । विश्वाप्रतीहि सगळ्या असुखी भयार्त ॥
मी दास होय तुमचा मुनिवर्य !जाणा !।दावा मला स्वकरुणा, मनिं रोप नाणा॥
रोपें जुळेल कधिं चाप-लता विभग्ना ? । कां श्रांतपादचि उभे, बसुनी बघाना ! ॥

हो कां तुम्हांस जर आवडि चापिं याच। तज्ज्ञांसि बोलावुनि जोडुं पुन्हांहि साच!"
भ्याला मनीं जनक लक्ष्मण बोलतांना। सांगे 'पुरे! अनुचितोक्ति करी हिता ना'
नारीनरां थरथरां तनुकंप होय! ते बोलती 'शिशु लघू, परि तीक्ष्ण काय ?!' ॥
ती निर्भयोक्ति फिरुनी भृगुनाथकर्णीं। येतां कढोनि मनिं होतहि शक्तिहानि!॥
रामाकडे बघुनि भार्गवराम बोले। "यातें, तुझा अनुज वास्तव वांचवीलें ॥
सौंदर्यपूर्ण वरि हा, परि आंत खोटा!। वाटे सुवर्णकलशीं विषपूर्ण सांठा!!" ॥
तेव्हां हंसे फिरुनि लक्ष्मण तोंच त्यातें। श्रीराम दापि झणिं उग्रकटाक्षपातें! ॥
टाकूनि वाम वदणें गुरुच्या समीप। तो जाय लक्ष्मण विनीत समाप्तदर्प!॥
जोडोनि पाणियुग राम वदे यथार्थ। सौम्योक्ति कोमलपणें "परिसा जि! नाथ!
आहां तुम्ही सहज सुज्ञ वडील त्यांनीं। घेऊं नयेचि मनिं मूर्ख किशोरवाणी!॥
हो कीं स्वभाव शिशुचा, भकणें कसेंही। त्याची न संत करिती कधिं खंत कांहीं॥
नोहेचि दोषलव यामधिं लक्ष्मणाचा। हा मीच होय तुमचा अपराधि साचा॥
जाणोनियां प्रभुवरें निजदास मातें। कीजे कृपा, न अथवा अति रोष चित्तें॥
किंवा करा वध; न वा, मज बांधिं घाला। तें आचरा उचित वाटत जे मनाला!
सांगा कसा प्रभुमनांतुनि रोष जाय?। वेगीं करीन मुनिनायक! तो उपाय!"॥
बोले मुनीश "मम रोष कसा निमावा?। देखें निजानुज, अजून न सोडि दावा
तत्कंठिं मी मम कुठार जरी न देई। संक्रुद्ध होउनि तरी मज लाभ कायी?!
माझी कुठारगति घोर पडोनि कानीं। होती भयें गलितगर्भ नृपालराज्ञी!॥
हस्तीं मदीय असुनीहि कुठार तो हा,। हा भूप-बाल मम वैरि जगे, अहाहा!!॥
कोपानळें जळत मन्मन हें तरीही। कुंठे कुठार नृपघाति मदीय पाहीं!॥६०॥
झाला विधीच जणुं वक्र, कृपा उदीर्णा। माझा स्वभावचि फिरे, मज हें सहेना!
दैवा! मला असह्य दुःखहि सोसवीसी!"। ऐकोनि लक्ष्मण वदे नतशीर्ष त्यासी
"ऐसा कृपापवन हा अनुकूलमूर्ति। जेणें झडे सुमनवर्षचि रम्य उक्ति!॥
जाळील गात्र तुमचें जर हो! दया ती। क्रुद्धां तुम्हां तनुसि रक्षक धातृमूर्ति!"
बोले तदा भृगुप "रे जनका! पहा हा। हट्टेचि बाल जणु कांक्षित मृत्युगेहा!
यातें न कां करितसां मम दृष्टिआड?। हा हो लहान नृपपुत्र परी दुवाड!!"
बोले हंसून मग लक्ष्मण 'हे मुनीश! डोळे मिटा; मग न गुणी न दिसेचि त्यास!'
तों रुष्ट भार्गव वदे "मज बोधिसी तूं। तोडून शंभुधनु; राम! शठा न किंतु॥

त्वत्संमतेंचि करि भाउ तुझा कटूक्ति। तूंही विनम्र कपटीं नमिसि स्वहस्तीं ! ॥
संतोषवीं मजसि युद्धचि आचरोनी। किंवा स्वनाम तरि तूं त्यज 'राम' वाणी! ॥
सांडोनियां कपट, युद्ध करीं, शिवारे !। बंधूसवेंचि तुज मारिन वा कुठारें!" ॥
हो ती कुठार उगरोनिच भार्गवोक्ति !। हांसोनि राम मनिं वंदित नम्रमूर्ति ॥६६॥
बोलेहि " लक्ष्मण चुके मज माथिं दंड ! मार्दुर्यही कधिं कधीं अध हो उदंड! ॥
जाणोनि वक्र शशि, वंदिति सर्व लोक। वक्रेंदुला गिळि न राहुहि जातशंक! ॥
टाका मुनीश ! मनिंचा निजकोप सारा। मच्छीर्ष हें, परशु हाणुनि शीघ्र मारा ! ॥
जेणें शमेल निजरोष करा प्रभो ! तें। हा दास मी अनुसरें तुमच्या पदांतें ! ॥६८॥
हो स्वामिसेवक अशांमधिं युद्ध कैसें ? रोषा त्यजूनि मुनिवर्य ! भरा सुतोषें ॥
वेषा बघूनि तुमच्या, शिशु बोलला जे त्यातें न दोष; सगळेंचि तथोक्त साजे ! ॥
पाहोनियां परशुबाणधनुष्यधारी। हा वेष, वीर शिशु तो पडला विचारीं ! ॥
त्या ज्ञात नाम तुमचें, नच वेषमूर्ति। तो आनुवंशिक गुणें करि सर्व उक्ति ! ॥
भो नाथ ! हे जर तुह्मी मुनिवेषि येता। घेता शिशूहि पदधूलिसि आत्ममाथां ॥
कार्या क्षमा, चुकत अज्ञपणेंचि बाल। चित्तीं कृपानिधि मुने! तुमच्या सखोल! ॥
आम्हांतुम्हांमधिं बरोबरि केविं होणें? । सांगा कुठें पद ? कुठें शिर हो ! गुणानें! ॥
माझें लहान अभिधानहि ' राम ' मात्र। मोठें तुम्हां 'परशु' युक्त न हें विचित्र!
हो देव ! एकगुण कार्मुक आमुचें हें। पुण्याब्धि तें नवगुणात्मक विप्र वाहे ॥
सर्व प्रकारिं हरतों तुळितां तुह्मां मी। कीजे क्षमा जि ! अपराध अनंत रामीं " ॥
संबोधि 'विप्र' 'मुनिवर्य' अशा प्रकारें। रामासि राम बहुवार वचीं विचारें ॥
तेव्हां मनीं अमित कोपुनि आद्य बोले।" बंधूसमान कुटिलत्व तुझेंहि ठेलें! ॥
तूं जाणसि द्विजचि केवळ काय मातें ? । माझें द्विजत्व तुज सांगतसें करें तें ॥
चाप स्रुवा समज, आहुति बाण जाण। मत्क्रोध घोर म्हण तूं अनलासमान ॥७५॥
उत्कृष्ट जाण समिधा चतुरंग सेना। मोठे नृपाल गमेल पशुच्याच माना ! ॥
कापूनियां परशुनें बलि त्यां दिलें मीं:। मी हे करीं समरयज्ञ असंख्य नामी ! ॥
नोहे प्रभाव मम ठाउक हा तुला रे !। ' विप्र द्विजा ' दि वदसी खिजवूनि सारें! ॥
तोडोनि चाप, बहु गर्व भरे तुझ्यांत, । जिंकीन विश्व' असला भ्रम तूं धरीत!" ॥
श्रीराम बोलत " वदा जि! विचारपूर्ण। हा रोष थोर, जरि दोष मदीय सान! ॥
तें जीर्ण चाप तुटलें शिवतांचि त्यास। तेथें कसा जि! मज गर्व शिवेल लेश? ॥७८॥

बोलोनि 'विप्र' जर निंदु बघेन देवा! हें सांगतों भृगुपते ! मनिं सत्य ठेवा ॥
आहे जगांत तरि कोण असा सुवीर। कीं ज्याप्रती भिउनि मच्छिर वांकणार ? ॥
होवोत देव दनुज प्रभु भूप शूर। आम्हांस तुल्यबल वा अधिकप्रवीर ॥
जो कोण बोलवि अम्हांस रणांगणांत। हर्षेंचि त्याशिं लढुं तो जरि काल मूर्त ! ॥
हा क्षात्रदेह मिळुनी रणिं ज्यास भीति, । तो कीं कलंक कुळिंचा अतिनीचवृत्ति;
सांगें स्वभाव, न करीं स्वकुलप्रशंसा। काळाहि भी ग्रसिल, ना परि भानुवंशा!
हो विप्रवंशिं अतुला प्रभुता अशी कीं। जो भी तुम्हांस, जन निर्भय तोच लोकीं!"
ऐकोनि गूढ मृदुला रघुनाथवाणी। लोपे रजःपटल भार्गवधीवरूनि ! ॥८२॥
"घे हे रमापतिधनुष्य करांत रामा ! । ओढूनि फेड मम संशय, सौख्यधामा!"
ऐसें वदूनि, धनु भार्गव देत तोंच। गेलें चढूनि सहजीं धनु तें स्वतांच ! !
आश्चर्य भार्गवमनीं अतिमात्र वाटे। रामप्रभाव कळुनी तनुहर्ष दाटे ॥
जोडोनि पाणि वदला भृगुवंशहीर। चित्तीं न माय हृदिंचा गुरुभक्तिपूर ! ॥
"जय हे रघुवंशपद्मसूर्या ! । जय आर्या ! सुरविप्रधेनुकार्या ! ॥
जय दानववंशवन्यदावा ! । जय मोहादिविनाशनप्रभावा ! ॥८५॥
जय कोपतमोभ्रमव्यथान्ता ! । जय कारुण्यगुणाब्धिशीलकान्ता ! ॥
जय नागरवाक्सुधानिधाना ! । जय भक्तप्रियमानसावधाना ! ॥८६॥
जय विश्वविलोभनीयकांति ! । जय हे कोटिमनोजरम्यमूर्ति ! ॥
स्तुति एक मुखें तुझी कितीशी ? ! श्रुतिशेषादिहि शक्त ना जियेसी ! ॥८७॥
तुज अज्ञपणें वदें, अमेया ! । जय हंसा ! शिवचित्तमानसीया ॥
जय बंधुयुगा ! क्षमानिवासा। मजलागीं करणें क्षमाविशेषा " ॥८८॥
'जय-जय-जयकार' या प्रकारें ! रघुकुलकेतुवरा स्तवनें गंभीरें ॥
करुनि भृगुपतीहि जाय दूरीं। गहन वनांत तपोऽर्थ पुण्यकारी ॥८९॥
स्वतांच सारे भिउनी नृपाळ। गेले पळोनी रिघतां न वेळ ॥
देवादिकीं वाजविले नगारे। प्रभूसि ते वर्षति पुष्पभारें ! ॥ ९० ॥
तें पौर सार नर आणि नारी। बुडोनि जाती बहु हर्षपूरीं ॥
त्यांच्या मनींची छळणारि चिंता सुदैवयोगें सहजीं विलुप्ता ॥९१॥
॥ इति लक्ष्मण-परशुराम-श्रीरामचंद्र संवादवर्णनं नामैकोनपंचाशस्तरङ्गः ॥

## तरंग ५० वा

आनंदवाद्यगजरें भरली त्रिलोकी । साहित्य मंगल मनोहर सिद्ध लोकीं ॥
स्मेरानना सुनयना ललना स्वयूथीं । सर्वत्र रम्य कलकोकिलकंठिं गाती ॥१॥
जें सौख्य होय जनका, नच वर्णु ये तें । आजन्म रंक जणु पावतसे निधीतें॥
सीताहि होय गतशोक सुखीं निमग्ना । कीं ती चकोरललना शशिलुब्ध माना ॥
वंदोनि कौशिकपदीं, मिथिलेश बोले । 'रामें कृपेंचि तुमच्या धनु मोडियेलें ॥
केलें कृतार्थ मज या अजि बंधुयुग्में । आतां तुम्हीं उचित तें करणें जि! धर्में'॥
बोले मुनी " चतुर तूं परिसें नृपाळा! । होता विवाह धनुचे वरि निश्चिलेला ॥
होतांच भग्न धनु, लग्नहि होय साचें । साक्षित्व यास सुरनागनरादिकांचें ! ॥

तथापी तूं आतां नृपवर ! करीं योग्य अवघें ।
विचारूनी विप्रां, गुरुसि, कुलवृद्धांप्रति बघें ॥
करावे जे धर्म श्रुति कथिति आचार विधिंनीं ।
अयोध्येशा दूतांकरविं कळवीं, बोलविं झणीं " ॥ ५ ॥

बोले नृपाळ 'बहु योग्यचि हें दयाळा!' । हर्षोनि दूत विसृजी झणिं त्या पुरीला ॥
बोलावि आत्मपुरिंचेहि धनाढ्य लोक । ते येवुनी लवुनि वंदिति पूर्णतोख ॥६॥
आज्ञापि " सर्व पुर मंदिर हाट वाटा । शृंगारपूर्ण सजवा, चतुरत्व थाटा!" ॥
हर्षेंचि ते निजगृहांप्रति सर्व जाती । तो त्यांस आणवि पुन्हां निजदूतहस्तीं ॥
सांगे 'रचा सुबक मंडप कौशलानें!' । आज्ञा शिरीं धरिति ते विनयावधानें ॥
त्यांनीं तदा चतुर तज्ज्ञहि बोलवीले । ज्यांनीं वितानविधिकौशल जाणियेलें ॥८॥
प्रारंभिली विधियुता रचना विताना । ज्या स्तंभिं हेमकदली रचिल्याहि नाना ॥
पानें फुलें हिरविं पाच रचूनि केलीं । त्यां पद्मरागमय केळफुलेंहि झालीं ! ॥९॥
आश्चर्यपूर्ण रचना बघुनी मनांत । धाताहि मोहुनि अतीवचि हृष्ट होत ॥
सद्वेणु रत्नमणि पाच नियोजुनीयां । केले सपर्ण मुळिं येति न ओळखाया ॥
सौवर्णतंतुमय निर्मित नागवल्ली । पर्णांसमेत परि नाहिं कळोनि आली ॥
तीं हेमतंतुमय बंधनिं घट्ट केलीं । मुक्ताफलावलि मधींमधिं सोडिलेली ! ॥११॥
त्यांतील माणिक हिरे द्युतिमंत पाच । योजून पद्मरचना दृढ केलि साच ॥
केले असंख्य बहुरंगिं विहंग भृंग । ज्यां कूजवी, मधुर गुंजवि वायुसंग ॥१२॥

स्तंभांत देव पुतळे अतिरम्य केले । साहित्य सर्व शुभ तत्करिं हो दिलेलें ॥
चौरंग सुंदर अनेक परी जयांत । माणिक्य रत्नमणि योजुनि शोभिवंत ॥
योजूनि निलमणिकोरि मनोज्ञरंगी । केले रसाल तरुपल्लव मंडपांगीं ॥
कैऱ्याहि त्या मरकतोपलिं निर्मियेल्या । हैमी तशा बदरि रेशमिं ओविलेल्या ॥
उत्कृष्टशोभि रचिलीं किति तोरणें तीं । वाटे जणों खचित तीं स्मरपाश होतीं ! ॥
झेंडे ध्वज प्रचुरभा चवऱ्या पताका । निर्मीयले कलश मंगल भूरि देखा ॥
रत्नप्रदीप अतिसुंदर दीप्तिमंत । आश्चर्यपूर्ण शुभमंडप शोभिवंत ॥
जेथें वधू जनकजा, वर रामराय ती श्रेष्ठ मंडपविभा कशि वर्णु जाय ! ॥१६॥
त्रैलोक्यिंयही न दुसरें तसलें वितान । सीतारघूत्तम जयांत विराजमान ॥
वर्णू शकेल कवि कोण यथार्थ त्यातें । सन्मंगलायतन पावन धन्य कीं तें ! ॥
जैशापरी जनकमंदिरिं दिव्य शोभा । तैशीच पौरगृहिं जी करि नेत्रलोभा ॥
जे राज्य पाहति तदा मिथिलाधिपाचें । चौदाहि त्यांस भुवनें गमतीच तुच्छें! ॥
जी तेथ नीचगृहिंही शुभसंपदा हो । पाहूनि ती सुरपतीहि कसा न मोहो ? ॥
लक्ष्मी जणों कपटवेष धरून तेथें । पौरांगनामिषिं वसे, रमवीत चित्तें ! ॥

रमाच जेथें करिते विहार । घेऊनि रूपें विविधप्रकार ॥
तेथील शोभा कशि कोण वर्णी । जें थांबती शेष तशीच वाणी ! ॥२०॥

इकडे पावन दशरथनगरीतें जनकदूत ते आले ॥
पाहुनि शोभा तेथिल अंतःकरणीं अतीव जे धाले ॥२१॥

भूपद्वारीं जाउन ' आलों जनकांकडून ' कळवीत ॥
तैं दशरथें परिसुनी बोलविलें त्यांसि ऐकण्या वृत्त ॥२२॥

करुनि प्रणाम देती जनकाचें पत्र नृपतितें दूत ॥
तों तें स्वतां उठोनी दशरथ-नृपराय आदरें घेत ! ॥२३॥

तें पत्र वाचतांना नृपनयनीं सलिलबिंदु डवडवले ॥
रोमांचित वपु झालें हर्षें उरही अतीव भारवलें ! ॥२४॥

हृद्रंगिं रामलक्ष्मण, करकमलीं चारुवृत्त तें पत्र ॥
ऐसा दशरथ ठेला कटु मधु कांहिंच वदे न तद्वक्त्र ! ॥२५॥

पुनरपि धीर धरोनी जनकाची पत्रिका नृपति वाची ॥
झाली सभाहि हर्षित कीं कानीं गोष्ट आलि ती साची ! ॥२६॥

खेळत असतां तेथें, पडतां त्यांच्या सुवृत्त कानीं तें ॥
शत्रुघ्न, भरत झाले सन्मित्रांसहच्चि त्या स्थलीं येते ॥२७॥
अतिशय मर्यादेनें अत्यंत स्नेहपूर्ण वच वदुनी ॥
पुसती नृपासि " ताता, आलें हें पत्र हो ! कुणाकडुनी ! ॥२८॥
कुशली अमुचे बंधु प्राणप्रिय असति ना ? कुण्या देशीं ? "
प्रेमप्रश्न परिसुनी वाचि पुन्हां भूप पत्र तनयांसी ॥२९॥
ऐकुनि सद्वृत्ता ते भरले दोघेहि बंधु हर्षभरें ॥
त्यांच्या प्रेमातिशया मावाया तदुर होय कीं अपुरें ! ॥३०॥
पाहुनि भरताचा तो अत्यंत प्रीतिचा भर पुनीत ॥
अंतःकरण सभेचें प्रेमाचें सौख्यसार अनुभवित ! ॥३१॥
नंतर नृप त्या दूतां बैसवुनी घेत आपुल्याजवळ ॥
मधुर मनोज्ञ वचांनीं पुसुं लागे तो तयांप्रती सकळ ॥३२॥
" सांगा मला गड्यांनो ! आहे ना कुशल दोनिही बाळां ?
निज लोचनीं स्वतां तुम्हि देखियले ना मदीय वेल्हाळां ? ॥३३॥
श्यामल गौर असे ते बाळ शरासन निषंग धरणारे ॥
वय सान,—देखिले कीं कौशिकमुनिंच्या सवें विचरणारे ? ॥३४॥
जर जाणिलें तयां तुम्हि उत्तमपणिं तर कथा मला नीट ! "
ऐसें प्रेमविवश तो नृप किति दूतां विचारित अवीट ! ॥३५॥
" ज्या दिनिं विश्वामित्रें नेले ते लाडके मम कुमार ॥
तेव्हांपासुनि आजचि त्यांचा मज हा कळे समाचार ! ॥३६॥
सांगा, कशाप्रकारें ओळखिले मम कुमार मिथिलेशें ! "
तें प्रियवाक्य नृपाचें ऐकुनि ते दूत हंसुनि वदति असें ॥३७॥
" भूपांच्या मुकुटमणे ! ऐकें; धन्य न तुझ्यासम कुणीही ॥
कीं ज्याचे तनय अशी विश्वविभूषण मनोज्ञ जोडी ही ! ॥३८॥
ते बाळसिंह कवणें पुसुनि कुणा काय जाणुनी घेणें ?
विश्वीं तत्कीर्तिपुढें भासे शशि मलिन, भानु शीत गुणें ! ॥३९॥
पुसतां आपण, ' कवण्या चिन्हीं त्यां जाणि आमुचा नाथ ? '
करिं काय दीप लागे हुडकाया दिवसनाथ गगनांत ? ॥४०॥

सीतास्वयंवरास्तव एकाहुनि एक भूप बलशाली ॥
आले परि हरधनु ना भंगि कुणी; हारि त्या नृपां आली ! ॥४१॥
तीनीही लोकींचे वीर अहंमन्य सर्व अवतरले ॥
त्यांचें सामर्थ्य जणों हरचापानें समग्र परिहरलें ! ॥४२॥
उचलाया मेरुगिरी होति सुरासुर विशेष शक्त जरी ॥
परि तेहि हृदयिं भिउनी परतति घालूनि कार्मुका फेरी ! ॥४३॥
सहज स्वलीलया जो कैलासातेंहि उचलिता झाला ॥
तोही तया सभेमधिं खाउनियां हारि, लावि कर भाला ! ॥ ४४ ॥
ऐका महाधरणिपाल ! तदा सलील । श्रीराम राघवकुलोज्ज्वलरत्नशील ॥
तोडी उमेशधनुतें झणिं अप्रयासें । भंगी मतंगजाचि पंकजनाल जैसें ! ॥४५॥
चापध्वनी परिसुनी भृगुनाथ आले । सक्रोध बंधुयुगिं वक्र करीत डोळे !
श्रीरामशक्ति बघण्या निजचाप देत । गेले स्तवोनि भृगुनाथ तपोवनांत ॥४६॥
होती जसे अतुलशक्ति जगांत राम । तैसेच लक्ष्मणहि शोभति दीप्तिधाम ॥
ज्यातें बघोनि नृप कांपति भीतिभावें । शार्दूलशाव बघुनी गज जेविं भ्यावे !
त्या देखुनी सुतयुगाप्रति, भूमिकांता । डोळां नसे भरत अन्य कुणीच आतां !"
दूतोक्तिशैलि अति आवडली नृपाला । प्रेमप्रताप रसवीरहि जींत ठेला ! ॥४८॥
राजा सभाहि सगळी अति हृष्ट दूतीं । त्यां द्यावया द्रविण भूपति घेइ हातीं
ते हस्त ठेविति अधर्म म्हणोनि कानीं । सद्धर्मदृष्टि बघुनी सुख सर्व मानी !
जाई वसिष्ठमुनितें मग भूपराय । दे पत्रिका मुनिकरीं; मुनि तुष्ट होय ॥
दूतांसि बोलावुनि वृत्त समग्रही तें । तो ऐकवीत नृप सादर त्या मुनीतें ॥५०॥
होवोनी अति हृष्ट बोलत मुनी " राजा ! पहा रे ! मही ।
आहे पुण्यनरार्थ नित्य भरली संपूर्ण सौख्येंच ही ॥
जैशा येति नद्या समुद्रिं, जरिही इच्छा तशी त्यास न ।
लक्ष्मीसौख्य न मागतांहि रिघती सद्धार्मिका आपण ! ॥५१॥
होसी तूं गुरु विप्रधेनुसुर यां सप्रेम सेवापर ।
कौसल्याहि तशीच पावन सती सत्सेवनीं सादर ॥
नाहीं कोणिच या जगामधिं दुजा पुण्यात्म तुम्हांसम ।
झालें नाहिं कुणीच पूर्वि, न पुढें होईल वा उत्तम ! ! ॥५२॥

आहे कोण तुझ्याहुनी नृपवरा ! पुण्यात्म ऐसें दुजें ।
कीं, ज्यातें सुत रामसे सुविनयी धर्मव्रती धीर जे ॥
वाटे हे सुगुणाब्धि चारहि शिशू ज्या, त्या सदा मंगल ।
कार्या सिद्ध वरात; वाद्यगजरीं संपूर्ण हो भूतल !" ॥५३॥

ऐकोनि वाक्य गुरुचें नृप नम्रशीर्षी । स्वीकारि 'उत्तम 'ह्मणोनि मुदें विशेषीं ॥
दूतांस देउन निवास रहावयाला । अंतःपुरांत निज भूप सहर्ष आला ॥५४॥
राज्ञीजना सकलही मग तो निमंत्री । त्या ऐकवी जनक जें लिहि वृत्त, पत्रीं ॥
आनंदल्या सकलही, मग त्यांस राय । सांगे स्वतांच, घडलें मिथिलेंत काय॥
प्रेमें प्रफुल्लित नृपाल तशाच राज्ञी । कीं, बर्हिवृंद परिसे मुदिं मेघवाणी ॥
आशीर्वचें दिधलिं हृष्ट अरुन्धतीनें । वृद्धांचिया मनिं अतीवचि हर्ष तेणें ॥
घेती परस्पर अतिप्रिय पत्रिका ती । लावोनि वक्षिं, भरती हृदयांत शांति ! ॥
श्रीरामलक्ष्मणयशें करणीहि, त्यांची । वाखाणि भूप असकृत्, परि ना पुरेचि ॥
मानोनि ही मुनिकृपा, नृप दारिं येत । राज्ञीहि बोलविति विप्रतती समस्त ॥
देती तयांस अतिहर्षि अनेकदानें । आशीर्वचें वितरती द्विज सन्निदानें ॥
बोलावुनी अमित याचक त्यांस दानें । तैं वाटिलीं कितिक कोट्यवधी नृपानें॥
" हे चक्रवर्तिनृपपुत्र यशोविहारी । दीर्घायु होउत सुखांबुधिमग्न चारी ! "॥
ऐसें म्हणोनि वसनें बहुतां परींचीं । ते पांघरोनि निघती स्वगृहां सुखेंचि ! ॥
वाद्यें असंख्य मधु मंगल वाजताती । जाणोनि वृत्त अति हर्षित हो प्रजा ती॥
उत्साह गेहिं सकलां, भुवनींहि चौदा । सीतारघूत्तमविवाह भरी प्रमोदा ॥
वार्ता शुभा परिसुनी जनता प्रहर्षे । शृंगारिती पथ, गृहें लघुही विशेषें ! ॥

अमे अयोध्या जरि नित्य शोभना । रघूत्तमाची शुभपूर्ण सद्गुणा ॥
तथापि आतां हृदयांत हर्षुन । केली जनांनीं अतिरम्यदर्शन ॥६२॥

तेव्हां सर्व पुरींत पूर्ण भरलीं नानापरीं सुंदर ।
वस्त्रें उज्ज्वल, चामरें, ध्वजलता, तैशा पताका वर ॥
मोठे कांचनकुंभ, मंगल अशा जाळ्या मणी तोरणें ।
माला पुष्पमयी दहीं हळदही पुण्याक्षता, ना उणें ॥६३॥
सर्वांनीं निजमंदिरें सजविलीं अत्यंत आनंदुनी ।
वीथी चौकहि लिंपुनी विरचिली सौंदर्यसंपादणी ॥

तेजस्वी निज यूथिं यूथिं युवती सौदामिनीसारख्या ।
श्रृंगारूनि नटूनि षोडशपरीं, संचारती सारख्या ! ॥६४॥
चंद्रानना त्या मृगशावलोचना । निजस्वरूपें रतिमानमोचना ॥
गातीं पदें मंगल मंजुल स्वनीं । मधुस्वरें कोकिल जाति लाजुनी ॥६५॥
कैसें करों ये नृपहर्म्यवर्णन । वितानभा केवल विश्वमोहन ॥
संन्मंगलद्रव्यतती मनोहरा । वाद्यें किती वाजति सुंदरस्वरां ॥६६॥
बंदीहि गाती बिरुदावली कुठें । कुठें द्विजांचा श्रुतिघोषही उठे ॥
गातीं कुठें मंगल गीति कामिनी । श्रीरामसीतागुणनाम गुंफुनी ! ॥६७॥
उत्साह अत्यंत महान् असीम तो । लहान त्या तो अवकाश भासतो ! ॥
तेणें गमे उत्सवपूर कीं तदा । फुटूनि वाहे दिशि सर्व संपदा ॥६८॥
दशरथभवनच्छवी कवीतें । कशि कवनीं वदवेल सर्वथा ते ? ॥
सकलसुरशिरोमणीच राम । अवतरुनी करि ज्यासि तो स्वधाम ! ॥६९॥
भरतासि बोलवोनी नृपति पुन्हां त्यास देइ आदेश ॥
कीं, ' सर्व सज्ज ठेवीं हय, गज, रथ; बोलवीत मिथिलेश ॥७०॥
श्रीरघुवीरवराती लवकर निघण्यास सिद्ध होऊं दे ! ' ॥
बंधुद्वय तें ऐकुनि झालें पुलकित भरोनियां मोदें ॥७१॥
बोलावी भरत तदा गजपति, हयपति असे प्रमुख लोक ॥
आदेश ऐकुनी ते निघती चित्तांत सेवुनी तोख ॥ ७२ ॥
आपापल्या रुचींनीं तुरग तयांनीं सुसज्ज तैं केले ॥
अत्यंत रम्यवर्णी सुंदर हय तूर्ण सजविले सगळे ॥ ७३ ॥
ते चारु अश्व चपलांग अतीव सारे । तप्तायसासम धरे पद टाकणारे ॥
त्या वाजिजाति अमिता नच वर्णुं येती । वाऱ्यासही गतिंत ज्या हरवूं पहाती ॥
झाले कुमारवर त्यांवरती सवार । तेव्हां समस्त भरतासम धीरवीर ॥
धारे मनोज्ञतम वेषविभूषणीं ते । हातांत चंड धनु तेविं कटीस भाते ॥७५॥
रेखीव सुंदर युवे सुमती कुमार । जे शूर संगरपटू सजले सवार ॥
प्रत्येक संगतिं पदातिहि दोन दोन । जे वीर खड्गधर, खड्गरणप्रवीण ॥७६॥
बांधोनि वीर बिरुदें निजवीर्यशंसी । बाहेरिं येति पुरिच्या सजुनी विशेषीं ॥
देती गती स्वतुरगां चतुरप्रकारीं । होती प्रहृष्ट पणवादिकघोषपूरीं ॥७७॥

ते भूषवूनि रथ सारथि सर्व येती । रत्नादिकीं ध्वजपताकिं मनोज्ञरीतीं ॥
चौऱ्याहि ढाळिति, किती घुमतात घांटा । जावा लपोनि रविचा रथगर्व मोठा॥
सुश्यामकर्ण गणनाहि जयां हयां ना । संयोजिले चतुर सारथिनीं रथांना ॥
वाजी सुरम्य मणिभूषणिं भूषवीले । पाहोनि होय मुनिचित्तहि मोहियेलें ! ॥
जेवीं स्थलावरुनि तेविं जलावरूनी । टापाहि ना भिजति सत्वर धावनांनीं ॥
शस्त्रास्त्रसंघ निज सज्ज पुरे करोनी । आणीयले निज रथीं मग सारथ्यांनीं ॥
आले रथांत बसुनी मग सज्ज वीर । बाहेर ते नगरिच्या मिनले समग्र ॥
आनंददायि सकळां निजकार्यिं होती । आरंभितांचि शकुनोत्तम सिद्धिमूर्ति ॥

अभ्राच्या गजराजवृंदिं चढल्या, शोभा न ती वानवे ।
चालों लागति जैं मतंगज, भरे आकाश घंटारवें ॥
वाटे श्रावणमेघराजिच जणों संचारु त्या लागती ।
वर्णावी सुषमा मनोहरतमा भव्योत्तमा ती किती ? ॥८२॥

नानापरीं अपरही किति वाहनें तीं । सौख्यासना सुबकशा शिबिकादि जाती ॥
त्यांमाजिं विप्रवरवृंद निघे बसोनी । कीं छंद, वेद जणु ते तनुधारि कोणी !॥
जे सूत मागध गुणस्तवकारि बंदी । आपापल्या उचित वाहनिं जाति मोदीं ॥
तीं खेचरें वृषभ उष्ट्र अनेकजाति । वस्तू अनेकपरिं घेउनि पृष्ठिं जाती ॥
वाहोनि कावडिहि कोट्यवधी निघाले । घेवोनियां ढिवर वस्तु असंख्य आले ॥
सारेहि सेवकसमूह विशेषवेषीं । यूथीं स्वकीय निघती हृदयप्रहर्षीं ॥८५॥
सर्वांचियाच हृदिं निर्भरहर्ष वाहे । रोमांचकायहि पदोपदिं होत आहे ॥
देखूं कधीं नयनिं ते सुकुमार वीर । श्रीरामलक्ष्मण मनोरममूर्ति धीर!!॥८६॥
गर्जोनि वाजति मनोहर दन्तिघंटा । आकाशिं सर्व रथघोषहि होय मोठा ॥
खिंकाळुनी हय निनादति, वाद्यसंघ । सारेच लोपविति मेघरवप्रसंग ॥८७॥
काना कळे न निज वा परकीय कांहीं । संमर्द भूपगृहसन्निधिं थोर होई ?
जेणें चुरा उडत भूतलिंच्या शिलांचा । भुकाच होत तळिंच्या मणिकुट्टिमांचा !
रामा धरोनि करिं आरति हैम ताटीं । माड्यांवरूनि बघती बहु हर्ष पोटीं ॥
गाती मनोहररवें कवनें रसाळें । तें कोण वर्णि मन जें गुरुहर्षिं लोळे ! ?
तेहां सुमंत्र रथ सज्ज करोनी दोन । सूर्याश्वकीर्तिहर ज्यांप्रति अश्वरत्न ॥
भूपाप्रती मग तयें रथयुग्म नेलें । ज्या शारदामुखहि वर्णुनि हो उगेलें!॥९०॥

त्यांतील एकरथिं राजसमाज बैसे । तेजोनिधान दुसरा दिसला विशेषें ॥
ज्यामाजिं राय चढवी गुरुतें सहर्ष । तोही चढे मग मनीं स्मरुनी सतोष ॥
कैलासनाथगिरिजागणनायकासी तैसें वशिष्ठगुरुंसी नमुनी स्वशीर्षी ॥
तेंव्हां वसिष्ठसह तो नृप तेविं साजे । जैसा बृहस्पतिसवें मघवा विराजे ! ॥
भूपाल वेदविधि ते कुलरीतिही ती । तो आचरोनि बघुनी रचना सुरीति ॥
चिंतोनि राम हृदयीं, पुसुनी गुरूसी । शंखादि मंगलरवीं निघत प्रवासीं ॥
झाले प्रहृष्ट सुर देखुनि ती वराती । ते पुष्पवृष्टि करुनी शुभदायि होती ॥
कल्लोळ एक उठला हयदन्तिघोषें । आकाश मंगलरवें भरलें प्रहर्षें ॥
तैं गाति मंगलपदें नरनागदेव । संगीतरागिं नदती सनयाहि सर्व ॥
घंटाध्वनी, ध्वनि अवर्ण्यचि घंटिकांचा । वर्णावया मधुरिमा वचिं शक्य कैंचा !॥
पट्टे पटाइत किती फिरविती लोक । थट्टेंत बोलति विदूषकहि अनेक ॥
ते हास्यभाषणपटू हसवीत जाती । संगीतगानपटु गाउनि रंजवीती ॥९६॥
तैं राजपुत्र परिसोनि मृदंग ढोल । अश्वांसि नाचविति लक्षुनि पूर्ण ताल ! ॥
ते अल्पही न चुकती हय तालमात्रीं । साश्चर्य नाट्यपटुही बघतात नेत्रीं ! ॥९७॥
ना वर्णवे मिरवणूक मुळींच कोणा । होई मनोज्ञ शकुनावलि भव्यपूर्णा ॥
वामांगिं चाष तृण भक्षिति नीलकंठ। होणार मंगल असे सुचवीति दाट ॥९८॥
सुक्षेत्रिं काक दिसले बसलेत डावे । सर्वां घडे नकुलदर्शन चारुभावें ॥
तैं शीत गंधयुत मंद समीर वाही। येती सुवासिनि सवत्स, सकुंभ त्याही ! ॥९९॥
लावे फिरोनि फिरुनी पुढतीं दिसावे । गाईहि पाजिति समोरचि वत्सभावें ॥
आल्या मृगालि फिरुनी उजवीकडे त्या । ज्या आत्मरूपिं जणुं मंगल हर्षवीत्या ॥
ते क्षेमकारि खग दाविति गोष्ठ चांगी । श्यामा दिसे वरतरूवरिं वामभागीं ॥
आले समोर दिसती दधि आणि मीन । सग्रंथ विप्रयुगलेंहि तशीं प्रवीण !।१०१।
ते मंगलायतन इष्टफलप्रदाते । कल्याणकारि शकुन स्वयथार्थतेतें ॥
स्थापावयासि जणुं, त्या स्थलिं एक वेळीं । एकत्र येति शुभसूचक एकमेळीं !!

॥ इति श्रीदशरथमहाराजवरव्रातप्रस्थानवर्णनं नाम पंचाशत्तमस्तरङ्गः ॥

## तरंग ५१ वा

सारेच मंगल तया शकुनप्रकार । ज्या ब्रह्म तें सगुण सुंदर पुत्रहीर ॥
श्रीरामचंद्र वर तेविं वधूहि सीता । व्याहीपणा दशरथा-जनकां नृकान्तां ॥

ऐशा विलोकुनि विवाह-महोत्सवातें । धाता त्वरें करित आजचि आपणां तें ॥
सत्यत्व हें अनुपमेय अम्हांसि येत । या हेतुनें शकुन हर्षुनि नर्ततात !॥२॥
ऐशा प्रकारिं पथिं चालत ती वरात । वाजी मतंगज सतूर्य निनादतात ॥
साकेतनाथ मिथिलेप्रति येतसे हें । जाणोनि, सेतु सरितें रचिले विदेहें ॥३॥
केले अनेक सुखवास मध्ये मधेंही । स्वर्गीय वैभव जयांमधिं पूर्ण वाही ॥
शय्या, सुखासन-सुवास-सुखाद्य-यांनीं । संतुष्ट होति सगळेचि, न दुःखि कोणी॥
सर्वत्र नित्यनव लाभुनि सौख्यराशि । सारे वराति निज विस्मरती घरांसि !॥
आनंदमूर्ति सुखसागरिं पोहणारी । तैसी वरात न दुजी कधिं लाभणारी ! ॥५॥

ऐकोनि वाद्यघोषां कळलें जनकास ये वरात पुरा ॥
हय, गज, रथवर पदचर सज्ज करुनि तीस जाय सामोरा ॥६॥
सोन्याचे कलश तसे ताट वाट्या पराति अमित परी ॥
तेजस्वि भाजनांतुनि अमृतोपम विविध खाद्य तो वितरी ॥७॥

तीं कीं अवर्णनीयें विविध मनोहर फळें जनकभूपें ।
हर्षभरें प्रेषियलीं भेटीस्तव त्या वरातिस अमूपें ! ॥ ८ ॥

वस्त्रें सुंदर पाठवी बहुपरीं रत्नें महाभूषणें ।
वाजी दन्ति मनोहरें खग-मृगें नेत्रांसि संतोषणें ।
द्रव्यें मांगलिकें अनेक सुमनें सौगन्धिकें चंदनें ॥
प्रेमें हर्षुनियां विदेहनृपती साऱ्या जनांकारणें ॥ ९ ॥

पोहे, दहीं, अशापरि अपार खाद्यें, फराळ रुचिकरसे ।
तो कावड्या भरोनी देई द्विवरासवें मनें सुरसें ॥ १० ॥

वऱ्हाडी ते जेव्हां बघति जनका स्वागतकरा ।
तदा मोद व्यापी हृदयिं तनुतें हर्षचि पुरा! ॥
मुदें सामोऱ्यां त्या निरखुनि समाजाप्रति तदा ।
वरात्यांनीं वाद्यें निनदविलिं असंख्यें बहुमुदा ॥ ११ ॥

हर्षें परस्पर जनांस मिळावयातें । जाती कितेक निज पंक्तिहि सोडुनी ते ॥
आनंदसागर जणों त्यजुनि स्ववेले । ते एकमेक मिळण्यास्तव काय गेले !! ॥१२॥
गावोनि वर्षलिं सुमें किति अप्सरांनीं । आहाटिल्या मधुर दुंदुभिही सुरांनीं ॥
साकेतनाथपुढतीं वितरूनि सारें । सप्रेमभक्ति जनकें नमिलें सुधीरें ॥ १३॥

स्वीकारिलें दशरथें सगळें सभक्ति । तैं याचकांप्रतिहि केलि अभीष्टपूर्ति ॥
सीमांति पूजुनि नृपें बहु गौरवोन । नेले वराति जन वासगृहांत तूर्ण ॥१४॥
अत्युत्तमा रुचिर पायवड्याहि सर्व । ज्या पाहुनी त्यजि कुबेरहि आत्मगर्व ! ॥
अत्यंत शोभन जनांस दिले निवास । सर्वत्र सर्वपरि उत्तम सोइ ज्यांस ॥१५॥
जाणोनि ती निजपुरांत वरात आली, । सीता तिथें स्वमहिमा प्रकटूनि ठेली ॥
बोलावि ती सकल सिद्धिगणा स्मरोनी । केला नृपा अमित पाहुणचार त्यांनीं ।१६।
सीतानिदेश परिसोनि समृद्धि येती । वासार्थ त्या जननिवासिं अनेकरीतीं ॥
त्यांच्यासवें चहुंकडे सुखसंपदांनीं । स्वर्गीयवैभव दिलें सकलां भरोनी ॥१७॥
जेव्हां वऱ्हाडि बघती स्वनिवासिं सारी । स्वर्गीय सौख्यतति अश्रम लाभणारी ॥
कोणांसि कांहिं न उणें; सुखमग्न जे-ते । वाखाणती सकलही मिथिलाधिपातें ॥
सीताकृती बघुनियां रघुरायचित्तीं । झाला प्रमोद अति जो वदवे न उक्तीं ॥
श्रीरामलक्ष्मणमनीं अतिहर्ष झाला । कीं तातदर्शनसुयोग समीप आला ! ॥१९॥
त्यां तातदर्शनसमुत्सुकता जरी ही । संकोच त्यां गुरुपशीं वदवी न कांहीं ! ॥
देखोनि तो विनयभाव तदीय थोर । झाला प्रहर्ष गुरुगाधिजचित्तिं फार ॥२०॥
दोघांसही गुरु धरीत सहर्ष पोटीं । अंगावरी पुलक हर्षुनि होय दाटी ! ॥
डोळ्यांतुनी प्रकट वाहति अश्रुबिंदु । येती तदा दशरथाप्रति हर्षसिंधू ॥२१॥

जाणों तृषार्तांसि तडाग लाभतो । तैसा गमे त्यां नृपहर्म्यलाभ तो ॥
मुनींसवें पुत्र बघोनि पातले । हर्षाब्धिसौख्यीं नृपचित्त रातलें ! ॥२२॥
मुनींस साष्टांग नमूनि भूपति । शीर्षीं धरी तत्पदधूलितें किती ! ॥
त्या ऊठवोनी धरि पोटिंशीं मुनी । आशींसि दे, क्षेम पुसे प्रमोदुनी ।२३।
प्रणामकर्ते बघि आपुले सुत । नृपांसि तें हर्ष हृदीं न मावत ॥
पुत्रां धरोनी उरिं, दुःख संहरी। मृतांगिं कीं प्राणचि तो पुन्हां भरी ! ॥२४॥
वंदी वसिष्ठा मग तें सुतद्वय । प्रेमें मुदें त्या उरिं घे महाशय ॥
ते विप्रवृंदाप्रति नम्र वंदिती । आशीर्वचें त्यांहि दिलीं तयां किती ! ॥२५॥

रामासि सानुज करी भरत प्रणाम । त्यां ऊठवोनि कवळी हृदयाशिं राम ॥
आलिंगिले उभय बंधुहि लक्ष्मणानें । हर्षे भरोनि पुलकांकित सर्व तेणें ॥२६॥
भेटे कृपाळु विभु राम विनीतचित्तें । आप्तस्वकीयजन पौरजनादि ते ते ॥
मित्रप्रधानपरिवारजनां समेतां । तैं याचकांसहि यथोचित आचरीता ॥२७॥

वऱ्हाडि लोकां जंव राम भेटला । प्रहर्ष त्यांतें किति थोर वाटला ! ॥
खरीच हृत्प्रीति विराजतां मनीं । रीती तिची येइल केविं वर्णुनी ? !
नृपाचिया सन्निध सूनु ते तसे । धर्मादि कीं ते चतुरर्थ मूर्तसे ॥
रायासवें पाहुनि चारि नंदनां । नारीनरांना पुरिं हर्ष हो मना !॥२९॥
पुष्पवृष्टि करिती सुर सारे । वाजवीति मधुघोषिं नगारे ॥
अप्सरा करिति नर्तन मोदें । गाति सुस्वर जयें नभ कोंदे ॥३०॥
गेले सामोरे द्विज, सचिव, शतानंद, सूत, मागध ते
बंदी, विदूषकादिक सन्मानिति दशरथा विनत चित्तें ॥३१॥
घेउनि निरोप त्याचा येती ते परत आपुल्या गेहां !॥
प्रमुदित मन पौरांचें, सेविति उत्सव अपूर्व रागें हा ॥३२॥
आली वरात, आधीं लग्नाच्या, म्हणुनि हर्ष बहुधा त्यां ॥
ते ब्रह्मानंदसुखें विनविति ' दिन रजनि दीर्घ करिं, धात्या !'॥३३॥
" सौंदर्यसीमा रघुनाथजानकी । पुण्यावधी भूपति हेचि दोन कीं ! "
जिथें तिथें पौर समग्र वानिती । नारीनर व्यर्थ नव्हेचि वाणि ती ! ॥३४॥
" जनकसुकृतमूर्ती जानकी हेचि जैसी। दशरथसुकृताची राम सन्मूर्ति तैसी
कुणिंच न कधिं केली त्यांपरी शंभुसेवा। फलहि नच कुणांतें त्यापरी प्राप्त केव्हां !
कवणहि नच झालें या जगीं त्यांसमान।नच कुणि अजिं आहे, ना पुढें भावि कोण।
सकल सुकृतराशी आम्हि हे धन्य आहों । जनकनगरिमध्यें जन्मलों राहिलों हो !
नयनिं निरखिताहों जानकी-रामरूप । खचित सुकृत कोणां यापरी हो अमूप ?
अधिक सुभग हें कीं पाहुं सीताविवाहा। नयनसुफलकर्ता योग आला भला हा"
कमलनयन रामा कोकिलाकंठि कोणी। वदति मधुर भावें एकमेकां स्ववाणीं ॥
'खचितचि सखयांनो! आणि हा योग धाता। नयनविषय व्हावे बंधु हे दोनि आतां

वारंवार प्रभु जनक तो प्रेमसंपूर्ण साच ।
माहेरातें प्रियतमसुते आणवील स्वतांच ॥
तीतें न्याया परतहि पुन्हां येत जातील बंधू ॥
हेही दोनी अमितमदनांहूनि लावण्यसिंधू ॥ ३९ ॥

होतील त्यांस सखि! पाहुणचार नाना। व्हावी अशी प्रिय न सासुरवाडि कोणा ?
हे रामलक्ष्मण विलोकुं पुन्हां पुन्हां गे ! सौख्यासि सेवितिल पौर निजांतरंगें ॥

ही रामलक्ष्मण अशी जशि जोडि धन्य । तैसेचि पुत्र नृपसंगिं दुजेहि अन्य ॥
ते श्याम एक, पर गौर मनोज्ञ दोनी । ऐसेचि होति' कथिती बघणार कोणी !
बोले कुणी नयनिं आजचि मी बघें ते । वाटे विरिंचिच तयां घडवी स्वहस्तें ॥
श्रीराम होय भरताचसमान थेट । नारीनरां सहज भेद कळे न नीट ! ॥४२॥
शत्रुघ्नसाच जणु लक्ष्मण एकरूप । लावण्य तें नखशिखान्त तसें अमूप ॥
जें त्यांत चित्त रमतें, वदवे न वाणीं । त्रैलोक्यिंयही नच तया उपमेसि कोणी !"॥
तुलसिदास म्हणे, उपमाच न । करि कसें मग सत्कवि वर्णन ! ॥
विनय-शील-मति-द्युति-शक्तिंना । निधि तयांपरि तेच; तदन्य ना ! ॥
पौरांगना पसरुनी पदरां विधीतें । प्रार्थीति "याच नगरीं शुभ लग्न हो तें ॥
चारीहि बंधुंसि करग्रह येथ व्हावे । आम्हींच त्यांस शुभमंगल गान गावें ! ॥४५॥
त्या एकमेक वदती युवती सुगात्री । रोमांचपूर्णतनु अश्रु भरोनि नेत्रीं ॥
"ऐसेंचि सर्व करणार सये ! उमेश । पुण्याब्धि कीं उभय हे नृपती विशेष !"॥

॥ इति श्रीमहाराजदशरथस्य मिथिलापुरप्राप्ति-वरव्रात-पुरजनानन्दवर्णनं नामैकपंचाशत्तरङ्गः ॥

## तरंग ५२ वा

ऐशा करीत हृदयांत मनोरथांतें । आनंदवीचि अनिवार भरीति चित्तें ॥
सीतास्वयंवर बघू म्हणुनी नृपाल । जे येति, ते बघुनि राघव हर्षलोल ॥१॥
त्यांनींहि रामयश गाउनियां विशाल । केलें सहर्ष गमन स्वपुरां सलील ! ॥
ऐशापरी दिन कितीक मनःप्रमोदें । गेले वराति-पुरवासिजनां विनोदें ॥२॥
आला पुढें सुदिन मंगल लग्नपोष । हेमंत काळ महिना शुभमार्गशीर्ष ॥
नक्षत्रयोगतिथिवारशुभग्रहादि । वेधाच कीं शुभमुहूर्त गणोनि साधी ॥३॥
तो नारदाकरविं जो कळवी मुहूर्त । आधींच जोशिहि निवदति तो यथार्थ ॥
ऐकोनि तें, म्हणति त्या मग वर्तवीत्या कीं 'ब्रह्मदेवचि दुजा' अभिधा नवी त्या !
ती सर्व मंगलनिदान मुहूर्तवेला । जी धेनुधूलिसमया सुगुणानुकूला ॥
वाखाणली सुमति विप्रजनीं विदेहा । तैं राय 'उत्तम'म्हणे,'सुफलो विवाहा !'
आमंत्रि राजा स्वपुरोहिताप्रती । सांगे 'न होवोचि विलंब संप्रति !'
तेव्हां शतानंदहि बोलवीतसे । सारे प्रधानादिक सिद्धिमानसें ॥ ६ ॥

त्यांनीं मंगलवस्तु सर्वहि तदा संपादिल्या शोभन ।
वाजों लागलिं शंख दुंदभि तुरें वाद्यें मनोज्ञस्वन ॥
केले मंगलकुंभ, होति शकुन प्रख्यात भव्यप्रद ।
गार्णी गाति सुवासिनी शुभ ऋचा सद्विप्र जे कोविद ॥ ७ ॥

ऐशा प्रकारिं जनवासगृहासि येती । आणावया रघुवरासि तसे वराती ॥
तो देखितां दशरथालयिंचा विलास । क्षुद्राचि इंद्रविभुता जणुं त्यापरीस ! ८
'समय भरत आला हो ! निघावेंचि आतां' । विनति दशरथातें यापरी केलि जातां
निनदति शुभघोषें चौघडे वाद्यसंघ । कुलविधि करि राजा साधुनिर्दिष्ट सांग

तदा अयोध्येश्वरभाग्यवैभवें । ब्रह्मादि वाखाणिति देव संस्तवें ॥
सहस्रशीर्षा धरणीधरा गमे । स्वजन्म तो व्यर्थचि मात्र संभ्रमें ॥ १० ॥
जाणोनि तो मंगलकाल, निर्जर । वर्षोनि पुष्पें, निनदीति सुस्वर ॥
वाद्यें मनोज्ञें बहु हर्षि ते किती । श्रीरामसीतेप्रति ते प्रशंसिती ॥ ११ ॥
ब्रह्मा महेशादिक देवयूथ ते । असंख्य आकाशिं विमानिं बैसते ॥
महोत्सवें रामविवाहदर्शना । येती प्रहर्षें सहभक्तिभावना ॥ १२ ॥
बघोनियां त्या मिथिलापुरीप्रति । चित्रांत सारे सुरही विमोहती ॥
त्यां क्षुद्र तैं वाटति आत्मलोकही । साश्चर्य दृष्टा मिथिलापुरी तिहीं ॥१३॥
तैं मंडपाची रचना अलौकिकी । अत्यंत हृद्या दिसली तयां निकी ॥
वैचित्र्यपूर्णा बघुनी सुरीति ती । सौंदर्यसारा अतिहृष्ट देखती ॥१४॥
मनोज्ञ नारीनर त्या पुरींतले । सुधर्म सच्छील सुविद्य चांगले ॥
बघोनि सारे सुर देवतांसह । दिपून गेले ! द्युति त्यांस दुःसह ! ॥१५॥
नक्षत्रतेजें फिकिं होति इंदुनें । तैसेच जाणों सुर पौरदर्शनें ॥
आश्चर्य वेध्यासहि चित्तिं वाटलें । कीं तत्कृतीतें स्थल तैं न कोठलें ! ॥१६
श्रीशंकरें तैं समजाविलें सुरां । की "नैव आश्चर्य तुम्ही मनीं करा ॥
धैर्या धरोनी मनिं चिंतुनी पहा ! । सीतारघूत्तंसविवाह होय हा ! ॥१७॥
नामेंच ज्यांचीं हृदिं चिंतिलीं जरी । अमंगलां नाश करीति सत्वरीं ॥
येतात हस्तीं पुरुषार्थ चारही । ते रामसीता जगिं जोडि थोरही !" ॥१८॥
शंभू असें त्यां समजावि सांगुनी । चले पुढें तो वृषराजवाहनीं ॥
निघे अयोध्येश जसें सुरां दिसे । रोमांचुनी त्यां अति हर्ष होतसे ॥१९॥

-संगें नृपाच्या जन साधु, भूसुर। सेवीति त्यातें नररूपिं निर्जर! ॥
रायासवें ते सुत चार शोभले। जे देहधारी जणुं मोक्षसे भले! ॥ २० ॥
तें एक नीलमणिकांति मनोज्ञ युग्म। तैसें सुवर्णसमकांति दुजे निकाम ॥
पाहोनि, हर्षभर पावुनि देवचित्तीं। प्रेमांबुधीस भरती चढली किती ती! ॥
रामासि देखुनि पुन्हां हृदिं हर्ष दाटे। ते वानिती दशरथा, स्तवपूर लोटे॥
पुष्पें तयांवरि नभांतुनि वर्षती तें। तत्प्रेमवर्णन अशक्यचि वर्णनातें ॥२२॥
श्रीरामरूप अतिसुंदर विश्वकांत। आपादमस्तक मनोहर जें नितान्त ॥
पाहे उमेसह पुरारि सहर्ष भावें। प्रेमाश्रु नेत्रिं, पुलकावलि गात्रिं पावे! ॥२३॥
तें बर्हिकंठहृदयंगमकांति अंग। विद्युद्द्युतीहुनिहि भास्वर वस्त्ररंग ॥
अत्यंत शोभन अनेक विवाहभूषा। सन्मंगलावह जया सजल्या विशेषा ॥२४॥
तें शारदेन्दुसम निर्मलकांति वक्त्र। तें नेत्र लाजवित नूतन पद्मपत्र ॥
सारी अलौकिक अशीच मनोज्ञता ती। जाणावि मात्र हृदयें, वदवे न उक्तीं!
ते बंधु सुंदर बरोबर चाललेले! बैसोनि अश्विं चपलीं, नटुनी निघाले ॥
वाजींवरी रुचिर राजकुमार अन्य। बंदी सुवंश बिरुदें किति गात धन्य ॥२६॥
ज्या अश्वरत्निं रघुराय विरूढ जाय। तद्रा बघोनि गरुडासहि लाज होय ॥
तो अश्व शोभन असा सगळ्याच रीतीं। कीं वाटलें स्मरचि घे हयरूपता ती!!

मदनचि बनला वाजिवेषिं कीं रामहितास्तव रम्यतनू ॥
गुणबलरूपें गतिवय यांहीं त्रिभुवन मोहित करित जणूं! ॥
जीन जयाचें रत्नमौक्तिकीं चमकत माणिकिं दिव्यपणें ॥
किंकिणि भूषा लगाम अनुपम; सुरनरमुनिमन भुलत गुणें! ॥२८॥

श्रीरामचित्तिं निजचित्त करून लीन। सौंदर्यपूर्ण हय चालत तो मनोज्ञ!
नक्षत्रविद्युदभिभूषित मेघ कीं तो। मोरा विलासमधुरा जणुं नर्तवीतो! ॥
श्रीराम ज्यावर सवार तया हयासी। वाणीहि वर्णिल यथार्थ कविर्त्विं कैसी?
तल्लीनचित्त हर पाहुनि रामरूप। त्या नेत्र पंचदश ते प्रिय होति खूप ॥
त्या सुंदराश्विं बघुनी रघुवंशनाथा। लक्ष्मीसमेत हरिच्याहि विमोह चित्ता! ॥
ब्रह्मा बघे रघुपतिच्छवि आणि हर्षे।' कां? नेत्र आठचि मला' करि दुःख ऐसें!
उत्साह वाटत अतीव षडाननातें। ब्रह्म्याहुनी नयन दीडपटीं तया ते! ॥
रामासि पाहुनि सुरेश म्हणे सुजाण। कल्याणकारि गणि गौतमशाप पूर्ण! ॥

सारेच देव म्हणती 'अजि इंद्र धन्य ! । नोहेचि त्याजसम कोणिहि धन्य अन्य!'
सर्वां सुरांस अति मोद, बघूनि राम, । दोनी नृपाळसमुदाय सुतुष्टिधाम ! ॥
राजसमाजीं दोहिंकडे बहु हर्षे दुंदुभि दुमदुमती ॥
सुर हर्षानें वर्षुनि सुमनें 'रघुकुलरत्ना ! जय' म्हणती ॥
अशा प्रकारें वरात ये हें जाणुनि शुभकर त्या गजरीं ॥
राज्ञी बोलवि सुवासिनींना मंगल आरति सिद्ध करी ॥३४॥

नानापरीं आरति सिद्ध घेउनी । तैसीच नानाविध मंगलें क्षणीं ॥
वरांगना कुंजरगामिनी मुदा । ओवाळण्या जाति रघूत्तमा तदा ॥३५॥
चंद्रानना त्या मृगशावलोचना । स्वरूपतेजीं रतिगर्वमोचना ॥
सुरम्य वस्त्रें बहुमूल्य लेइल्या । अलंकृतींनीं सकला विभूषिल्या ॥३६॥
सन्मंगलें अंगिं समग्र साजलीं । गानें जयांच्या कलकंठि लाजली ॥
सकिंकिणीनूपुरकंकणध्वनी । जावे गतीनें स्मरदन्ति लाजुनी ! ॥३७॥
वाद्यें अनेकपरिंचीं नदती सुघोषीं । आकाशिं तेविं नगरीं विधि पुण्यराशि ॥
श्रीशारदा, तशि रमा, गिरिजा, शचीही । याही तिथें; चतुर पावन पुण्यवाही ॥
या देवता कपटवेषिं बनूनि नारी । अंतःपुरीं विचरती अतिहर्षपूरीं ॥
गाती सुधामधुर मंगलपूर्ण गाणीं । हर्षीं निमग्नपणिं त्यां वळखी न कोणी ! ॥

कोण ओळखी कुणा ? निघति त्या ओवाळाया ब्रह्मातें ।
मधुर गाति किति वाजतिं वाद्यें वर्षति सुमतति सुर किति तें ? ॥
थाटिं अशा त्या प्रमोदसिंधुस बघतां सकलां मोद भरे ।
लोचन सलिलें भरलें, सुतनुंसि पुलकावलि त्यां झाकि पुरें ॥ ४० ॥

बघोनि श्रीरामा रुचिरतमवेषा निरुपमा ।
मनीं सीतामाता अनुभवित जो सौख्यगरिमा ॥
तयातें वर्णाया शकतिल मुळीं कल्पशतही ।
न वाग्देवीकोटी अपरिमित वा शेषहि महीं ! ॥ ४१ ॥
भरे प्रेमाश्रूनीं नयन, परि राणी स्वहृदया ।
मनीं मांगल्याचें स्मरण धरुनी आवरि तयां ॥
प्रहर्षानें केली रघुकुलवरा आरति तिनें ।
कुलाचारा तैसें श्रुतिमत करी ती सुविधिनें ॥४२॥

पंचध्वनी चालति, गानमंगल, । नानापरीं पायघड्या विनिर्मल, ॥
केली तिंनें आरति, अर्घ्य घातलें । श्रीराम तैं मंडपगर्भि पातले ॥४३॥
दशरथनृप शोभे सर्व लोकांसमेत । विभव बघुनि त्याचें दिक्पती लाजतात ॥
सुर करिति कितीदा पुष्पवृष्टी तयातें। द्विजवर पठती तैं योग्यशीं शांतिसूक्तें ॥
गगनिं, नगरिं तैसे चालले घोष मोठे । निजपर कवणाचे नायके कोण कोठें ॥
प्रविशत रघुराणा उत्सवानें वितानीं । बसविति वरभागीं देउनी अर्घ्य पाणी ॥

बैसवुनी त्या आसनिं आरति करिती निरखुनि वर सुखिता ।
वस्त्रभूषणें रत्नें टाकिति ओंवाळुनि किति तैं वनिता ॥
गाती मंगल; कौतुक देखति विधिमुखसुरही द्विजवेषें ।
रघुकुलपंकजरविच्छवीतें पाहुनि होति न धन्य कसे ? ॥४६॥

रामाची ओवाळणि नापित तांबोळि भाट नट घेती ॥
अत्यंत तोष हृदयिं न माउनि आशीर्वचें नमुनि देती ॥४७॥

अति प्रीतीं भेटे दशरथ विदेहासि; करिती ।
मुदें साऱ्या रीती श्रुतिजनमतीं संमत किती ॥
महाराजे दोनी मिळति उरिं ते, त्यांस तुलितें ।
न यत्नेंही लाभे ! कविमन खिजे ! त्यांसमचि ते ! ॥४८॥
बघोनी त्यां व्याह्यां सुरमनिं अति प्रेम भरलें ।
सुमें वर्षोनी ते उभयसुयशें गात रमले ॥
तयां वाटे, “ ब्रह्मा रचि जग तदापासुनि भले ।
किती झालीं लग्नें परि न दिसले व्याहि असले ! ॥४९॥

विवाह आम्ही बघतों अनंत । न हे परी थाट समृद्धि त्यांत ॥
समान ज्यां हो विभवादि पूर्ण। न देखिले व्याहि अम्हीहि कोण!” ॥

ऐकोनि देववच सुंदर आणि साच । दोनी समाजि अति आदर हो तसाच ॥
घालोनि पायघडि सत्तम, अर्घ्य देत । अत्यादरें जनक मंडपिं त्यास नेत ॥५१॥

चित्रविचित्रा मंडपरचना सुंदर देखुनि भुलति मुनी ।
स्वकरें सिंहासनों बैसवी सकलां सन्मति नृपतिमणि ॥
स्वकुलदेवतेसमचि वसिष्ठा पूजुनि आशीर्वच घे तो ।
पूजि कौशिका प्रीतिभरें ज्या तो भर कुठला पर दिसतो ! ॥५२॥

श्रीवामदेवादिक सर्वही मुनी । अतीव हर्षें जनकें समर्चुनी ॥
दिलीं तयां सादर दिव्य आसनें आशीर्वचें घेतलिं सौख्यवर्षणें ॥५३॥
चित्तांत भावें मग ईश मानुन । करीत तो कोसलराजपूजन ॥
विनम्रभावें स्तवि हस्त जोडुनी । स्वभाग्यपुण्यें विभवें किती गणी ॥
पूजीयले सर्व तसे वऱ्हाडिही । त्याह्मापरी सादर सर्व रीतिंहीं ॥
योग्यासनें सर्वजनांप्रती दिलीं मी वर्णु ती एकमुखें किती भलीं? ॥५५॥

सन्मानिले भूपतिनें वराति ते । दानें सुमानें विनयें सुभाषितें ॥
ते गौरवीलें जनकें प्रहर्षुनी । सन्मान त्यांचेवरि भूरि वर्षुनी ॥५६॥
ब्रह्मा, महेशादि, दिनेश, दिक्पती, । जे जाणती राघववैभवाप्रती ॥
घेऊनि तेही द्विजवेष नेटके । तो सोहळा पाहति मूककौतुकें ! ॥५७॥
न जाणतांही सुर त्यांसि मानुनी । नृपाल पूजी सकलां वरासनीं ॥
सद्भक्ति त्याची सकलीं प्रशंसिली । आशीर्वचें त्यांहिं सहर्ष वर्षिलीं ॥

कोण कुणातें तेथें जाणत ? निजशुद्धीही नुरत कुणा ॥
प्रमोदकंदा बघुनि वरातें उभय बाजुच्या हर्ष मना ॥
सुजाण राघव जाणुनि देवां पूजुनि हृदयीं आसन दे ! ॥
सुभावशील प्रभुचें जाणुनि विबुधमनें तैं भरति मुदें ! ॥५९॥

श्रीरामचंद्र-मुखचंद्र-विभेसि नेत्र । जे कीं चकोर अतिसुंदर हृष्टगात्र ॥
अत्यादरें चतुर सेविति भक्तिभावें । प्रेमप्रमोद अमितावधि त्यांस पावे ॥६०॥

वशिष्ठांनीं तेव्हां अवसर बघोनी कथियलें ।
शतानंदालागीं निजनिकट आणूनि वहिलें ॥
" कुमारीतें आणा झणिंच तुम्हि जा, हो न उशिर ! ।
मुनीच्या आदेशें निघत मुदित ब्राह्मणवर ॥ ६१ ॥

ऐकून सादर पुरोहितवाक्य राणी । साऱ्या सख्यांसहचि जाय मुदें भरोनी ॥
बोलावि ती द्विजवधू कुलवृद्ध नारी। रीती कुलागत करी, शुभ गाति सारी ॥६२॥
ज्या मानवीवेषिं सुरांगना कुणी । आल्या मनोज्ञा अतिरम्यरूपिणी ॥
त्यांना बघोनी सगळ्याच हर्षती । जरी न हो ओळख पूर्व कोणती ! ॥६३॥
त्या वाटल्या प्राणसमाच कीं प्रिया । सन्मानि राज्ञी बहु संमदें तयां ॥
मानी तयां ती जणु शारदा रमा । श्रीशंभुची वा दयिता सती उमा ! ॥६४॥

सीतेसि शृंगारुनि सर्व सुंदरी । तिच्या सख्या प्रेमळ हर्षनिर्भरीं ॥
घेऊनि तीतें मग येति मंडपीं । सौंदर्य नेत्रीं जनता उदंड पी ! ॥६५॥

घेउनि तीतें सख्या चालल्या सादर मंगलविभूषणा ।
ल्याल्या षोडश शृंगारांतें मत्तमतंगजगति ललना ॥
गान ऐकुनी ध्यान मुनींचें चळे लाजतिहि पिक काम ।
नूपुर-कंकण-मंजीरध्वनि सताल वाजति अभिराम ! ॥६६॥

सकलललनावृंदीं शोभे मनोहर जानकी ।
सहजललिता सौंदर्याची खनीच जणूं निकी ! ॥
गमलि सुषमारूपीं रामासमूहिं विराजते ।
जणुं मधुरता ती कीं मूर्ता सुकांत अतीव ते ! ॥६७॥
न सीतारूपातें कवणहि कधीं वानुं शकती ।
नसे कीं त्या सीमा, वरि लघुतमा हे कविमति ! ॥
वऱ्हाड्यांनीं सीता बघितलि यदा पावनतमा ।
वितानीं येतांना नमिलि हृदिं ती मूर्त सुषमा ॥६८॥

हो राम पाहुनि तिला मनिं पूर्णकाम । पुत्रांस ती दशरथासह सौख्यधाम ॥
ना वर्णवेचि कवणा सुख जें तयांसी । देवादिकीं नमुनि वर्षिलि पुष्पराशि ॥
आशीर्वचोध्वनि भरे शुभ तें मुनींचा । झाला सुघोषभर दुंदुभिवादनांचा ॥
प्रेमें प्रमोदभरिं मंगल गान चाले । नारीनरां सुरवरां किति सौख्य झालें ! ॥
सीता प्रवेश करि मंडपिं यापरीं तें । गाईयलीं मुनिवरीं मुदिं शांतिसूक्तें ॥
तें योग्य सर्व विधि त्या समयीं करी ती । दोघांचे कुलगुरु श्रुतिकीर्त रीतीं ॥

तदुपरि सद्गुरु-गौरी-गणपतिपूजा करविलि विप्रवरीं ।
स्वतां प्रकट सुर घेती पूजा आशीर्वाक्यें देति खरीं ॥
जें जें जेथें योग्य मुनिमतें मधुपर्कास्तव मंगल तें ।
स्तबकीं कलशीं हैमीं भरुनी किति परिचारक करिं धरिते ॥७२॥
प्रीतमनें कुलरीति निवेदी रवि, त्या केल्या भक्तिभरें ।
होतां हें सुरपूजन बसविलि सीता सिंहासनीं त्वरें ॥
सीताराघव बघति परस्पर परि ती प्रीती कळत कुणा ? ।
बुद्धिमनोवाग् यांसि अगोचर, गोचर कशि मग कविवचना !! ॥७३॥

तैं होमकालीं अनल स्वमूर्तिनें । स्वतां करें आहुति घेत सन्मनें ॥
वेदादिही घेउनि विप्ररूपता । विवाहमंत्रां म्हणती यथार्थतां ॥७४॥

जगद्वंद्या जी कीं जनकमहिषी मुख्य महिता ।
कशी सीतामाता कवनिं कथवे ती समुचिता ? ॥
जणों धाता तीतें सृजित मिसळोनी गुणवर ।
सुकीर्ती सत्पुण्यें सुख अतुलसौंदर्य चतुर ! ॥ ७५ ॥

बोलाविती सुसमयीं मुनिवर्य तीतें । तैं आणिती तिज स-मान सुवासिनी तें ॥
ती शोभली जनकवामदिशीं सुनेत्रा । मैना जशी हिमगिरीसह सच्चरित्रा ॥७६॥
सौवर्णकुंभ शुचि मंगल वारिपूर्ण । सद्गंधयुक्त तबकें द्युति-दिव्यरत्न ॥
अत्यंत हृष्ट मनिं भूप तशीच राज्ञी । रामासि अर्पिति समोर, समृद्धपाणि ! ।७७।
तैं मंगलोक्ति म्हणती मुनि वेदसूक्तें । हो पुष्पवर्ष कितिदा नभिंहून त्यांतें ॥
प्रेमें वरा निरखिती किति दंपती ते । प्रक्षालुं लागति शुभंकर तत्पदांतें ! ॥७८॥

जीं पदकंजें स्मरारिमानसिं सदैव शोभति; जीं सुकृतें ।
स्मरतां हृन्मल, कलिमल नाशिति तीं पदकंजें क्षालिति ते ! ॥
उभयहि होती हर्षभरानें पुलकित तेव्हां नभिं नगरीं ।
गाननिप्राणध्वनि किति गर्जे जयजयकारहि विश्व भरी ! ॥७९॥

ज्यांच्या स्पर्शें पातकपूर्णा मुनिवनितेतें सुगति मिळे ।
मरंद ज्यांचा सुरसरिता ती हरशिरिं साजे तीर्थबळें ॥
ज्यांवरि भृंगचि निजमन करुनी ध्येय साधिती योगिमुनी ।
तीं पदकंजें जनक धूत तैं ‘ जयजय ’ म्हणती सर्व जनीं ! ॥ ८० ॥

वधूवरांचे करतल जोडुनि वंशा कुलगुरु उच्चरिती ।
झालें पाणिग्रहण बघोनी सुरनर मुनिविधि मुदिं भरती ॥
सुखसंभारा वरा बघोनी पुलकिं दंपती हर्षिं भरे ॥
नृपरत्नें जनवेदाविधीनें कन्या दिधली यशस्करें ॥ ८१ ॥

हिमनग दे जशि गिरिजा शंभुसि, हरिसी कमला सागर दे ॥
रामा सीता तशी जनक दे विश्वा भरि नव कीर्तिनदें ॥
कशी करावी विनति ? विदेहा ‘ विदेह ’ करि तो श्यामतनू ! ॥
विधिनें होमा करुनि गांठिले पदरीं घालिति फेरि जणूं !! ॥८२॥

जयजयजयघोषें बंदिलोकोक्तिघोषें श्रुतिपठनसुघोषें मंजुसंगीतघोषें ॥
पटहनिनदघोषें तूर्यघोषादिकांनीं मुदित सुर करीती वृष्टि दिव्यप्रसूनीं ॥८३॥
तें जैं वधूवर करीत सुरम्य फेरी । साफल्य-लाभ नयनांप्रति घेति सारीं ॥
तें वर्णवेचि न मनोहरयुग्म वाणीं । जी ती तया उपमिती गमणार गौणी !॥८४॥
स्तंभांतल्या मणिगणीं प्रतिबिंबलेलीं । सीतारघूत्तमयुगें द्युतिमन्त ठेलीं ॥
तेव्हां गमे जणुं असंख्य तनू धरोनी,।लग्नोत्सवा बघति ते रतिकाम दोनी !॥८५॥
ते दर्शनोत्सुक जरी रतिकाम चित्तीं । संकोचही हृदयिं अल्प न ते धरीती ॥
यासाठिं ते प्रकटती लपतीहि दोनी । स्तंभांतल्या मणिगणीं फिरुनी फिरूनी! ॥८६॥
तैं देखणार सगळे जनकासमान । तल्लीन होति विसरोनि शरीरभान ॥
हर्षेंचि संपवि पुरोहितवर्य फेरी । दानें दिलीं अतिथिंना परिपूर्ण सारीं ॥८७॥
शेंदूर पेरि शिरिं राघव जानकीच्या । शोभा न ती कधिंहि वर्णनशक्य वाचा ॥
पद्मामधें जणुं भरी अरुणां परागां ! । चंद्रामृतास्तव जसा अभिलाष नागा ! ॥
देती वसिष्ठ अनुशासन रामसीते । एकासनीं नववधूवर बैसती ते ॥
त्या दर्शनें दशरथा अतिहर्ष झाला । तैसाच लोकसमुदायहि चित्तिं धाला ॥

एकासनिं ते रामजानकी बघुनि दशरथीं मोद भरी ।
पुलकिततनु तो बघे कितीदा स्वपुण्यसुरतरु सुफल धरी ॥
उत्सव जग भरि, गर्जति सगळे 'लग्न जाहलें रामाचें !' ।
कैसी वर्णनिं पुरे ? जीभ ही एकलि, मंगल बहु साचें ! ॥९०॥
नंतर जनकहि वसिष्ठवाक्यें विवाहसिद्धी करुनि बरी ।
आणवि मांडवि ती श्रुतकीर्ती तशी ऊर्मिला या कुमरी ॥
कुशकेतूची कन्या पहिली सुखशोभागुणशीलखनी ।
भरता दिधली विवाहविधिनें जनकें भूपें हृष्टमनीं ॥ ९१ ॥
बहिण धाकुटी सीतेची दुजि सकल सुंदरी जाणुनियां ।
दिली ऊर्मिला लक्ष्मणराया विधिसन्मानें उचित तया ॥
शत्रुघ्नातें दिली मनोज्ञा श्रुतकीर्ती गुणशीलवती ।
सुलोचना विधुमुखी अशी ती भूपतिरायें बुद्धिमती ॥ ९२ ॥
निजानुरूपा वरा लाभुनी वरिं संकोचित, हृदिं हृष्टा ।
परस्परां त्या सार्‍यां पाहुनि अमरीं सुमताति किति वृष्टा ! ॥

जीव जसा निज चारि दशांसह निज विभुसंगत शोभतसे ।
चारि वधू त्या निजवरसहिता शोभति मंडपिं एकिं तसे ॥९३॥

सकलसुत वधूंसमेत पाहे । दशरथराय अतीव सौख्य लाहे ॥
मिळविंत जणुं तो क्रियाच चारी । सुफलसमृद्धित ज्या चतुःप्रकारीं ॥
जें वर्णिलें रामविवाहदर्शन तैसेंच तद्वधुविवाहही पण ॥
जें अर्पिलें आंदण तें अमेय कीं । भरोनि तो मंडप हेम-हीरकीं ! ॥९५॥

विचित्रशाली बहु शालजोड्या । मनोहरा कांबळिया न थोड्या ॥
वस्त्रें मनोज्ञें बहुमूल्य सर्व । साकेतनाथा दिधलीं अपूर्व ! ॥९६॥
हस्त्यश्व, मोठे रथ, दास-दासी । सालंकृती धेनुहि देत त्यासी ॥
अनंत वस्तू किति त्या वदाव्या ? । जे पाहती त्यांसचि होत ठाव्या ! ॥

दिक्पालही स्तिमित होत बघून ज्यांतें । स्वीकारिल्या प्रमुदितें जनताधिनाथें ॥
त्या वांटिल्या अतिथिनाहि तयें अनेका । आणीत शेष निजवासिं किती सुरेखा ॥
बोले तदा जनक जोडुनि अंजलीतें । वाक्यें मनोज्ञमृदुलें सुविचारितोक्तें ॥
सन्मानुनी मुदितचित्तिं वरातियांतें । पूजूनि भक्तिहृदयें मुनिवृंदही ते ॥९९॥

सन्मानुनि ते सकल वऱ्हाडी स्तवुनी सादर दिलिं दानें ।
मुनिवृंदातें वंदुनि पूजी प्रमुदित हृदयें बहुमानें ।
प्रणत शिरानें सुरां नमुनि तो अंजलि जोडुनि जनक म्हणे ॥
“ देव, साधुजन भक्ति त्रिलोकिति ! तोषत सिंधुहि अंजलिनें !”
जोडुनि करयुग बंधुसमेतहि पुन्हां दशरथा मधुवचनीं ॥
स्वभावसुंदर शीलस्नेहें जनक बोलला सुगुणखनी ॥
“ श्रेष्ठ जाहलों सर्वपरीं मी संबंधें या प्रभुसरिस ॥
राज्यवैभवासवें म्हणा मज निष्कामातें निजदास ! ॥१०१॥

या कन्यांसी मानुनि दासी करुणाराशी पाळावें ।
क्षमा करा मम अपराधा कीं निमंत्रि धार्ष्ट्यें ‘ तुम्हि यावें ! ’’ ॥
रविकुलभूषण पुन्हांहि जनका गौरवि पूजी सकलविधी ।
परस्परांचा हृदयप्रेमा वर्णन करण्या शकत न धी ! ॥१०२॥
निघतां दशरथ जनवासाप्रति सुरगण वर्षति पुष्पतती ।
दुंदुभिजयरववेदध्वानिंनीं नभ नगरी हीं दुमदुमती ॥

मुनिवर वदतां, सर्व सख्यांनीं मंगल गाणीं गात मुदा ।
वधूसवें त्या वरांस नेलें गृहांत गौरीहरां, तदा ॥१०३॥

बघे वारंवार प्रभु रघुवरातें जनकजा ।
वरी संकोचे ती, परि न हृदयीं भावचि दुजा ! ॥
तिच्या तेव्हां नेत्रीं हरिलि मधुरा मीनसुषमा ।
तृषार्ता नेत्रांची चतुरसरणी ती निरुपमा ! ॥ १०४ ॥
स्वभावें सुश्यामा रघुवरतनू सुंदरतमा ।
स्मरांच्या कोटीही खिजति बघतां रामसुषमा ॥
पदाब्जांची शोभा नयनमधुरा यावकयुता ।
मुनींच्या चित्तांच्या मधुकरतती ज्यांवरि रता ! ॥१०५॥
प्रभूंनीं ल्यालेलें विमल पिवळें पुण्य वसन ।
हरी जें बालार्कद्युतिसि, चपलाकांति हरुन ॥
कटींची सूत्राभा रुचिर, मधुरा किंकिणि किती ! ।
महाबाहूंची भा निरुपम सजे भूषणवती ॥ १०६ ॥

यज्ञोपवीतहि तसें पिवळें विराजे । त्या मुद्रिका हरिति चित्त मनोज्ञ तेजें ।
शोभा विशेष वितरीत विवाहवेष। वक्षःस्थलीं विपुलि भूषणकांतिपोष ।।१०७।।
स्कंधांवरी उपरणें बहुपीत लोळे । कांठांस दोहिं मणिमौक्तिक लाविलेले ॥
रक्तोत्पलांपरि मनोज्ञ विशालनेत्र । कर्णांत कुंडलविभा, अतिरम्य वक्त्र ॥
सौंदर्यसार मुखभा, भृकुटी सुरेखा । नासा मनोहरतमा अतुलाच लेखा ॥
भालीं टिळा रुचिर, मस्तकिं मोर साजे । मोतीं हिरे जडवुनी विलसे सुतेजें ! ॥

अमोल रत्नें मोरा जडविलिं वरतनु हरती मनाप्रती ।
वरास पाहुनि दृष्ट काढिती किति पुरनारी सुरयुवती ॥
रत्नभूषणें वस्त्रें टाकिति ओवाळुनि त्यांवरुनि किती ।
आरति करिती मंगलगीतीं पुष्पें वर्षति सुर किति तीं ! ॥११० ॥
बंदी मागध सूत सुस्वरें गाती कीर्ती मुदितमनीं ।
वधूवरें तीं उमाहरांपशिं येतां, सुखिता सुवासिनी ॥
अति प्रीतिनें लौकिकरीती करिती, मंगलगान चले ।
कौतुकलीला पाहुनि सकलां वाटे जीवनफल आलें ! ॥ १११ ॥

गौरी तदा शिकवि सांगुनि सर्व रामा। वाग्देवता जनकजप्रति केलिकामा ॥
राज्ञी तयें सकल हासविलासमग्ना। वोट तयां सुफल जन्म असा न कोणां ॥११२॥
स्वपाणिकंकणमणींत बिंबित सीता राघवरूप बघे।
हलवी ती नच भुजवल्लीही जणुं विरहार्ती तिज बिलगे ! ॥
विनोद कौतुक हर्षरती ती अगम्य; ठाउक सखीजना।
वधूवरांतें सुंदर सखया नेती मग त्या वरसदना. ॥११३॥
तेव्हां चहुंदिशिं पुरिं नभिं हर्षें आशीर्वचनें ऐकियलीं।
" चिरंजीव या होउत चारी चारु दंपती ! " मुखिं सकलीं ॥
योगिमुनी सुरसिद्ध विभूनें पाहुनि दुंदुभि वाजविती।
हर्षें वर्षुनि फुलें निघत निज लोकां, 'जय, जय, जय' म्हणती ! ॥
सहित निज वधूंच्या सर्व आले कुमार। दशरथनिकटीं, तैं सौख्य वाहे अपार॥
अतिशय भर शोभा मंगलें मोद यांना। उमगुनि जनवासा पोहला त्यांत जाणा!
॥ इति श्रीसीतारामविवाहोत्सवत्रैलोक्यमङ्गलवर्णनं नाम द्विपंचाशत्तमस्तरङ्गः ॥

## तरंग ५३ वा

नानापरीं नंतर जेवणावळी। वराति सारीं जनकें निमंत्रिलीं ॥
अमूल्य त्या पायघड्या तयांप्रती। राजा अयोध्येश कुमार चालती ॥
प्रक्षाळिलें तत्पद आदरें भलें। यथोचित स्थान बसावया दिलें ॥
जें तो धुई भूपतिपादपंकजें। तें प्रेम तें शील अवर्ण्य कीं सजे ॥२॥
हृदब्जीं शंभूच्या सतत वसती ज्यां विलसली।
पदाब्जें रामाचीं जनक करिं तीं धूत सलिलीं ॥
तिनींही भ्रात्यांचीं चरणकमळें क्षाळिलिं तशीं।
गणोनी त्यां रामासमचि जनकानें अतुलशीं ॥ ३ ॥
सर्वांसि भूपें उचितासनें दिलीं। आज्ञापिली सूपकरादि मंडळी ॥
पात्रें तयीं मांडलिं सर्व सुंदरें। जीं रत्नताटें कनकांकितांतरें ! ॥४॥
स्वादिष्ट उत्तम मनोहर डाळभात। हैयंगवीन अतिसुंदर तूप त्यांत ॥
तें वाढिलें चतुर सत्वर वाढप्यांनीं। अत्यादरें सुविनयें शुचिवासितांनीं ॥५॥
प्राणाहुती कवल घेउनि भोजनाला। प्रारंभ हो, ललित गानविनोदनाला ॥
झाला प्रमोद सकलां बहुतांपरींचीं। अन्नें तिथें किति सुधेहुनि गोड साचीं !॥६॥

आचारि वाढति कुशाग्र किती प्रकार? । कोशिंबिरी चटणियां किति वर्णणार?
नांवेंहि ठाउक कुणास समग्र त्यांचीं !। कोठेंहि कांहिंहि उणीव अशी नसेचि! ।।
जे सूपशास्त्र कथि चारहि सत्प्रकार । त्यांतील एक तरि कोण कथी समग्र ?
त्या षड्रसीं रुचिरशा चटण्या गणाव्या।त्याही असंख्य कथण्यास कुणास याव्या?।।
त्या भोजनीं मधुरकोमलकंठ नारी । घेती उखाणिं सविनोद न लागणारीं ! ।।
गुंफोनि नामकुशलें पुरुषस्त्रियांचीं । तेणें दुणावत विभा किति भोजनाची ! ।।
तो सत्प्रसंग समजून समग्र लोक । राजादि सर्वपरिं हांसति ते अनेक ।।
झालें असें विविध भोजन सर्व रीतीं । अत्यादरें सकल आंचवणें करीती ।।
तांबूलदानादि विदेह त्यां करी । पूजा करोनी सकलांस आदरी ।।
जाई अयोध्येश नृपालसन्मणि । सर्वां समेतें जनवासिं हर्षुनी ।। ११ ।।
होती नवे नित्य पुरींत उत्सव । क्षणापरी हो दिनरात वास्तव ।।
भल्या पहाटे नृपराय जागृत । स्तवीति त्या याचकवृंद हर्षित ।। १२ ।।
स्नुषांसवें पाहि कुमार सुंदर । हर्षास त्याच्या किति थोर ये भर ! ।।
प्रातःक्रिया सारुनि ये मुनींप्रती । महाप्रमोदा नच त्याचिया मिती ।।१३।।
नमूनि पूजी मुनितें कृतांजली । बोले वचें ज्यांत सुधाच सिंचिली ! ।।
"मुनींद्र! ऐका तुमच्या कृपागुणें। कृतार्थ मी हा, मज कांहिं ना उणें ! ।।
आतां निमंत्रुनि विभो! द्विज सर्व त्यांस। द्याव्यात धेनु सदलंकरुनी विशेष"।।
तेव्हां वसिष्ठमुनिंनीं स्तवुनी नृपासी । बोलाविले द्विजसमूह तयें प्रहर्षी ।।१५।।
देवर्षि ते नारद वामदेव । वाल्मीकि जाबालि मुनीश सर्व ।।
तपोनिधी कौशिक त्यांत येत । वृंदें, तयें भूपति हृष्टचित्त ।। १६ ।।
दशरथ सकलांतें वंदि दंडप्रणामें । बसवित अतिभावें आसनीं दानकामें ।।
सुगुण सुरभि धेनू आणुनी लक्ष चार। कनकमणिविभूषा घालुनि दे अपार ।।
सविनय मुनिवर्यां धेनु अर्पोनि राव । वदत 'अजिं मिळालें जीवनश्रेय होय!'।।
मुनिवर अवनीशा देति आशीर्वचांतें । प्रमुदित नृप तेव्हां बोलवी याचकांतें ! ।।
वितरि कनक-रत्नें अंबरें मूल्यवन्त। हयरथ गज मोठे याचकां लोककान्त ।।
गुणगण नृपतीचे गाइले तैं तयांनीं । 'जय रविकुलधन्या !' बोलुनी गोड वाणी! ।।
श्रीरामलग्नविधि यापरि उत्सवाचा । झाला जगा सुखद जो वदवे न वाचा ।।
ज्यातें सहस्रमुखिं शेषहि वानुं नेणें । तो केविं येथ कथवेल यथार्थतेनें !।।२०।।

पुनःपुन्हां कौशिकपादिं शीर्ष । ठेवूनि बोले विनयें महीश ॥
"जें सौख्य मातें मुनिहो! मिळालें। कृपालवें तें तुमच्याच झालें" ॥२१॥
दशरथनृप वर्णी शीलकर्तृत्व सारें । नृपमणि जनकाचें वैभवादिप्रकारें ॥
प्रतिदिनिं उठुनी जैं त्या अयोध्येश मागे । निजपुरगमनातें, तो परी ठेवुनी घे ॥
अतिशय जनकाची सादर प्रेमभक्ति। दिनिं दिनिं अधिका हो नूतना त्यापरीं ती॥
प्रतिदिवशिं विशेषा प्रीति ये पाहुणेरा । नवनव नगरीचा वाढला हर्ष सारा!॥
दशरथगमनाची आवडी नैव कोणां! । बहुत सुदिन गेले ते परी न्यून त्यांना!
गमति जणु वराती सर्व ते बांधलेसे । जनकनृपवरानें प्रेमबंधेंचि जैसे! ॥
तेव्हां शतानंदमुनीस कौशिक । जाऊनि सांगे समजावि त्या निक ॥
तो त्याप्रमाणें जनकासि सांगत । नाना प्रकारीं समजावुनी मत ॥२५॥
'दशरथनृपतीतें देइं आदेश राया!। जरि तुजसिहि येना प्रेम तें आवराया' ॥
समजुनि जनकानें बोलवीले प्रधान । नमित 'जय विभो!' हें बोलुनी ते सुजाण॥
वदत जनक त्यांतें 'जाउनी आंत सांगा,। दशरथ नृप जाया इच्छिती या प्रसंगा!'
परिसुनि नृपतीचें वाक्य तें, सर्व झाले।द्विजसचिवजनादि प्रेमभावें रिझाले ॥२७॥
पुरजन परिसोनी जाति कीं हे वराती। पुसति विकलतेनें एकमेकां कथा ती॥
कळुनि सकळ येतां, सर्व चित्तें उदास, । कमलतति निशीथीं टकिते कीं विकास!

जेथें जेथें वसति करिती सर्व येतां वरानी ।
तेथें तेथें सकल परिंचीं केलि तें सिद्धता ती ॥
नाना रीतीं रुचिकर अशा सर्व मेवे-मिठाया ।
पक्वान्नेंही नृपति अमितें पाठवी त्याच ठायां! ॥२९॥

भरोभरोनी वृषवाहनें किती । कहारपृष्ठींहि न हो जयां मिति ॥
आचारिही धाडियले अनेक ते । व्हावेंचि तेथें कमती न कोणतें ॥३०॥
नखशिखान्त विभूषित लक्ष ते । हय; चतुर्थ तसे रथ तेउते ॥
दशसहस्र मतंगज भूषित । बघुनि दिग्गज ज्यांप्रति लज्जित ॥३१॥
कनकवस्त्रमणी किति वाहनें ? । अमित गो-महिषी; कुणि मोजणें ? ॥
अमित वस्तु तशा विविधापरी । जनक आंदण दे तनुजेवरी! ॥३२॥
कवण ही गणती करुं ना शके । विभव दिक्पतिचें न पुढें टिके ॥
अमित वैभव तें जनकें तदा । दशरथालयिं पाठविलें मुदा ॥३३॥

'जाती वऱ्हाडि' कळतांच, समस्त राज्ञी । शोकार्ते मीनगण जेविं जलावसानीं ॥
सीतेसि घेति बहुवार किती निजांकीं । आशीर्वचें वितरिती शिकवीति त्या कीं ॥

" सीते ! तूतें अमित वितरूं आम्हि आशीर्वचें हीं– ।
हो भर्त्याची हृदयदयिता नित्य सौभाग्य वाहीं ॥
सेवा व्हावी नव करिं गुरू, सासरा, सासु यांची ।
आज्ञा प्रेमें अनुसर सदा प्रीति रक्ष प्रियाची ! " ॥३५॥

सख्याही राज्ञींच्या चतुरमति त्या सांगति तिला ।
सतीधर्मा साऱ्या मधुरवचनीं स्निग्ध महिला ॥
वधूंना राज्ञी त्या समजविति वक्षीं कवळुनी ।
" विरिंचीनें नारी रचिलि तरि कां ? ऐशि " म्हणुनी ! ॥३६॥

ये त्याच वेळि निज बंधुसमेत राम । आनंदुनी जनकमंदिरिं सौख्यधाम ॥
घ्याया निरोप सकलां पुनुनी सुभावें । तद्दर्शनार्थ सगळी मिथिलाचि धांवे ! ॥

तेव्हां कोणी वदति " ठरलें आज, यांचें प्रयाण ।
यांची जाण्या नृपतिजनकें सिद्धता केलि पूर्ण ! ॥
भ्राते चारी नृपतिसुत हे पाहुणे आवडीचे ।
यांचें घेऊं नयनिं भरुनी रूप लावण्य साचें ! ॥३८॥

वाटे आम्हां, कवण सुकृतें आमुचीं पाहुनीयां ।
केलें यांतें अतिथि विधिनें लोचनां आमुच्या यां ! ॥
पीयूषाचा, चतुर सखिनो ! लाभ हो मृत्युशीला ।
कीं लाभावा सुरतरु जसा जन्मनिष्कांचनाला ! ॥३९॥

कीं पाप्याला हरिपद मिळे ?! त्यापरी वाटताहे ।
आम्ही यांना नयनिं बघतों आमुच्या जें असें हें ॥
श्रीरामाची मधुरसुषमा साठवूं या हृदब्जीं ! ।
चित्ताहीच्या फणिवरि मणीसारखी बैसवूं जी ! " ॥४०॥

ऐशा रीतीं सकलनयनां देत साफल्य पूर्ण ।
सारे येती जनकसदना बंधु रामादि तूर्ण ॥
देखोनी त्यां नयनसुभगां, हर्षे अंतःपुरातें ।
सासू प्रेमें करिति सकलां आरती आर्द्रचित्तें ॥ ४१ ॥

अत्यानंदें काढिती दृष्ट त्यांची । ओंवाळूनी टाकिती मूल्य तेंची ॥
सीतामाता पाहुनी राममूर्ति । प्रेमाधिक्यें पादकंजें धरी ती ! ॥४२॥
प्रीत्युत्कर्षे लाज राहे न चित्तीं । प्रेमाची ती वानवे केवि रीति ? ॥
बंधूसंगें त्यां उटी लावुनीयां । न्हाणी; लागे षड्रसें भोजवाया ॥४३॥

तदा श्रीरामांनीं अवसर बघोनी कथियलें ।
सुशिल स्नेहाच्या वचनिं मनिं संकोचुनि भलें ॥
"अयोध्येतें जाऊं म्हणति अमुचे तात म्हणुनी ।
निरोपा घ्यायातें विसृजति अम्हां मातृचरणीं ! ॥ ४४ ॥

अहो आई ! आम्हां मुदित मनिं आदेश वितरा ।
करा नित्यप्रीती गणुनि शिशुसद्भावचि खरा !" ॥
अशा स्निग्धें वाक्यें कळवळत अंतःपुरजन ।
अति स्नेहें माता वदुं न शकती कांहिं वचन ! ॥ ४५ ॥

घेऊनी त्या पोटिं चारीहि बाला । देती माता त्यांजला तत्पतींला ॥
भक्त्युद्रेकें प्रार्थिती राघवातें । हृत्प्रीती ये गावया केंधवां ते ? ! ॥४६॥

सीता अर्पुनि रामातें ती हात जोडुनी पुनःपुन्हां ।
वदे " टाकितें ओंवाळुनि तनु, तुम्हांवरुनि मी हृष्टमना ॥
अवगत मानस तुम्हां; प्रिया मम, जीवचि राया, नागरिकां ।
प्रेमसुशीला सीता दासी माना तुलसी निज रसिका ! ॥४७॥

आहांचि राम ! परिपूरितसर्वकाम । ज्ञानैकधाम भजकां हृदयाभिराम ॥
कारुण्यराशि अघनाशि गुणाधिलक्षी !" । ऐसें वदोनि धरि तत्पद पंकजाक्षी! ॥
ती स्तब्ध राहि; जणु काय तदीय वाणी । हृत्प्रेमपंकिं तिचिया बसली रुतोनी ! ॥
तें स्नेहवाक्य परिसोनि उदारशील । सन्मानि सासुसि किती प्रभु मेघनील ! ॥

वारंवार प्रभु कर तिला जोडि, मागे निरोप ।
वंदोनीयां पदिं कितिकदां सादर प्रेमरूप ॥
घेई आशीर्वचन नमुनी तत्पदाब्जीं स्वशीर्षी ।
येई बंधूसहित मग तो राम कारुण्यवर्षी ! ॥५०॥
मंजुश्यामा रुचिर मधुरा रामलावण्यमूर्ति ।
राणी साऱ्या हृदयिं धरिती प्रेमविक्लिन्नचित्तीं ॥

धैर्यें घेती पुनरपि सती बोलवीती मुलींना ।
वारंवार प्रबल उरिं ये प्रीतिचा त्यांस पान्हा ! ॥५१॥

तैं कन्यांना भेटती गाढ माता । स्तब्धा होती त्या पुन्हां पोंचवीतां ॥
वक्षोवक्षीं भेटती मायलेकी ! । धेनू वत्सां, त्यापरी वाटलें कीं ! ॥५२॥
अंतःपुरांतिल सख्यांसह सर्वराज्ञी । साऱ्या स्त्रिया पुरुष तेथिल पौर कोणी ॥
प्रेमार्तिपूरिं अति विक्लवचित्त होती । झाली वियोग-करुणा-वसती पुरी ती ! ! ॥
पाळोनियां कनकपंजरिं जानकीनें । ज्या सारिका पढविल्या शुकही, मुलानें ॥
त्या विह्वला म्हणति 'जानकि ! तूं कुठें गे?' । ऐकोनि तें हृदयधैर्य कसें न भंगे ! ! ॥
ऐशापरी खगमृगादिहि शोकपूर्ण । याची दशा मग मनुष्यमनासि कोण ! ! ॥
आला विदेहनृप बंधुसमेत तेथ । प्रेमें तया नयनपूर भरून येत ! ॥५५॥
सीतेसि पाहुनि, टिके नच धैर्य त्याचें । वैराग्य जें 'परम', उक्तित मात्र वांचे ! ॥
रायें उरीं धरियली निज जानकी ती । ज्ञानाब्धिची लपलिशीच 'अपार' कीर्ति! ॥
तैं सर्व सुज्ञ सचिवीं समजावियेला । जाणोनि वेळ, सुविचार नृपेंहि केला ॥
सीतेप्रती धरि उराशिं पुनःपुन्हांही । तो पालख्या रुचिर मागवि तेथ कांहीं ॥
प्रेमार्तता सपरिवारिं जरी विदेहीं । चित्तामधें शुभमुहूर्तविचार पाही ॥
चिंतूनि सिद्धिगणनायक आत्मचित्तीं । तो पालख्यांत तनया बसवी सुकीर्ति ॥
कन्यांसि तो बहुपरी समजावि भूप । स्त्रीधर्मनीति कुलरीति कथी अमूप ! ॥
देई अनेक तिजसंगतिं दासदासी । सेवेसि सेवक शुचिप्रिय जानकीसी ॥५९॥

सीता जेव्हां निघत, सकलां दुःख पौरांसि झालें ।
झाले तेव्हां शुभशकुनही मंगलीं शोभलेले ॥
संगें लोक-द्विज-सचिव हे घेउनी पोंचवाया ।
सीतेलागीं निघत नृपती आवरी शोक वाया ! ॥६०॥

अवसर मग होतां वाजती वाद्यवृंद । करिति रथगजाश्वां तैं वरातीहि सिद्ध ॥
दशरथनृपराय ब्राह्मणां बोलवोनी । मुदित करित त्यांतें दानमानादिकांनीं ॥
द्विजपदकमलांची धूलि वाहोनि शीर्षी । मुदित नृपति घेई पुण्य आशीर्वचांसी ॥
स्मरुनि गजमुखा तो आरभी स्वप्रयाणा । शकुनहि शुभशंसी होति त्यालागिं नाना

अयोध्येचा राणा निजपुर अयोध्येप्रति सरे ।
तदा अत्यानंदें निनदविति वाद्यें सुमधुरें ॥

सुरांच्या संघांनीं वरुनि सुमराशी विकिरल्या ।
स्वमाधुर्यें गाती सुरयुवति, आनंदिं भरल्या ॥ ६३ ॥
प्रार्थोनीयां नृप परतवी लोकही थोरथोर ।
आमंत्री तो उचित विनयें याचकाली समग्र ॥
त्यांतें अर्पी हयगज तशा वस्त्रभूषादि सर्व ।
प्रेमा पोषी; सकलही जनां तें गमे हर्षपर्व ! ॥ ६४ ॥
वारंवार प्रभुवरयशें वर्णुनी चारुकीर्ति ।
सारे येती परतुनि हृदीं घेउनी राममूर्ति ! ॥
सांगे ज्या दशरथ जरी तो कितीदा तया तें ।
होतां प्रेमें विवश जनका नावडे जावयातें ! ॥ ६५ ॥
पुन्हां सांगे त्यांतें दशरथ अति प्रीतिमधुर ।
" फिरावें आतां हो ! परत; बहु आलां, नृपवर ! " ॥
पुन्हां तो थांबोनी उतरुनि उभा राहि नृपति ।
तयाचें प्रेमाश्रू नयन भरुनी वाहति किती ! ॥ ६६ ॥
बोले त्या तें जनकनृपती आदरें बद्धपाणि ।
स्निग्धत्वाच्या अमृतिं भरली पूर्ण ती काय वाणी ? ॥
" कोण्या रीतीं विनति करणें मीं महाराज ! आतां ? ।
आहे मातें तुम्हिं चढविलें सौख्यशैलाधिनाथा ! " ॥६७॥

व्याही तसे सुजन सर्व परीं नृपाळ । सन्मानि कोशलपती अति पुण्यशील॥
अत्यादरें मिळति ते उरिं गाढ भेटीं । आनंद माय न तदा उभयांहि पोटीं !॥
ते रूपशीलगुणमंदिर चार बंधू । जामात, तो कवळि भेटुनि हर्षसिंधू ॥
बोले जुळून करकंज मनोज्ञरूप । हृत्प्रेम मूर्त जणु तद्वचनीं अमूप ! ॥६९॥
"रामा! तुझी कशि बरें करु मी प्रशंसा? । हे योगिवृंद-हर-मानसपुण्यहंसा !॥
ध्याती जया हृदयिं साधुनि योग, योगी । त्यागोनि मोह ममता मद, मोक्षमार्गी॥
तें ब्रह्म तूंच अविनाशि अलक्ष्य पूर्ण । आनंदचिन्मय गुणाढ्य गुणींहि हीन ॥
ज्यातें न जाणत असे मन आणि वाणी । तर्कासही अकळ जो सकलानुमानीं ॥
ज्या 'नेति नेति'वचनीं कथिती श्रुतीही । जो कीं त्रिकालिंहि समान समग्र राही !
तो तूं समस्तसुखहेतु पहातसें मी । झालास दृग्विषय तूं मज सर्वगामी ! ॥
जैं होसि तूंच भगवान् हृदयानुकूल । तेव्हांचि जीव मिळवी सुखिता सलील ॥
तूं सर्वरीतिं मज थोरपणा दिलास । स्वीकारिलेंसि मज जाणुनि तूं स्वदास ॥

श्रीशारदा अयुतसंख्य, अनंत शेष । ते कल्पकोटिभरिं मोजुत कीं विशेष, ॥
त्यांनाहि नाहिं रघुवर्य ! सरावयाचें । मद्भाग्यवर्णन, तुझें गुणगान साचें ! ॥
मी सांगतों मजसि एकचि शक्ति साह्या। कीं, भक्ति अल्पहि पुरे तव तोष व्हाया॥
मी प्रार्थितों जुडुनि पाणि पुनःपुन्हां जें । सोडो न चित्त चुकुनीहि तुझीं पदाब्जें!”

तें ऐकोनी वचन, अतुल प्रेमिं कीं पोसलेलें ।
श्रीरामाचें हृदय, नुरुनी काम, संतुष्ट झालें ! ॥
संमानीलें श्वशुरजनका राघवें आदरानें ।
विश्वामित्रा जणुं, दशरथा कीं, वसिष्ठाप्रमाणें ! ! ॥ ७६ ॥
भरतासही जनक तो भेटुनियां प्रार्थि थोर विनयानें ॥
अत्यंतप्रीतमना देई आशीर्वचें तया मानें ॥ ७७ ॥
लक्ष्मणशत्रुघ्नांतें भेटुनियां जनक त्यांसि दे आशी ॥
प्रेमें विवश परस्पर मस्तक नमवीति एकमेकांसी ! ॥ ७८ ॥
वारंवार प्रार्थुनि संस्तवुनी निघत राम बंधुंसवें ॥
विश्वामित्रपदांतें कवळुनि अभिषेचि त्यां जनक असवें ॥७९॥
घेउनि तच्चरणरजां माथां, डोळांहि लावुनि वदे तो ॥
“ मुनिनाथश्रेष्ठा ! तव दर्शनलाभचि समस्तवर देतो ॥८०॥
ऐसें मन्मन सांगे निःसंशय; दिक्पती धरिति आस ॥
जें सुख लाभो म्हणुनी परि ते त्राजति, मिळोनि न तयांस ॥८१॥
तें सुख तें सत्यशही झालें सुखसाध्य जें विभो ! मजला ॥
त्वद्दर्शनानुसारी मजला तो सिद्धिलाभ करिं सजला ! ” ॥८२॥

पुनःपुन्हां यापरि वंदुनी तया । स्तवोनिही तत्पदपंकजद्वया ॥
आशीर्वचें पावुनि उत्तमोत्तम । विदेह मागें परते, नुरे तम ॥८३॥

वाद्यें वाजति, चालुं लागति पुरा सारे वराती जन ।
आनंदें भरलें महान् लघु तसें साऱ्या जणांचें मन ॥
श्रीरामा अवलोकुनी, नगरिच्या संतोष नारीनरां ।
साफल्या मिळवीति ते स्वनयनीं पाहोनि त्या सुंदरा ! ॥८४॥

मधें मधें वास करीत सारीं । मार्गींहि लोकां सुख देत भारी ॥
आली अयोध्येजवळीं वरात । वेला मुहूर्तादि यदा पुनीत ॥८५॥

॥ इति श्रीरामविवाहोत्सववर्णनं नाम त्रिपंचाशत्तमस्तरङ्गः ॥

## तरंग ५४ वा

किती चौघडे आणि नगारे । डुम डुम डुम डुम वाजुं लागती ! ।
निनदति भेरी कंबु घनध्वनि । हयगज हर्षें सुस्वर गर्जति ॥
मृदंग झांजा वाजति, सनया । रागदारिनें मंजुळ नदती ।
ऐशा थाट गर्जत येते । स्वपुरातें ती रामवराती ! ॥ १ ॥

येते असें परिसुनी स्वपुरा वरात । सारे प्रहृष्ट पुलकावलियुक्त होत ॥
आपापलीं सजविलीं सदनें तयांनीं । ते हाट, वाट, पुरिं चोहट शोभवोनी ॥
मार्गावरी सकल सिंचुनि अर्गजातें । केलें तयीं रुचिर चौक मनोज्ञ कीं ते ॥
बाजार पण्यरचना अति शोभणारी । जी तोरणध्वजपताकिं विराजणारी ! ॥३॥

रंभा रसाल फलयुक्त, सुपारि झाडें । रोपीयले बकुलवृक्ष मुळीं न थोडे ॥
तैसे कदंब तरु सुंदरसे तमाल । ज्यांतें हिरेजडित उज्ज्वल आलवाल ! ॥४॥
घरोघरीं मंगल कुंभ लावुनी । अत्यंत रम्या रचना विनिर्मिली ॥
ब्रह्मादिकांनीं स्तविली प्रहर्षें । श्रीराघवाची नगरी घरातलीं ! ॥५॥

नृपभवन असे तैं शोभवीलें अतीव । बघुनि सुरचना ती मोहिला कामदेव ! ॥
शुभकर शकुनांनीं शोभल्या ऋद्धिसिद्धीं । सकलमनिं उफाळे हर्षप्रीता सुखाब्धि ॥
दशरथगृहशोभा मूर्त सर्वोत्सवांनीं । सुभग तनु धरोनी वाढवीली भरोनी ॥
हृदिं धरिलि तयांनीं लालसा दर्शनाची । जणुं रघुवरसीतामूर्ति पाहूं स्वतांचि !

यूथीं यूथिं विलासिनी मिळुनियां तैं चालल्या कामिनी ।
सौंदर्यें रतिलाहि लाजविति ज्या, माधुर्यपूर्णस्वनी ॥
हस्तीं घेउनि आरत्या रघुवरा ओंवाळण्या हर्षल्या ।
गाणीं मंगल गाति, मूर्त जणु त्या श्रीभारती भासल्या ! ! ॥८॥
झाला जो कीं नृपतिसदनों लोकसंमर्दघोष ।
त्यांच्या हर्षा कवण कवनीं वर्णणारा विशेष ? ॥
कौसल्यादि प्रमुदितमना तेधवां राममाता ।
प्रेमोद्रेकें जणुं विसरल्या देहभाना समस्ता ! ॥ ९ ॥

दानें दिलीं विपुल विप्रवरां तयांनीं । पूजीयले शिवगणेश किति स्तवोनी ॥
वाटे जणों अति दरिद्रि कुणी भिकारी।संतोषला मिळवुनी पुरुषार्थ चारी!॥१०॥

प्रेमप्रहर्षिं विवशा सगळ्याच माता । त्यां चालवे न जणुं देह गळून जातां ! ।
हो रामदर्शनिं अतीव रती तयांची । त्या आरती करिति सिद्ध समग्र साची ॥ ११॥

तदा नाना वाद्यें गजर करिती मोदभरित ।
सुमित्रा मांगल्यें सकलपरिं तीं सिद्ध करित ॥
फुलें दूर्वा पर्णें दधि हळद शाल्यंकुर भले ।
तशीं पूगी पानें, सुभग तुलसी मंजरि-दलें ॥ १२ ॥
लाजा रोचन, मंगलें वितरल्या तैशाच त्या अक्षता ।
साऱ्या मेळविल्या मनोहर तिनें सद्वस्तु सत्संमता ॥
स्वर्णी कुंभ सकुंकुमांकित तिथें मांगल्यशोभी जणूं ।
तीं कीं कामविहंगमेंचि रचिलीं नीडें लपाया म्हणूं ! ॥१३॥
आमोदां तिथल्या शुभाढ्य शकुनां कैशापरी वानणें ? ।
राज्ञी सर्वहि तूर्ण पूर्ण करिती तीं मंगलें शोभनें ॥
केल्या सिद्ध तयीं तदा शुभवहा नानापरीं आरत्या ।
राज्ञी मंगल गाणिं सुस्वर किती आनंदुनी गाति त्या ? ॥ १४ ॥

श्रीमंगलें कनकताटिं भरोनि राज्ञी । हस्तांबुजीं धरुनि तीं मुदितीं मनांनीं ॥
रोमांचपल्लवितदेहलता निघाल्या । ओवाळण्यास्तव सुतांसि अधीर झाल्या !! ॥
हो धूपधूम भरुनी नभ कृष्णकांति । कीं श्रावणांतिलचि ती घनराजपंक्ति ! ॥
ज्या कल्पवृक्षसुमनावलि देवेिं वृष्टा । माला बलाकि जणुं त्या भुलवीति दृष्टा ! ॥
ती रत्नकांतिधर तोरणपंक्तिशोभा । जी इंद्रचापसम लोचनिं निर्मि लोभा ! ॥
हर्म्याग्रिं चंचलगती पुरभामिनींची । लोपे दिसे चपलभा जणुं दामिनींची!!॥१७॥
ते दुंदुभिध्वनि घनावलिगर्जितें कीं!। त्या याचकांसि तुलुं चातक-बर्हि-भेकीं ! ॥
सौगंधवारि सृजिती सुर वर्षधारा!। नारीनरां सुखित सस्यचि मानुं पौरां !! ॥

मुहूर्ता पाहोनी गुरुवदनिं आदेश मिळुनी ।
अयोध्येमध्यें तो रघुकुलमणी ये प्रविशुनी ॥
स्मरोनी चित्ताब्जीं शिव-गिरिसुता-सिंधुरमुखां ।
मुदें सर्वां लोकांसहित सकलां अर्पित सुखा ॥ १९ ॥

शकुन सुभग होती वर्षती देव पुष्पें । निनदति पटहांतें मानसीं हृष्टरूपें ॥
मुदित विबुधबाला दाविती नृत्यलीला । अमृतमधुरगानीं रंगल्या हर्षलोला ! ॥
त्रैलोक्यवंद्य यश सुंदर राघवाचें । तें वंदि सूत नट मागध गाति वाचें ॥

झाले जयध्वनि अघापह वेदघोष। दाहीं दिशां भरति मंगलपुण्यघोष ! ॥२१॥
तेव्हां अनंतपरिं वाद्यनिनाद चाले। पौरां पुरीं, नभिं सुरां किति सौख्य झाले ?!
ना ती वराति कवणासहि वर्णु यात्री। तो हर्षसौख्यभर राहि मनींच केवीं ? ! ॥
दशरथनृपतीतें वंदिती सर्व लोक। नयनिं बघुनि रामा, त्यांस होई सुतोख ॥
मणिगणवरवस्त्रें टाकिलीं त्यांवरूनी। पुलक भरत गात्रीं, नेत्रिं संपूर्ण पाणी ! ॥
पौरांगना करिति आरति हर्षपूरीं। सौख्यें पहाति नृपपुत्र मनोज्ञ चारी ॥
भाग्योत्तमा उघडुनी शिबिका पहाती !। देखोनि चारिहि वधूंसि सुतुष्ट होती ! ॥

ऐशा रीतीं सकळहि जना देत सौख्यें अपार।
राजद्वाराप्रति नववधूयुक्त आले कुमार ॥
ओवाळीती मुदित हृदयीं प्रेमला त्यांस माता।
ओवाळीतां फिरुनि फिरुनी हर्ष त्यां कोण चित्ता ! ॥२५॥
रत्नें नाना अमित वसनें उत्तमें त्यां वरोनी।
ओवाळूनी त्यजियलिं किती भूषणेंही तयांनीं ॥
देखोनी ते नव वरवधू चारिही विश्वकांत।
अत्यानंदीं सकलजननी सौख्य घेती अनंत ! ॥२६॥
सीतारामच्छवि निरखिती आदरें त्या कितीदा !।
वाटे त्यांना अजि मिळविलें जीवनानन्दकंदा ॥
सीतावक्त्रा बघति कितिदा हृष्ट राज्ञीसख्याही।
गानीं गाती सुभग सुकृतें वानुनी आपुलीं हीं ! ॥२७॥

देव क्षणोक्षणिंहि वर्षति पुष्पराशि। ते नृत्यगानिं करिती प्रभुसेवनासी ॥
सेवा समर्पिति जणों प्रभुपादपद्मीं। जें चालले प्रभु सजानकि आत्मसद्मीं ! ॥

पाहोनी त्यां रुचिर सुभगां चारही दंपतींतें।
वाग्देवीही उपमिति तयां धुंडु लागे स्वचित्तें ॥
नैकाही जें तिज मनिं रुचे, वाटुनी गौण भारी।
लावोनी ती टकचि नुसती रंगली रूपसारीं ! ! ॥२९॥

तें शास्त्रधर्म कुलरीति करून पूर्ण। देऊनि अर्घ्य, तळिं पायघड्या करून ॥
काढूनि दृष्ट बरवी तनय-स्नुषांतें। घेऊनि, हृष्ट जननी गृहिं येति कीं तें ॥
सिंहासनें सहजसुंदर चारुकांति। चारी विनिर्मिलिं गमे मदनें स्वहस्तीं ! ॥
त्यांचेवरी बसवुनी नवदंपती ते ! तत्पुण्यपाद धुतले अति भक्तिचित्तें ! ॥३१॥

त्यां धूपदीप करुनी विधि वेदमार्गं । नैवेद्यपूजनिं वधूवर तुष्ट सांग ॥
तें मंगलायतन आदरिलें तयांनीं । ओवाळुनी व्यजनिं ढाळुनि चामरांनीं ! ॥
माता समस्त अति मोदिं हृदीं भरोनी । ओवाळुनी कितिक वस्तु दिल्या तयांनीं॥
वाटे जणों परमतत्त्वचि योगि पावे । कीं दीर्घरोगिकरिं येत सुधा सुभावें ! ॥
कीं लाभला परिस तो जणुं जन्मरंका ? जन्मांधही मिळवि लोचनलाभ तो कां!
कीं, मूकवक्त्र करि भूषित शारदाच! । कीं, पावला विजय शूर रणांत साच !
हें होय सौख्य शतकोटिपटीं समृद्ध । झालें तसेंच सुख त्या जननींस शुद्ध ! ॥
भ्रात्यांसमेतचि विवाहित जो जहाला । तो राम राघवकुलेंदु गृहासि आला ॥३५॥
राज्ञी यदा करिति लौकिक सर्व रीती । लज्जेसि ते मनिं वधूवर कीं वरीती !
ते मोद आणिक विनोद बघून त्यांचे । श्रीरामचित्तिं अभिराम सुहास्य नाचे!

॥ इति वरव्रातस्यायोध्याप्राप्तिवर्णनं नाम चतुःपंचाशत्तमस्तरङ्गः॥

## तरंग ५५ वा

तें होय देवपितृपूजन सर्वरीतीं । आनंद इष्टफल पाउनि त्या वरीती ॥
वंदोनि मागति तदा वरदान रामा । हो कीं सदैव सुख बंधुसमेत रामा ॥१॥
अंतर्हितीं अमरिं अर्पियल्या वराशीं । राज्ञी प्रसन्नमनिं अंचलिं घेति ज्यांसी !
बोलाविलें दशरथें मग ते वराती । त्यां दे मुदीं वसनभूषणरत्नपूर्ति! ॥ २ ॥
भूपें निरोपित, सहर्ष मनें स्वधामीं । केलें तयीं गमन ठेवुनि चित्त रामीं ॥
देई अहेर नृपती सगळ्याच पौरां । नारीनरां गणति नाहिं सुखा अपारा ! ॥३॥
जें जें तदा म्हणति याचकवृंद तें तें । देई प्रसन्न हृदयें नरनाथ त्यांतें ॥
सन्मानिले सकलसेवक दानमानें । जे वादकादिकहि ते नृपसत्तमानें ॥४॥
भूपासि वंदुनि विचिंतुनि त्या अभीष्ट । ते जाति गात गुणराशि तदीय तुष्ट ॥
तेव्हां वसिष्ठ मुनिभूसुर यांसमेत । राजा प्रवेश करि आपुलिया गृहांत ॥५॥
ज्या ज्या वसिष्ठ वितरी अनुशासनातें । रुत्युक्त पुण्यविधिनें करि भूप तें तें ।
राज्ञीहि थोर बघुनी द्विजवृंद तेथें । सानंद त्या उठति वाढुनि भाग्य मोठें ॥६॥

तत्पादाब्जां धुति करविती स्नान अभ्यंग त्यांस ।
पूजोनी त्यां दशरथनृपें भोजवीलें सहर्ष ॥

मानें दानें नृप अति तयां तोषवी भक्तिमूर्ति ।
आशीर्वादां अगणित मुदा देउनी विप्र जाती ॥ ७ ॥

विश्वामित्रा बहुपरिं नृपें पूजुनी प्रार्थियेलें ।
" नाहीं माझ्यासम कुणि दुजा धन्य ! " हें राय बोलें ॥
त्याचें भक्त्या स्तवन करि तो तत्पदांभोजधूली ।
घेई राज्ञींसहित नृपती लावुनी आत्मभालीं ॥ ८ ॥

त्यातें देई क्षितिप अपुल्या मंदिरीं सन्निवास ।
राज्ञी राजा बहुपरि तया सेविती भव्यदा-स ॥
तैसें पूजी अतिशयमुदें तो वसिष्ठा सभक्ति ।
प्रेमें प्रार्थी, चरणकमलें वंदुनी नम्रचित्तीं ॥ ९ ॥

ते राजपुत्र स-वधू, नृपती सराज्ञी । वंदीति सद्गुरुवसिष्ठपदां स्तवोनी ॥
सारेच वंदिति गुरूसि पुनःपुन्हां ते । आशीर्वचें मुनिवरें दिधलीं तयांतें ॥
प्रार्थीत त्या नृप अतीवचि भक्तिपूर्ण । तो पुत्रवित्त मुनिच्या पुढतीं करून ॥
त्यांतून घेत मुनिनायक दक्षिणेंतें । आशीर्वचें वितरि, हर्षवि भक्तचित्तें ॥११॥

सप्रेम ठेवुनि हृदीं प्रभुरामसीता । तो हृष्ट जाय मुनि आपुलिया निकेता॥
आमंत्रुनी द्विजवधू मग लोककान्तें । त्यां भूषणें सुवसनें दिलिं मूल्यवन्तें ॥
बोलावि तो मग समग्र सुवासिनींसी । दे त्यां यथेष्ठ वसनें बहुमूल्य तैसीं ॥
बोलावि सर्व मग वृत्तिपरां जनांना । दे त्यांस भूप अनुरूप धना, स-माना ॥
जे पाहुणे दयित, पूज्य असे नृपाचे । सन्मान त्यांसि नृप देइ अतीव साचे॥
पाहूनि देव रघुवर्यविवाहहर्षे । वानूनि त्या सृजिति हर्षुनि, पुष्पवर्षे !॥१४॥
होऊनि हृष्ट सुर जाति निजालयातें । वाद्यें प्रहर्षभरिं वाजविती किती ते ! ॥
ते एकमेकिं वदतां प्रभुरामकीर्ति । गाऊनि होति हृदिं भक्तिरसार्द्रमूर्ति ॥१५॥
सर्वांस सर्वपरिं भूप समानमानें । तो बोलवीत हृदयें अति आदरानें ॥
तेणें तदंतरिंहि मोद भरून दाटे । झाला कृतार्थ नरनाथ, उणें न कोठें ! ॥
अंतःपुरांत नृप जों मग ठेवि पाय । तों पाहि तो सुत वधूंसह तेथ राय ॥
अत्यंत हृष्टमनिं घेत तयांस अंकीं । तैं तत्सुखें कवण वर्णु शकेल लोकीं ? ॥
राया सुनांसि लडिवाळ निजांकिं घेत । गोंजारुनी करित त्यां किति हृष्टचित्त!
राज्ञी तसे सकल लोकहि हर्षमग्न । सान्यांचिया हृदयिं नांदत सौख्य पूर्ण ! !

शाया तयां कथित सर्व विवाहवृत्त । ऐकोनि तें, सकल हृष्ट अतीव होत ॥
वाखाणि भूप गुणशील महत्त्वरीति । प्रीती विचार धनिता जनकांतरीं ती !॥
तत्संपदा अतुल वानिलि भूपरायें । भाटांसही नच तसें जणुं वर्णितां ये !॥
ऐकोनि तें जनकवर्णन हर्षकारी । राज्ञी अतीव बुडल्या जणुं सौख्यपूरीं ! !

राजा पुत्रसमेत न्हाउनि, गुरू विप्रादि आप्तादिक ।
बोलावूनि तयांसवें करित तो सद्भोजनातें निक ॥
ऐशा रीति अतीत पंचघटिका रम्या तदा यामिनी ।
गाणीं सत्कुलकामिनी वरतनू गाती रसार्द्रा मनीं ! ॥२१॥

होतां भोजन आंचवून सकलीं तांबूल सेवीयले ।
स्रग्गन्धादिकिं भूषवूनि सगळे अत्यंत आनंदले ॥
नेत्रीं पाहुनि रामरूप हृदयीं घेऊनि, राजाज्ञया ।
सारे लागति वंदुनी जन गृहा आपापल्या जावया ॥२२॥

नांदे प्रेम, विनोद, मोद, गुरुता, सौंदर्य त्या लोकिं जें ।
यावें केविं कथावयास मजला औचित्यवाक्यें निजें ? ॥
येना जें शत शारदाक्षितिधरां वेदां गणेशा हरां ।
वेध्या, तें मज केविं ? काय किरडूं माथां धरी हे धरा ! ॥२३॥

बोलावि भूप मग गौरवुनी स्वराज्ञी । बोले मृदूक्ति वचनीं, सकलां परींनीं ॥
"आल्या वधू परगृहाहुनि लेकि माना !! डोळ्यांस पांपणि तशा तुम्हि व्हा तयांना!
झालीं मुलें श्रमित यां निजवा निवांत। निद्रा दिसे बिलगली जणुं डोळियांत !'
सांगोनि हें शयनमंदिरिं जाय भूप। चित्तांत सांठवुनि रामपदस्वरूप ! ॥
ऐकोनि ती सहजरम्य नृपालवाणी । रत्नाढ्य मंचक करीति सुसज्ज राज्ञी ॥
गोक्षीरफेनसम शुभ्र मनोज्ञ शय्या ।ज्यांचेवरी मृदुलशा गिरद्या उशा या ॥२६॥

सर्वांस रम्यवर आस्तरणें मृदूशीं । ज्यांची यथार्थ रुचि वर्णुनी येइ कशी ? ॥
माला सुगंध मणिमंदिरिं रत्नदीप।शोभा अशी विरचिली सकलीं अमूप ॥२७॥

अत्यंत शोभन मनोहर चांदवा तो । जो पाहिल्याविण न वर्णनशक्य होतो ! ॥
रामासि ऊठवुनि लाविति त्या निजाया। प्रेमेंचि सौख्यशयनावरि भूपजाया॥
श्रीराम बंधुसहि सांगि पुनःपुन्हां कीं।आपापल्या शयनिं तें निजती पलंकीं ॥
त्या श्याम मंजु सुकुमार बघोनि रामा।रामा विचारिति सकौतुकहर्षधामा ॥२९॥

"जातां पथीं अतिभयंकर ताटका रे ! । बाळा ! कशी वधिलि तूं वद वृत्त सारें ! ॥
जे घोर राक्षस, न जे रणिं जेय, तेवीं । मारीच मंथिशि सुबाहु समित्र केवीं ?
बाळा ! प्रसाद मुनिच्या पदपंकजांचा । त्यावांचुनी कठिणें मार्ग तुम्हांस कैंचा ?
बंधुद्वयें मुनिमखा तुम्हि रक्षियेलें । विद्यादिका गुरुकृपे तुम्हि मेळवीलें ॥२१॥
उद्धारिलें मुनिकलत्र पदाब्जधूलीं । ही कीर्ति सर्व भुवनांस भरूनि ठेली ! ॥
जें कच्छपृष्ठसम, वज्र तसें कठोर । तें तोडिशी शिवधनू नृपसंधिं थोर ! ॥२२॥
लब्धा जगद्विजयकीर्तिसरूप सीता । येशी गृहा सकलबन्धुविवाहकर्ता ॥
कर्में अमानुष तुझीं गमतात सारीं । ही सिद्धि कौशिककृपें सकलप्रकारीं ! ॥२३॥
आम्हां सुधन्य अजि जन्म गमेच्चि लोकीं । वत्सा! तुझ्या शशिमुखा अवलोकितों कीं!
गेले अदर्शनिं तुझ्या दिन आमुचे जे । त्यांचा विरिंचिकरिंही नच पार की जे!"
प्रेमार्द्र नम्र वच बोलुनि तोषवीतो । श्रीराम सर्व जननीहृदयांस कीं तो ॥
चित्तीं स्मरोनि हरसद्गुरुविप्रपादां । संकोचि निद्रित विभू नयनारविंदां ॥२५॥
निद्रेंतही प्रभुमुखांबुज तेविं साजे । सायंतनीं कमलभा जणुं मीलिता जे ! ॥
पौरांगना गृहिं गृहीं जणुं जागणाऱ्या । देती परस्पर उखाणिं, शुभाढ्य साऱ्या ॥
राज्ञी विनोदिं वदती 'रजनी विराजे । तैशी गडे ! नगरिही अतिरम्य साजे !' ॥
येती सुनांसि निज त्या निजतां पुढ्यांत । कीं नाग शीर्ष-मणि ते उरिं झांकतात !
झाले प्रभातिं जन जागृत पुण्यकालीं । जें कुक्कुट ध्वनति ते मधुरारवाली ॥
ते बंदि मागध करीति गुणानुवाद । द्वारांत येति जन वंदुं पदारविंद ॥२८॥
ते बंधु सर्व नमिती गुरुविप्रदेवां । मातापित्यां मिळविती शुभ आशि सर्वा ॥
माता पहाति सुखितें तनयाननांतें । जाती सभेंत सगळेच पित्यासवें ते ॥२९॥
सहजशुचितनू ते चारही बंधु जाती । शुभजलशरयूतें, स्नान तेथें करीती ॥
नियमितविधि सारे आचरूनि प्रभातीं । दशरथनिकटीं ते बुद्धिमान् पुत्र येती॥
निरखुनि तनयांतें, भूप घे त्यां उराशीं । बसति सकल तातें सांगतां चित्तहर्षीं॥
बघुनि रुचिर रामा हो सभा सुप्रसन्ना । निरवधि गमला तो लाभ तल्लोचनांना॥
आले वसिष्ठमुनि कौशिकही तदा ते । श्रेष्ठासनीं नृप तयां बसवी सुचित्तें ॥
पुत्रांसमेत मुनिवर्यपदाब्ज पूजी । दोनी मुनी रमति राघवमूर्ति-तेजीं ! ॥४२॥
धर्मेतिहास कथि उत्तम तें वसिष्ठ । राज्ञींसमेत नृपती परिसे सुतुष्ट ॥
सांगे वसिष्ठ मुनिनाहि अगम्यलील । हर्षेंचि गाधिजकथाकृति पुण्यशील ॥

त्या वामदेवमुनि तैं वदती 'यथार्थ। त्रैलोक्यिं गाधिजसुकीर्तिनदी वहात!' ॥
सर्वांसि मोद जरि ऐकुनि त्या वचातें। श्रीरामलक्ष्मण अतीवचि हृष्ट चित्तें!॥
आनंदमंगलमहोत्सविं या प्रकारें। जाती अनेक दिन हर्षभरें विहारें ॥
साकेतवासिजनता मुदिं पोहणारी। झाली निमग्न अधिकाधिक सौख्यपूरीं! ॥
हो लग्नकंकणविसर्जन सन्मुहूर्तीं। आनंदमंगलविनोदनिं चित्तपूर्ति ॥
साकेतिं नित्य नव सौख्यभरा पहाते। धात्यासि मागति पुन्हां सुर जन्म तेथें!
प्रार्थीति नित्य मुनि कौशिक जावयातें। प्रेमाग्रहेंचि रघुनाथ न सोडि त्यातें ॥
पाहूनि नित्य नृपभक्ति विवर्धणारी। तो त्या प्रशंसि नृपतीस मुनीश भारी ॥
तैं मागतां फिरुनियां गमना निरोप। राहोनि त्यापुढतिं पुत्रसमेत भूप ॥
सप्रेम बोलत "विभो! तुमचीच सारी। संपत्ति सेवकयुता, ससुता, स-नारी! ॥

राहो हे मुनिवर्य! नित्य तुमची मत्पुत्रि साधो! दया।
वारंवार घडो जि! दर्शन अम्हां जें देइ भव्योदया" ॥
प्रार्थोनी स-कलत्र-पुत्र मुनिच्या पायीं पडे भूपती।
प्रेमोद्रेकभरें भरे गहिंवरें; राहे मुकी भारती! ॥ ४९ ॥

आशीर्वादां वितरि सकलां त्यांस हर्षें मुनीश।
तत्प्रीतीचें कथन न असे शक्य केव्हांहि लेश ॥
जाई जेव्हां मुनिवर तदा पोंचवी राम त्यासी।
भ्रात्यांसंगें; मग परतती ते मुनीच्या निदेशीं ॥ ५० ॥

मार्गीं जातां मुनिवर मनीं चिंति रामस्वरूपा।
भक्तीही ती नृपहृदयिंची, त्या विवाहा अमूपा ॥
त्यां वाखाणी प्रमुदितमनीं गाधिज प्रीतिभावें।
प्रेमाधिक्यें भरुनि भरुनी चित्त त्याचें डुलावें! ॥५१॥

ज्ञानी वसिष्ठमुनि, त्यापरि वामदेव। ते गाति कौशिककथा सहभक्तिभाव ॥
ऐकोनि गाधिजयशा नृप आत्मचित्तीं। वाखाणि पुण्य अपुलें किति तो सभक्ति!
तेव्हां विसर्जुनि सभा नृप ये गृहातें। पुत्रांसमेत विलसे अतिहृष्ट चित्तें ॥
जेथें तिथें नगरिं रामविवाह गाती। व्यापी त्रिलोकिहि मनोरम रामकीर्ति ॥५२॥
करुनि निजविवाहा ये अयोध्येस राम। तिथुन खचित झाली ती पुरी हर्षधाम!
शकति न कधिं वर्णूं तद्विवाहोत्सवातें। अहिपति अथवा श्रीशारदा केंवि वा ते ॥

"जातां पथीं अतिभयंकर ताटका रे! । बाळा! कशी वधिलि तूं वद वृत्त सारें! ॥
जे घोर राक्षस, न जे रणिं जेय, तेवीं । मारीच मंथिशि सुबाहु समित्र केवीं ?
बाळा ! प्रसाद मुनिच्या पदपंकजांचा । त्यावांचुनी कठिनिं मार्ग तुम्हांस कैंचा ?
बंधुद्वयें मुनिमखां तुम्हिं रक्षियेलें । विद्यादिकां गुरुकृपें तुम्हिं मेळवीलें ॥३१॥
उद्धारिलें मुनिकलत्र पदाब्जधूलीं । ही कीर्ति सर्व भुवनांस भरूनि ठेली ! ॥
जें कच्छपृष्ठसम, वज्र तसें कठोर । तें तोडिशी शिवधनू नृपसंधिं थोर ! ॥३२॥
लब्धा जगद्विजयकीर्तिसरूप सीता । येशी गृहा सकलबन्धुविवाहकर्ता ॥
कर्मे अमानुष तुझीं गमतात सारीं । ही सिद्धि कौशिककृपें सकलप्रकारीं ! ॥३३॥
आम्हां सुधन्य अजिं जन्म गमेच्चि लोकीं । वत्सा! तुझ्या शशिमुखा अवलोकितों कीं!
गेले अदर्शनिं तुझ्या दिन आमुचे जे । त्यांचा विरिंचिकरिंही नच पार की जे!"
प्रेमार्द्र नम्र वच बोलुनि तोषवीतो । श्रीराम सर्व जननीहृदयांस कीं तो ॥
चित्तीं स्मरोनि हरसद्गुरुविप्रपादां । संकोचि निद्रित विभू नयनारविंदां ॥३५॥
निद्रेंतही प्रभुमुखांबुज तेविं साजे । सायंतनीं कमलभा जणुं मीलिता जे ! ॥
पौरांगना गृहिं गृहीं जणुं जागणाऱ्या । देती परस्पर उखाणिं, शुभाढ्य साऱ्या ॥
रात्री विनोदिं वदती 'रजनी विराजे । तैशी गडे ! नगरिही अतिरम्य साजे !' ॥
घेती सुनांसि निज त्या निजतां पुढ्यांत । कीं नाग शीर्ष-मणि ते उरिं झांकतात !
झाले प्रभातिं जन जागृत पुण्यकालीं । जें कुक्कुट ध्वनति ते मधुरारवाली ॥
ते बंदि मागध करीति गुणानुवाद । द्वारांत येति जन वंदुं पदारविंद ॥३८॥
ते बंधु सर्व नमिती गुरुविप्रदेवां । मातापित्यां मिळविती शुभ आशि सर्वां ॥
माता पहाति सुखितें तनयाननांतें । जाती सभेंत सगळेच पित्यासवें ते ॥३९॥
सहजशुचितनू ते चारही बंधु जाती । शुभजलशरयूतें, स्नान तेथें करीती ॥
नियमितविधि सारे आचरूनि प्रभातीं । दशरथनिकटीं ते बुद्धिमान् पुत्र येती॥
निरखुनि तनयांतें, भूप घे त्यां उराशीं। बसति सकल तातें सांगतां चित्तहर्षीं॥
बघुनि रुचिर रामा हो सभा सुप्रसन्ना। निरवधि गमला तो लाभ तल्लोचनांना॥
आले वसिष्ठमुनि कौशिकही तदा ते । श्रेष्ठासनीं नृप तयां बसवी सुचित्तें ॥
पुत्रांसमेत मुनिवर्यपदाब्ज पूजी । दोन्ही मुनी रमति राघवमूर्ति-तेजीं ! ॥४२॥
धर्मेतिहास कथि उत्तम तें वसिष्ठ । राज्ञींसमेत नृपती परिसे सुतुष्ट ॥
सांगे वसिष्ठ मुनिनाहि अगम्यलील । हर्षेचि गाधिजकथाकृति पुण्यशील ॥

त्या वामदेवमुनि तैं वदती 'यथार्थ । त्रैलोक्यिंय गाधिजसुकीर्तिनदी वहात!' ॥
सर्वांसि मोद जरि ऐकुनि त्या वचातें । श्रीरामलक्ष्मण अतीवचि हृष्ट चित्तें!॥
आनंदमंगलमहोत्सवि या प्रकारें । जाती अनेक दिन हर्षभरें विहारें ॥
साकेतवासिजनता मुदिं पोहणारी । झाली निमग्न अधिकाधिक सौख्यपूरीं! ॥
हो लग्नकंकणविसर्जन सन्मुहूर्तीं । आनंदमंगलविनोदनिं चित्तपूर्ति ॥
साकेतिं नित्य नव सौख्यभरा पहाते । धात्यासि मागति पुन्हां सुर जन्म तेथें!
प्रार्थीति नित्य मुनि कौशिक जावयातें । प्रेमाग्रहेंचि रघुनाथ न सोडि त्यांतें ॥
पाहूनि नित्य नृपभक्ति विवर्धणारी । तो त्या प्रशंसि नृपतीस मुनीश भारी ॥
तैं मागतां फिरुनियां गमना निरोप । राहोनि त्यापुढतिं पुत्रसमेत भूप ॥
सप्रेम बोलत "विभो! तुमचीच सारी । संपत्ति सेवकयुता, ससुता, स-नारी ! ॥

राहो हे मुनिवर्य ! नित्य तुमची मत्पुत्रि साधो ! दया ।
वारंवार घडो जि ! दर्शन अम्हां जें देइ भव्योदया " ॥
प्रार्थोनी स-कलत्र-पुत्र मुनिच्या पायीं पडे भूपती ।
प्रेमोद्रेकभरें भरे गहिंवरें; राहे मुकी भारती ! ॥ ४९ ॥

आशीर्वादां वितरि सकलां त्यांस हर्षें मुनीश ।
तत्प्रीतीचें कथन न असे शक्य केव्हांहि लेश ॥
जाई जेव्हां मुनिवर तदा पोंचवी राम त्यासी ।
भ्रात्यांसंगें; मग परतती ते मुनीच्या निदेशीं ॥ ५० ॥

मार्गीं जातां मुनिवर मनीं चिंति रामस्वरूपा ।
भक्तीही ती नृपहृदयिंची, त्या विवाहा अमूपा ॥
त्यां वाखाणी प्रमुदितमनीं गाधिज प्रीतिभावें ।
प्रेमाधिक्यें भरुनि भरुनी चित्त त्याचें डुलावें ! ॥५१॥

ज्ञानी वसिष्ठमुनि, त्यापरि वामदेव । ते गाति कौशिककथा सहभक्तिभाव ॥
ऐकोनि गाधिजयशा नृप आत्मचित्तीं । वाखाणि पुण्य अपुलें किति तो सभक्ति !
तेव्हां विसर्जुनि सभा नृप ये गृहातें । पुत्रांसमेत विलसे अतिहृष्ट चित्तें ॥
जेथें तिथें नगरिं रामविवाह गाती । व्यापी त्रिलोकिहि मनोरम रामकीर्ति ॥५३॥
करुनि निजविवाहा ये अयोध्येस राम । तिथुन खचित झाली ती पुरी हर्षधाम!
शकति न कधिं वर्णूं तद्विवाहोत्सवातें । अहिपति अथवा श्रीशारदा केधवां ते ॥

गणुनि कविकुलांचे जीवनस्थान पुण्य, । मतिमल हरणारे रामासीता शरण्य ॥
धवलयश तयांचें मंगलींच वाणी । कथिलि लव इथें मी उद्धराया स्ववाणी !
करावया पावन आत्मवाणी । श्रीरामकीर्ती तुलसीहि वर्णी ॥
अपार अशी रघुवीरगाथा । पलीकडे कोण कवीश जाता ? ! ॥५६॥
उपनयन-विवाह राघवाचे । परिसति सादर गाति जे स्ववाचें ॥
रघुवरजनकात्मजाप्रसादें । सततसुखीं रमणें तयांस साधे ! ॥५७॥
सीतारघूत्तमविवाह सभक्ति जे कीं । गातील ऐकतिल वा रसपूर्ण लोकीं ॥
लाभेल हर्षभर त्यांस सदा समस्त । कीं मंगलायतन रामयशेंचि मूर्त ! ॥५८॥

॥ इति श्रीमदयोध्याविश्रामपरमानन्दत्रैलोक्यवर्णनं नाम
पञ्चपञ्चाशत्तमस्तरङ्गः ॥

॥ इति श्रीमद्रामचरितमानसे सकलकलिकलुषविध्वंसने महाराष्ट्रभाषानुवादकाव्ये
'विमलसन्तोष-सम्पादनो' नाम प्रथमसोपानः समाप्तः ॥

—० ❀ ❀ इति बालकाण्डः समाप्तः ❀ ❀ ०—

श्रीतुलसीदासांच्या अमृतमया 'मानसा'स या श्लोकीं ॥
मी अनुवादुनि साधीं रामकृपेनेंचि धन्यता लोकीं ! ॥ १ ॥
श्रीखण्डकुलजन्मा चिन्तामणि-जानकीतनय 'राम' ॥
गाई आत्मच्छंदें 'रामायण' मानसाख्य रसधाम ॥ २ ॥
श्रीसीतारामयशें गाउनि हीं 'राम' वर्णि 'सीते'तें ॥
श्रीतुलसीदासकृपें मानसिं या सौख्य लाभतें तें तें ॥ ३ ॥
श्रीयादव-मुकुलादिक सज्जन मर्मज्ञ 'मानस'मराळ ॥
त्यांच्या कृपें विहरलों रामचरित्रार्थिं सहज मी बाळ ॥ ४ ॥
हा वाग्विहार माझा देवो संतोष सज्जनां रसिकां ॥
त्यांच्या आशीर्वादें पुढतिंहि कृति रम्य व्हावि ना असि कां ? ॥५॥

॥ श्रीसीतारामचन्द्रार्पणमस्तु ॥

॥ शुभमस्तु ॥

## — महत्त्वाचें शुद्धिपत्रक व अल्प टीप —

| तरंग | श्लोक | शुद्धशब्द |
|---|---|---|
| १ | १० | ० रात्रितम |
| २ | २ | मनिं बुद्धिवाणीं |
| ३ टीप | | सुरानीक–मद्यसमूह |
| ४ | २३ | कीं एक....दिव्यधाम |
| ७ | ५ | माहात्म्य |
| १२ | १७ | श्रीरामकीर्तिशरयू |
| १४ | २६ | अनुमान |
| १५ | १७ | अधिकाधिक |
| १५ | ७१ | तरि सुरसरिता |
| १७ | ३३ | स्मर फार अंतरीं |
| १७ | ३५ | भंगुनी |
| १८ | १ | न्याया लयासि |
| १८ | ५ | सुरांचिया हें |
| १८ | २३ | हस्तीं डमरूहि |
| २० | १ | हें विश्व गमे |
| २० | ८ | जे कान |
| २१ | १ | देई उडवुनि दुरीं |
| २१ | ६ | मनोमुकुरिं |
| २४ | ५ | जालंधर |
| २४ | २४ | क्रीडा ऐवजीं लीला वाचावें |
| २७ | २६ | निजराजधानिसी |
| २८ | १६ | हो तीच माझी |
| २९ | ६६ | स्वकीयजनसहित |
| २९ | ८३ | अंक ८३ हवा |
| २९ | ८४ | जप व तर हे शब्द नकोत |
| २९ | ८८ | भीतिव्याकुला |
| ३० | १ | बसोनि |
| ३१ | २३ | गुणसागर ( अनुस्वार नको ) |

| | | |
|---|---|---|
| ३५ | २ | आचरी तैं...भूरि इष्ट |
| ३५ | १२ | क्रीडा |
| ३६ | १९ | सुज्ञां मुनींच्या |
| ३७ | २० | निजकरांबुजें लीन जोडि ती वाचावें |
| ३७ | २३ | ज्ञानदर्शका ! हवें |
| ३७ | ३१ | कीर्ति |
| ३८ | २ | करीति ते ० |
| ३८ | २० | बोले सगद्गद नरेश ० |
| ३९ | १६ | पथिं गौतमपत्नी |
| ३९ | १९ | नाहींच संशय ० |
| ३९ | २२ | करि सौख्यपोष |
| ४२ | २२ | अपचिति म्हणजे पूजा |
| ४५ | ३ | चौथा चरण, 'नासिका, भृकुटि रम्य किती ती !' असा वाचावा |
| ४६ | ३४ | आज्ञा मिळेल |
| ४७ | २६ | नेत्रांबुही राहत |
| ४८ | ९ | चकोरशिशू |
| ४९ | ४२ | 'वाटे, तुम्हांस कधिं आज वरी न होता' वाचावें |
| ४९ | ५१ | ० बोलवुनि जोडुं ० |
| ४९ | ६२ | 'जेणें झडे कुसुमवर्षचि रम्य उक्ति !' वाचावें |
| ४९ | ८९ | स्वनें गभीरें |
| ५० | १४ | ० नीलमणि ० |
| ५० | ५० | दूतांसि बोलवुनि ० |
| ५२ | ४ | ० निवेदति तो यथार्थ |
| ५२ | १३ | चित्तांत सारे सुरही ० |

REFBK 0007850

REFBK-0007850

| | | |
|---|---|---|
| ३५ | २ | आचरी तैं...भूरि इष्ट |
| ३५ | १२ | क्रीडा |
| ३६ | १९ | सुज्ञां मुनींच्या |
| ३७ | २० | निजकरांबुजें लीन जोडि ती वाचावें |
| ३७ | २३ | ज्ञानदर्शका ! हवें |
| ३७ | ३१ | कीर्ति |
| ३८ | २ | करीति ते ० |
| ३८ | २० | बोले सगद्गद नरेश ० |
| ३९ | १६ | पथिं गौतमपत्नी |
| ३९ | १९ | नाहींच संशय ० |
| ३९ | २२ | करि सौख्यपोष |
| ४२ | २२ | अपचिति म्हणजे पूजा |
| ४५ | ३ | चौथा चरण, ' नासिका, भृकुटि रम्य किती ती ! ' असा वाचावा |
| ४६ | ३४ | आज्ञा मिळेल |
| ४७ | २६ | नेत्रांबुही राहत |
| ४८ | ९ | चकोरशिशू |
| ४९ | ४२ | 'वाटे, तुम्हांस कधिं आज वरी न होता' वाचावें |
| ४९ | ५१ | ० बोलवुनि जोडुं ० |
| ४९ | ६२ | 'जेणें झडे कुसुमवर्षचि रम्य उक्ति !' वाचावें |
| ४९ | ८९ | स्वनें गभीरें |
| ५० | १४ | ० नीलमणि ० |
| ५० | ५० | दूतांसि बोलवुनि ० |
| ५२ | ४ | ० निवेदति तो यथार्थ |
| ५२ | १३ | चित्तांत सारे सुरही ० |